सर्वसुखाचासागर ॥ जनीह्मणेसारंगधर ॥ ४ ॥

( ८ )

ज्याचासखाहरी ॥ त्यावरिविश्वरुपाकरी ॥ १ ॥
उणेंपडोंनेदीत्याचें ॥ वारेंसोसीआघाताचें ॥ २ ॥
तयावीणक्षणभरी ॥ कदाआपणनव्हेदूरी ॥ ३ ॥
आंगआुलेंवोढोनी ॥ त्यालाराखेजोनिर्वाणीं ॥ ४ ॥
ऐसाअंकीतभक्तासी ॥ ह्मणेनामयाचीदासी ॥ ५ ॥

( ९ )

जेंवींजेंवींगामुरारी ॥ तुजवाढितेंशीदोरी ॥ १ ॥
कनकाचीयेताटीं ॥ रत्नजडितठेविलीवाटी ॥ २ ॥
आमुचेंब्रह्मसारंगपाणी ॥ फिरतसेवनोवनीं ॥ ३ ॥
गोपाळांचेमेळीं ॥ करीतसेहोरांडोळी ॥ ४ ॥
तुळसीच्यावनीं ॥ उभीराहेदासीजनी ॥ ५ ॥

( १० )

जातिहीनचोखामेळा ॥ त्यालाभक्तीचाकळवळा ॥ १ ॥

त्याचाजालाह्मणीयारा ॥ राहेघरींधरीयारा ॥ २ ॥
देवजेवीतयाघरा ॥ त्याचाभक्तीभावखरा ॥ ३ ॥
देवराटवीलातेणें ॥ हांसेजनीगायगाणें ॥ ४ ॥

( ११ )

सुखेंसंसारकरावा ॥ माजिविठ्ठलआठवावा ॥ १ ॥
असोनियांदेहीं ॥ छायापुरुषजैसापाहीं ॥ २ ॥
जैसासूर्यघटाकाशीं ॥ तैसींदेहींजनीदासी ॥ ३ ॥

( १२ )

चोरासंगतीनेंगेला ॥ वाटेजातांनागवला ॥ १ ॥
तैसीसांडोनियांभक्ति ॥ धरीविषयाचीसंगती ॥ २ ॥
अग्नीसवेंखेळे ॥ नजळतीतरीपोळे ॥ ३ ॥
विश्वासलाचोरा ॥ जनीह्मणेघालाखरा ॥ ४ ॥

( १३ )

कोणेएकेदिवशीं ॥ विटोगेलाजनीपासीं ॥ १ ॥
हळुचमागतोखायासी ॥ कायदेऊंबामीतुसी ॥ २ ॥
हातींधरूननेलाआंत ॥ वाढीपंचामृतभात ॥ ३ ॥
प्रेमसुखाचाढेंकरदिला ॥ जनीह्मणेविटोधाला ॥ ४ ॥

( १४ )

लोलोलागलाअंबेचा ॥ विठाबाईआनंदीचा ॥ १ ॥
आदिटाणेंपंढरपुर ॥ नांदेकान्हाईसुंदर ॥ २ ॥
गोणाईनेंनवसकेला ॥ देवापुत्रदेईमला ॥ ३ ॥
शुद्धदेखोनियांभाव ॥ पोटींआलेनामदेव ॥ ४ ॥
दामाशेटीहरुषला ॥ दासीजनीसआनंदझाला ॥ ५ ॥

( १५ )

कायकरूंपंढरिनाथा ॥ काळसाह्यनाहींआतां ॥ १ ॥
मजटाकिलेंपरदेशीं ॥ नाहींविठ्ठलतुजपाशीं ॥ २ ॥
बहुश्रमझालेजीवा ॥ आतांसांभाळींकेशवा ॥ ३ ॥
तुजवीणसखाकोण ॥ माझेंकरींसमाधान ॥ ४ ॥
लीनदीनतुझेपोटीं ॥ जनीह्मणेदेईभेटी ॥ ५ ॥

## अभंग राजाईचे.

घरधन्यानींकेलागुरू ॥ बाईमीआतांकायकरूं ॥
असूननाहींहासंसारू ॥ चमत्कारूकृपेचा १ ॥
धांवपावगेमेसाई ॥ कवणाचेंहीनचलेकाई ॥
सत्यपणतुझियेठायीं ॥ असूननाहींसेंकरीहें ॥ २ ॥
मंत्रघेतलासेजैसा ॥ घरींसंताचाबोळसा ॥
बोसपडोयाहरिदासा ॥ गेलेनयेतीमागुती ॥ ३ ॥
कायसांगूंयाच्यारीती ॥ सोसेंपायवणीपिती ॥
अन्नघेभांबरभुतेंहोती ॥ नाचतातीआनंदें ॥ ४ ॥
एकमेकांच्यापडतीपायां ॥ लौकिकांतुनगेलेवांया ॥
ह्मणतीयेगापंढरीराया ॥ ब्रह्मानंदेंडुल्लती ॥ ५ ॥
भोळीसासूगोणाबाई ॥ पांढरास्फटिकव्यालीकाई ॥
त्यानेंजोडलाशेषशाई ॥ ह्मणेराजाईकायकरूं ॥ ६ ॥

## अभंग गोणाईचे.

( १ )

गोणाईह्मणेनाम्यासांडींदेवपिसें ॥ वळेंघरकैसेंबुडविसी ॥ १ ॥
जनाचींलेंकुरेंवर्ततातीकैशीं ॥ तूंमजजालासीकुळदीपु ॥ २ ॥
धन्यधन्यपुत्रकलत्रेंनांदती ॥ अभाग्याचेचित्तींपांडूरंग ॥ ३ ॥
यातेंजेअनुसरतीत्यांचेंनुरेकांहीं ॥ ह्यादेवनोहेपाहींघरघेणा ॥ ४ ॥
याचीभक्तीकैसीलौकिकावेगळी ॥ संसाराचीहोळीकेलीनाम्या ॥ ५ ॥
गोकूळांतचोरीकरुनीपोटभरी ॥ तोतुजनिर्धारींदेईलकाय ॥ ६ ॥
गोणाईह्मणेनाम्याहेंरेनव्हेभलें ॥ घरत्वांबुडविलेंकुळासहित ॥ ७ ॥

( २ )

दोनप्रहररात्रपाहोनीएकांत ॥ राजाईवृत्तांतसांगेमाते ॥ १ ॥
अहोरखुमाबाईविठोबासीसांगा ॥ भ्रताराशीकांगावेडेंकेलें ॥ २ ॥
वस्त्रपात्रनाहींखायाजेवायासी ॥ नाचेअहर्निशीनिर्लज्जसा ॥ ३ ॥
चवदामनुष्येंआहेतमाझेघरीं ॥ हिंडतीदारोदारींअन्नासाठीं ॥ ४ ॥
बरामार्गतुह्मीउमजोनोसांगा ॥ नामयाचीराजाभलीनव्हे ॥ ५ ॥

## अभंग गोंदोबाचे.

भावेंभक्तिवादेंकरावेंकीर्तन ॥ आशाबद्धमनकरूंनये ॥ १ ॥
अन्नपाणीमनअवधानारायण ॥ विठ्ठलावांचोनबोलूंनये ॥ २ ॥
निष्कामेंकरावेंदेवाचेंकीर्तन ॥ भयहेंसांडूनशरीराचें ॥ ३ ॥
रणामध्येंकैसाभिडतोरणशूर ॥ होवोनीउदारजीवावरी ॥ ४ ॥
तैसापांडुरंगींधराहोनिर्धार ॥ उतराहापारभवसिंधु ॥ ५ ॥
सिंधुउतरोनीलावाजगढाल ॥ पाहातेंनवलविठ्ठलाचें ॥ ६ ॥
देवजोडियेलातयाकायऊन ॥ गोंदाह्मणेमनधीटकरा ॥ ७ ॥

---

## एकनाथ.

समाधि शके १५४६—इ० स० १६२४.

### याचे प्रसिद्ध ग्रंथ.

एकनाथी भागवत. शके १४९५. रुक्मिणीस्वयंवर.
एकनाथीरामायण. स्वात्मसुख.

### वेंचे रामायणांतील.

ओंव्या.

याउपरिकायकर्तव्यता ॥ श्रीरामपुसेसमस्तां ॥ अवघेह्मणतीरघुनाथा ॥ युद्धतत्वतांकरावें ॥ १ ॥ ससैन्यमारावेंलंकानाथा ॥ विचारकायसापैं आतां ॥ ऐसेंसमस्तींसांगतां ॥ तेंरघुनाथानमाने ॥ २ ॥ जेजेराजधर्मविहित ॥ तेणेंचिसाधेपरमार्थ ॥ ऐसेधर्मरघुनाथ ॥ उपपादीतशास्त्रार्थु ॥३॥ अतिशयेंजोसमर्थ ॥ शिष्टधाडावालंकेंत ॥ ऐसेंबोलतांरघुनाथ ॥ कपिसमस्तक्षोभले ॥ ४ ॥ आपुलीचोरूनिनेलीसीता ॥ आपणाचिशिष्टपाठवावाआतां ॥ हेंतंवअयुक्तरघुनाथा ॥ युद्धकरितांभयकाय ॥ ५ ॥ ऐसें बोलतांसमस्त ॥ रामसांगेराजधर्मार्थ ॥ भूतदयापरमार्थ ॥ समन्वितउपपादी ॥ ६ ॥ युद्धधर्मचतुर्विध ॥ सामदानदंडभेद ॥ हेअनादिसिद्धप्रसिद्ध ॥ विशदभेदवर्णिले ॥ ७ ॥ युद्धसमयींसामानुक्रम ॥ हाचिमुख्यत्वेंराजधर्म ॥ सामींभूतदयासंभ्रम ॥ सामचिहोयपरमार्थ ॥ ८ ॥ सामनकरितांजेजाण ॥ युद्धकरितातिदारुण ॥ असंख्यमरतीप्राणीजन ॥ हत्याकवणसोशील ॥ ९ ॥ ऐकोनिरामाचेंवचन ॥ हनुमानूघालीलोटांगण ॥

अंगदसुग्रीवविभीषण ॥ वानरगणासमवेत ॥ १० ॥ पडतांवानरांचेंअनु
मोदन ॥ स्वयेंपुसेरघुनंदन ॥ शिष्टपाठवावाकोण ॥ तोनिवडोनिसांगामज
॥११॥ शिष्टनसावामहाभ्याड ॥ शिष्टेंनधरावीभीड ॥ शिष्टबोलकासुघड ॥
निवडाप्रौढनिजबुद्धीं ॥१२॥ शिष्टपाहिजेचपळचतुर ॥ देऊंजाणेप्रत्युत्तर ॥
राहोनियांधुरेसमोर ॥ स्वामिकार्यसाधक ॥ १३ ॥ हनुमान्ह्मणेरघुनंदना ॥
वानरवीरांचीगणना ॥ वीसपद्मेंसंख्याजाणा ॥ आंगवणेंअतिवळी ॥
॥ १४ ॥ यांहिमाजीवाळीसुत ॥ अंगदवळेंविख्यात ॥ रावणाचेसभेआं
त ॥ अतिसमर्थबोलावया ॥ १५ ॥ अंगदबोलेनिनिधोट ॥ अंगदवीरधी
रसुभट ॥ गांजूंशकेदशकंठ ॥ तोचिशिष्टयोजावा ॥ १६ ॥ पाचारूनिअं
गदासी ॥ रामआलिंगीत्हृदयासीं ॥ शिष्टहोऊनीरावणापासीं ॥ सांगें
त्यासीमद्वाक्य ॥१७॥ दंडासिकारणमुख्यचोरी ॥ तुवांचोरिलीमाझीनारी ॥
तुजदंडावयाबाणधारी ॥ आलोंनिर्धारींमीराम ॥ १८ ॥ मुख्यत्वेंपरदाराह
रण ॥ तुझ्यामरणाचेंकारण ॥ दुर्धरसुटल्यामाझेबाण ॥ तुजलाकोणराखे
ल ॥ १९ ॥ यालागिंतूंअर्पीसीता ॥ शरणजाईंअयोध्यानाथा ॥ लंकानि
जराज्यींस्वस्थता ॥ तरीचतूतेंहोईल ॥ २० ॥ ऐसेंश्रीरामेंआपण ॥ स्वमु
खेंअंगदासांगून ॥ अमृतफळेंदेऊनीजाण ॥ करवीगमनलंकेशी ॥ २१ ॥
अंगदह्मणेश्रीरघुनाथा ॥ आज्ञाप्रमाणजीसमर्था ॥ स्वयेंपुरुषार्थबोलतां ॥
आंगींमूर्खतायेऊंपाहे ॥ २२ ॥ श्रीरामासिनमस्कार ॥ करूनीमुखींनाम
गजर ॥ अवलोकूनीलंकापुर ॥ अंगदवीरउडाला ॥ २३ ॥ जैसाश्रीरामा
च्याबाण ॥ तैसेंअंगदाचेंउड्डाण ॥ सत्वरक्रमूनिगगन ॥ आलाआपणलंके
सी ॥ २४ ॥ रावणसभेपुढेंजाण ॥ आलेंअंगदाचेंउड्डाण ॥ तेणेंदचकलाद
शानन ॥ कंपायमानभयभीत ॥ २५ ॥ अवध्यांचाकरावयाघात ॥ पुढती
आलारेहनुमंत ॥ ऐसावळसालंकेआंत ॥ अतिआकांतराक्षसां ॥ २६ ॥
अंगदासींसन्मुख ॥ बोलेंनशकेदशमुख ॥ आणीककोणबोलेमशक ॥ झा
लीटकमकराक्षसां ॥ २७ ॥ मीअतिथीआलोंसभेंत ॥ कोणीनपुसांस्वाग
त ॥ भयेंझालांअतिभ्रांत ॥ निश्चितमहामूर्खहो ॥ २८ ॥ हनुमंतअशोकव
नींबळी ॥ केलीराक्षसांरवंदळी ॥ तेणेंतुह्मांदांतखिळी ॥ वचनावळीखुंट
ली ॥२९॥ ऐकोनिअंगदाचेंवचन ॥ दुरुक्तिबोलामाजिछळण ॥ स्वयेंअनुवा
देरावण ॥ सावधानअवधारा ॥ ३० ॥ सांडूनिदुर्गद्वारभूमी ॥ तूंआला

सीअमार्गगामी ॥ यास्तवतुजसींनबोलोंआह्मी ॥ मौनानुक्रमेंराहिलों ॥
॥ ३१ ॥ अमार्गगामीयासींभाषण ॥ हेंतोआह्मांअतिदूषण ॥ ऐकोनिरा
वणाचेंवचन ॥ हास्यआलेंअंगदा ॥ ३२ ॥ रावणाऐकसावधान ॥ देखे
पुढिलाचेअवगुण ॥ आपुलेनदेखेदुर्गुण ॥ रासभपूर्णतोएक ॥ ३३ ॥ मुख्य
अधर्मतस्करपण ॥ तेंहीपरदाराहरण ॥ तैसातूंपापीरावण ॥ काळेंवदन
त्रैलोकीं ॥ ३४ ॥ अंगदखवळलादेखोन ॥ चळचळकांपेदशानन ॥ ह्म
णतीराक्षसप्रधान ॥ दुसरेंविघ्नहेंआलें ॥ ३५ ॥ पहिलाकरूनिगेलाहोळी ॥
दुसरात्याहूनिआलाबळी ॥ राक्षसकांपतीचळचळीं ॥ आतुर्बळीवानर
॥ ३६ ॥ रावणासन्मुखसिंहासनीं ॥ अंगदबैसलापुच्छासनीं ॥ वांकुल्या
दावीफळेंखाउनी ॥ मिचकाऊनिनयनांतें ॥ ३७ ॥ अंगदबैसलादेखोन ॥
हळूचपुसेदशानन ॥ हनुमान्नव्हेसितरीतूंकोण ॥ किमर्थयेथेंआलासी
॥ ३८ ॥ ऐसेंपुसतांलंकानाथ ॥ अंगदआपुलावृत्तांत ॥ स्वयेंअसेपैसांग
त ॥ रघुनाथातेंस्मरोनी ॥ ३९ ॥ जेणेंमारीचमारिलावनांत ॥ खरदूषणा
केलाघात ॥ त्याश्रीरामाचामीदूत ॥ वाळिसुतअंगद ॥ ४० ॥ रावणा
घालूनिकाखेतळीं ॥ समुद्रींकेल्याआंघोळी ॥ त्याचापुत्रमीआतुर्बळी ॥
आलोंतुजजवळीतेंऐक ॥ ४१ ॥ सीतादेऊनिशरणागत ॥ झाल्यावांचेल
लंकानाथ ॥ नातरीत्याचाकरीनघात ॥ ऐसेंरघुनाथबोलिला ॥ ४२ ॥ धि
कूरामाचापुरुषार्थ ॥ धिक्धिक्तुझाहीवळार्थ ॥ जेणेंकेलापितृघात ॥ त्या
चादूतह्मणविशी ॥ ४३ ॥ ठकूनिकेलापितृघात ॥ मातेसीदुजायोजिला
कांत ॥ ऐसानष्टजोरघुनाथ ॥ त्याचादूतह्मणविशी ॥ ४४ ॥ अंगदाऐ
सानिलाजिरा ॥ पाहतांऐसानदिसेदुसरा ॥ कायमुखदाखविशीवानरा ॥
रिघोनिसागरींजीवदेईं ॥ ४५ ॥ नातरीकरींआडविहिरी ॥ पोटींघालोनि
घेईंसुरी ॥ जळोजळोतुझीथोरी ॥ निंद्यसंसारींतूंएक ॥ ४६ ॥ साधावयापि
तृकार्यार्थ ॥ मिथ्याह्मणसीरामदूत ॥ हाहीकळलामजभावार्थ ॥ शरणा
गततूंमाझा ॥४७॥ मारूनिरामलक्ष्मण ॥ करूनिसुग्रीवाचेंहनन ॥ तुज
किष्किंधादेईन ॥ सत्यवचनहेंमाझें ॥४८॥ ऐसेंबोलतांदशानन ॥ अंगद
झालाहास्यवदन ॥ खोचूनिदेतसेप्रतिवचन ॥ तेंसावधानअवधारा ॥ ४९ ॥
स्वयंवरींधनुष्यबाण ॥ चढवितांसभेंतपडलासिउलथोन ॥ तुझेंअंगींन
पुंसकपण ॥ केंवीशरणम्याव्हावें ॥ ५० ॥ बहुतऐकिलेरावण ॥ त्यामाजि
दूंकवण ॥ त्याचेंविविधलक्षण ॥ विचक्षणजाणती ॥ ५१ रावणदशमुखा

चेंकिडें ॥ किंवापातलेंघुंगुरडें ॥ बळीनपाहेतयाकडे ॥ तोकोणतारावण
॥ ५२ ॥ विचित्रदेखोनिवानरीं ॥ मजअंगदाच्यापाळण्यावरी ॥ रावणबांधि
लाखेळण्यापरी ॥ हेमसूत्रींशृंखळे ॥ ५३ ॥ त्यांतीलतूंकोणतारावण ॥ हेंपु
सावेंनलगेजाण ॥ माझ्यापदलत्तांचेवण ॥ मुखींसंपूर्णदीसती ॥ ५४ ॥
माझ्यामुताचीबाळधार ॥ मुखींपडतांनिरंतर ॥ झालेसचिन्हउभयअधर ॥ ते
हेउघडदीसती ॥ ५५ ॥ तोतूंअतिशयदीनहीन ॥ भद्रींबैसलासीरावण ॥ तु
जकैंचीआंगवण ॥ करावयारणरामासीं ॥ ५६ ॥ अंगदाचेवाग्बाण ॥ त्द
दयींखोंचलेसंपूर्ण ॥ तेणेंतळमळीरावण ॥ प्राणजावूंपाहाती ॥ ५७ ॥ सभे
सिबैसेनिवानरा ॥ कितीजल्पसीसैरावैरा ॥ तोंडानाहींवोढावारा ॥ दश
शिरानोळखिसी ॥ ५८ ॥ ऐकेंमाझीआंगवण ॥ बंदींघातलेसुरगण ॥ रामबा
पुडेंतेंकोण ॥ मजसीरणकरावया ॥ ५९ ॥ इंद्रचंद्रादिसकळसुर ॥ माझेघर
चेझालेचाकर ॥ मद्भयेंकांपतीथरथर ॥ अहर्निशीराबती ॥ ६० ॥ रामवा
पुडेंकेवळनर ॥ आमुचेंखाजुगेंग्रासमात्र ॥ वानरजेकावनचर ॥ धाकेंचि
संग्रामींमरतील ॥ ६१ ॥ मुख्यभक्ष्यरामलक्ष्मण ॥ मर्कटेंकोंशिबरीजाण ॥
एकाग्रासेंकुंभकर्ण ॥ भक्षीलआपणक्षणार्धें ॥ ६२ ॥ ऐकरेरावणादुर्मती ॥
दुष्टबुद्धीदुष्टरीती ॥ चैतन्यविग्रहीराममूर्ती ॥ त्याप्रतीमनुष्यह्मणसीतूं ॥
॥ ६३ ॥ श्रीरामाचासेवक ॥ हनुमंतएकलाएक ॥ तेणेंमर्दूनितुझें
कटक ॥ तुझेंमुखजाळिलें ॥ ६४ ॥ तेणेंगांजिलासिझोंडा ॥ सभेसिबैससीकाळ
तोंडा ॥ वृथाजल्पसीबळबंडा ॥ ऐकलंडानिजहित ॥ ६५ ॥ सीताअर्पूनि
आपण ॥ रामासिरिघालियाशरण ॥ तैंचवांचतीतुझेप्राण ॥ एऱ्हवींमर
णतुजआलें ॥ ६६ ॥ सीतारामासिनदेतांजाण ॥ रावणातुजराखेलकोण ॥ मी
चतुझाघेईनप्राण ॥ आंगवणपाहेंहीमाझी ॥ ६७ ॥ रावणातुझींदहाशिरें ॥
मीचछेदितोंनखाग्रें ॥ परितींशिवस्वअपवित्रें ॥ ह्मणोनिकरेंस्पर्शेंना ॥ ६८ ॥
अंगदआदळलाआंगासी ॥ बोलिलानिष्ठुरवाक्यासी ॥ तेणेंरावणकासा
विसी ॥ अतिकोपेंसींकोपला ॥ ६९ ॥ वांचवावयाआपणास ॥ क्रोधेंसां
गेप्रधानास ॥ धरामारावानरास ॥ मजसभेंतनिर्भर्त्सी ॥ ७० ॥ कांहींनधरि
तांभीड ॥ सभेमध्येंहामाकड ॥ माझेंह्मणेकाळेंतोंड ॥ खंडविखंडकराया
सी ॥ ७१ ॥ ऐकोनिरावणाचेंवचन ॥ अंगदधरावयाजाण ॥ सैन्यसेनानीप्रधा
न ॥ अतिगर्जोनीउठले ॥ ७२ ॥ कटींपुच्छींबाहुमूळीं ॥ अंगदधरिलाराक्ष
सींसकळीं ॥ तयासहिततोआतुर्बळी ॥ वेगेंतात्काळींउडाला ॥ ७३ ॥ आं

गझाडिलेंअंतराळीं ॥ राक्षसींधरिलातोवळी ॥ अंगवातेंपडोनितळीं ॥ झालीरांगोळीअवघ्यांची ॥ ७४ ॥ स्वयेंमारूंनयेरावण ॥ अंगदजाणोनिआपण ॥ पायींदडपोनिदशानन ॥ मुकुटहिरोनिघेतला ॥ ७५ ॥ मुकुटघेऊनिआपण ॥ अंगदउडालासत्राण ॥ शिरेमंडपउचलिलापूर्ण ॥ हेंनाहींअवगतअंगदा ॥ ७६ ॥ मंडपदेखोनियांमाथां ॥ कोपआलाश्रीरघुनाथा ॥ अंगदाकेलीअधर्मता ॥ दत्तअर्थआणिला ॥ ७७ ॥ अंगदह्मणेश्रीरघुनाथा ॥ म्यांनिजवळेंउडतां ॥ केव्हांमंडपबैसलामाथां ॥ मजनकळतांयेथेंआला ॥ ७८ ॥ ऐशींसहस्रस्तंभज्याशी ॥ ऐसामंडपघेऊनिसहजेशीं ॥ पुनरपिनेऊनिलंकेशी ॥ ठेवीस्वस्थानींअंगद ॥ ७९ ॥ श्रीरामेंमुकुटघेऊन ॥ पाचारिलाविभीषण ॥ त्याचेमस्तकींआपण ॥ संतोषोनिघातला ॥ ८० ॥

## वेंचे, एकनाथी भागवतांतील.

### ओंव्या.

#### अध्याय बेविसावा.

आत्मापरिज्ञानमयशुद्ध ॥ हेंश्लोकींचेंमूळपद ॥ तेणेंअज्ञानेसींनिरसेभेद ॥ आत्माशुद्धबुद्धचिद्रूप ॥ ८० ॥ जेंविसनक्षत्ररजनी ॥ निवटीतुप्रगटेतरणी ॥ तेंविसभेदकार्यनिरसुनी ॥ प्रगटेचित्किरणींचिदाभासु ॥ ८१ ॥ तेथगुणेंसींमायाउपडे ॥ भेदेशींवादवुडे ॥ मुळेसींअज्ञानखुडे ॥ चहूंकडेसच्चिदानंदु ॥ ८२ ॥ आत्मासच्चिदानंदपूर्ण ॥ तेथसमूळमिथ्याअज्ञान ॥ तेंअज्ञाननिरसीसाधन ॥ विवेकेंसांख्यज्ञानव्यर्थदिसे ॥ ८३ ॥ तेंचिविशीचेंनिरोपण ॥ श्लोकार्थेंसुलक्षण ॥ स्वयेंसांगताहेश्रीकृष्ण ॥ साध्यसाधनविभागें ॥ ८४ ॥ मुळींसमूळमिथ्याअज्ञान ॥ अज्ञानजन्यविषयभान ॥ तेंदेखोनिभुललेजन ॥ पडिलेंविस्मरणस्वस्वरूपीं ॥ ८५ ॥ मीपरमात्माहृदयस्थुसंनिधी ॥ त्यामजपासूनिउपरमेबुद्धी ॥ मगविषयासक्तित्रिशुद्धी ॥ आवडेउपाधीदेहद्वारा ॥ ८६ ॥ जेंस्वरूपाचेंविस्मरण ॥ तें वाढवीतीव्रविषयध्यान ॥ तेणेंजीवासिजन्ममरण ॥ अनिवारजाणदेहाभिमान ॥ ८७ ॥ तोनासावयादेहाभिमान ॥ वैराग्ययुक्तज्ञानध्यान ॥ मीचिबोलिलोंसाधन ॥ समूळअज्ञानछेदक ॥ ८८ ॥ जंववरीआंगींदेहाभिमान ॥ तंवअवश्यपाहिजेसाधन ॥ निःशेषनिरसल्याअज्ञान ॥ वृथासा

धनमीहीमानीं ॥ ८९ ॥ ह्मणसीतेंकोणपांअज्ञान ॥ जेंशुद्धासीलावीजीव
पण ॥ त्याजीवाआंगींजन्ममरण ॥ अनिवारजाणवाढवी ॥ ९० ॥ स्वस्व
रूपाविसरोनिजाण ॥ देहींस्फुरेमीपण ॥ अत्यंतदृढतरअज्ञान ॥ तोदेहा
भिमानउद्धवा ॥ ९१ ॥ गौणनांवत्याचेंअज्ञान ॥ येऱ्हवींमुख्यत्वेंदेहाभि
मान ॥ हेंऐकोनिदेवाचेंवचन ॥ दचकलेंमनउद्धवाचें ॥ ९२ ॥ तेचि
अर्थींचाप्रश्न ॥ देवासीपुसेआपण ॥ कोण्यायुक्तीदेहाभिमान ॥ जन्ममरण
भोगवी ॥ ९३ ॥ सर्वत्रसदासन्मुखगगन ॥ त्यासीकदाघडेनाविमुखपण ॥
तेंविआत्मासबाह्यपरिपूर्ण ॥ वृत्तिविमुखजाणहोयकैशी ॥ ९४ ॥ जैं
जाळींबांधवेगगन ॥ तैंक्रियालागेकर्मबंधन ॥ वंध्यागर्भसटवेसंपूर्ण ॥
तैंजन्ममरणमुक्तासी ॥ ९५ ॥ आत्म्यावेगळेंकांहीं ॥ रितेंतंवउरलेंचि
नाहीं ॥ तरियेदेहींचीतेदेहीं ॥ गमनसिद्धीपाहींकैसेनी ॥ ९६ ॥ पृथ्वी
रुसोनिवोसराहे ॥ आकाशपळोनिपऱ्हाजाये ॥ तैंदेहींचादेहांतरींपाहे ॥
आत्मालाहेसंसरण ॥ ९७ ॥ सातहीसमुद्रगिळीमुंगी ॥ तैंआत्माउंचनीच
योनीभोगी ॥ हेंअतर्कतर्केनामार्गीं ॥ भुललेयोगीयेअर्थीं ॥ ९८ ॥
अभिनवहेतुझीगती ॥ सर्वथानकळेश्रीपती ॥ मायामोहीतजेचित्तीं ॥
त्यांतुझीस्थितीनेणवे ॥ ९९ ॥ तूंआत्माअद्वैतअविनाशु ॥ तेथउत्पत्ति
स्थितिविनाशु ॥ नाथिलादाविशीभवभासु ॥ हेअतर्कलीलातर्केना ॥
॥ १०० ॥ येथवेदाचीयुक्तीठेली ॥ उपनिषदेंवेडावलीं ॥ पुराणेंमुक्कींजा
हलीं ॥ अतियत्नेंलक्षिलींनवचतीपुढां ॥ १ ॥ तुझेंकेवळरूपेंवीण ॥
तुझेंइत्थंभूतनव्हेज्ञान ॥ ऐसेजडमूढहरिरूपाहीन ॥ त्यांसिभवबंधनसुटेना
॥ २ ॥ तुझीयोगमायेचीअतर्क्यता ॥ ब्रह्माभुलविलावत्सेंनेतां ॥ शिऊ
भुलविलामोहनीदेखतां ॥ इतरांचीकथातेकोण ॥ ३ ॥ प्रपंचींअथवा
परमार्थीं ॥ तुझेनिचालतीइंद्रियवृत्ती ॥ यालागिंगोविंदनामाचीख्याती ॥
त्रिजगतीवाखाणी ॥ ४ ॥ सादररूपापूर्वकआपण ॥ माझासांगाअत
र्क्यप्रश्न ॥ देहीसदेहांतरसंसरण ॥ जीवासीजन्ममरणतेंकैसें ॥ ५ ॥ ऐको
निउद्धवाचाप्रश्न ॥ हांसिनलामधुसूदन ॥ हेंअवघेंमाइकजाण ॥ कल्प
नाविंदाणमनोमय ॥ ६ ॥ अकराइंद्रियेंपंचमहाभूतें ॥ हेसोळादेहाचेंलिं
गदेहयेथें ॥ मुख्यत्वेंप्राधान्यमनाचेंनेथें ॥ नानाविषयातेंकल्पक ॥ ७ ॥
येथलिंगदेहतोचिमन ॥ मनाअधीनइंद्रियेंजाण ॥ मनाचेंनिदेहागमन ॥
तेथदेहाभिमानमनासवें ॥ ८ ॥ मनज्यातेंसांडूनिजाये ॥ तेथअभिमान

उभानराहे ॥ मनयोगेंअभिमानपाहें ॥ देहाचावाहेखटाटोप ॥ ९ ॥ ते
थविषयासक्तमन ॥ करीशुभाशुभकर्माचरण ॥ तेव्हांहोऊनिकर्माधीन ॥
देहीकरीगमनदेहांतरा ॥ १० ॥ आत्मात्यासिंअलिप्तभिन्न ॥ परीदेहास
वेंदावीगमन ॥ हेंअतिअतर्क्यविंदाण ॥ ऐकलक्षणतयाचें ॥ ११ ॥ घटू
जेथजेथहिंडोंवैसे ॥ आकाशत्यासवेंजातदिसे ॥ परीढळणेंनाहींआका
शें ॥ आत्म्याचेंतैसेंगमनयेथें ॥ १२ ॥ घटामाजिभरिजेअमृत ॥ अथवा
घालिजेखातमूत ॥ आकाशदोंहींतेंअलिप्त ॥ तेंविसुखदुःखातीतदेहस्थ
आत्मा ॥ १३ ॥ घटूघायेंकरिजेशतचूर ॥ परीआकाशासीननिघेचीर ॥
तेंविनश्वरींअनश्वर ॥ जाणसाचारनिजात्मा ॥ १४ ॥ घटूफुटोनिजेथ
नासे ॥ तेथआकाशसहजेंअसे ॥ नवाघटुजेथउपजोंवैसे ॥ तोतेथेंचिआ
काशेंव्यापिजे ॥ १५ ॥ तेंविदेहाचेंनश्वरपण ॥ आत्माअखंडत्वेंपरिपूर्ण ॥
आत्म्यासिंदेहांतरगमन ॥ जन्ममरणअसेना ॥ १६ ॥ देहींचेंदेहांतरगम
न ॥ वासनायोगेंकरीमन ॥ तेंमनोगमनाचेंलक्षण ॥ ऐकसंपूर्णसांगेन ॥
॥ १७ ॥ श्रुतदृष्टविषयाचेंध्यान ॥ निरंतरवाढवीमन ॥ तीव्रधारणादा
रुण ॥ अन्यस्फुरणस्फुरेना ॥ १८ ॥ आवडल्याविषयाचेंध्यान ॥ अंत-
काळींठसावेजाण ॥ तेव्हांतदाकारहोयमन ॥ सर्वभावेंआपणतन्निष्ठ ॥
॥ १९ ॥ तेव्हांभोगक्षयेंजाण ॥ मागिल्यादेहाचाअभिमान ॥ सहजेंचि
विसरेमन ॥ पुढीलध्यानएकाग्रता ॥ २० ॥ विषयवासनारूढमन ॥ नि
जकर्मतंत्रेंजाण ॥ देहांतराकरीगमन ॥ तेथसप्रमाणसंचरे ॥ २१ ॥
मागीलसांडल्यादेहातें ॥ सर्वथास्मरेनाचित्तें ॥ पुढेंधरिलेंआणिकातें ॥ तें
हीमनातेंस्फुरेना ॥ २२ ॥ विषयाभिनिवेशेंमन ॥ ज्यास्वरूपाचेंकरी
ध्यान ॥ तद्रूपहोयआपण ॥ पूर्वदेहाचेंस्मरणविसरोनियां ॥ २३ ॥ तें
चिविसरेकैसें ॥ निजबाळत्वप्रौढदशे ॥ निःशेषनाठवेमानसें ॥ पूर्वदेहतै
सेंविसरोनिजाय ॥ २४ ॥ असेंअत्यंतविस्मरण ॥ त्यानांवदेहाचेंमरण ॥
त्याविसरासवेंजाण ॥ चेतनासप्राणनिघोनिजाय ॥ २५ ॥ जेव्हांचेत
नाजायसप्राण ॥ तेव्हांदेहासियेतप्रेतपण ॥ यानांवउद्भवामरण ॥ ज
न्मकथनतेंऐकें ॥ २६ ॥ स्नेहेंद्वेषेंअथवाभयें ॥ अंतकाळींजेंध्यानराहे ॥
पुरुषतद्रूपचिहोय ॥ जन्महिलाहेतैसेंचि ॥ २७ ॥ भरथुकरितांअनुष्ठान ॥
आंगींलागलेंमृगाचेंध्यान ॥ तोमृगाचिजाहलाआपण ॥ ध्यानानुरूपें
जनमन्मपावे ॥ २८ ॥ भयास्तवभृंगीचेंध्यान ॥ कीटकासीकरितांजाण ॥

तेंतद्रूपहोयआपण ॥ ध्यानानुरूपेंमनजन्मपावे ॥ २९ ॥ द्वेषेंध्यातांश्रीकृ
ष्णासी ॥ तद्रूपताजाहलीपौंड्रिकासी ॥ जैसेंदृढध्यानमानसीं ॥ तेगतीपु
रुषासित्रिशुद्धी ॥ ३० ॥ वाढवूनियांसंभ्रम ॥ अंतकाळींआवडेसप्रेम ॥
जेंध्यानठसावेमनोरम ॥ तेंचिजन्मपुरुषासी ॥ ३१ ॥ मनतेणेंध्यानानु
भावें ॥ जैसाकांहींआकारूसंभवे ॥ तेथदेहाभिमानपावे ॥ हेंमीअवघे
ह्मणोनी ॥ ३२ ॥ येथमनआणिअभिमान ॥ स्वरूपएककांहींभिन्न ॥
हेंचित्तचतुष्टयलक्षण ॥ जाणतीसज्ञानएकात्मता ॥ ३३ ॥ दैवयोगेंत्या
देहाचें ॥ बरेंवोखटेंघडेसाचें ॥ तेंअभिमानघेऊनिनाचे ॥ जन्मपुरुषाचें
यानांव ॥ ३४ ॥ परिदेहनवेंआन ॥ देहीस्मरेनातेंमन ॥ पूर्वीलजोदेहा
भिमान ॥ तोचियेथजाणआरोपी ॥ ३५ ॥ येचिअर्थींचादृष्टांतु ॥ स्वयें
सांगताहेकृष्णनाथु ॥ जेंविस्वप्नआणिमनोरथु ॥ विसरवितुनिजदेहा ॥
॥ ३६ ॥ स्वगृहींदरिद्रीनिद्रिस्थु ॥ तोस्वप्नींहोयअमरनाथु ॥ मगउर्वशी
प्रमुखाअप्सरांतु ॥ असेमिरवतुऐरावतीं ॥ ३७ ॥ तेंदारिद्रदेहमाझेंगेलें ॥
हेंअमरदेहप्राप्तझालें ॥ ऐसेंस्वप्नींनाहींआठवलें ॥ तैसेंजन्मजाहलेंजनासी ॥
॥ ३८ ॥ मजूरराउळींचेंघृतनेतां ॥ तोतुरंगींचढेमनोरथा ॥ मगनाचऊं
लागेउल्हासतां ॥ स्वकल्पिताकल्पना ॥ ३९ ॥ सबळवारूचेंउड्डाण ॥
ह्मणोनिउडोंजातांआपण ॥ पडोनिघृतकुंभहोयभग्न ॥ पुसतीजनकाय
झालें ॥ ४० ॥ बळेंउडालामाझाघोडा ॥ परीस्मरेनातोफुटलाघडा ॥ बं
दींपडलारोकडा ॥ नेणेबापुडामनोरथें ॥ ४१ ॥ येथवरीतीव्रजेंविस्मरण ॥
त्यानांवदेहाचेंमरण ॥ अतिउद्यतजेंमनाचेंध्यान ॥ तेंचिजन्मजाणप्राण्या
सी ॥ ४२ ॥ एवंआत्म्यासिजेंजन्ममरण ॥ तेंकेवळभ्रमाचेंलक्षण ॥ तेचिअ
र्थींचेंनिरोपण ॥ स्वयेंश्रीकृष्णसांगतु ॥ १४३ ॥

---

### वेंचे, रुक्मिणीस्वयंवरांतील.

### ओंव्या.

### अध्याय सातवा.

कृष्णभेटीलागिंदेखा ॥ नवविधाभक्तीसीआवांका ॥ तेशानवरत्नमुद्रिका ॥
भीमककन्यालेइली ॥ १ ॥ सकळसौंदर्याचीखाणी ॥ बरवेपणतीपासू
नी ॥ स्वरूपरूपाचीजननी ॥ वीरींरुक्मिणीदेखिली ॥ २ ॥ सुरनरप

नगांच्याठाईं ॥ हिंडतांसौंदर्याविश्रांतिनाहीं ॥ ह्मणोनिधांविन्नलेंलवला हीं ॥ भीमकीदेहींविश्रांति ॥ ३ ॥ भीमकीकृष्णआलिंगन ॥ तेणेंसौंदर्या समाधान ॥ तिहींलोकींचेंवरवेपण ॥ भीमकीपाशींधांविन्नलें ॥ ४ ॥ जी चियासौंदर्याशी ॥ वेधलागलाश्रीकृष्णाशी ॥ तेभीमकीवर्णावींकैशी ॥ सीमारूपासीनकरवे ॥ ५ ॥ नाहींस्रष्टयानेंसृजिली ॥ कृष्णप्रभावेंरूपा सिआली ॥ वरवेपणासिगाचढली ॥ साकारलीतेंदर्ये ॥ ६ ॥ गगनशू न्यत्वाउबगलें ॥ कृष्णभेटीसिउदितझालें ॥ भीमकीमस्तकासीआलें ॥ निळारंगींशोभत ॥ ७ ॥ मस्तकींचेनीळकुंतळ ॥ जेंविनभअतिसुनीळ ॥ तळींमुखचंद्रनिर्मळ ॥ भीमकीमुखींउगवला ॥ ८ ॥ चंद्रक्षीणकृष्णपक्षीं ॥ ह्मणेहावंधूपूर्वीलमाझाकीं ॥ ह्मणऊनकळवळलीभीमकी ॥ निजमुखींध रियेला ॥ ९ ॥ भीमकीमुखींनिष्कलंक ॥ क्षयातीतपूर्णशशांक ॥ कृष्णप्रा प्तीसीमृगांक ॥ भीमकीमुखींसंचरला ॥ १० ॥ चंद्रपूर्णपूर्णिमाएकीं ॥ येऱ्हवींक्षयवृद्धित्याइहलोकीं ॥ तोसदासंपूर्णभीमकीमुखीं ॥ निजात्मसुखी परिपूर्ण ॥ ११ ॥ चंद्रमंडळामागेंपुढें ॥ जैसेतारागणांचेवेढे ॥ तैशीं मोतीलगतानवडें ॥ दोन्हीकडेतळपती ॥ १२ ॥ कृष्णवेधेंवेधिलीखरी ॥ ह्मणोनिविसरलीभोंवरी ॥ भंवरियाकृष्णमायेचाकरी ॥ येअवसरींतेंना हीं ॥ १३ ॥ भीमकीथोरकपाळाची ॥ कृष्णदैवतेंदैवाची ॥ निडळींकृ ष्णप्रभाश्यामतेची ॥ तोचीकस्तूरीमळवटू ॥ १४ ॥ चंद्रबिंबींशामरेखा ॥ तैसामळवटूमस्तकींदेखा ॥ भंवयारेखिल्याकृष्णरेखा ॥ अतिसुरेखाव्यं कटा ॥ १५ ॥ कृष्णपाहावयाजगजेटी ॥ भंवईसांडिलीव्यंकटी ॥ कृष्णीं मिनालियादृष्टी ॥ सहजेगांटीसुटेल ॥ १६ ॥ कृष्णरंगेंसुरंग ॥ अहेवपण तेंअभंग ॥ तेंचिकुंकुमपैंचांग ॥ मुखचंद्रींचंद्रमा ॥ १७ ॥ नभींइंद्रधनुष्य रेखा ॥ तैसाभांगींसेंदूरदेखा ॥ भुलवावयायदुनायका ॥ मोहनीमुखारूजि लें ॥ १८ ॥ नातरींतसरस्वतीओघीं ॥ आलीकृष्णाभेटीलागीं ॥ जीवहास लियादोन्हीभागीं ॥ मुक्तलगीतटस्थ ॥ १९ ॥ जैशींनक्षत्रेंनभोमंडळीं ॥ तैशीमुक्तमोतियांचीजाळी ॥ लेइलीअसेभीमकवाळी ॥ तेणेंवेल्हाळीशो भत ॥ २० ॥ त्याहीवरीभक्तीफरां[१] ॥ झळकतनवरत्नांचाखरा ॥ खुणा वीतसेसुरनरां ॥ भजायदुवीरानिजभावें ॥ २१ ॥ दृश्यदेखतांशिणलेन यन ॥ धणीचघ्यावयाकृष्णदर्शन ॥ एकत्रहोऊनदेखणेंपण ॥ भीमकीलो

१ पिंपळपान.

मा२५१९

चनास्तिपैंआलें ॥ २२ ॥ पाहावयाघनसांवळा ॥ कृष्णश्यामताआलीबुबुळा ॥ आसांवलीदोहींडोळां ॥ सबाह्यपणंदेखणें ॥ २३ ॥ कृष्णदेखावयानिधान ॥ नयनींसूदलेंअंजन ॥ सोगयाचेसलंबजाण ॥ कटाक्षबाणपिसारे ॥ २४ ॥ भीमकीकटाक्षाच्याघाईं ॥ मदनुपाडिलाटाईं ॥ सुरनरांचापाडकाई ॥ निधडापाहींश्रीकृष्ण ॥ २५ ॥ मुख्यमुखशोभनिक ॥ श्लेष्मागमनेंशिणलेंनाक ॥ तेंभीमकीमुखायेऊनिदेख ॥ नाकाभीकपैंचढलें ॥ ॥ २६ ॥ कृष्णसुवासींआवडी ॥ तेणेंनाकातिलागलीगोडी ॥ दोहींनाकपुडियाबुडीं ॥ दिधलीबुडीवसंतें ॥ २७ ॥ अधरदोन्हीझालेसधर ॥ बिंबीफळरंगाकार ॥ तेतंवपरिपक्वेंनश्वर ॥ हेअनश्वरहरिरंगें ॥ २८ ॥ भीमकीअधरामृतगोडी ॥ श्रीकृष्णचिजाणेफुडी ॥ एकाएकींघालूनउडी ॥ नेईलरोकडीप्रत्यक्ष ॥ २९ ॥ मुखामाजिदंतपंक्ति ॥ जैशाओंकारामाजिश्रुति ॥ चवकीचेचाऱ्हीझळकती ॥ सोहमस्मिसोज्वळ ॥ ३० ॥ अधरातळींहनुवटी ॥ गोरेपणेंदिसेगोमटी ॥ तेथेंहीश्यामप्रभाउटी ॥ कृष्णवर्णगोंदिलें ॥ ३१ ॥ वनिताअधरींसुवर्णकांसा ॥ पडोनिमुक्ताचिआलेंनाशा ॥ भेटावयाकृष्णपरेशा ॥ उपावकैसादेखिला ॥ ३२ ॥ भीमकीनाकींचंसुपाणी ॥ सहजेदेखेलशारंगपाणी ॥ अधोमुखअनुष्ठानीं ॥ बोळकंवतीहरिलागीं ॥ ३३ ॥ हळदीमिनलीहेमकळा ॥ तेणेंउटिलेंमुखकमळा ॥ तेजझळकतमुखमंडळा ॥ सूर्यकळालाजिल्या ॥ ३४ ॥ भीमकीमुखकमळसुंदर ॥ कृष्णकृष्णपणेंभ्रमर ॥ आमोदभावाचेशेजार ॥ निजमंदिरहरीचें ॥ ॥ ३५ ॥ कृष्णकृष्णपणिअहेवतंतू ॥ कंठींधरिलानतूटतू ॥ दिसेंनेदीलोकांअतू ॥ केलाएकांतूनिजकंटीं ॥ ३६ ॥ फिटलाचिंतेचाअभिलाखु ॥ ह्मणोननघालीचाचिंतांकु ॥ कृष्णपदींचापदांकु ॥ तेंचिपदकुल्हदयींचें ॥ ॥ ३७ ॥ पृथ्वीनवखंडेंखंडिली ॥ जडजडत्वाउवगली ॥ भीमकीचआंगींरिघाली ॥ सुनीळझालीकांचोळी ॥ ३८ ॥ पावावयाकृष्णदेवो ॥ सांडिलासवतीमत्सरभावो ॥ आलिंगावयाकृष्णदेवो ॥ धरापाहाहोधांविंनली ॥ ॥ ३० ॥ एकांगींभिन्नपणों ॥ जीवाशिववाढलेदोन्ही ॥ तेणेंचिझालीव्यंजतूस्तनी ॥ कुचकामिनीकुचभारें ॥ ४० ॥ विद्याअविद्यापांखींदोन्ही ॥ आछादिलेदोन्हीस्थानीं ॥ दाटलेत्रिगुणाचेकसणी ॥ कृष्णावांचोनिकोणसोडी ॥ ४१ ॥ भीमकीकृष्णाआलिंगन ॥ तेणेंजीवाशिवासमाधान ॥ यालागींदोन्हीउचललेजाण ॥ कृष्णस्पर्शावांछिती ॥ ४२ ॥ मुक्तनांवमुक्ता

कै. म. म. द. वा. पोतदार

फळा ॥ नेणतीमुक्तीचाजिव्हाळा ॥ ह्मणऊनिपडिलीभीमकीगळां ॥ भेटी गोपाळामाळघाली ॥ ४३ ॥ पूर्वीक्षीरसिंधूचीबाळा ॥ नेसलीक्षीरोदकपाटोळा ॥ नातरीपाहावयाकृष्णसोहळा ॥ कांसेलागलाक्षीराब्धि ॥ ४४ ॥ माझीकन्याहेगोरटी ॥ ह्मणीकोणाचीलागेलदिटी ॥ ह्मणवूनिघातलीअसेकंठीं ॥ रत्नमाळाक्षीराब्धि ॥ ४५ ॥ प्रकृतिपुरुषापडिलीमिठी ॥ तैसेंविरडेंकांचोळियेदाटी ॥ कृष्णसोडीलजगजेठी ॥ आयावायांतेंनसुटे ॥ ४६ ॥ शमदमादिसुभटें ॥ हस्तकडगेंवाह्यवटें ॥ करींकंकणेंउद्धटें ॥ कृष्णनिष्ठेंरुणझुणती ॥ ४७ ॥ क्षणींक्षणींदिशाउजळे ॥ तैशींचढलींदशांगुळें ॥ दशावतारांचानि मेळें ॥ जडितकेल्यामुद्रिका ॥ ४८ ॥ पाहातांतळहातींच्यारंगा ॥ उणेंआणिलेंसंध्यारागा ॥ करीचरणसेवाश्रीरंगा ॥ तळवातळहातींसदा ॥ ४९ ॥ आटूनियांहेमकळा ॥ आटणीघातल्याबारासोळा ॥ वोतींवकेलीकटिमेखळा ॥ मध्येंघननीळाजाडियेला ॥ ५० ॥ दोन्हीकडेमुक्तलग ॥ तेणेंशोभतमध्यभाग ॥ भीमकीभाग्याचीसभाग्य ॥ तिणेंश्रीरंगवेधिला ॥ ॥ ५१ ॥ चरणींगर्जतीनूपुरें ॥ वांकीआंदुवाचेनिगजरें ॥ झालेंकामासिचेइरें ॥ धनुष्यपुरेंवाहिलें ॥ ५२ ॥ कृष्णधरूनियांचित्तीं ॥ चालतसेहंसगती ॥ चैद्यमागधपाहती ॥ मदनेंख्यातीथोरकेली ॥ ५३ ॥ माझीअभिलाषितीजननी ॥ ह्मणऊनिविंधिलेंकामबाणीं ॥ वीरपडिलेधरणीं ॥ मदनबाणींमूर्छित ॥ ५४ ॥ कामेंहिरतिलीयादृष्टी ॥ धनुष्येंगळालींमुष्टी ॥ भीमकीराखावीगोरटी ॥ हेंहीपोटींविसरले ॥ ५५ ॥ रथांचेउलंडलेथोरथोर ॥ अश्वींहूनिपडिलेवीर ॥ गजींचेउलथलेमहाशूर ॥ रितेकुंजरगळदंडीं ॥ ५६ ॥ भीमकीपाहतसेभोंवतें ॥ वीरभेदिलेमन्मथें ॥ कृष्णत्रिशुद्धिनाहींयेथें ॥ तेणेंकामातेंजिंकिलें ॥ ५७ ॥ रमारमणीयएकांतीं ॥ मिनल्याकामनुपजेचित्तीं ॥ यालागिंधांवेतोश्रीपति ॥ भावनिश्चितींभीमकीचा ॥ ५८ ॥ कामबाणींनव्हेच्युत ॥ ह्मणऊननामेंतोअच्युत ॥ भोगभोगूनभोगातीत ॥ कृष्णनाथानिर्धार ॥ ५९ ॥ कृष्णपहावयावेगेंउठी ॥ आलेसलोभकेंशआडवेदिटी ॥ धरूनिऐक्याचियेमुष्टी ॥ सुमनेंवीरगुंठीवांधिली ॥ ६० ॥ कृष्णपहावयाभावएकू ॥ तंवतोअर्काचाहीआदिअर्कू ॥ नयनींनयनाप्रकाशकू ॥ यदुनायकूकेंविदिसे ॥ ६१ ॥ निजभावेंपाहेगोरटी ॥ तंवघनश्यामदेखेदृष्टी ॥ लज्जावृत्तिझालीउफराटी ॥ तंवजगजेठीपावला ॥ ६२ ॥ उपरमूनिपाहेसुंदरी ॥ तंवआंगींआदळलाश्रीहरी ॥ प्रेमेंसप्रेमेंघावरी ॥ करीं

धरीनिजमाळा ॥ ६३ ॥ वीरांचेअभिमानाझालाअस्तु ॥ मध्यान्हाआ लागभस्तु ॥ मुहूर्तसुमुहूर्तअभिजितु ॥समयोउचितुलग्नाचा ॥ ६४ ॥ काळसावधानह्मणत ॥ सूर्यलग्नघटिकापहात ॥ वियोगअंत्रपाटसोडित ॥ भावार्थह्मणतओंपुण्या ॥ ६५ ॥ भीमकीपाहेकृष्णवदन ॥ नयनींचगुंतलेंनयन ॥ दोहींचाएकझालाप्राण ॥पाणिग्रहणजीवशिवा ॥ ६६ ॥ ऐशियेभावाचेनिवाडें ॥ माळघातलीवाडेकोडें ॥ वीरमूर्छापावलेगाढे ॥ आडतापुढेंकोणीनये ॥ ६७ ॥ यापरीसारंगपाणी ॥ रथींवाहूनियांरुक्मिणी ॥ निघताझालातत्क्षणीं ॥ प्रकटपरीकोण्हीनदेखे ॥ ६८ ॥ एकाएकींवनमाळी ॥ रथींवाहूनिभीमकबाळी ॥ आलायादवांजवळी ॥ पिटिलीटाळीसकळिकीं ॥ ६९ ॥ त्राहाटिल्यानिशाणभेरी ॥ गगनगर्जेमंगळतूरीं ॥ देववर्षतीअंबरीं ॥ जयजयकारींप्रवर्तले ॥ ७० ॥ यादवगर्जतीमहावीर ॥ सिंहनादकरितीथोर ॥ भीमकीआनंदेंनिर्भर ॥ वरिलावरश्रीकृष्ण ॥ ७१ ॥ हरिखेंनाचतनारद ॥ आतांहोईलद्वंद्वयुद्ध ॥ यादवआणिमागध ॥ झोटधरणींभिडतील ॥ ७२ ॥ रथलोटतीलरथांवरी ॥ अश्वधांवतीलअश्वांवरी ॥ कुंजरआदळतीलकुंजरीं ॥ महावीरींमहावीर ॥ ७३ ॥ शस्त्रेंसूटतीलगाढीं ॥ वीरभिडतीलकडोविकडीं ॥ डोळेभरींपाहीनगोडी ॥ शेंडीतडतडीनारदाची ॥ ७४ ॥ थोरहरिखेंपिटिलीटाळी ॥ साल्यामेहुण्यांतहोईलकळी ॥ कृष्णकरीलरांडोळी ॥ तेनवाळींदेखेनमी ॥ ७५ ॥ एकाजनार्दनाह्मणे ॥ रुक्मिणीहरणकेलंकृष्णें ॥ वीरवरवाळतीधांवणें ॥ युद्धसत्राणेंहोईल ॥ ७६ ॥ रसाळकथाआहेपुढां ॥ रणींनाचेलरणझेंडा ॥ वोंवाळणीबाणप्रचंडा ॥ दोहींकडांपडतील ॥ ७७ ॥ ऐकायुद्धाचीकुसरी ॥ युद्धमांडलेंकवणेपरी ॥ क्रोधेंझुंजतीनिर्धारीं ॥ मुक्तीचारीकामाच्या ॥ ७८ ॥ इतिसप्तमोध्यायः ॥

# तुकाराम.

जन्म शके १५१०–इ० स० १५८८.

समाप्ति शके १५५०–इ० स० १६२८.

**याचे स्फुट अभंग पुष्कळ आहेत.**

वेंचे अभंगांतील.

( १ )

भावेंगावेंगीत ॥ शुद्धकरूनीयांचित्त ॥ १ ॥
जरींव्हावातुजदेव ॥ तरींहासुलभउपाव ॥ २ ॥
करींमस्तकठेंगणा ॥ लागेंसंताचेचरणा ॥ ३ ॥
आणीकाचेकानीं ॥ गुणदोषमनानाणीं ॥ ४ ॥
तुकाह्मणेफार ॥ थोडाकरींउपकार ॥ ५ ॥

( २ )

पुढेंआतांकैंचाजन्म ॥ ऐसाश्रमवारेसा ॥ १ ॥
सर्वथाहीफिरोंनये ॥ ऐसीसोयलागालया ॥ २ ॥
पांडुरंगाऐसीनाव ॥ तारीभावअसतां ॥ ३ ॥
तुकाह्मणेचुकवींवापा ॥ पुन्हाखेपासकळा ॥ ४ ॥

( ३ )

नाहींसंतपणामिळतहेंहाटीं ॥ हिंडतांकपाटींरानींवनीं ॥ १ ॥
नयेमोलदेतांधनाचियाराशी ॥ नाहींतेंआकाशींपाताळींतें ॥ २ ॥
तुकाह्मणेआहेआपल्यातेंआंगीं ॥ गवसेनाजगींदुजेठायीं ॥ ३ ॥

( ४ )

देववसेज्याचेचित्तीं ॥ त्याचीघडावीसंगती ॥ १ ॥
ऐसेंआवडतेंमना ॥ देवापुरवावीवासना ॥ २ ॥
हरीजनाभेटी ॥ नहोअंगसंगतुटी ॥ ३ ॥
तुकाह्मणेजिणें ॥ बरवेंसंतसंघट्टणें ॥ ४ ॥

( ५ )

विरोधाचेंमजनसाहेवचन ॥ बहुहोतेंमनकासावीस ॥ १ ॥
ह्मणवूनीजीवानसाहेसंगती ॥ बैसतांएकांतींगोडवाटे ॥ २ ॥
देहाचीभावनावासनेचासंग ॥ नावडेउबगआलायांचा ॥ ३ ॥
तुकाह्मणेदेवअंतरयामुळें ॥ आशामोहजाळेंदुःखवाटे ॥ ४ ॥

( ६ )

नलगेमायेसीबाळनीरवावें ॥ आपुल्यास्वभावेंवोढेत्यासि ॥ १ ॥
मजकांलागलाकरणेंविचार ॥ ज्याचाकारभारत्याचेमाथां ॥ २ ॥
गोडधडत्यासीठेवीनमागतां ॥ समाधानखातांनेदीमना ॥ ३ ॥
खेळतांगुंतलेंउमगूनीआणी ॥ बैसोनियांस्तनींलावीवळें ॥ ४ ॥
त्याच्यादुःखेंपीडेआपणखापरीं ॥ लाहीतळींवरीहोयजैसी ॥ ५ ॥
तुकाह्मणेदेहविसरेआपुला ॥ आघाततीत्यालालागोंनेदी ॥ ६ ॥

( ७ )

घेसीतरीघेईंसंतांचीयेभेटी ॥ आणीकतेगोष्टीनकोमना ॥ १ ॥
सर्वभावेंत्यांचेंदेवभांडवल ॥ आणीकतेबोलनबोलती ॥ २ ॥
करिसीतरीकरींसंतांचीसंगत ॥ आणीकतेमातनकोमना ॥ ३ ॥
बससीलतरींबैससंतांमधीं ॥ आणीकतेबुद्धीनकोमना ॥ ४ ॥
जासीतरींजाईंसंतांचीयेगांवा ॥ होईलविसावातेथेंमना ॥ ५ ॥
तुकाह्मणेसंतसुखाचेसागर ॥ मनानिरंतरधणीघेईं ॥ ६ ॥

( ८ )

संतांचीयेगांवींप्रेमाचासुकाळ ॥ नाहींतळमळदुःखलेश ॥ १ ॥
तेथेंमीराहीनहोऊनीयाचक ॥ घालतीलभीकतेचीमज ॥ २ ॥
संतांचीयेगांवींवरोभांडवल ॥ अवघाविठ्ठलधनवित्त ॥ ३ ॥
संतांचेंभोजनअमृताचेंपान ॥ करितीकीर्तनसर्वकाळ ॥ ४ ॥
संतांचाउदीमउपदेशाचीपेंठ ॥ प्रेमसुखसाठघेतीदेती ॥ ५ ॥
तुकाह्मणेतेथेंआणिकनाहींपरी ॥ ह्मणोनिभीकारीझालोंत्यांचा ॥ ६ ॥

( ९ )

सर्वभावेंआलोंतुजचीशरण ॥ कायावाचामनासहितदेवा ॥ १ ॥
आणीकदूसरेंनयेमाझेमना ॥ राहीलींवासनातुझेठायीं ॥ २ ॥
माझीयेवरीचेंकांहींजडभारी ॥ तुजवीणवारीकोणदेवा ॥ ३ ॥
तुझेआह्मीदासआमचातूंधनी ॥ चालतदूरूनीआलोंमागें ॥ ४ ॥
तुकाह्मणेआतांघेतलेंधरणें ॥ हिशोबाकारणेंभेटीदेईं ॥ ५ ॥

( १० )

संसारतोकोणदेखे ॥ आह्मांसखेहरिजन ॥ १ ॥

काळब्रह्मानंदेंसरे ॥ आवडीउरेसांचली ॥ २ ॥
स्वप्नांतहीनाहींचिंता ॥ रात्रीजातांदिवस ॥ ३ ॥
तुकाह्मणेब्रह्मरसें ॥ होयसरसेंभोजन ॥ ४ ॥

( ११ )

नीचपणबरवेंदेवा ॥ नचलेकोणाचाहीहेवा ॥ १ ॥
महापुरेंझाडेंजाती ॥ तेथेंलोहाळेराहाती ॥ २ ॥
येतीसिंधूच्यालहरी ॥ नम्रहोतांजातीवरी ॥ ३ ॥
तुकाह्मणेहेंचीफळ ॥ पायधरिल्यानचलेबळ ॥ ४ ॥

( १२ )

लहानपणदेगादेवा ॥ मुंगीसाखरेचारवा ॥ १ ॥
ऐरावतीरत्नथोर ॥ त्यासिअंकुशाचामार ॥ २ ॥
ज्याचेअंगींमोठेपण ॥ तयायातनाकठीण ॥ ३ ॥
तुकाह्मणेहेंचीजाण ॥ व्हावेंलाहनाहुनिलाहन ॥ ४ ॥

( १३ )

घरोघरींअवघेंझालेंब्रह्मज्ञान ॥ परीमेळवणबहूमाजी ॥ १ ॥
निरेंकोणापासींहोयएकरज ॥ तरीद्यारेमजदुर्बळासी ॥ २ ॥
आशातृष्णामनींकालवूनीदोन्ही ॥ दंभतोदूरूनीदीसतसे ॥ ३ ॥
कामक्रोधलोभशीणवीबहूत ॥ मेळवूनीआंतकालकूट ॥ ४ ॥
तुकाह्मणेतेथेंकांहींहातानये ॥ आयुष्यतेंजायेवायांसर्व ॥ ५ ॥

( १४ )

थुंकोनीयांलोभमान ॥ दंभकरीतोंकीर्तन ॥ १ ॥
झालोंउदासीनदेहीं ॥ एकावीणचाडनाहीं ॥ २ ॥
अर्थअनर्थासारिखा ॥ करूनिठेवीलापारिखा ॥ ३ ॥
उपाधीवेगळा ॥ तुकाराहीलासोंवळा ॥ ४ ॥

( १५ )

भक्तऐसेजाणाजेदेहींउदास ॥ गेलेआशापाशनिवारूनी ॥ १ ॥
विषयतोत्यांचाझालानारायण ॥ नावडेजनधनमातापीता ॥ २ ॥
निर्वाणींगोविंदअसेमागेंपूढें ॥ कांहींचसांकडेंपडोंनेदी ॥ ३ ॥
तुकाह्मणेसत्यकर्मांव्हावेंसाह्य ॥ असत्यासीभयनरकाजाणें ॥ ४ ॥

( १६ )

याजसाठींकेलाहोताअट्टाहास ॥ शेवटींचादीसगोडव्हावा ॥ १ ॥
आतांनिश्चितीनेंपावलोंविसांवा ॥ खुंटल्यात्याधांवातृष्णेचीया ॥ २ ॥
कवतूकवाटेजालीयाविच्चाच ॥ नावमंगळाचेंतेणेंगुणें ॥ ३ ॥
तुकाह्मणेमुक्तिपर्णीलीनोवरी ॥ आतांदिवसचारीखेळीमेळी ॥ ४ ॥

( १७ )

कोण्यापुण्येंयाचाहोईनसेवक ॥ जींहींद्वंद्वादिकदूरावले ॥ १ ॥
ऐसींवर्मेंमजदावींनारायणा ॥ अंतरींच्याखुणाप्रगटोनी ॥ २ ॥
बहुअवघडअसेसंतभेटी ॥ तरीजगजेठीकरुणाकेली ॥ ३ ॥
तुकाह्मणेमननयेवृत्तीवरी ॥ सुखाचेशेजारींपहूडेना ॥ ४ ॥

( १८ )

कर्मधर्मनव्हतींसांगें ॥ उण्याआंगेंपतन ॥ १ ॥
भलत्याकाळींनामावळी ॥ सुलभभोळीभाविका ॥ २ ॥
प्रायश्चित्तेंपडतीपायां ॥ गातीतयावैष्णवा ॥ ३ ॥
तुकाह्मणेनुपजेदोष ॥ कराघोषनामाचा ॥ ४ ॥

( १९ )

आशातेकरवीतेबुद्धीयेचालोप ॥ संदहतेंपापकैसेंनव्हे ॥ १ ॥
आपूलाआपणकरावावीचार ॥ प्रसन्नतेंसारमनगोही ॥ २ ॥
नांवरूपेंअंगींलावीलावीटाळ ॥ होतेंतेनिर्मळशुद्धबुद्ध ॥ ३ ॥
आंधळ्यानेंनयेदेखण्याचीचाली ॥ चालेंऐशीबोलीतुकाबोले ॥ ४ ॥

( २० )

गेलेंआतांनांवरूप ॥ माझेंपापगांठीचें ॥ १ ॥
संताचियाचरणरजें ॥ उतरूंवोझेंमातीचें ॥ २ ॥
लटिकीयाचाअभीमान ॥ होतोंशीणपावत ॥ ३ ॥
तुकाह्मणेअरूपींचें ॥ सुखसाचेंमानावें ॥ ४ ॥

( २१ )

निंदास्तुतीकरवीपोट ॥ सोंगदाखवीबहुभाट ॥ १ ॥
जटाराखविटंबना ॥ धीरनाहींक्षमामना ॥ २ ॥
शृंगारिलेंमडें ॥ जीवेंवीणजैसेंकुडें ॥ ३ ॥
तुकाह्मणेरागें ॥ भलतेंचावळेवाउगें ॥ ४ ॥

( २२ )

भिक्षापात्र अवलंबनें ॥ जळोजीणेंलाजिरवाणें ॥
ऐसीयासीनारायणें ॥ उपेक्षीजेसर्वथा ॥ १ ॥
देवापायींनाहींभाव ॥ भक्तिवरीवरीवाव ॥
समर्पिलानाहींजीव ॥ जाणावाहाव्यभिचार ॥ २ ॥
जगाघालावेंसांकडें ॥ दीनहोऊनीबापुडें ॥
तेंचीअभाग्यरोकडें ॥ मूळआणीविश्वासा ॥ ३ ॥
कायनकरीविश्वंभर ॥ सत्यकारितांनिर्द्धार ॥
तुकाह्मणेसार ॥ दृढपायधरावे ॥ ४ ॥

( २३ )

भावबळेंविष्णुदास ॥ नाहींनासपावत ॥ १ ॥
योगभाग्येंघरायेती ॥ सर्वशक्तिचालत ॥ २ ॥
पित्याचेंजेंकायधन ॥ पुत्राकोणवंचील ॥ ३ ॥
तुकाह्मणेकडेवैसों ॥ तेणेंअसोंनिर्भय ॥ ४ ॥

( २४ )

मागतांविभाग ॥ कोठेंलपालजीमग ॥ १ ॥
संतसाक्षीयावचना ॥ त्यांसिठाऊकीयाखुणा ॥ २ ॥
होइनधरणेकरी ॥ मगमीरिघांनेदींघरीं ॥ ३ ॥
तुकाह्मणेमीअक्षर ॥ तुजदेवपणाचाभार ॥ ४ ॥

( २५ )

अवघाचीआकारग्रासीयेलाकाळें ॥ येकचीनीराळेंहरिचेंनाम ॥ १ ॥
धरूनीराहीलोंअविनाशकंठीं ॥ जीवनहेंपोटींसांटवीलें ॥ २ ॥
शरीरसंपत्तीमृगजळभान ॥ जाईलनासोनखरेंनव्हे ॥ ३ ॥
तुकाह्मणेआतांऊपाधीच्यानावें ॥ आणियेलादेवेंवीटमज ॥ ४ ॥

( २६ )

बोलणेंचीनाहीं ॥ आतांदेवावीणकांहीं ॥ १ ॥
एकसरेंकलानेम ॥ देवादिल्हेक्रोधकाम ॥ २ ॥
पाहेनतेपाय ॥ जोंवरीहेदृष्टीधाय ॥ ३ ॥
तुकाह्मणेमनें ॥ हेंचीसंकल्पवाहणें ॥ ४ ॥

( २७ )

खरेंबोलेतरी ॥ फुकासाठींजोडेहरी ॥ १ ॥

ऐसेंफुकाचेउपाय ॥ सांडूनीयांवायांजाय ॥ २ ॥
परउपकार ॥ एकावचनाचाफार ॥ ३ ॥
तुकाह्मणेमळ ॥ मनेंसांडीतांशीतळ ॥ ४ ॥

( २८ )

दयाक्षमाशांती ॥ तेथेंदेवाचींवसती ॥ १ ॥
पावेधांवोनीयांघरा ॥ राहेधरूनीयांथारा ॥ २ ॥
कीर्तनाचेवाटे ॥ वराडीयाऐसालोटे ॥ ३ ॥
तुकाह्मणेघडे ॥ पूजानामेंदेवजोडे ॥ ४ ॥

( २९ )

शिष्याचीजोनघेसेवा ॥ मानीदेवासारिखें ॥ १ ॥
त्याचाफळेउपदेश ॥ आणीकादोषउफराटे ॥ २ ॥
त्याचेंखरेंब्रह्मज्ञान ॥ उदासीनदेहभावें ॥ ३ ॥
तुकाह्मणेसत्यसांगें ॥ योतरागेंयेतीते ॥ ४ ॥

( ३० )

आणीककोणाचानकरींमीसंग ॥ जेणेंहोयभंगमाझ्याचित्ता ॥ १ ॥
विठ्ठलावांचूनीआणीकजेवाणी ॥ नायकेंमीकानींआपुलिया ॥ २ ॥
समाधानासाठींबोलावीहेमात ॥ परीमाझेंचित्तनाहींकोठें ॥ ३ ॥
जीवाहूनीमजतेचीआवडती ॥ आवडेज्यांचित्तींपांडुरंग ॥ ४ ॥
तुकाह्मणेमाझेंतोचीजाणेंहीत ॥ आणीकाच्याचित्तनाहींबोला ॥ ५ ॥

( ३१ )

आशाहेसमूळखाणोनीकाढावी ॥ तेव्हांचीगोंसावीव्हावेंतेणें ॥ १ ॥
नाहींतरीसुखेंअसावेंसंसारीं ॥ फजीतीदूसरीकरूंनये ॥ २ ॥
आशामारूनीयांजयवंतव्हावें ॥ तेव्हांचीनीघावेंसर्वांतूनी ॥ ३ ॥
तुकाह्मणेजरीयोगाचीतांतडी ॥ आशेचीबीबुडीकरींआधीं ॥ ४ ॥

( ३२ )

निष्ठावंतभावभक्ताचास्वधर्म ॥ निर्द्धारहेंवर्मचूकोंनये ॥ १ ॥
निष्कामनिश्चलविठ्ठलींविश्वास ॥ पाहोंनयेआसआणीकांची ॥ २ ॥
तुकाह्मणेऐसाकोणउपेक्षीला ॥ नाहींआयकीलाऐसाकोण्ही ॥ ३ ॥

( ३३ )

जयाचीयेवाचेनयेह्याविठ्ठल ॥ त्याचेमजबोलनावडती ॥ १ ॥

शत्रूतोम्याकेलानह्मणेंआपुला ॥ विन्मुखविठ्ठलासर्वभावें ॥ २ ॥
जयासीनावडेविठोबाचेंनाम ॥ तोजाणाअधमतुकाह्मणे ॥ ३ ॥

( ३४ )

जीवतोचीदेवभोजनतेंभक्ती ॥ मरणतेमुक्तीपाखंडयाची ॥ १ ॥
पिंडाच्यापोषणींनागवलेजन ॥ लटीकेंपूराणकेलेंवेद ॥ २ ॥
मनाआलातैसाकरीतीविचार ॥ ह्मणतीसंसारनाहींपुन्हा ॥ ३ ॥
आपूलेमनींचेंकरूनीपाखंड ॥ जनांमध्येंभांडपोटभरी ॥ ४ ॥
तुकाह्मणेपाठीउडतीयमदंड ॥ पापपुण्यलंडनविचारीती ॥ ५ ॥

( ३५ )

आशातृष्णामायाअपमानाचेंबीज ॥ नासीलीयापूज्यहोईजेती ॥ १ ॥
अधीरासीनाहींपाहींजातांमान ॥ दुर्लभदर्शनधीरत्याचें ॥ २ ॥
तुकाह्मणेनाहींआणीकासीबोल ॥ वायांजायमोलबुद्धीपासीं ॥ ३ ॥

( ३६ )

मोक्षाचेंआह्मांसीनाहींअवघड ॥ तोअसेऊघडगांठोळीस ॥ १ ॥
भक्तीचेसोहळेहोतीलजीवासी ॥ नवलत्यांवीशींपूरवीतां ॥ २ ॥
ज्याचेंत्यासीदेणेंकोणतेंऊचित ॥ मानोनीयांहीतघेतोंसुखें ॥ ३ ॥
तुकाह्मणेसूखेंदेईंबासंसार ॥ आवडीसोथारकरींमाझे ॥ ४ ॥

( ३७ )

चिंतनासीनलगेवेळ ॥ सर्वकाळकरावें ॥ १ ॥
सदावाचेनारायण ॥ तेंवदनमंगळ ॥ २ ॥
पढियेसर्वोत्तमींभाव ॥ येरवावपसारा ॥ ३ ॥
ऐसेंउपदेशीतुका ॥ अवघ्यालोकांसर्वदा ॥ ४ ॥

( ३८ )

ज्यानेंज्यानेंजैसेंध्यावें ॥ तैसेंव्हावेंकृपाळें ॥ १ ॥
सगुणनिर्गुणाचाडाव ॥ विटेपावधारियेले ॥ २ ॥
अवघेंसाकरेचेंअंग ॥ नयेव्यंगानिवडीतां ॥ ३ ॥
तुकाह्मणेजेंजेंकरी ॥ तेंतेंहरीभोगिता ॥ ४ ॥

( ३९ )

ठेवाजाणीवगुंडून ॥ येथंभावचीप्रमाण ॥ १ ॥
एकाअनुसरल्याकाज ॥ अवघेंजाणेंपंढरीराज ॥ २ ॥

होणेंतर्कावितर्कासी ॥ बावनलगेसायासी ॥ ३ ॥
तुकाह्मणेभावावीण ॥ अवघावोलतीतोशीण ॥ ४ ॥

( ४० )

मुक्तताआशंकानाहींजयाअंगीं ॥ बद्धमोहसंगींलज्जाचित्ता ॥ १ ॥
सुखपावेशांतीधरूनीएकांत ॥ दुःखीतोलोकांतदंभकरी ॥ २॥
तुकाह्मणेलागेथोडाचिविचार ॥ परीहेप्रकारनागवीती ॥ ३ ॥

( ४१ )

कथाकरूनीयांद्रव्यघेतीदेती ॥ तयांअधोगतीनरकवास ॥ १ ॥
रौरवकुंभपाकभोगितीयातना ॥ नयेनारायणाकरुणात्यांची ॥ २ ॥
असीपत्रधाराछेदीतीसर्वांग ॥ तप्तभूमींअंगलोळवीती ॥ ३ ॥
तुकाह्मणेतयांनरकनचुकती ॥ सांपडलेहातींयमाचीया ॥ ४ ॥

( ४२ )

नायकावेकानींतयाचेतेबोल ॥ भक्तीवीणफोलज्ञानसांगे ॥ १ ॥
वाखाणीअद्वैतभक्तीभावेंवीण ॥ दुःखपावेशीणश्रोतावक्ता ॥ २ ॥
अहंब्रह्मह्मणुनीपाळीतसेपिंडा ॥ बोलोंनयेभांडातयासवें ॥ ३ ॥
वेदबाह्यलंडबोलेजोपाखंड ॥ त्याचेंकाळेंतोंडसंतांमध्यें ॥ ४ ॥
तुकाह्मणेखंडीदेवभक्तपण ॥ वरिष्ठत्याहूनश्वपचतो ॥ ५ ॥

( ४३ )

तीर्थाचेंजेंमूळव्रताचेंजेंफळ ॥ ब्रह्मतेंकेवळपंढरीये ॥ १ ॥
तेंआह्मींदेखीलेंआपुल्यानयनीं ॥ फीटलींपारणींडोळीयांचीं ॥ २ ॥
जीवाचेंजीवनसुखाचेंशेजार ॥ उभेंकटीकरठेवूनीयां ॥ ३ ॥
जनाचाजनिताकृपेचासागर ॥ दीनांदयाकरदुष्टांकाळ ॥ ४ ॥
सुरवरांचिंतनींमूनीवरांध्यानीं ॥ आकारनिर्गुणींतोचीअसे ॥ ५ ॥
तुकाह्मणेनाहींश्रुतीआतुडलें ॥ आह्मांसांपडलेंगीतगातां ॥ ६ ॥

( ४४ )

कथाकरूनीयांमोलज्यापेंघेती ॥ तेहीदोघेजातीनरकामध्यें ॥ १ ॥
ब्रह्मपूर्णकराब्रह्मपूर्णकरा ॥ अखंडहोस्मरारामराम ॥ २ ॥
मधूरावाणीच्यानकापडूंभरीं ॥ जालयमपूरीभोगावया ॥ ३ ॥
तुकाह्मणेकरींब्रह्मांडठेंगणें ॥ हातपसरीजीणेंधीगूत्याचें ॥ ४ ॥

( ४५ )

गोडनावेंक्षीर ॥ परीसाखरेचाधीर ॥ १ ॥
तैसेंजाणब्रह्मज्ञान ॥ बापुडेंतेंभक्तीविण ॥ २ ॥
रुचीनेदीअन्न ॥ ज्यांतनसतेंलवण ॥ ३ ॥
तुकाह्मणेझारा ॥ लागेतंबूऱ्याच्यातारा ॥ ४ ॥

( ४६ )

नम्रझालाभूता ॥ तेणेंकोंडीलेंअनंता ॥ १ ॥
हेंचीशूरत्वाचेंअंग ॥ हारीआणीलाश्रीरंग ॥ २ ॥
अवघाझालापण ॥ लवणसकळाकारण ॥ ३ ॥
तुकाह्मणेपाणी ॥ पातळपणेंतळाआणी ॥ ४ ॥

( ४७ )

आशाबद्धवक्ता ॥ भयश्रोतियांच्याचित्ता ॥ १ ॥
गातोतेंहीनाहींठावें ॥ तोंडवासीकांहींद्यावें ॥ २ ॥
झालेंलोभाचेंमांजर ॥ भीकमागेदारोदार ॥ ३ ॥
उभयतांलोभीमन ॥ वायांगेलेंतेंभजन ॥ ४ ॥
मापआणिगोणी ॥ तुकाह्मणेरीतींदोन्ही ॥ ५ ॥

( ४८ )

निर्वाहापूरतेंअन्नआच्छादन ॥ आश्रमासीस्थानकोपीगूहा ॥ १ ॥
कोठेंहींचित्तासीनसावेंबंधन ॥ ह्रदयींनारायणसांठवावा ॥ २ ॥
नयेबोलोंफारबैसोंजनांमधीं ॥ सावधानबुद्धीइंद्रियदमनीं ॥ ३ ॥
तुकाह्मणेघडीघडीनेंसाधावी ॥ त्रिगुणाचीगोवीउगवूनी ॥ ४ ॥

( ४९ )

याचियानावेंदोष ॥ राहेअंतरींकिल्मिष ॥ १ ॥
मनाअंगींपुण्यपाप ॥ शुभउत्तमसंकल्प ॥ २ ॥
बीजाऐशींफळें ॥ उत्तमकींअमंगळें ॥ ३ ॥
तुकाह्मणेंचित्त ॥ शुद्धकरावेंहेंहित ॥ ४ ॥

( ५० )

कायमाझेंनेतीवाईटह्मणोन ॥ करूंसमाधानकशासाठीं ॥ १ ॥
कायमजलोकनेतीलपरलोका ॥ जातांकोणीनरकानिवारील ॥ २ ॥
नह्मणेंकोणासीउत्तमवाईट ॥ सुखेंमाझीकूटखावोमागें ॥ ३ ॥

सर्वमाझाभारअसेपांडुरंगा ॥ कायमाझेंजगासवेंकाज ॥ ४ ॥
तुकाह्मणेमाझेंसर्वहीसाधन ॥ नामसंकीर्तनवीठोबाचें ॥ ५ ॥

( ५१ )

नाशीवंतदेहनासेलहाजाणा ॥ कांरेउच्चारानावाचेनाम ॥ १ ॥
नामेंचीतारिलेकोट्यानहीकोटी ॥ नामेंचिवैकुंठींबैसवीले ॥ २ ॥
नामापरतेंसारनाहींत्रिभूवनीं ॥ तेंकांतुह्मींमनींआठवाना ॥ ३ ॥
तुकाह्मणेनामवेदांसीआगळें ॥ तेंदील्हेंगोपाळेंफुकासाठीं ॥ ४ ॥

( ५२ )

सांगोंजाणतीशकुन ॥ भूतभविष्यवर्तमान ॥ १ ॥
त्यांचाआह्मासीकंटाळा ॥ पाहोंनावडतीडोळां ॥ २ ॥
रिद्धिसिद्धीचेसाधक ॥ वाचासिद्धहोतीएक ॥ ३ ॥
तुकाह्मणेजाती ॥ पुण्यक्षयेंअधोगती ॥ ४ ॥

( ५३ )

ठाकलोंसेंद्वारीं ॥ उभायाचकभीकारी ॥ १ ॥
मजभीककांहींदेवा ॥ प्रेमभातुकेंपाठवा ॥ २ ॥
याचकाचाभार ॥ नयेघेऊंवेरझार ॥ ३ ॥
तुकाह्मणेदान ॥ सेवाघेतल्यावांचून ॥ ४ ॥

( ५४ )

सत्यसंकल्पाचादातानारायण ॥ सर्वकरीपूर्णमनोरथ ॥ १ ॥
येथेंअळंकारशोभतीसकळ ॥ भाववळेंफळइच्छेचेंतें ॥ २ ॥
अंतरींचेंबीजजाणेकळवळा ॥ व्यापकसकळाब्रह्मांडाचा ॥ ३ ॥
तुकाह्मणेनाहींचालततांतडी ॥ प्राप्तकाळघडीआल्यावीण ॥ ४ ॥

( ५५ )

कायवाणूंआतांनपूरेहेवाणी ॥ मस्तकचरणींठेवीतसें ॥ १ ॥
थोरीवसांडीलीआपूलीपरीसें ॥ नेणेसिवोंकैसेंलोखंडासी ॥ २ ॥
जगाच्याकल्याणासंतांच्याविभूती ॥ देहकष्टवीतीउपकारें ॥ ३ ॥
भूतांचीदयाहेंभांडवलसंतां ॥ आपूल्याममतानाहींदेहीं ॥ ४ ॥
तुकाह्मणेसुखपराचीयासुखें ॥ अमृतहेंमुखेंस्रवतसे ॥ ५ ॥

( ५६ )

अवघातोशकून ॥ हृदयींदेवाचेचरण ॥ १ ॥

येथेंनसतांवीयोग ॥ लाभाऊणेंकायमग ॥ २ ॥
संगहरीच्यानामाचा ॥ शुचिर्भूतसदावाचा ॥ ३ ॥
तुकाह्मणेहरिच्यादासा ॥ शूभकाळअवघ्यादिशा ॥ ४ ॥

( ५७ )

पतीतपावना ॥ दीनानाथानारायणा ॥ १ ॥
तुझेंरूपमाझेमनीं ॥ राहोनामजपोवाणी ॥ २ ॥
ब्रह्मांडनायका ॥ भक्तजनांच्यापाळका ॥ ३ ॥
जीवींचीयाजीवा ॥ तुकाह्मणेदेवदेवा ॥ ४ ॥

( ५८ )

धेनुचरेवनांतरीं ॥ चित्तबाळकापेंघरीं ॥ १ ॥
तैसेंकरिवोमाझेआई ॥ ठावदेउनिराखेंपायीं ॥ २ ॥
काढितांतळमळी ॥ जीवनाबाहेरमासोळी ॥ ३ ॥
तुकाह्मणेकुडी ॥ जीवप्राणाचीआवडी ॥ ४ ॥

( ५९ )

ह्मणेविठ्ठलब्रह्मनव्हे ॥ त्याचेबोलनायकावे ॥ १ ॥
मगहोकांकोण्हीएक ॥ आदिकरुनीब्रह्मादिक ॥ २ ॥
नाहींविठ्ठलजयाठावा ॥ तोहीडोळांनपाहावा ॥ ३ ॥
तुकाह्मणेनाहीं ॥ त्याचिभीडमजकांहीं ॥ ४ ॥

( ६० )

मुक्तहोतापरीवळेंझालाबद्ध ॥ घेऊनीयांछंदमाझेंमाझें ॥ १ ॥
पापपुण्यअंगींघेतलेंजडून ॥ वर्मनेणेकोणकरीतातो ॥ २ ॥
तुकाह्मणेगेलेंव्यर्थवांयावीणे ॥ जैसामृगशीणेमृगजळें ॥ ३ ॥

( ६१ )

पोटलागलेंपाठीसी ॥ हिंडवीतेंदेशोदेशीं ॥ १ ॥
पोटाभेणेंजिकडेजावें ॥ तिकडेपोटयेतेंसवें ॥ २ ॥
जपतपअनुष्ठान ॥ पोटासाटींझालेदीन ॥ ३ ॥
पोटेंसांडीयेलीचवी ॥ नीचापुढेंतेंनाचवी ॥ ४ ॥
पोटकशियानेंभरे ॥ तुकाह्मणेझुरझुरूमरे ॥ ५ ॥

( ६२ )

घोंटवीनलाळब्रह्मज्ञान्याहातीं ॥ मुक्ताआत्मस्थीतीसांडवीन ॥ १ ॥

ब्रह्मभूतहोतेकायाचकीर्तनीं ॥ भाग्येंतरीरिणीदेवऐसा ॥ २ ॥
तीर्थभ्रमकासीआणीनआळस ॥ कडूस्वर्गवासकरिनभोग ॥ ३ ॥
सांडवीनतपोधनाअभीमान ॥ यज्ञआणीदानलाजवीन ॥ ४ ॥
भक्तीभाग्यसीमासाधीनपुरुषार्थ ॥ ब्रह्मींचाजोअर्थनिजठेवा ॥ ५ ॥
धन्यह्मणवीनइहलोकींलोका ॥ भाग्येंआह्मींतुकादेखीयेला ॥ ६ ॥

( ६३ )

संसाराचेअंगींअवघींव्यसनें ॥ आह्मीह्याकीर्तनेंशुद्धझालों ॥ १ ॥
आतांहेंसोंवळेंझालेंत्रिभूवन ॥ वीषमधूऊनसांडीयेलें ॥ २ ॥
ब्रह्मपूरींवासकरणेंअखंड ॥ नदेखीजेतोंडवीटाळाचें ॥ ३ ॥
तुकाह्मणेआह्मांएकांताचावास ॥ ब्रह्मींब्रह्मरससेवूंसदा ॥ ४ ॥

( ६४ )

सर्वांभूतींद्यावेंअन्न ॥ द्रव्यपात्रविचारून ॥
उपतिष्ठेकारण ॥ तेथेंवीजपेरीजे ॥ १ ॥
पुण्यकरितांहोयपाप ॥ दूधपाजूनीपोसिलासाप ॥
करूनीअघोराचाजप ॥ दुःखविकतघेतलें ॥ २ ॥
भूमीपाहातांनाहींवेगळी ॥ माळबरडएककाळी ॥
उत्तमनिराळी ॥ मध्यमआणिकनिष्ठ ॥ ३ ॥
ह्मणोनीविवेकें ॥ कांहींकरणेंतेंनिकें ॥
तुकाह्मणेफिक्कें ॥ रुचीनेदीमिष्टान्न ॥ ४ ॥

( ६५ )

नेत्रझाकोनीयांकायजपतोसी ॥ जंवनाहींमानसींप्रेमभाव ॥ १ ॥
उघडामंत्रजाणारामकृष्णह्मणा ॥ तुटतीयातनागर्भवास ॥ २ ॥
मंत्रयंत्रकांहींकारिसीजरीबुटी ॥ तेणेंभूतसृष्टीपावशील ॥ ३ ॥
सारतुकाजपेबीजमंत्रएक ॥ भवसिंधूतारकरामनाम ॥ ४ ॥

( ६६ )

स्वर्गाजाणेंतरीयज्ञयागकरा ॥ सत्कर्मआचरानित्यनेमें ॥ १ ॥
नरकाजाणेंतरीपापेंआचरावीं ॥ कथानऐकावीविठोबाची ॥ २ ॥
गुरुव्हावातरीसंताशरणजावें ॥ पारखूनघ्यावेंब्रह्मज्ञान ॥ ३ ॥
मोक्षव्हावातरीअभिमानसोडा ॥ आत्मज्ञानजोडातुकाह्मणे ॥ ४ ॥

( ६७ )

गायत्रीवीकूनीपोटजेजाळीती ॥ तयांहोयगतीयमलोकीं ॥ १ ॥
कन्येचाजेनरकरीतीवीकरा ॥ तेजातीअघोरानरकपाता ॥ २ ॥
नामगाऊनीयांद्रव्यजेमागती ॥ नेणोंतयांगतीकैसीहोय ॥ ३ ॥
कैसेंहोइलत्यांचेंतेचहोजाणती ॥ आह्मांसीसंगतीनलगेत्यांची ॥ ४ ॥
आमचासांगातीआहेतोश्रीहरी ॥ नलगेदुराचारीतुकाह्मणे ॥ ५ ॥

( ६८ )

साधूच्यादर्शनालाजसीगव्हांरा ॥ वेश्येचीयेघराहर्षेंजाशी ॥ १॥
वेश्यादासीमुरळीजगाचीओंवळी ॥ तेतूजसोंवळीवाटेकैशी ॥ २ ॥
तुकाह्मणेआतांलाजधरींलुच्या ॥ टांचराच्याकुच्यामारावेगीं ॥ ३ ॥

( ६९ )

दुर्बुद्धितेमना ॥ कदानुपजोनारायणा ॥ १ ॥
आतांमजऐसेंकरीं ॥ तुझेपायचित्तींधरीं ॥ २ ॥
उपजलाभावो ॥ तुझेरूपेंसिद्धीजावो ॥ ३ ॥
तुकाह्मणेआतां ॥ लाभनाहींयापरता ॥ ४ ॥

( ७० )

साखरेच्यागोण्यांबैलाचीयेपाठीं ॥ तयासीशेवटींकरबाडें ॥ १ ॥
मालाचेंपेंपेटेवाहतातीउंटें ॥ तयालागींकांटेभक्षावया ॥ २ ॥
वाऊगाहाधंदाआशावाढवीसी ॥ बांधोनीयांघेसीयमाहातीं ॥ ३ ॥
ज्यासीअसेलाभतोचीजाणेगोडी ॥ येरवींबापूडींशिणलींवायां ॥ ४ ॥
तुकाह्मणेशाहाणाहोयींरेगव्हांरा ॥ चौऱ्यांशीचाफेराफिरोंनको ॥ ५ ॥

( ७१ )

मुख्यतेगळालीपाहिजेअहंता ॥ उपदेशघेतांसूखवाटे ॥ १ ॥
व्यर्थभराभरकेलेंपाठांतर ॥ जोंवरीअंतरशुद्धनाहीं ॥ २ ॥
घोडेंकायथोडेंवागवीतेंओझें ॥ भावेंवीणवांझेंपाठांतर ॥ ३ ॥
तुकाह्मणेधरानिष्ठावंतभाव ॥ जरीपंढरीरावपाहिजेतो ॥ ४ ॥

( ७२ )

जेथेंकीर्तनकरावें ॥ तेथेंअन्ननसेवावें ॥ १ ॥
बुकालाऊंनयेभाळा ॥ माळघालूंनयेगळां ॥ २ ॥
तट्टावृषभासीदाणा ॥ तृणमागोंनयेजना ॥ ३ ॥

तुकाह्मणेद्रव्यघेती ॥ देतीतेहीनरकाजाती ॥ ४ ॥

( ७३ )

कईवाहवेंजीवन ॥ कईपलंगींशयन ॥ १ ॥
जैसीजैसीवेळपडे ॥ तैसेंतैसेंहोणेंघडे ॥ २ ॥
कईभोज्यनानापरी ॥ कईकोरड्याभाकरी ॥ ३ ॥
कईबैसावेंवाहनीं ॥ कईपाईंअनवाणी ॥ ४ ॥
कईउत्तमप्रावर्णें ॥ कईवसनेंतींहीजीर्णें ॥ ५ ॥
कईसकळसंपत्ती ॥ कईभोगणेंविपत्ती ॥ ६ ॥
कईसज्जनासिसंग ॥ कईदुर्जनासीयोग ॥ ७ ॥
तुकाह्मणेजाण ॥ सुखदुःखतेंसमान ॥ ८ ॥

( ७४ )

कासयापाषाणपूजीतीपीतळ ॥ अष्टधातूखळभावहीन ॥ १ ॥
भावचीकारणभावचीतारण ॥ मोक्षाचेंसाधनबोलीयेलें ॥ २ ॥
कायकरिलजपमाळकंठमाळा ॥ करिसीवेळोवेळांविषयजप ॥ ३ ॥
कायकरीसीलपंडीतहोऊनी ॥ अक्षराभीमानीथोरहोय ॥ ४ ॥
कायकरीसीलकूशळगायन ॥ अंतरींमळीनकुबुद्धितो ॥ ५ ॥
तुकाह्मणेभावनाहींकरीसेवा ॥ तेणेंकायदेवायोग्यहोसी ॥ ६ ॥

( ७५ )

साधकाचीदशाउदासअसावी ॥ उपाधीनसावीअंतर्बाह्य ॥ १ ॥
लोभातेंटाकावेंनिद्रेतेंजिंकावें ॥ भोजनकरावेंपरीमीत ॥ २ ॥
एकांतींलोकांतींस्त्रीयांसींभाषण ॥ प्राणगेल्याजाणकरूंनये ॥ ३ ॥
संगसज्जनाचाउच्चारनामाचा ॥ घोषकीर्तनाचाअहर्निशी ॥ ४ ॥
तुकाह्मणेऐशासाधनींजोराहे ॥ तयाज्ञानलाहेगुरूकृपें ॥ ५ ॥

( ७६ )

कासयागामजघातलेंसंसारीं ॥ चित्तपायांवरीनाहींतुझ्या ॥ १ ॥
कासयागामजघातलेंह्याजन्मा ॥ नाहींतुझाप्रेमानित्यनवा ॥ २ ॥
नामावीणमाझीवाचाअमंगळ ॥ ऐसाकांचांडाळनिर्मीयेला ॥ ३ ॥
तुकाह्मणेमाझीजळोजळोकाया ॥ विठ्ठलासखयावांचूनीयां ॥ ४ ॥

( ७७ )

माताकापीगळा ॥ तेथेंकोणराखेबाळा ॥ १ ॥

कै. म. म. द. वा. पोतदार

हेंकानेणानारायणा ॥ मजचाळवीतांदीना ॥ २ ॥
नागवीधावणें ॥ तेथेंसाह्यव्हावेंकोणें ॥ ३ ॥
राजासर्वेहरी ॥ तेथेंदुजाकोणवारी ॥ ४ ॥
तुझ्याकेल्यावीण ॥ नव्हेस्थीरवशमन ॥ ५ ॥
तुकाह्मणेहरी ॥ सूत्रतुह्मांहातींदोरी ॥ ६ ॥

( ७८ )

परद्रव्यपरनारी ॥ अभिलाषुनीनाकधरी ॥ १ ॥
जळोतयाचाआचार ॥ व्यर्थभारवाहेखर ॥ २ ॥
सोंवळ्याचीस्फीती ॥ क्रोधेंविटाळलाचित्तीं ॥ ३ ॥
तुकाह्मणेसोंग ॥ दावीवाहेरीलअंग ॥ ४ ॥

( ७९ )

टिळेटोपीउंचदावी ॥ जनींमीएकगोंसावी ॥ १ ॥
अवघावररंगसारा ॥ पोटींविषयाचाथारा ॥ २ ॥
मुद्रालावितोकोरूनी ॥ मानव्हावयासीजनीं ॥ ३ ॥
तुकाह्मणेऐसेकिती ॥ नरकागेलेपुढेंजाती ॥ ४ ॥

( ८० )

ऐसेसंतझालेकळीं ॥ तोंडींतमाखूचीनळी ॥ १ ॥
स्नानसंध्याबूडविली ॥ पुढेंभांगवोढविली ॥ २ ॥
भांगभुर्कांहिंसाधन ॥ पचनींपडेमद्यपान ॥ ३ ॥
तुकाह्मणेअवघेंसोंग ॥ तेथेंकैंचापांडुरंग ॥ ४ ॥

( ८१ )

वर्णावीतेयोरीएकाविठ्ठलाची ॥ कीर्तिमानवाचीबोलोंनये ॥ १ ॥
उदंडचीझालेजन्मोनीयांमेले ॥ होवोनीयांगेलेरावरंक ॥ २ ॥
अक्षयअढळचळेनाढळेना ॥ तयानारायणाध्यातजावें ॥ ३ ॥
तुकाह्मणेतुह्मीविठ्ठलाचित्तींध्यातां ॥ जन्ममरणव्यथादूरहोती ॥ ४ ॥

( ८२ )

जोडोनीयांधनउत्तमवेव्हारें ॥ उदासवीचारेंवेंचकरी ॥ १ ॥
उत्तमचीगतीतोएकपावेल ॥ उत्तमभोगीलजीवखाणी ॥ २ ॥
परउपकारीनेणेपरनिंदा ॥ परस्त्रियासदाबहिणीमायी ॥ ३ ॥
भूतदयागायीपशूंचेंपाळण ॥ तान्हेल्याजीवनवनामाजी ॥ ४ ॥

शांतीरूपेंनव्हेकोणाचेंवाच्यत्व ॥ वाढवीमहत्ववडीलाचें ॥ ५ ॥
तुकाह्मणेहेंचीआश्रमाचेंफळ ॥ परमपदबळवैराग्याचें ॥ ६ ॥

( ८३ )

आलींसिंहस्थपर्वणी ॥ न्हाव्याभटांझालीधणी ॥ १ ॥
अंतरींपापाच्याकोढी ॥ वरीबोडीडोयीदाढी ॥ २ ॥
जेंबोडिलेंतेंनिघालें ॥ सांगकायपालटलें ॥ ३ ॥
पापगेल्याचीखुण ॥ नाहींपालटलेअवगुण ॥ ४ ॥
भक्तिभावेंवीण ॥ तुकाह्मणेअवघाशीण ॥ ५ ॥

( ८४ )

तुजघालोनीयांपूजीतोसंपुष्टीं ॥ परीतुझ्यापोटींचौदाभुवनें ॥ १ ॥
तुजनाचवूनीदाखवूंकौतुक ॥ परीरूपरेखनाहींतूज ॥ २ ॥
तुजलागींआह्मींगातअसोंगीत ॥ परीतूंअतीतशब्दाहूनी ॥ ३ ॥
तुजलागींआह्मींघातीयेल्यामाळा ॥ परीतूंवेगळाकर्तृत्वासी ॥ ४ ॥
तुकाह्मणेआतांहोऊनीपरिमित ॥ माझेंकांहींहीतविचारावें ॥ ५ ॥

( ८५ )

हेचीथोरभक्तीआवडतीदेवा ॥ संकल्पावीमायासंसाराची ॥ १ ॥
ठेवीलेंअनंततैसेंचीराहावें ॥ चित्तींअसोंद्यावेंसमाधान ॥ २ ॥
वाहील्याउद्वेगदु:खचीकेवळ ॥ भोगणेंतेंफळसंचीताचें ॥ ३ ॥
तुकाह्मणेघालूंतयावरीभार ॥ वाहूंहासंसारदेवापायीं ॥ ४ ॥

( ८६ )

धनवंतालागीं ॥ सर्वमान्यताहेजगीं ॥ १ ॥
मातापितावंधूजन ॥ सर्वमानितीवचन ॥ २ ॥
जंवचालेमोठाधंदा ॥ तंवबहींणह्मणेदादा ॥ ३ ॥
सदाशृंगारभूषणें ॥ कांतालवेवहूमानें ॥ ४ ॥
तुकाह्मणेधन ॥ भाग्यअशाश्वतजाण ॥ ५ ॥

( ८७ )

लोहोपरीसारूसलें ॥ सोनेपणासीमूकलें ॥ १ ॥
येथेंकोणाचेंकायवागेलें ॥ ज्याचेंतेणेंअनहितकेलें ॥ २ ॥
गंगाआलीआळशावरी ॥ आळशीदेखुनिपळेदुरी ॥ ३ ॥
गांवाखालीलओहळे ॥ रागेंगंगेसीनमीळे ॥ ४ ॥

तुकाह्मणेहोऊनीदास ॥ गुरूसीनभजतीशिष्य ॥ ५ ॥

( ८८ )

मागेनतेंएकतुज ॥ देईंविचारोनीमज ॥ १ ॥
नकोदुर्जनासींसंग ॥ क्षणक्षणाचित्तभंग ॥ २ ॥
जन्मघेईनमीनाना ॥ बहूसोसीनयातना ॥ ३ ॥
तुकाह्मणेहेंचिआतां ॥ देईंदेईंतूंसर्वथा ॥ ४ ॥

( ८९ )

लागोंनेदींबोलपायांतूझ्याहरी ॥ जीवजावोपरीनकरींआन ॥ १ ॥
परनारीमजरखुमाईसमान ॥ वमनाहूनीधननीचमानीं ॥ २ ॥
तुकाह्मणेयाचीलाजअसोकोणा ॥ साह्यकारीवासनाज्याचीतया ॥ ३ ॥

( ९० )

आपूलीयाबळेंनाहींबोलवत ॥ सखाभगवंतवाचात्याची ॥ १ ॥
साळुंखीमंजूळबोलतसेवाणी ॥ शिकवीताधणीवेगळाची ॥ २ ॥
कायम्यांपामरेंबोलावींउत्तरें ॥ परित्याविश्वंभरेंबोलविलें ॥ ३ ॥
तुकाह्मणेत्याचीकोणजाणेकळा ॥ वागवीपांगुळापायांवीण ॥ ४ ॥

( ९१ )

ऐसाघेईंबासंन्यास ॥ करींसंकल्पाचानाश ॥ १ ॥
मगतूंराहेंभलत्याठायीं ॥ जनींवनींखाटेभोईं ॥ २ ॥
तोडींजाणीवेचीकळा ॥ होईंवृत्तीसींवेगळा ॥ ३ ॥
तुकाह्मणेव्यापकनभा ॥ होईंअणूचाहीगाभा ॥ ४ ॥

( ९२ )

जनहेंसुखाचेंदिल्याघेतल्याचें ॥ वाअंतकाळींचेंनाहींकोणी ॥ १ ॥
झाल्याहीनशक्तीनाकडोळेगळती ॥ सांडोनियांपळतीरांडापोरें ॥ २ ॥
बाईलह्मणेखरमरतातरीबरें ॥ नासीलेंहेंघरथुंकोनीयां ॥ ३ ॥
तुकाह्मणेमाझींनहोतहींकोणी ॥ तुजचक्रपाणीवांचूनीयां ॥ ४ ॥

( ९३ )

मोलेंघातलेंरडाया ॥ नाहींअसूंआणीमाया ॥ १ ॥
तैसाभक्तिवादकाय ॥ रंगबेगडीचान्याय ॥ २ ॥
वेठींधरिल्यादावीभाव ॥ मागेंपळावयापाव ॥ ३ ॥
काजव्याच्याजोती ॥ तुकाह्मणेनलगेवाती ॥ ४ ॥

( ९४ )

पतीतमीपापीशरणआलोंतूज ॥ राखींमाझीलाजपांडुरंगा ॥ १ ॥
तारीयेलेभक्तनकळेतूझाअंत ॥ थोरमीपतीतपांडुरंगा ॥ २ ॥
द्रौपदीबहीणवैरीयेंगांजीली ॥ आपणाऐसीकेलीपांडुरंगा ॥ ३ ॥
प्रल्हादाकारणेंस्तंभींअवतार ॥ माझाकांवीसरपांडुरंगा ॥ ४ ॥
सुदामाब्राह्मणदारिद्रेंव्यापीला ॥ आपणाऐसाकेलापांडुरंगा ॥ ५ ॥
तुकाह्मणेतूजशरणनिजभावें ॥ पापनिर्दाळावेंपांडुरंगा ॥ ६ ॥

( ९५ )

समर्थाचीधरिलीकास ॥ आतांनासकशाचा ॥ १ ॥
धांवेंपावेंकरिनलाहो ॥ तुमचाअहोविठ्ठला ॥ २ ॥
नलगेमजपाहाणेंदिशा ॥ हाकेसरसावोढसी ॥ ३ ॥
तुकाह्मणेनव्हेंधीर ॥ तुमच्यास्थीरदयेनें ॥ ४ ॥

( ९६ )

वैष्णवासंगतींसुखवाटेजीवा ॥ आणीकमीदेवाकांहींनेणें ॥ १ ॥
गायेंनाचेंउडेंआपुलीयाछंदें ॥ मनाच्याआनंदेंआवडीनें ॥ २ ॥
लाजभयशंकादुरावीलामान ॥ नकळेसाधनयापरतें ॥ ३ ॥
तुकाह्मणेआतांआपुल्यासायासें ॥ आह्मांजगदीशेंसांभाळावें ॥ ४ ॥

( ९७ )

लेंकरालेववीमाताअळंकार ॥ नाहींअंतपारआवडीसी ॥ १ ॥
कृपेचेंपोसणेंतुमचेंमीदीन ॥ आजीसंतजनमायवाप ॥ २ ॥
आरुष*उत्तरींसंतोषेमाउली ॥ कवळूनीघालीह्रदयाआंत ॥ ३ ॥
पोटाआलेंत्याचेनेणेगुणदोष ॥ कल्याणचिऐसेंअसावेंहें ॥ ४ ॥
मनाचीतेचालीमोहाचीयेसोय ॥ ओघगंगाकायपरतोंजाय ॥ ५ ॥
तुकाह्मणेमोटीउदारमेघशक्ती ॥ माझीतृषाकीतीचातकाची ॥ ६ ॥

( ९८ )

ह्मामीआलोंह्मणेकोण्हीवूडतया ॥ तेणेंकीतीतयाबळचढे ॥ १ ॥
तुह्मींमाझाभारघेतलासकळ ॥ आश्वासीलोंबाळअभयकरें ॥ २ ॥
भुकेलीयाआसदावीतांनिर्द्धार ॥ कितीहोयधीरसमाधान ॥ ३ ॥
तुकाह्मणेदिल्हीचिंतामणीसाटीं ॥ उचितकाचवटीदंडवत ॥ ४ ॥

* आर्षपणाचें.

( ९९ )

जेणेंवाढेअपकीर्ती ॥ सर्वार्थींतेंत्यजावें ॥ १ ॥
सत्यरुचेभलेपण ॥ वचनतेंजगासी ॥ २ ॥
परधनपरजाया ॥ पाहुनवायांनभुलावें ॥ ३ ॥
तुकाह्मणेखोटेंवर्म ॥ निंद्यकर्मकाळिमा ॥ ४ ॥

( १०० )

कोण्याकाळेंयेइलमना ॥ नारायणातुमचिया ॥ १ ॥
माझाकरणेंअंगीकार ॥ सर्वभारफेडूनी ॥ २ ॥
लागलीहेतळमळचित्ता ॥ तरीदुश्चित्तासंसारीं ॥ ३ ॥
इच्छापूर्णझाल्यावीण ॥ कैसाशीणवारेल ॥ ४ ॥
कंटाळातोनधरावा ॥ तुह्मीदेवादासाचा ॥ ५ ॥
तुकाह्मणेमाझेवेळे ॥ नकळेकांहींउफराटें ॥ ६ ॥

( १०१ )

तूंमाझीमाउलीतूंमाझीसाउली ॥ पाहातोंवाटूलीपांडूरंगे ॥ १ ॥
तूंमजऐकूलावडीलधाकूला ॥ तूंमजवापूलासोयराजीव ॥ २ ॥
तुकाह्मणेजीवतूजपाशींआस ॥ तुजवीणओससर्वदीशा ॥ ३ ॥

( १०२ )

घातलेंदुकान ॥ देतीआलीयासीदान ॥ १ ॥
संतउदारउदार ॥ भरलेअनंतभांडार ॥ २ ॥
मागत्याचीपुरे ॥ धणीआणीकासीउरे ॥ ३ ॥
तुकाह्मणेपोतें ॥ देवेंभरलेंन्व्हेरितें ॥ ४ ॥

( १०३ )

नरस्तुतीआणीकथेचावीकरा ॥ हेंनकोदाताराघडोंदेऊं ॥ १ ॥
ऐसीयेकपेचीभाकितोंकरूणा ॥ आहेसीतूंराणाउदारांचा ॥ २ ॥
पराचीयानारीआणीपरधना ॥ नकोदेऊंमनावरीयेऊं ॥ ३ ॥
भूतांचामत्सरआणीसंतानिंदा ॥ हेंनकोगोविंदाघडोंदेऊं ॥ ४ ॥
तुकाह्मणेतूझ्यापायांचावीसर ॥ नकोवारंवारघडोंदेऊं ॥ ५ ॥

( १०४ )

पाहाकितीआले ॥ शरणसमानचीकेले ॥
नाहींविचारिले ॥ गुणदोषकोणाचे ॥ १ ॥

मजशेवटींचाद्यावा ॥ ठावतयाचीयेदेवा ॥
नाहींकरीतमीहेवा ॥ कांहींथोरपणाचा ॥ २ ॥
नाहींपाहिलाआचार ॥ कुळगोत्राचाविचार ॥
फेडूंआलाभार ॥ मगनह्मणेदगड ॥ ३ ॥
तुकाह्मणेसर्वजाणा ॥ तुझ्याआल्यावरीमना ॥
केलातोउगाणा ॥ घडल्यामहादोषाचा ॥ ४ ॥

( १०५ )

दुष्टाआचरणासिग्वाहीमाझेंमन ॥ मजठावेगुणदोषमाझे ॥ १ ॥
आतांतुह्मीसर्वजाणापांडुरंगा ॥ पाहिजेप्रसंगाऐसेंकेलें ॥ २ ॥
व्याह्याजांवयाचेपंगतीदुर्बळ ॥ वंचीजेतोकाळनव्हेकांहीं ॥ ३ ॥
तुकाह्मणेआतांझालोंशरणागत ॥ पुढीलऊचिततुह्मांहातीं ॥ ४ ॥

( १०६ )

जराकर्णमुळींसांगोंआलीगोष्टी ॥ मृत्यूचीयेभेटीजवळीआली ॥ १ ॥
आतांमाझ्यामनाहोईंसावधान ॥ हेपुण्याचीजाणकार्यसिद्धी ॥ २ ॥
सेवटीलघडीबुडतांनलगेवेळ ॥ साधावातोकाळजवळीआला ॥ ३ ॥
तुकाह्मणेचिंतींकुळींचीदेवता ॥ वारावाभोंवताशब्दमिथ्या ॥ ४ ॥

( १०७ )

संतांसीक्षोभवीकोण्याहीप्रकारें ॥ त्याचेंनव्हेबरेंउभयलोकीं ॥ १ ॥
देवाचातोवैरीशत्रूदावेदार ॥ पृथ्वीवरीथारनेदीतया ॥ २ ॥
संतांपाशींज्याचानुरेचीविश्वास ॥ त्याचेझालेदोषबळींवंत ॥ ३ ॥
तुकाह्मणेक्षीरवांसराच्याअंगें ॥ कीतधांवोलागेविषमेंगारूं ॥ ४ ॥

( १०८ )

सेवकासीआज्ञानिरोपासीकाम ॥ स्वामीचेंतेंकर्मस्वामीजाणे ॥ १ ॥
मनाचीयेमूळींराहावेंबैसोन ॥ आक्रोशावेगुणपायांपाशीं ॥ २ ॥
भेटीचेतांतडीकरीतसेलाहो ॥ पाळावाहादेहोऐसेंवाटे ॥ ३ ॥
तुकाह्मणेमाझेंकरावेंकल्याण ॥ आपुलेंजतनब्रीदकरा ॥ ४ ॥

( १०९ )

ज्याचासखाहरी ॥ त्यावरीविश्वकृपाकरी ॥ १ ॥
ऐसाअसूनीअनुभव ॥ कासावीसहोतोजीव ॥ २ ॥
करितांहरीचेंचिंतन ॥ त्यासिवाधूंनसकेविघ्न ॥ ३ ॥

तुकाह्मणेहरी ॥ प्रल्हादासीयत्नकरी ॥ ४ ॥

( ११० )

नाहींधर्माचीवासना ॥ कायकरूनीप्रदक्षिणा ॥ १ ॥
असेंनव्हेभक्तिवर्म ॥ तेथेंनाहींमाझाराम ॥ २ ॥
नयेकृपाकांहींकेल्या ॥ नाहींनेमजीवगेल्या ॥ ३ ॥
जैसीखांडियाचीधार ॥ विठ्ठलपाईंतुकाशूर ॥ ४ ॥

( १११ )

जाणतेंलेंकरूं ॥ मातालागेदुरीधरूं ॥ १ ॥
तैसेंनकरींकृपावंते ॥ पांडुरंगेमाझेमाते ॥ २ ॥
सिंपीआणिजळा ॥ भेटीनव्हेमुक्ताफळा ॥ ३ ॥
तुकाह्मणेलोणी ॥ ताकसांडीनीवडूनी ॥ ४ ॥

( ११२ )

मुखींनामहातींमोक्ष ॥ हेतोसाक्षवहूतां ॥ १ ॥
वैष्णवाचामालखरा ॥ फुकावराघावला ॥ २ ॥
नलगेभस्मदंडकाठी ॥ तीर्थेंआटीभ्रमण ॥ ३ ॥
तुकाह्मणेघटपटा ॥ नलगेवाटाशोधाव्या ॥ ४ ॥

( ११३ )

आधींहोतावाघ्या ॥ दैवयोगेंझालापाग्या ॥ १ ॥
त्याचायेळकोटराहिना ॥ मूळस्वभावजाईना ॥ २ ॥
आधींहोताग्रामजोशी ॥ राज्यपदआलेंत्याशी ॥ ३ ॥
त्याचेंपंचांगराहीना ॥ मूळस्वभावजाईना ॥ ४ ॥
आधींहोतीदासी ॥ पट्टराणीकेलेंतिसी ॥ ५ ॥
तिचेंहिंडणेंराहीना ॥ मूळस्वभावजाईना ॥ ६ ॥
आधींहोतासंतसंग ॥ तुकाझालापांडूरंग ॥ ७ ॥
त्याचेंभजनराहीना ॥ मूळस्वभावजाईना ॥ ८ ॥

( ११४ )

नामविटोवाचेंध्यावें ॥ मगपाऊलटाकावें ॥ १ ॥
सर्वमुहूर्तशकून ॥ ह्रदयींविटोवाचेंध्यान ॥ २ ॥
ऐसाअसतांहायोग ॥ लाभाउणेंकायमग ॥ ३ ॥
तुकाह्मणेहरिचेदासा ॥ शुभकाळसर्वदिशा ॥ ४ ॥

( ११५ )

ज्यासीमातापरनारी ॥ त्याचेमुखींखराहरी ॥ १ ॥
इतरपोटासाठींसोंग ॥ तेथेंकैंचापांडुरंग ॥ २ ॥
ज्यालापरधनविष ॥ तोचिखराहरीदास ॥ ३ ॥
तुकाह्मणेसत्यसत्य ॥ कृष्णपायांचीशपत ॥ ४ ॥

( ११६ )

जेणेंसांडीलासंसार ॥ तयावरीमायाफार ॥ १ ॥
धांवेचालेमागेंमागें ॥ सुखदुःखसोशीअंगें ॥ २ ॥
ज्याणेंध्यावेंनाम ॥ त्याचेंकरावेंतेंकाम ॥ ३ ॥
तुकाह्मणेभोळी ॥ विठ्ठलकृपेचीकोंवळी ॥ ४ ॥

( ११७ )

घेईंघेईंमाझेवाचे ॥ गोडनामविठोबाचें ॥ १ ॥
मनातेथेंधांवघेईं ॥ राहींराघोबाचेपाईं ॥ २ ॥
डोळेतुह्मीध्यारेसुख ॥ पाहाविठोबाचेंमुख ॥ ३ ॥
तुह्मीआइकारेकान ॥ माझेविटोबाचेगूण ॥ ४ ॥
तुकाह्मणेजीवा ॥ नकोसांडूंयाकेशवा ॥ ५ ॥

( ११८ )

ब्रह्मरसघेईंकाढा ॥ तेणेंपीडावारेल ॥ १ ॥
पथ्यनामविठोबाचें ॥ आणिकवाचेनसेवीं ॥ २ ॥
भवरोगाऐसेंजाय ॥ यमकायक्षुल्लक ॥ ३ ॥
तुकाह्मणेनव्हेबाधा ॥ आणिककदाभूतांची ॥ ४ ॥

( ११९ )

पडतांजडभारी ॥ दासींआठवावाहरी ॥ १ ॥
मगतोहोऊंनेदीशीण ॥ आडघालीसुदर्शन ॥ २ ॥
हरिनामाचेचिंतनें ॥ बारावाटापळतीविघ्नें ॥ ३ ॥
तुकाह्मणेहरी ॥ कांहींउरूंनेदीउरी ॥ ४ ॥

( १२० )

नाहींनिर्मळजीवन ॥ कायकरीलसाबण ॥ १ ॥
मंघ्येनहोतीलेंकुरें ॥ कायकीजेत्याभ्रतारें ॥ २ ॥

नपुंसकापुरुषासी ॥ बाइलकायहोयत्यासी ॥ ३ ॥
वृक्षनेदीपुष्पफळ ॥ कायकरिलवसंतकाळ ॥ ४ ॥
तुकाह्मणेभक्तीवीण ॥ फळकांहींनाहींजाण ॥ ५ ॥

( १२१ )

जेकारंजलेगांजले ॥ त्यांसीह्मणवीजोआपुले ॥ १ ॥
साधुतोचीओळखावा ॥ देवतेथंचीजाणावा ॥ २ ॥
ज्यासीआपंगितानाहीं ॥ त्यासीधरीजोव्हदयीं ॥ ३ ॥
दयाकरीजेपुत्रासी ॥ तेचिदासआणीदासी ॥ ४ ॥
तुकाह्मणेसांगूकिती ॥ तोचिभगवंताचीमूर्ती ॥ ५ ॥

( १२२ )

नामघेतांउठाउठी ॥ पडेसंसारासीतुटी ॥ १ ॥
ऐसालाभबांधागांटी ॥ विठ्ठलपायींपडेमीठी ॥ २ ॥
नामापरतेंसाधननाहीं ॥ जेंजेंकरीशीलकांहीं ॥ ३ ॥
गर्वनाशुनिहितैंपददेशी ॥ देशिजेंगुरुपणेंउपदेशी ॥ २८ ॥
तूंमुक्तिदेतोसिअसीउदंड ॥ दासांसिदास्येंचिखळांसिदंड ॥
कर्मेंतुझींत्यांतविवेकरीती ॥ देशीजसेंकर्मफळेंकरीती ॥ २९ ॥

एवंअनुग्रहखळाजन्हियाग्रहांत ॥ तेहीनसेविषमतातवाविग्रहांत ॥
कर्मानुरूपफळदेउनिमुक्तिदेशी ॥ दुष्टांसआणिकभल्यांसहितोपदेशीं ॥३०॥
जोअन्यघातासिसदाभुकेला ॥ स्वयेंचितैशासहिदंडकेला ॥
कोण्यातपाचेंफळदेवदेवा ॥ नेणोंअसेंबोलतिवासुदेवा ॥ ३१ ॥
अजिकितीतपलानकळेतपें ॥ विविधसोसुनियांहिमआतपें ॥
गुरुकुळींअथवाप्रथमाश्रमीं ॥ बहुतजन्मवनींक्रमिलेश्रमीं ॥ ३२ ॥
त्यजुनिमानधनादिकमीपणें ॥ स्वपरटाकुनिकेवळआपणें ॥
बहुतदेउनिमानधनेंजना ॥ परमतत्परयातवपूजना ॥ ३३ ॥
किंवातुतेंलक्षुनिसर्वभूतीं ॥ केलीदयाकींहरिचीविभूती ॥
धर्मेंअशाश्रीहरितुष्टलाहो ॥ तरीचहालाभहिदुष्टलाहो ॥ ३४ ॥
जीवतूंहरिजगींसकळाचा दंडआपणचिहोयखळाचा ॥
सर्वभूतकरुणेविणहातां ॥ जेंनयेफळकदापिपहातां ॥ ३५ ॥
शिरिंजयातवरेणुअसापडे ॥ सुकृततेंनमनासहिसांपडे ॥
पदरजासिअशाअतिदुर्लभा ॥ भुजगपात्रकसाव्रजवल्लभा ॥ ३६ ॥
कमळजातुझिजेनिजनायका ॥ तिसहिलाभनहाव्रजनायका ॥
बहुतपेंकरितांजगमाउली ॥ विनटलीतवयामृदुपाउलीं ॥ ३७ ॥
चपलजेपलजेंवियुगेंकरी ॥ विरमलीरमलीधरितांकरीं ॥
पदरजींविरजींतवलक्षणें ॥ नवसतीवसतीइतरींक्षणें ॥ ३८ ॥
व्रजपतीजपतीसतुझासदा ॥ नमनितेमनितेजदुजेंकदा ॥
तिसकळासकळातुजअर्पणें ॥ चपळतेपळतेअनुहीपणें ॥ ३९ ॥
तवरमावरमागुनियांरजीं ॥ विनटलीनटलीबहुफारजी ॥
अजितसाजितसापहिलाधला ॥ विभवहेभवहेळणलाधला ॥ ४० ॥
सांपडेचरणरेणुजयाला ॥ यत्नतेइतरसिद्धजयाला ॥
सर्वथानकरतीचरमेशा ॥ यावरीवदतिहेपरमेशा ॥ ४१ ॥
असेंतुझेंजेंपदरेणुदेवा ॥ तेंलाधलाहाखळवासुदेवा ॥
आश्चर्यहेंमानुनिसर्परामा ॥ निवेदितीविश्वमनोभिरामा ॥ ४२ ॥
अनंतशक्तिप्रभुवासुदेवा ॥ तूंज्ञानाविज्ञाननिधानदेवा ॥
तूंब्रह्मतूंनिर्गुणानिर्विकारा ॥ तूंतत्वतातूंप्रकृतिप्रकारा ॥ ४३ ॥
नमोकालरूपानमोविश्वरूपा ॥ नमोविश्वसाक्षीअनादिस्वरूपा ॥
नमोविश्वकर्त्याजगत्कारणाला ॥ स्वयेंकारणातीतनारायणाला ॥ ४४ ॥

तूंईशयेरितिउपाधिजयासिविद्या ॥ तूंजीवहीधरुनिहीअससीअविद्या ॥
जोस्वानुभूतरहितात्रिगुणाभिमान॥त्यातेंनमोस्थिरचरांतहिजोसमान ॥४५॥
तूंसिद्धिदातासकळाविकारा ॥ नमोनमोत्यातुजानिर्विकारा ॥
जोवर्तवीतोसकलेंद्रियांतें ॥ तोतूंहृषीकेशनमोतयातें ॥ ४६ ॥
तूंइंद्रियेंवर्तवुनीविरक्त ॥ कोठेंनहोसीविषयानुरक्त ॥
कींतूंगुरूआदिगुरूमुनीला ॥ नित्यस्वयेंमुक्तसरोजनीला ॥ ४७ ॥
तूंसाक्षिगासर्वमनोगतींचा ॥ अध्यक्षतूंयाजगदुत्पतीचा ॥
नविश्वहोऊनिहिविश्वरूपा ॥ कींसर्पहीरज्जुचचित्स्वरूपा ॥ ४८ ॥
ज्ञानस्वरूपाजडसर्पहारा ॥ द्रष्टृत्वकर्मेंकरिशीविहारा ॥
तूंकारणस्थावरजंगमाचें ॥ निमित्तरज्जूचभुजंगमाचें ॥ ४९ ॥
वंदूनियांयेरितिपीतवासा ॥ प्रसन्नदेखूनिजगन्निवासा ॥
त्याप्रार्थितीश्रीकमलापतीतें ॥ कींसोडियाआमुचियापतीतें ॥ ५० ॥
अंगीकरूनिवदल्याखळदंडआधीं ॥ हाकष्टलापतिअसानधरूनआधी ॥
कींयामिसेंकरुनिहोउनितुष्टदेवा॥प्राणप्रदानपतिचेंकरिंवासुदेवा ॥ ५१ ॥
तोंतोंप्रसन्नहरिदेखियलाभलाहो ॥ नेदीतथापिपतिमोक्षणलाभलाहो ॥
यानंतरेंह्मणतिकींस्थिरजंगमातें ॥ तूंबुद्धिदायकतसाचभुजंगमातें ॥ ५२ ॥
तूंसूत्रधारीचजनाशयाचा ॥ करूनिसृष्टिस्थितिनाशयाचा ॥
ज्याज्याससंस्कारजसेमतीचे ॥ उद्बोधतेसेकरिसीमतीचे ॥ ५३ ॥
तूंचिस्वयेंप्रेरकवासुदेवा ॥ अन्याययाचातरिकायदेवा ॥
क्षमाकरावीजगदेकबंधू । अनंतकारुण्यगुणैकसिंधू ॥ ५४ ॥
अन्यायकेलाजरिबाळकानें ॥ क्षमाकरावीजगपाळकानें ॥
तूंमायबापस्थिरजंगमाचा ॥ हासोसिअन्यायभुजंगमाचा ॥ ५५ ॥
जोश्रीतनूसिडसतांअपराधझाला ॥ तोदंशबाधकनव्हेगरुडध्वजाला ॥
ज्याच्याविषेंभयजगींगरुडासनाहीं॥तेंदुःखदेइलकसेंगरुडासनाही ॥ ५६ ॥
किमपिदुःखतुतेंगमतेंजरी ॥ उपजतातुजकोपहिअंतरीं ॥
तदपिनेणतहासुरसत्तमा ॥ तुजअजीडसलापुरुषोत्तमा ॥ ५७ ॥
मूढमूर्तिहरियाभुजगाची ॥ शांतिमाउलिचतूंत्रिजगाची ॥
हाचुकेनअपराधकराया ॥ तूंक्षमेसनचुकेंसुरराया ॥ ५८ ॥
ताडिलेंचभृगुनेंतुजलातें ॥ श्लाघ्यहोयत्हृदयींतुजलातें ॥
गातियाअमृतआचरणातें ॥ भक्तजेशरणयाचरणातें ॥ ५९ ॥

हेआयकेशब्दतदंगनांचे ॥ रंगींफणांच्याविविधांगनाचे ॥
तोंचालिलाप्राणभुजंगमाचा ॥ नभारसोसेस्थिरजंगमाचा ॥ ६० ॥
तेंपाहतांकाकुळतीकरीती ॥ त्रैलोक्यनाथासहिलोकरीती ॥
वस्त्रांचलातेंपसरूनिदान ॥ त्यामागतीदेखुनियांनिदान ॥ ६१ ॥
कृष्णजीअज्ञुनिकांनपहाहा ॥ प्राणकींत्यजिभुजंगमहाहा ॥
दीसतेतनुशवासमयाची ॥ आसतेइतुकियासमयाची ॥ ६२ ॥
प्राणभीकपतिचीकरुणातें ॥ मागतोंशरणयाचरणातें ॥
प्रार्थितोंनिजकृपानिपुणासी ॥ देरमापतिअहेवपणासी ॥ ६३ ॥
परमतत्परत्यापतिजीवनीं ॥ विनवितीयमुनाऱ्हदजीवनीं ॥
पतिससोडिंअसावरमागती ॥ वरितिआपणहीपरमागती ॥ ६४ ॥
काकूळतीयारितिबायकांनीं ॥ केलीतितेंश्रीशुकगायकानीं ॥
घेऊनिआत्मास्थिरजंगमाचा ॥ पुरेकरीदंडभुजंगमाचा ॥ ६५ ॥
आतांह्मणेश्रीशुकहीनृपाळा ॥ ऐशाप्रकारेंस्तवितीकृपाळा ॥
आलीकृपात्याचजनार्दनातें ॥ पुरेकरीकालियमर्दनातें ॥ ६६ ॥
पायेंकरूनिभुजगाधिपलोटिलाहो ॥ हासेवटींपदरजेंशतकोटिलाहो ॥
गुंडाळल्यापदयुगावरिवर्तमाना ॥ झिंझाडुनीढकलिल्याभुजगेंद्रमाना॥६७॥
तोकाळियाहोउनिसावधान ॥ देखेरमाकांतदयानिधान ॥
भजावयाश्रीगरुडध्वजाला ॥ तत्काळतोहीनररूपजाला ॥ ६८ ॥
धरुनियांनररूपकृतांजळी ॥ चरणवंदुनियांहरिचेजळीं ॥
हळुहळूप्रभुसीअतिसंकटें ॥ वदतसेशिशुजेरितिधाकटें ॥ ६९ ॥
आह्मीह्मणेउपजतांखळदुष्टभारी ॥ कींक्रोधदीर्घअतिदारुणकैटभारी ॥
उत्पत्तिकेवलतमोमयतामसांची ॥ हेतोनव्हेअनृतगोष्टिअसीचसाची॥७०॥
प्राण्याससंस्कारकधींसुटेना ॥ स्वभाववेडीसहसातुटेना ॥
श्रीमूर्तितूझीहरिसारसाक्षी ॥ हेजाणतेसारअसारसाक्षी ॥ ७१ ॥
यालागिंआतांकरणेंचिदंड ॥ करींतरीआणिकहीउदंड ॥
कृपाकरावीजरिहेंचिवाटे ॥ सर्वज्ञतूंलावितशाचवाटे ॥ ७२ ॥
हरिपुढेंपसरीफणिविग्रहा ॥ अजिह्मणेहरिटाकुनिआग्रहा ॥
अजिदयातरिदाविंअनुग्रहा ॥ करिंपुरेअथवाअतिनिग्रहा ॥ ७३ ॥
शुकह्मणेशरणागतिहेखरी ॥ भुजगजेवदलानिजवैखरी ॥
परिसतांहरित्याप्रतिबोलतो ॥ धरणिनायकआयकबोलतो ॥ ७४ ॥

जळपितीकरितीलनिमज्जना ॥ पशुपगोवळगौळणिमज्जना ॥
तवविषेंअतिदूषितजीवना ॥ क्षणनलागतनाशिलजीवना ॥ ७५ ॥
ह्मणुनिटाकुनियांयमुनाऱ्हदा ॥ त्वरितजायह्मणेखळदुर्द्दंदा ॥
वरहिंदेउनियांकमळावरें ॥ दवडिलाचफणीजगदीश्वरें ॥ ७६ ॥
ऱ्हदजळांतहिम्यांकमळासनें ॥ गुणकथारचिल्यातवशासनें ॥
स्मरतिजेजनसांजसकाळिंया ॥ नतुमचेंभयपावतिकाळिया ॥ ७७ ॥
विषतुझेंनकदापितयासिरे ॥ सततहेंखळशासनजोस्मरे ॥
तुजजयींनतयासहिपाहवे ॥ व्रजसमीपकसेंवदराहवे ॥ ७८ ॥
कड्यावरूनियांउड्याप्रथमटाकुनीत्यागड्या ॥
गडेपशुपभेटतीतटतटाभुजींआंगड्या ॥
फुगोनितनुफाटतीमणगटींकडींदाटती ॥
सुखेंअमितवाटतीविरहसिंधुतेआटती ॥ १७९ ॥

---

## वेंचे, निगमसारांतील.

### ओंव्या.

### अध्यायपहिला.

जयजयकल्याणनिलया ॥ जयजयकरुणावरुणालया ॥ जयजयसर्वाश्रया ॥ परममंगळागोविंदा ॥ १ ॥ जयजयभगवतोत्तमा ॥ जयजयसर्वोत्तमा ॥ जयदेवतासार्वभौमा ॥ अनादिपुरुषा ॥ २ ॥ तूंसाकारनिर्विकार ॥ तूंप्रत्यक्षविश्वाकार ॥ सर्वात्मभावेंनमस्कार ॥ सर्वेश्वरातूतें ॥ ३ ॥ तूंशेषशायीपरमेश्वर ॥ तूंचिअवघेंचराचर ॥ ग्रंथआरंभिलानिगमसार ॥ तो तूंचिकीं ॥ ४ ॥ सकळनिगमाचेंसार ॥ ब्रह्मअद्वैतनिर्द्धार ॥ तेंव्हांहा ग्रंथकरणार ॥ तोतूंचिकीं ॥ ५ ॥ तूंचिजालासिवामन ॥ तुंवाव्यापिलें त्रिभुवन ॥ तोतूंचिसच्चिदानंदघन ॥ विश्वात्मा ॥ ६ ॥ जयजयपरमपुरुषा ॥ जयजयसर्वविशेषा ॥ जयजयमायानिषेधशेषा ॥ सच्चिदानंदा ॥ ॥ ७ ॥ ज्याच्यासत्पदींविश्वअसे ॥ ज्याच्याचित्पदींविश्वदिसे ॥ आनंदपदें विश्वउल्लसे ॥ तोतूंश्रीगुरुसच्चिदानंद ॥ ८ ॥ श्रीसच्चिदानंदगुरू ॥ ब्रह्मविद्येचाकल्पतरू ॥ करुणामृताचासागरू ॥ वेदांतवेद्यगोविंदा ॥ ९ ॥ जोभेटलामलयाचळीं ॥ मार्गीपाककरितेकाळीं ॥ आधींस्फुरलाऱ्हदय

कमळीं ॥ सच्चित्पदार्थेंविचारितां ॥ १० ॥ उपनिषदर्थपाहतां ॥ आत्मा
ब्रह्महेंविचारितां ॥ परीअनुभवानयेऐशीचिंता ॥ ज्यादिवसांतअत्यंत ॥
॥ ११ ॥ ऐशीउत्कंठाअंतरीं ॥ तोंसत्पदेंस्फुरलाहरी ॥ कालत्रयविद्यमा
नतरी ॥ आत्माब्रह्मह्मणउनी ॥ १२ ॥ कालत्रयींविद्यमान ॥ तरीआत्मा
ब्रह्मयाअनुसंधान ॥ चितूपदेंपाहतांज्ञान ॥ तरीआत्माब्रह्महोयकीं ॥ १३ ॥
ऐसाअन्वयजरीस्फुरला ॥ तरीगुरुत्वाकारणेंउरला ॥ संदेहमागुतीशि
रला ॥ नकळतांव्यतिरेकें ॥ १४ ॥ जेथेंसर्ववृत्तीशून्य ॥ तेंसद्रूपब्रह्मचैत
न्य ॥ तैसेंनकळेतोंवरीधन्य ॥ नव्हेऐसेंवाटलें ॥ १५ ॥ तथापिचित्पदेंपा
हवां ॥ आपणासीघडतेब्रह्मता ॥ परीआनंदकळेनातत्वतां ॥ मनींऐसा
विचार ॥ १६ ॥ ऐसेंविचारितांमनीं ॥ तीऐकोंआलीहास्यध्वनी ॥ पा
हतोंजंवपरतोनी ॥ वस्त्रभगवेंदेखिलें ॥ १७ ॥ अवलोकिलेंमुखा ॥ तंव
मस्तकींनाहींशिखा ॥ मुखचंद्रदेखतांसुखा ॥ भरतेंजैसेंसमुद्रासी ॥ १८ ॥
कृपादृष्टीअवलोकुनी ॥ कायविचारितांहोमनीं ॥ ह्मणतांपुढतीमीधांवो
नी ॥ श्रीचरणांलागलों ॥ १९ ॥ स्वामीआत्माआपुला ॥ ब्रह्मकैसेंहेंन
कळेमजला ॥ विचारितांअनुभवाआला ॥ सच्चित्पदेंकांहींसा ॥ २० ॥
परीआनंदनाहींकळला ॥ आणिवृत्तिवेगळानदिसेमला ॥ नतुटेसंदेहशृं
खळा ॥ श्रीगुरुविणें ॥ २१ ॥ जोअंतःकरणींस्फुरला ॥ तोचियारूपेंप्र
गटला ॥ आतांकृतार्थमजला ॥ करावेंस्वामी ॥ २२ ॥ ऐसेंबोलोनिचर
णीं ॥ मस्तकठेवूनिअंतःकरणीं ॥ तोनित्यमुक्तचक्रपाणी ॥ जगद्गुरूवरि
लागुरुत्वें ॥ २३ ॥ मस्तकींठेवोनियांकर ॥ सकळउपनिषदांचेंसार ॥ पं
चकोशेंकरूनिनिर्द्धार ॥ केलाब्रह्मात्मतेचा ॥ २४ ॥ मथावयाक्षीरसाग
र ॥ पूर्वींकेलाअजितावतार ॥ मथिलानिगमरत्नाकर ॥ परमहंसरूपेंते
व्हां॥२५॥ सांख्ययोगवेदांत ॥तिन्हीशास्त्रांचासिद्धांत॥श्रुतिमुखेंदोंमुहूर्तांत॥
उपदेशिला ॥ २६ ॥ सांख्यें‌आत्मत्वनिर्द्धार ॥ योगेंवृत्तिशून्यसाक्षात्कार ॥
साकारतितुकेंनिराकार ॥ वेदांतगुह्य ॥ २७ ॥ गीतापुराणेंश्रुती ॥ सां
ख्ययोगजोकाबोलती ॥ तोचिसिद्धांतइतरारिती ॥ तयाशास्त्राच्यानिषे
धीं ॥ २८ ॥ सांख्ययोगावांचूनि ॥ शुष्कवेदांतेंकरोनि ॥ तत्वसिद्धिन
व्हेह्मणोनि ॥ सांगितलेंरहस्य ॥ २९ ॥ आधींचआकाशादिउत्पत्ती ॥ ऐ
सेंबोलतीवेदांती ॥ येथेंघ्यावीसांख्यरिती ॥ प्रमाणअनुभवेंसंमत ॥ ३० ॥
चित्तवृत्तीचानिरोध ॥ करितांस्फुरेआत्मबोध ॥ तोसाक्षात्कारवेदसिद्ध ॥

वेदांतीयाचाआदर ॥ ३१ ॥ सांख्ययोगदोन्ही ॥ वेदांतींदूषियलेह्मणउ
नी ॥ त्यांचेंरहस्यनकळोनी ॥ उपेक्षिती ॥ ३२ ॥ प्राधान्यप्रकृतीचेंदे
खिलें ॥ याकरितांसांख्यदूषिलें ॥ गीतापुराणींचेंउपपादिलें ॥ तत्वसांख्य
तेंमुख्य ॥ ३३ ॥ योगजन्यसाक्षात्कार ॥ बोलिलेनाहींतभाष्यकार ॥
त्यांच्याअभिप्रायाचाविचार ॥ जाणतीलविरळकोण्ही ॥ ३४ ॥ ब्रह्मा
द्वैतबोध ॥ हृदयींबिंबलाज्यासशुद्ध ॥ तोकरावयावृत्तिनिरोध ॥ प्रवर्ते
लसहज ॥ ३५ ॥ तेजरीबोलतेयोगरिती ॥ तरीज्ञानसिद्धीदुर्लभदिसती ॥
नकरितेशास्त्रींप्रवृत्ती ॥ कोण्हीतेव्हां ॥ ३६ ॥ ज्यासहोईलआत्मज्ञान ॥
तोजरीनकरीलयोगसाधन ॥ जन्मांतरींत्याअनुसंधान ॥ योगासिद्धीपा
वेल ॥ ३७ ॥ अनादिसंसारप्रवाहीं ॥ ज्ञानावांचूनिसुटकानाहीं ॥ एक
जन्मत्यासकांहीं ॥ नह्मणावेंविलंब ॥ ३८ ॥ ऐसेविविधनिर्द्धार ॥ बोलि
लेकरुणासागर ॥ तेअनुभवाचेचमत्कार ॥ पुढेंबोलिजेतील ॥ ३९ ॥ क्ष
णामाजींसचराचर ॥ मजवाटलेंमाझेंशरीर ॥ साकारातितुकेंनिराकार ॥
तेचिसमयीं ॥ ४० ॥ जैसाउगवतांदिनकर ॥ कांहींचनुरेअंधकार ॥ उप
देशाचावडिवार ॥ ऐसादेखिला ॥ ४१ ॥ तोंगमनाभिमुखदेखिले ॥ म्यां
दोन्हीचरणमस्तकींधरिले ॥ तोंकृपेंकरूनबोलिले ॥ आतांउरलेंतेंकाय
॥ ४२ ॥ आह्मीचआत्मत्वेंप्रगटलों ॥ नाहींबोलिलोंतेंहीबोलिलों ॥ अं
तर्यामीआह्मीचउरलों ॥ निषेधितांक्षरभाग ॥ ४३ ॥ आह्मीकरितोंगम
न ॥ तुंवाओळखिलाआनंदघन ॥ नित्यतन्मयअसोंदेमन ॥ तोचिआ
ह्मी ॥ ४४ ॥ तुजविद्याभार्गवीवारुणी ॥ उपदेशिलीहेअंतःकरणीं ॥ दृढ
धरूनिगोविंदचरणीं ॥ प्रीतीधरणेंआत्मत्वें ॥ ४५ ॥ शुकादिकजीवन्मु
क्तीं ॥ मुक्तीहुनीगोडमानिलीभक्ती ॥ सर्वथात्हृदयींआसक्ती ॥ बाह्यसुखाची
नधरणें ॥ ४६ ॥ विज्ञानकोशींअभ्यास ॥ जोसांगितलातयास ॥ सर्व
थानकरणेंआळस ॥ हेआज्ञाआमुची ॥ ४७ ॥ पूर्वींभृगूसीवरुणें ॥ कृपा
केलीसकरुणें ॥ त्यासीपंचकोशांच्याविवरणें ॥ अनुभवाआलें ॥ ४८ ॥
याकरितांश्रुती ॥ भार्गवीवारुणीविद्याह्मणती ॥ तेआह्मींतुजप्रती ॥ उप
देशिली ॥ ४९ ॥ उपदेशाचाबहुप्रकार ॥ परीऐसाआत्मत्वाचानि
र्द्धार ॥ आणिअभ्यासाचेचमत्कार ॥ अन्यत्रनसती ॥ ५० ॥ परब्र
ह्मींयेचिस्थिती ॥ प्रकर्षह्मणुनीश्रुतीबोलती ॥ इतरब्रह्मविद्येचीस्तुती ॥
ऐशीनकरितीवेद ॥ ५१ ॥ भवभयेंयेतीलशरणें ॥ त्यांसीयेविद्येचाउपदे

शकरणें ॥ आपणतरोनितारणें ॥ हेंज्ञानियासीआवश्यक ॥ ५२ ॥ ऐसें बोलोनिचालिले ॥ तेउभेनाहींराहिले ॥ नेत्रझांकोनिअवलोकिले ॥ हृदयामाजी ॥ ५३ ॥ घटिकामात्रकेलेंध्यान ॥ मगउघडिलेलोचन ॥ आत्मलाभानुसंधान ॥ वाटलानाडीवियोग ॥ ५४ ॥ ऐसाश्रीगुरूचामहिमा ॥ ज्याच्याप्रतापानाहींसीमा ॥ वर्णितांपडिलेंनिगमा ॥ मौनजेथें ॥ ॥ ५५ ॥ तेंगुरुत्वतेव्हांप्रगटलें ॥ मलयपर्वतींजेंकाभेटलें ॥ ज्याचियाकृपेनेंफिटलें ॥ संसारभय ॥ ५६ ॥ श्रीगुरुमहिमाश्रुती ॥ जेथेंबोलोंनशकती ॥ तेथेंनसरेवैखरीचीगती ॥ कोणीकडे ॥ ५७ ॥ याकारणेंभेटीजाली ॥ तितुकीकथारूपेंवर्णिली ॥ हेहीअवतारलीलादेखिली ॥ परमहंसरूपें ॥ ॥ ५८ ॥ ध्रुवेंज्यारूपेंदेखिला ॥ तोहीअवतारलेखिला ॥ अवतारमाळेंत गुंफिला ॥ श्रीभागवतीं ॥ ५९ ॥ जेंनिराकारनिर्गुण ॥ तेंचिशुद्धतत्वेंईश्वरआपण ॥ त्यासहीआकारकरचरण ॥ नाहींतऐशाश्रुती ॥ ६० ॥ भक्तवात्सल्यादिधर्म ॥ तथापितेंपरब्रह्म ॥ ज्यारूपेंजेंजेंकर्म ॥ तोतोअवतार ॥ ६१ ॥ हाअवतारपरमहंसरूप ॥ अविद्याहरणयेथेंप्रताप ॥ मंगळाचरणकथास्वरूप ॥ हेचिआरंभीं ॥ ६२ ॥ त्याचिस्वरूपाचेंध्यान ॥ त्याचिउपदेशाचेंअनुसंधान ॥ त्याचेआज्ञेकरूनिदान ॥ ब्रह्मविद्येचें ॥ ॥ ६३ ॥ उपदेशाचाप्रकार ॥ आत्मत्वाचानिर्द्धार ॥ संतांसीसंतोषकर ॥ ग्रंथआरंभिला ॥ ६४ ॥ चंद्रदूरसमुद्रापासोनी ॥ त्याचिचंद्रासीदेखोनी ॥ सिंधूसीसंतोषेंकरूनी ॥ भरतेंदाटे ॥ ६५ ॥ संतकृपेचेंचिफळ ॥ हेग्रंथरचनासकळ ॥ संतचिदेखोनिकेवळ ॥ संतोषती ॥ ६६ ॥ ग्रंथाचेंनामनिगमसार ॥ वेदामाजीजोविस्तार ॥ संक्षेपेंकरोनितोप्रकार ॥ बोलिजेल ॥ ॥ ६७ ॥ विद्याभार्गवीवारुणी ॥ उपदेशकर्ताचक्रपाणी ॥ निगमसारत्याचीचवाणी ॥ तोचिआत्मावामनाचा ॥ ६८ ॥ नकरितांशब्दविस्तार ॥ ब्रह्मस्थितीचानिर्द्धार ॥ बोलिलेअनुभवचमत्कार ॥ अनुभवरसिकाकारणें ॥ ६९ ॥ आकृतीनेंवामन ॥ आणिआक्रमिलेंत्रिभुवन ॥ त्याचेंचहेंसंक्षेपवचन ॥ अर्थगंभीर ॥ ७० ॥ सत्पदआणिचित्पद ॥ विचारितांश्रीमुकुंद ॥ गुरुरूपेंसच्चिदानंद ॥ प्रगटजाला ॥ ७१ ॥ त्यासिकरोनिनमस्कार ॥ ग्रंथआरंभिला निगमसार ॥ ज्याच्याश्रवणेंभवसागर ॥ मृगजळप्राय ॥ ७२ ॥ भक्तिवैराग्यतिसरेंज्ञान ॥ इतुकेंचिमोक्षाचेंसाधन ॥ परीयातिहींसीजीवन ॥ आत्मतत्व ॥ ७३ ॥ नव्हेतेंज्ञाननव्हेतेभक्ती ॥ अथवानव्हेतीविरक्ती ॥ जोंवरीनाहींअ

भिव्यक्ती॥आत्मत्वाची ॥७४॥ सर्वदावेदांताचेंश्रवण ॥ तथापिनकळेआपण कोण॥अधीकवाढलेंमीपण ॥ आत्मत्वनकळतां ॥७५॥ टाकूनिजातीसकळ॥ परीमनींविषयाचीहळहळ ॥ जोंनकळेसुखाचेंमूळ ॥ विषयवासनातंवनतुटे ॥७६॥ उदकेवीणमासोळी ॥ सुखेवीणतळमळी॥कोणेएकेतरीजळीं ॥ जळचरेंअसावें॥ ७७ ॥सुखसमुद्रींचीमासोळी ॥विषयकर्दमींतळमळी॥तेटाकितां शुष्कस्थळीं ॥ वांचेचिना ॥७८॥ समुद्रांतबुडविजेमासा ॥ तोकर्दमातेंना ठवीजैसा ॥ नाठवीविषयाच्याविलासा ॥ आत्मसुखेंजोतृप्त ॥ ७९ ॥ आत्म ज्ञानावांचोनिभक्ती ॥ देवासीमागेभुक्तिमुक्ती ॥ पाहातांप्रीतीचीअभिव्य क्ती॥आपणानिमित्यदेवाची ॥८०॥ निमित्येंकरूनिभजन ॥ तेंशरीरशिरेंवी ण॥सत्वरनव्हतांकल्याण॥तेचिदेवताअप्रिय ॥८१॥ प्रीतीनेंकरीभजन॥ मु क्तीकींभुक्तीइच्छीमन॥इच्छूनियांधनमान॥सप्रेमनृपहीसेविती ॥ ८२ ॥ स कळाहूनिअधिकदेव ॥ तरीतोनिर्मळभक्तिभाव ॥ देवापरीआवडेजीव ॥ भ क्तियोगकैसा ॥ ८३ ॥ याकारणेंआत्मस्थिती ॥ कळलियाज्ञानवैराग्यभ क्ती ॥ तोचिपरमात्माकैवल्यमूर्ती ॥ तोचिसच्चिदानंद ॥ ८४ ॥ सेवितांए कचिअमृता ॥ तृप्तीआरोग्यअमरता ॥ कळतांएकआत्मतत्वता ॥ ज्ञान भक्तिवैराग्य ॥ ८५ ॥ अन्नभक्षितांग्रासोग्रासीं ॥ अधीकसंतोषमानसीं॥ तैसीआत्मत्वाच्याअभ्यासीं ॥ ज्ञानभक्तिवैराग्य ॥ ८६ ॥ एकआत्माकळ ल्यावरी ॥ स्वयेंआपणचराचरीं ॥ आणीकजाणावयाचीउरी ॥ उरेचिना ॥ ८७ ॥ मनधांवेजेथवरी ॥ आत्मासबाह्यअभ्यंतरीं ॥ मनचिपांगूळहोय परी ॥ आत्मात्याहीपुढें ॥ ८८ ॥ ऐसाआत्माअनंत ॥ विश्वतितुकेंअंत वंत ॥ विश्वाबाहेरीआणिआंत ॥ स्वयेंज्ञानीआपण ॥ ८९ ॥ सत्तामात्रआप ण ॥ विश्वअवघेंआपणावीण ॥ नदिसेनअसेऐशीखूण ॥ वाणेतयासी॥९०॥ जेंजयावीणनादिसे ॥ तेंतयावीणनअसे ॥ रज्जूवरीसर्पभासे ॥ नदिसेनअ सेत्यावीण ॥ ९१ ॥ आकारमात्रपंचभूतीं ॥ तेंतोआपणावीणनादिसती ॥ आत्मत्वावेगळींनसती ॥ सर्वहीसर्वज्ञपणें ॥ ९२ ॥ ब्रह्मतेंआपणकेवळ॥आ पणामाजीसृष्टीसकळ ॥ आपणाकरितांविश्वसफळ ॥ लयअंतींआपणां त ॥ ९३ ॥ सृष्टिस्थितिप्रळय ॥ आपणामाजीहोयजाय ॥ आतांजाणेंउरलें काय ॥ सर्वज्ञासी ॥ ९४ ॥ आतांजनांच्यानानाबुद्धी ॥ त्याचयाप्रत्यया चीज्ञानसिद्धी ॥ तोपरमेश्वराचाउपाधी ॥ अन्यत्रनसे ॥ ९५ ॥ तेनित्य मुक्ताचीव्यक्ती ॥ तेथेंअलिप्तविद्याशक्ती ॥ ज्ञानीयासितेहीअभिव्यक्ती ॥

अभ्यासबळेंहोतसे ॥ ९६ ॥ ऐशाअनेकईश्वरशक्ती ॥ त्यांतइच्छितांअंतरेमुक्ती ॥ यास्तवसिद्धीचीआसक्ती ॥ नधरितीज्ञानी ॥ ९७॥ प्रबळज्याचाअभ्यास ॥ सिद्धीसुलभतयास ॥ जेसिद्धीसकरितीआयास ॥ तेमोक्षासअंतरती ॥ ९८॥ जोज्ञानीनिष्काम ॥ त्यासिसिद्धीचेंकायकाम ॥ जोसर्वदाआत्माराम ॥ ब्रह्मानंदींनिमग्न ॥ ९९ ॥ अभेदजेव्हांईश्वरीं ॥ सृष्ट्यादिकर्मेंहाचिकरी ॥ तोहीकदाचित्इच्छाधरी ॥ तरीसिद्धीदासीतयाच्या ॥ ॥ १००॥ जेपरमेश्वराचीव्यक्ती ॥ तेपावलाहेविद्याशक्ती ॥ जीकरीकरितांकैवल्यमुक्ती ॥ इतरसिद्धीकिमर्थ ॥ १ ॥ जेविद्याशक्ती ॥ ईश्वराचीनित्यमुक्ती ॥ इतरशक्तीत्यायुक्ती ॥ सृष्ट्यादिरचनेच्या ॥ २ ॥ सार्वभौमराजाचीमुद्रा ॥ वंद्यजैसीचतुःसमुद्रा ॥ विद्यातैसीआणखीक्षुद्रा ॥ शक्तीईश्वराच्या ॥ ३ ॥ तेमुद्राज्याआधीन ॥ तोप्रधानराजयासमान ॥ तैसेंज्यासआत्मज्ञान ॥ तोचिपरमेश्वर ॥ ४ ॥ सकळराज्याचाधणी ॥ तोचीदेहभोगीपट्टराणी ॥ इतरराजाज्ञेचीसिराणी ॥ तयासीकिमर्थ ॥ ५ ॥ विद्याईश्वराचादेह ॥ तिणेंतुटलाभेदसंदेह ॥ इतरसिद्धीचास्नेह ॥ मगकिमर्थ॥ ६ ॥ जेथेंनित्यमुक्तपण ॥ तेथेंसर्वशक्तीचेंअनुसरण ॥ तेंतेव्हांविद्याशक्तीचेंकारण ॥ ईश्वरत्वीं ॥ ७ ॥ सहजजेथेंविरक्ती ॥ तोनइच्छीकांहींशक्ती ॥ इच्छातेथेंमुक्ती ॥ नबोलवे ॥ ८ ॥ जेथेंज्ञानआणिविरक्ती ॥ तेथेंसर्वशक्तीवोळगती ॥ तथापिज्ञानीनपाहती ॥ जयांकडे ॥ ९ ॥ त्यांसप्रारब्धाचाकरणेंक्षय ॥ सिद्धीघेऊनिकरावेंकाय ॥ जोसिद्धीमिरऊंजाय ॥ तोज्ञानीनह्मणवे ॥ १० ॥ भूतभविष्यवर्तमान ॥ हेंकालत्रयाचेंज्ञान ॥ पावलेअनेकमुनिजन ॥ तपेंहीकरोनी ॥११॥ ऐसेथोरथोरमुनी ॥ तेहीमोहिलेमायेकरोनी॥ तत्वज्ञानेंतरलेज्ञानी ॥ मायासमुद्र ॥ १२ ॥ सर्वज्ञताजेथेंश्रुती ॥ ज्ञानियाचीवर्णिती ॥ यासिद्धीचीतेथेंनकरिती ॥ वार्ताही ॥ १३ ॥ जयासीकळलामृत्पिंडएक ॥ मृन्मयपदार्थकळलेअनेक ॥ मृत्तिकासत्यइतरकौतुक ॥ शब्दमात्राचें॥ १४ ॥ सुवर्णाचामणीएक ॥ तैसेंचसकळअळंकारादिक ॥ ज्यासकळलेंखरेंकनक ॥ तोअलंकारसृष्टींतसर्वज्ञ ॥ १५ ॥ ऐसेंसामोपनिषदीं ॥ बोलिलेऐसेंचसकळवेदीं ॥ तत्वकळलेंतोचिपदीं ॥ बैसलासर्वज्ञतेच्या ॥ १६ ॥ ऐसेंचबृहदारण्यकीं ॥ मैत्रेयाप्रतियाज्ञवल्की ॥ ह्मणेएकआत्माकळतांचिकीं ॥ सर्वकळलें ॥१७॥ वसिष्ठादिमुनी ॥ तेराहिलेऋषीह्मणउनी ॥ यास्तवकाळवशेंकरोनी ॥ सिद्धीप्रगटकरिती ॥१८॥ ज्ञानिया

सीप्रारब्धसारणें ॥ किंवाजनासीउद्धारणें ॥ त्यासीसिद्धीअवलंबणें ॥ कि
मर्थ ॥ १९ ॥ तथापिहीतोमनींधरी ॥ तरीसिद्धीत्यासीनसतीदुरी ॥ हात
जोडोनिकिंकरी ॥ नित्यउभ्या ॥ २० ॥ ऐसासर्वज्ञआत्मज्ञानी ॥ वासुदे
वअवघाह्मणउनी ॥ आत्मरतअद्वैतभजनीं ॥ तोचिभक्त ॥ २१ ॥ जडचै
तन्यसर्वही ॥ चराचरआकारजितुकाकांहीं ॥ वासुदेवावांचोनिनाहीं ॥
तोचिभक्त ॥ २२ ॥ निर्निमित्यआपुलीआवडी ॥ जेनविटेकोणेघडी ॥ तो
चिवासुदेवऐशीगोडी ॥ तोचिभक्त ॥ २३ ॥ सहजआत्मयाचीप्रीती ॥ तो
चिआत्मासर्वभूतीं ॥ ऐशीसर्वज्याचीस्थिती ॥ तोचिभक्त ॥ २४ ॥ शुद्ध
सत्वब्रह्मकेवळ ॥ साकारदिसेभक्तवत्सल ॥ गुणत्रयाचाविटाळ ॥ जेथेंन
से ॥ २५ ॥ आत्माचिद्ब्रह्मनिराकार ॥ तोचिनित्यमुक्तपरमेश्वर ॥ साका
रींदेखेनिराकार ॥ तोचिभक्त ॥ २६ ॥ तोहीभक्ताचेदृष्टींदिसे ॥ परीतेथें
आकारनसे ॥ जेभजतीजैसेतैसें ॥ फळदेकल्पवृक्ष ॥ २७ ॥ सर्वत्रसमहेंनि
श्चित ॥ तथापिपरमात्माआत्मरत ॥ ह्मणोनिआत्मज्ञानीभक्त ॥ आवड
तीअतिशयें ॥ २८ ॥ आत्मत्वेंसकळाचीआवडी ॥ परीकोण्हीनेणतीहेगो
डी ॥ आत्मज्ञानीएकघडी ॥ तेगोडीसनविसरे ॥ २९ ॥ जीवेश्वरदोघेआ
त्मरत ॥ त्यांतजीवतितुकेभ्रांत ॥ भ्रांतीफिटतांसहजआत्मरत ॥ परस्परें
प्रीतीआयती ॥ ३० ॥ बहुतांस्त्रियांचापती ॥ समानसकळांचीप्रीती ॥ प
रीनवोढातितुक्यानेणती ॥ तरुणीभोगितीसर्वदा ॥ ३१ ॥ याकारणेंसक
ळांहुनी ॥ भक्तअधीकआवडतीज्ञानी ॥ तोमाझाआत्माह्मणउनी ॥ गी
तेंतबोलिलाश्रीकृष्ण ॥ ३२ ॥ जेभेदेंभजती ॥ तेभक्तीचेंरहस्यनेणती ॥ नि
र्निमित्यआपुलीप्रीती ॥ त्यासिजाणतीदेहत्वें ॥ ३३ ॥ ऐसीचआत्मज्ञाना
वीण ॥ वैराग्याचीनकळेखूण ॥ सुखचिहोतांआपण ॥ प्रीतिनधरावीवि
षयाची ॥ ३४ ॥ अमृतरसनेवरीपडे ॥ मगत्यासकांजीनावडे ॥ तेव्हांवा
सनेचामार्गमोडे ॥ मनबुडेजेव्हांस्वरूपीं ॥ ३५ ॥ आत्मज्ञानावेगळें ॥ जरीवैरा
ग्यधारिलेंबळें ॥ उदकआरितांहीढाळे ॥ धांवेचभूमीसी ॥ ३६ ॥ याकरितांसर्वप्र
यत्नें ॥ गुरुमुखेंघ्यावेंआत्मज्ञान ॥ जेंसच्चिदानंदघन ॥ परमहंसरूपेंबोलि
लें ॥ ३७ ॥ ज्याज्ञानाचापराक्रम ॥ वामनजालात्रिविक्रम ॥ उत्तराध्यायीं
उपक्रम ॥ मार्गदावीवारुणीचा ॥ ३८ ॥ श्रीगुरुरूपावतरण ॥ तेंचियेथेंमंगला
चरण ॥ ह्मणावयाकारणें ॥ मंगळाध्याय ॥ ३९ ॥ इतिश्रीमन्निगमसारे ॥
उपनिषत्तात्पर्यानुसारे ॥ वेदभूलोकभाषावतारे ॥ प्रथमोध्यायः ॥ १४० ॥

# रामदास.

जन्मशक १५३०–इ. स. १६०८.

समाधिशक १६०३–इ. स. १६८१.

## त्याचे प्रसिद्ध ग्रंथ.

दासबोध. मनाचेश्लोक.

## स्फुट अभंग.

वेंचे, रामदासाचे अभंगांतील.

( १ )

कायाहेकाळाचीघेऊनीजाणार ॥ तुझेनिहोणारकायबापा ॥ १ ॥
कायबापाऐसेंजाणोनीनेणसी ॥ मीमीह्मणतोसीवायांवीण ॥ २ ॥
वायांवीणशीणकेलाजन्मवरी ॥ दंभलोकाचारीनागवण ॥ ३ ॥
नागवणझालीपरलोकाजातां ॥ स्वहीताचीचिंताकेलीनाहीं ॥ ४ ॥
केलीनाहींचिंतानामींकानकोंडें ॥ अंतींकोण्यातोंडेंजातआहे ॥ ५ ॥
जातआहेसर्वसांडूनिकरंटा ॥ जन्मवरीताटाधरोनीयां ॥ ६ ॥
धरोनीयांताटाकासयामरावें ॥ भजनकरावेंदासह्मणे ॥ ७ ॥

( २ )

सुखाचेसांगातींसर्वहीमीळती ॥ दुःखहोतांजातीनीघोनीयां ॥ १ ॥
निघोनीयांजातीसंकटाचेवेळे ॥ सुखहोतांमीळेसमुदाव ॥ २ ॥
समुदावसर्वदेहाचेसंबंधी ॥ तुटलीउपाधीरामदासीं ॥ ३ ॥

( ३ )

मूर्खतोसंसारीमाझेंमाझेंकरी ॥ मृत्युबरोबरीहिंडतसे ॥ १ ॥
हिंडतसेकाळसांगातींसरीसा ॥ धरीभरंवसानेणोनीयां ॥ २ ॥
नेणोनीयांप्राणीसंसाराशीआला ॥ आलातैसागेलादैन्यवाणा ॥ ३॥
दैन्यवाणागेलासर्वहीसोडोनी ॥ ठेवीलेंजोडोनीजनालागीं ॥ ४ ॥
लागलेलीमळीदोषाचीसूटेना ॥ आसक्तीतूटेनाअंतरींची ॥ ५ ॥

अंतरींचीमूर्तीअंतरलीदूरी ॥ कदाकाळींहरीआठवेना ॥ ६ ॥
आठवेनाअंतकाळींरामावीण ॥ धन्यतेंमरणदासह्मणे ॥ ७ ॥

( ४ )

सुखपाहोंजातांकोठेंचीनदीसे ॥ संसारहाअसेदुःखमूळ ॥ १ ॥
दुःखमूळजन्मजनआणिनारी ॥ पाहातांसंसारींसूखनाहीं ॥ २ ॥
सुखनाहींकदाशाश्वतावांचूनी ॥ जाणतीसुज्ञानीदासह्मणे ॥ ३ ॥

( ५ )

पूर्णसमाधानइंद्रीयदमन ॥ श्रवणमननीरंतर ॥ १ ॥
नीरंतरज्याचेह्र्दयींवीवेक ॥ उपासनाएकतोचीधन्य ॥ २ ॥
धन्यतोचीएकसंसारींराहातां ॥ विवेकेंअनंताटाईंपाडी ॥ ३ ॥
टाईंपाडीनीजस्वरूपआपूलें ॥ असोनीचोरीलेंजन्मोजन्मीं ॥ ४ ॥
जन्मोजन्मींकेलेंपुण्यबहूसाल ॥ तरीचघडेलसंतसंग ॥ ५ ॥
संतसंगजयामानवाआवडे ॥ तेंणेंगुणेंघडेसमाधान ॥ ६ ॥
समाधानघडेसज्जनाच्यासंगें ॥ स्वरूपाच्यायोगेंरामदासीं ॥ ७ ॥

( ६ )

ज्याजैशीसंगतीत्यासींतैसीगती ॥ समागमेंरीतीसर्वकांहीं ॥ १ ॥
सर्वकांहींघडेसंगतीच्यागुणें ॥ साधूचींलक्षणेंसाधूसंगें ॥ २ ॥
साधूसंगेंसाधूहोईजेआपण ॥ रामदासखूणसांगतसे ॥ ३ ॥

( ७ )

चंदनासंगतींचंदनचीहोती ॥ होयकाळीमातीकस्तूरीका ॥ १ ॥
कस्तूरीकाहोयकस्तूरीच्यायोगें ॥ साधूचेनीसंगेंसाधूजन ॥ २ ॥
साधूजनहोतीसंगतीधरीतां ॥ मीळणीमीळतांगंगाजेंवी ॥ ३ ॥
जेवीतांअमृतअमरहोईजे ॥ अचळपावीजेसाधूसंगें ॥ ४ ॥
साधूसंगेंदेवआपणचीहोणें ॥ अद्वैतलक्षणेंबाणलीया ॥ ५ ॥
बाणलीयातयानिःसंगाचासंग ॥ होईजेनिःसंगआपणची ॥ ६ ॥
आपणचीध्यानींबैसलाआसनीं ॥ जनींआणीवनींदेवभासे ॥ ७ ॥
देवभासेतेंणंआपणभूलला ॥ तेंणेंगुणेंझालादेवअंगें ॥ ८ ॥
देवाचेसंगतींदेवचीहोईजे ॥ चतुर्भूजराजेवैकुंठींचे ॥ ९ ॥
वैकुंठींचेराजेध्यातीअहर्नीशी ॥ वंदीतीसाधूंसीदासह्मणे ॥ १० ॥

( ८ )

साधूसंगेंसाधूभोंदूसंगेंभोंदू ॥ वाद्यासंगेंवादूहोतअसे ॥ १ ॥
होतअसेभलाभल्याचेसंगतीं ॥ जायअधोगतीदुष्टसंगें ॥ २ ॥
दुष्टसंगेंदुष्टझालामहापापी ॥ होतसेनिःपापीसाधूसंगें ॥ ३ ॥
संगजयाजैसालाभतयातैसा ॥ होतसेआपैसाअनायासें ॥ ४ ॥
अनायासेंगतीचूकेअधोगती ॥ धरीतांसंगतीसज्जनाची ॥ ५ ॥
सज्जनाचीकृपाजयालागींहोय ॥ तयालागींसोयपरत्राची ॥ ६ ॥
परत्राचीसोयभक्तीच्याऊपायें ॥ चुकतीअपायदासह्मणे ॥ ७ ॥

( ९ )

जाणावातोयोगीसदावीतरागी ॥ अहंभावत्यागीअंतरींचा ॥ १ ॥
स्वजनस्वदेशसांडूनीउदास ॥ तेणेंआशापाशतोडीयेले ॥ २ ॥
पूर्णींपूर्णकामतेणेंजोनिःकाम ॥ विषयाचाभ्रमतुच्छकेला ॥ ३ ॥
विवेकाचेबळेंझालेतेप्रबळ ॥ बाह्यमायाजाळत्यागीयेला ॥ ४ ॥
धन्यतोचीसदासंसारींउदास ॥ तयारामदासमानीतसे ॥ ५ ॥

( १० )

तोंवरीतोंवरीडगूमगीनाकदा ॥ देहाचीआपदाझालीनाहीं ॥ १ ॥
तोंवरीतोंवरीपरमार्थस्वयंभ ॥ जंवपोटींलोभआलानाहीं ॥ २ ॥
तोंवरीतोंवरीअत्यंतसद्भाव ॥ विशेषेंवैभवआलेंनाहीं ॥ ३ ॥
तोंवरीतोंवरीसांगेनिरभिमान ॥ देहासीअभिमानझालानाहीं ॥ ४ ॥
तोंवरीतोंवरीधीरत्वाचीमात ॥ प्रपंचींआघातझालानाहीं ॥ ५ ॥
रामदासह्मणेअवघेचीगाबाळी ॥ ऐसाविरळाबळीधैर्यवंत ॥ ६ ॥

( ११ )

कर्ताएकदेवतेणेंकेलेंसर्व ॥ तयापाशींगर्वकामानये ॥ १ ॥
देहतेंदेवाचेंवित्तकूबेराचें ॥ तेथेंह्याजीवाचेंकायआहे ॥ २ ॥
देतादेववीतानेतानेववीता ॥ कर्ताकरवीतादेवएसा ॥ ३ ॥
निमित्ताचाधनीकेलाअसेप्राणी ॥ पाहातांनिर्वाणींदेवएक ॥ ४ ॥
लक्ष्मीहीदेवाचीसर्वसत्तात्याची ॥ त्यावीणेंजीवाचीउर्मीनाहीं ॥ ५ ॥
दासह्मणेमनासावधअसावें ॥ दुश्चित्तनसावेंसर्वकाळ ॥ ६ ॥

( १२ )

ऐसाकोणआहेमुकीयाचाजाण ॥ कळेवोळखणनसांगतां ॥ १ ॥
नसांगतांजाणेअंतरींचाहेत ॥ पुरवीमनोरथसर्वकांहीं ॥ २ ॥
सर्वकांहींजाणेचतुरांचाराणा ॥ धन्यनारायणालीलातूझी ॥ ३ ॥
तूझीलीलाजाणेऐसाकोणआहे ॥ वीरंचीतोपाहेचाकाटला ॥ ४ ॥
चाकाटलामनुदेवासीपाहातां ॥ दासह्मणेआतांसीमाझाली ॥ ५ ॥

( १३ )

आमचेसज्जनसाधूसंतजन ॥ होयसमाधानतयांचेनी ॥ १ ॥
तयांचेनीसंगेंपावीजेविश्रांती ॥ साधूआदींअंतींसारीखेची ॥ २ ॥
सारीखेचीदाससंतसमाधानी ॥ ह्मणोनीयांमनींआवडती ॥ ३ ॥
आवडतीदाससंतजीवलग ॥ सुखरूपसंगसज्जनाचे ॥ ४ ॥
सज्जनाचासंगपापासीसंहारी ॥ ह्मणोनीयांधरीरामदास ॥ ५ ॥

( १४ )

शौचकेलेंतेणेंशुचिर्भूतझाला ॥ जळींस्नानकेलामळत्यागें ॥ १ ॥
मळत्यागेंझालाशरीरेंनिर्मळ ॥ अंतरींचामळकैसागेला ॥ २ ॥
कैसाजातोकामक्रोधलोभदंभ ॥ नांदतोस्वयंभअंतर्यामीं ॥ ३ ॥
अंतर्यामींआधींहोईजेनिर्मळ ॥ तेणेंतूटेमूळसंसाराचें ॥ ४ ॥
संसाराचेंमूळसुक्षमींगुंतलें ॥ मनहीभूललेंविभ्रमासी ॥ ५ ॥
विभ्रमासीबरेंशोधूनीपाहावें ॥ अंतरींराहावेंनिष्ठावंत ॥ ६ ॥
निष्ठावंतज्ञानपूर्णसमाधान ॥ मगसंध्यास्नानसफळची ॥ ७ ॥
सफळचीसंध्यासंदेहनसतां ॥ निःसंदेहहोतांसमाधान ॥ ८ ॥
समाधाननाहींस्नानसंध्याकाळीं ॥ लोकांचियामेळींलोकलाजे ॥ ९ ॥
लोकलाजेसर्वलौकीकचीकेला ॥ देवदूरावलावरपंगें ॥ १० ॥
वरपंगेंदेवकदासांपडेना ॥ निष्ठेचाघडेनाभक्तिभाव ॥ ११ ॥
भक्तीभावदेवींदृढहोयज्याचा ॥ कर्मलौकीकाचाखटाटोप ॥ १२ ॥
खटाटोपदेवकदापावीजेना ॥ निश्चयघडेनाशाश्वताचा ॥ १३ ॥
शाश्वताचाशोधअंतरींअसतां ॥ सर्वहीपाहातांनिरर्थक ॥ १४ ॥
निरर्थकतीर्थेंनिरर्थकव्रतें ॥ दासह्मणेजेथेंज्ञाननाहीं ॥ १५ ॥

( १५ )

बाळकजाणेनामातेसी ॥ तिचेंमनबाळापासीं ॥ १ ॥

तैसादेवहाकृपाळू ॥ करीभक्ताचासांभाळू ॥ २ ॥
धेनुवत्साचेनिलागें ॥ धांवेत्याच्यामागेंमागें ॥ ३ ॥
पक्षीघेतसेगगन ॥ पिलापाशींत्याचेंमन ॥ ४ ॥
मच्छआठवितांपाळी ॥ कूर्मदृष्टीनेंसांभाळी ॥ ५ ॥
रामींरामदासह्मणे ॥ मायाजाळाचींलक्षणें ॥ ६ ॥

( १६ )

ऐसेंकैसेंरेसोंवळें ॥ सिवतांहोतसेवोंवळें ॥ १ ॥
स्नानसंध्याटिळेमाळा ॥ पोटींक्रोधाचाउमाळा ॥ २ ॥
नित्यदंडीतोसीदेह ॥ परीफीटेनासंदेह ॥ ३ ॥
नित्यनेमखटाटोप ॥ मनींविषयाचाजप ॥ ४ ॥
बाह्यकेलीझळफळ ॥ देहबुद्धीचावीटाळ ॥ ५ ॥
रामदासींदृढभाव ॥ तयावीणसर्ववाव ॥ ६ ॥

( १७ )

देहविटाळाचागोळा ॥ कैसाहोतोसीसोंवळा ॥ १ ॥
तुजकळेनाविचारू ॥ ऐसियासीकायकरूं ॥ २ ॥
दृढकेलाअभिमान ॥ तेणेंजाहालेंबंधन ॥ ३ ॥
रामदासस्वामीविण ॥ केलातितूकाहीशीण ॥ ४ ॥

( १८ )

काळजातोक्षणक्षणा ॥ मूळयेईलमरणा ॥ १ ॥
कांहींधांवाधांवकरीं ॥ जंवतोआहेमृत्युदूरी ॥ २ ॥
देहआहेजाईजणें ॥ मूललासीकोण्यागुणें ॥ ३ ॥
मायाजाळींगुंतलेंमन ॥ परिहेंदुःखासीकारण ॥ ४ ॥
सत्यवाटतेंसकळ ॥ परिहेंजातांनाहींवेळ ॥ ५ ॥
रामींरामदासह्मणे ॥ आतांहोईंसावधान ॥ ६ ॥

( १९ )

अंतकाळयेतांयेतां ॥ तेथेंनयेचुकवीतां ॥ १ ॥
अकस्मातलागेजावें ॥ कांहींपुण्यआचरावें ॥ २ ॥
पुण्याविनाजातांप्राणी ॥ घडेयमाचीजाचणी ॥ ३ ॥
रामदासह्मणेजना ॥ कंठींयमाच्यायातना ॥ ४ ॥

( २० )

ज्याच्याउदरासीआला ॥ त्यासिफीरोनीपडला ॥ १ ॥
तोचीजाणावाचांडाळ ॥ देवब्राह्मणाचाकाळ ॥ २ ॥
झालास्त्रियेचालंपट ॥ मायबापासींउद्धट ॥ ३ ॥
भयपापाचेंनधरी ॥ सज्जनाचीनिंदाकरी ॥ ४ ॥
नेणेमायकींमावसी ॥ कोणेंसांगावेंतयासी ॥ ५ ॥
रामींरामदासह्मणे ॥ यमकेलात्याकारणें ॥ ६ ॥

( २१ )

कोण्हीपुत्रकामानये ॥ मित्रकरीतोऊपाये ॥ १ ॥
कैंचेंआपूलेंपरावें ॥ अवघेंऋणानुबंधेंघ्यावें ॥ २ ॥
जिवलगजीवघेती ॥ त्यासीपरावेरक्षीती ॥ ३ ॥
जिवलगाचीयेपरी ॥ मातेहूनीलोभकरी ॥ ४ ॥
आहेकोणजाणेकैंचें ॥ परितेजिवलगजीवाचे ॥ ५ ॥
रामींरामदासह्मणे ॥ नकळेदेवाचेंकरणें ॥ ६ ॥

( २२ )

घातकरूनीआपुला ॥ कायरडवीसीपूढिला ॥ १ ॥
वहुतमोलाचेंआयुष्य ॥ विषयलोभेंकेलानास ॥ २ ॥
नाहींयोळखीलेंसत्या ॥ तेणेंकेलीआत्महत्या ॥ ३ ॥
नरदेहाचीसंगती ॥ गेलीगेलीहातोहातीं ॥ ४ ॥

( २३ )

कोणेंकोणासीरडावें ॥ एकामागेंएकींजावें ॥ १ ॥
एकवेळगेलीमाता ॥ एकवेळगेलापिता ॥ २ ॥
द्रव्यदाराजातीपुत्र ॥ जिवलगआणिमित्र ॥ ३ ॥
प्राणीसंसारासीआला ॥ तितुकामृत्युपंथेंगेला ॥ ४ ॥
पूर्वजगेलेदेवापासीं ॥ तेचीवाटआपणासी ॥ ५ ॥
रामदासह्मणेलोक ॥ करितीगेलीयाचाशोक ॥ ६ ॥

( २४ )

ज्याचेंहोतेंत्याणेंनेलें ॥ येथेंतुझेंकायगेलें ॥ १ ॥
वेगींहोईंसावधान ॥ करींदेवाचेंभजन ॥ २ ॥
गतीनकळेहोणाराची ॥ हेतोइच्छाभगवंताची ॥ ३ ॥

पूर्वसंचीताचेंफळ ॥ होतीदुःखाचेकल्लोळ ॥ ४ ॥
पूर्वीकेलेंजेंसंचीत ॥ तेंतेंभोगावेंनिश्चित ॥ ५ ॥
दासह्मणेपूर्वरेखा ॥ प्राप्तनटळेब्रह्मादिकां ॥ ६ ॥

( २५ )

आतांकोठेंधरूंभाव ॥ बहुसालझालेदेव ॥ १ ॥
मुख्यपूजायारंपार ॥ एकाहुनीएकथोर ॥ २ ॥
माझेकुळींचेंदैवतें ॥ सांगोंजातांअसंख्यातें ॥ ३ ॥
रामदासीदेवएक ॥ येरसर्वहीमायीक ॥ ४ ॥

( २६ )

आतांशरणकोणाजावें ॥ सत्यकोणातेंमानावें ॥ १ ॥
नानापंथनानामतें ॥ भूमंडळींअसंख्यातें ॥ २ ॥
एकमानितीसगुण ॥ एकह्मणतीनिर्गुण ॥ ३ ॥
एकींकेलासर्वत्याग ॥ एकह्मणतीराजयोग ॥ ४ ॥
रामदाससांगेखूण ॥ भक्तिवीणसर्वशीण ॥ ५ ॥

( २७ )

शरणजावेंसंतजना ॥ सत्यमानावेंनिर्गुणा ॥ १ ॥
नानामतींकायचाड ॥ करणेंसत्याचानीवाड ॥ २ ॥
ज्ञानेंभक्तीसीशिणवावें ॥ भक्तितयेसीह्मणावें ॥ ३ ॥
रामींरामदाससांगे ॥ सर्वकाळसंतसंगें ॥ ४ ॥

( २८ )

एकदेवआहेखरा ॥ मायानाथिलापसारा ॥ १ ॥
हेंचिवीचारेंजाणावें ॥ ज्ञातातयासीह्मणावें ॥ २ ॥
रामदासाचेंबोलणें ॥ स्वप्नामाजीजायीजिणें ॥ ३ ॥

( २९ )

गेलाप्रपंचहातींचा ॥ लाभनाहींपरमार्थाचा ॥ १ ॥
दोहींकडेअंतरला ॥ थोरपणेंभांबावला ॥ २ ॥
गेलीअवघीनिस्पृहता ॥ नाहींस्वार्थहीपूरता ॥ ३ ॥
क्रोधेंगेलासंतसंग ॥ लोभेंजाहालावीरंग ॥ ४ ॥
पूर्णझालीनाहींआशा ॥ इकडेबुडालाअभ्यासा ॥ ५ ॥
दासह्मणेक्रोधेंकेलें ॥ अवघेंलाजिरवाणेंझालें ॥ ६ ॥

( ३० )

संगस्वार्थाचाधरीला ॥ तेणेंकामखवळला ॥ १ ॥
थोरपणहेंमातलें ॥ तेणेंआल्हाटेंघातलें ॥ २ ॥
कामामागेंआलाक्रोध ॥ क्रोधेंकेलाबहूखेद ॥ ३ ॥
लोभदंभाचेंकारण ॥ मोहेंकेलेंविस्मरण ॥ ४ ॥
कामीलांचावलेंमन ॥ झालेंबुद्धीचेंपतन ॥ ५ ॥
दासह्मणेहेंसकळ ॥ अवघेंअनर्थाचेंमूळ ॥ ६ ॥

( ३१ )

कामक्रोधखवळला ॥ तोचिसन्निपातझाला ॥ १ ॥
यासीऔषधकरावें ॥ पोटींवैराग्यधरावें ॥ २ ॥
कुपथ्यअवघेंजेंझालें ॥ मगतेंपुढेंऊफाळलें ॥ ३ ॥
रामदाससांगेभलें ॥ लोकह्मणतीपीसाळलें ॥ ४ ॥

( ३२ )

व्यर्थमायाजाळींगुंतोनीराहासी ॥ हीतगमावीसीआपूलेंतें ॥ १ ॥
गृहदारासुतनव्हेतअंतींचीं ॥ मगईतरांचीकायआशा ॥ २ ॥
सर्वहेंसांडोनीजाशीलबाह्मणी ॥ काळतोबांधोनीनेईतूज ॥ ३ ॥
तेथेंसोडवीतानसेतुजकोण्ही ॥ एकाचक्रपाणीवांचोनीयां ॥ ४ ॥
नकोगुंतूंगळींमायीकासीटाळीं ॥ स्वहीतसांभाळींभिक्षुह्मणे ॥ ५ ॥

( ३३ )

वाजेपाऊलआपलें ॥ ह्मणेमागेंकोणआलें ॥ १ ॥
कोणधांवतसेआड ॥ पाहेंजातांझालेंझाड ॥ २ ॥
भावीतसेअभ्यंतरीं ॥ कोणचालेबरोबरी ॥ ३ ॥
शब्दपडसादऊठला ॥ ह्मणेकोणरेबोलिला ॥ ४ ॥
रामींरामदासह्मणे ॥ संशयाचींहींलक्षणें ॥ ५ ॥

( ३४ )

कांहींदिसेअकस्मात ॥ तेथेंवाटेआलेंभूत ॥ १ ॥
वायांपडावेंसंदेहीं ॥ मुळींतेथेंकांहींनाहीं ॥ २ ॥
झाडझुडूपदेखिलें ॥ जिवींवाटेकोणीआलें ॥ ३ ॥
रामदाससांगेखूण ॥ भितोआपणाआपण ॥ ४ ॥

( ३५ )

छायादेखुनीआपली ॥ शंकाअंतरींवाटली ॥ १ ॥
ऐसेंभ्रमाचेंलक्षण ॥ भुलेआपणाआपण ॥ २ ॥
मुखेंबोलतांउत्तर ॥ तेथेंझालेंप्रत्युत्तर ॥ ३ ॥
डोळांघालितांआंगोळी ॥ एकाचींतींदोनझालीं ॥ ४ ॥
पोटींआपणकल्पिलें ॥ तेंचिआलेंसेंवाटलें ॥ ५ ॥
दासह्मणेहेऊपाधी ॥ शंकाधरितांअधिकबाधी ॥ ६ ॥

( ३६ )

नाहींएकउपासना ॥ कैंचीभक्तीचीभावना ॥ १ ॥
नाहींनिश्चयअंतरीं ॥ मनफीरेदारोदारीं ॥ २ ॥
ज्यासीनाहींएकदेव ॥ सातांपांचांठायींभाव ॥ ३ ॥
नानाकारझालेंमन ॥ कैंचेंनिष्ठेचेंभजन ॥ ४ ॥
रामींरामदासह्मणे ॥ निष्ठेवीणसर्वसुणें ॥ ५ ॥

( ३७ )

जयाज्ञानहेंनेणवे ॥ पशुतयासीह्मणावें ॥ १ ॥
कोणेंकेलेंचराचर ॥ कोणविश्वाचाआधार ॥ २ ॥
ब्रह्मादिकांचानिर्मिता ॥ कोणआहेत्यापरता ॥ ३ ॥
अनंतब्रह्मांडांच्यामाळा ॥ हेतोभगवंताचीलीळा ॥ ४ ॥
रामदासाचाविवेक ॥ सर्वकर्तादेवएक ॥ ५ ॥

( ३८ )

ज्ञानाविणजेजेकळा ॥ तेतेजाणावीअवकळा ॥ १ ॥
ऐसेंभगवंतबोलिला ॥ चित्तद्यावेंत्याच्याबोला ॥ २ ॥
एकेंज्ञानेंचीसार्थक ॥ सर्वकर्मनीरर्थक ॥ ३ ॥
दासह्मणेज्ञानावीण ॥ प्राणीजन्मलापाषाण ॥ ४ ॥

---

## वेंचे, दासबोधांतील.

ओंव्या.

दशक पहिला, समास सातवा.

कवींचेंवर्णन.

आंतांवंदूंकवीश्वर ॥ जेशब्दसृष्टीचेईश्वर ॥ नातरीहेपरमेश्वर ॥ वंदावे

तरी ॥ १ ॥ कीं हे सरस्वतीचें निजस्थान ॥ कीं हे नानाकळांचें जीवन ॥ नानासद्विद्यांचें भुवन ॥ यथार्थ होय ॥ २ ॥ कीं हे पुरुषार्थाचें वैभव ॥ कीं हे जगदीश्वराचें महत्व ॥ नानालाघवें सत्कीर्तीस्तव ॥ निर्माण कवी ॥ ३ ॥ कीं हे शब्दरत्नांचे सागर ॥ कीं हे मुक्त सरोवर ॥ नानाविधींचे वैरागर ॥ निर्माण झाले ॥ ४ ॥ अध्यात्मग्रंथाची खाणी ॥ कीं बोलके चिंतामणी ॥ नानाकामधेनूंचीं दुभणीं ॥ वोळलीं श्रोतयांसी ॥ ५ ॥ कीं हे कल्पनेचे कल्पतरू ॥ कीं हे मोक्षाचे पडिभरू ॥ नानासायोज्यतेचे विस्तारू ॥ विस्तारले ॥ ६ ॥ कीं हा परलोकींचा निजस्वार्थ ॥ कीं हा योगियांचा गुप्त पंथ ॥ नानाज्ञानियांचा परमार्थ ॥ रूपासि आला ॥ ७ ॥ कीं हे निरंजनाची खूण ॥ कीं हे निर्गुणाची ओळखण ॥ मायाविलक्षणाचें लक्षण ॥ ते हे कवी ॥ ८ ॥ कीं हा श्रुतीचा भावगर्भ ॥ कीं परमेश्वराचा अलभ्य लाभ ॥ नातरी होय सुलभ ॥ निजबोध कविरूपें ॥ ९ ॥ कवी मुमुक्षूचें अंजन ॥ कवी साधकाचें साधन ॥ कवी सिद्धाचें समाधान ॥ निश्चयात्मक ॥ १० ॥ कवी स्वधर्माचा आश्रयो ॥ कवी मनाचा मनोजयो ॥ कवी धार्मिकाचा विनयो ॥ विनयकर्ते ॥ ११ ॥ कवी वैराग्याचें संरक्षण ॥ कवी भक्ताचें भक्तिलक्षण ॥ नानास्वधर्मसंरक्षण ॥ ते हे कवी ॥ १२ ॥ कवी प्रेमळांची प्रेमळस्थिती ॥ कवी ध्यानस्थांची ध्यानमूर्ती ॥ कवी उपासकांची वाढकीर्ती ॥ विस्तारली ॥ १३ ॥ नानासाधनांचें मूळ ॥ कवी नानाप्रयत्नांचें फळ ॥ नानाकार्यसिद्धि केवळ ॥ कवीचेनि प्रसादें ॥ १४ ॥ आधीं कवीचा वाग्विलास ॥ तरी मग श्रवणीं तुंबळे रस ॥ कवीचेनि मतिप्रकाश ॥ कवित्वासी होय ॥ १५ ॥ कवी व्युत्पन्नाचीयोग्यता ॥ कवी सामर्थ्यवंताची सत्ता ॥ कवी विचक्षणाची कुशळता ॥ नानाप्रकारीं ॥ १६ ॥ कवी कवित्वाचा प्रबंध ॥ कवी नानाधाटी मुद्रा छंद ॥ कवी गद्यपद्य भेदाभेद ॥ पदप्रसादकर्ते ॥ १७ ॥ कवी सृष्टीचा अळंकार ॥ कवी लक्ष्मीचा शृंगार ॥ सकळसिद्धीचा निर्धार ॥ ते हे कवी ॥ १८ ॥ कवी सभेचें मंडण ॥ कवी भाग्याचें भूषण ॥ नानासुखांचें संरक्षण ॥ ते हे कवी ॥ १९ ॥ कवी देवांचे रूपकर्ते ॥ कवी ऋषींचे महत्ववर्णिते ॥ नानाशास्त्रांचें सामर्थ्य ते ॥ कवी वाखाणिती ॥ २० ॥ नसता कवीचा व्यापार ॥ तरी कैंचा असता जगदोद्धार ॥ ह्मणोनि कवी हे आधार ॥ सकळसृष्टीसी ॥ २१ ॥ नानाविद्या दातृत्व कांहीं ॥ कवीश्वराविण तो नाहीं ॥ कवीपासून सर्व कांहीं ॥ सर्वज्ञता ॥ २२ ॥ मागें वाल्मीकि व्यासादिक ॥ झाले कवीश्वर अ

नेक ॥ तयांपासूनिविवेक ॥ सकळजनांसी ॥ २३ ॥ पूर्वींकाव्येंहोतीं केलीं ॥ तरीचव्युत्पत्तीप्राप्तझाली ॥ तेणेंपंडितताअंगींबाणली ॥ परमयोग्यता ॥ २४ ॥ ऐसेपूर्वींथोरथोर ॥ झालेकवीश्वरअपार ॥ आतांआहेतिपुढेंहोणार ॥ नमनमाझेंत्यांसिपैं ॥ २५ ॥ नानाचातुर्याच्यामूर्ती ॥ कींहेसाक्षात्‌बृहस्पति ॥ वेदश्रुतिबोलोंह्मणती ॥ ज्यांच्यामुखें ॥ २६ ॥ परोपकाराकारणें ॥ नानानिश्चयअनुवादणें ॥ शेखींबोलिलेपूर्णपणें ॥ संशयातीत ॥ २७ ॥ कींहेअमृताचेमेघवोळले ॥ कींहेनवरसांचेवोघलोटले ॥ नानासुखांचेउचंबळले ॥ सरोवरहे ॥ २८ कींहेविवेकनिधीचींभांडारें ॥ प्रकटझालींमनुष्याकारें ॥ नानावस्तूंचेनिविचारें ॥ कोंदाटलेहे ॥ २९ ॥ कींहेआदिशक्तीचेंठेवणें ॥ नानापदार्थांशीआणीउणें ॥ लाधलेंपूर्वसंचिताच्यागुणें॥विश्वजनासी ॥३० ॥ कींहींसुखाचींतारुवेंलोटलीं ॥ अक्षयींआनंदेंउतटलीं ॥ विश्वजनासीउपेगाआलीं ॥ नानाप्रयोगाकारणें ॥ ३१ ॥ कींहेनिरंजनाचीसंपत्ती ॥ कींहेविराटाचीयोगस्थिती ॥ कींभक्तीचीफळश्रुती ॥ फळासिआली ॥ ३२ ॥ कींहेईश्वराचापवाड ॥ पाहतांगगनाहूनिवाड ॥ ब्रह्मांडरचनेहूनिजाड ॥ कविप्रबंधरचना ॥३३॥ आतांअसोहाविस्तार ॥ जगासिआधारकवीश्वर ॥ तयांसिमाझानमस्कार साष्टांगभावें ॥ ३४ ॥

---

## वेंचे, दासबोधांतील.

### ओंव्या.

### नरदेहप्रशंसा. समास १० वा.

धन्यधन्यनरदेहो ॥ येथीलअपूर्वतापाहाहो ॥ जोजोकीजेपरमार्थलाहो तोतोपावेसिद्धीतें ॥ १ ॥ यानरदेहाचेनिआधारें ॥ नानासाधनांचेनिद्वारें ॥ मुख्यसारासारविचारें ॥ बहुतसुटले ॥ १८ ॥ यानरदेहाचेनिसंबंधें ॥ वहुतपावलेउत्तमपदें ॥ अहंतासांडोनिस्वानंदें ॥सुखीझाले ॥ १९॥ नरदेहींयेवूनिसकळ ॥ उद्धारगतीपावलेकेवळ ॥ येथेंसंशयाचेंमूळ ॥ खंडोनिगेलें ॥ २० ॥ पशुदेहींनाहींगती ॥ ऐसेंसर्वत्रबोलती ॥ ह्मणोनिनरदेहींचप्राप्ती ॥ परलोकाची ॥ २१ ॥ह्मणोनिनरदेहश्रेष्ठ॥ नानादेहांमध्येंवरिष्ठ ॥ जयाचेनिचुकेअरिष्ट ॥ यमयातनेचें ॥ २४ ॥ नरदेहहास्वाधीन ॥ नव्हेसहसापराधीन॥ परंतुपरोपकारींझिजऊन ॥ कीर्तिरूपेंउ

रवावा ॥ २५ सांगनरदेहजोडिलें ॥ आणिपरमार्थबुद्धिविसरलें ॥ तें मूर्खकैसेंभ्रमलें ॥ मायाजाळीं ॥ ३३ ॥ मृत्तिकाखाणोनिघरकेलें ॥ तें माझेंऐसेंदृढकल्पिलें ॥ परितेंबहुतांचेंहेंकळलें ॥ नाहींचतयासी ॥ ३४ ॥ अवघींघरेंभंगिलीं ॥ गांवाचीपांढरपडली ॥ मगत्यागृहींराहिलीं ॥ अरण्यश्वापदें ॥ ३८॥ किडामुंगीवाळवीमूषक ॥ त्यांचींघरेंनिश्चयात्मक ॥ हेप्राणीवापुडेमूर्ख ॥ निघोनिगेले ॥ ४९ ॥ ऐशीगृहाचीस्थिती ॥ मिथ्या आलीआत्मप्रतीती ॥ जन्मदोंदिवसांचीवस्ती ॥ कोठेंतरीकरावी ॥ ५० ॥ आतांदेहह्मणावेंआपुलें ॥ तरीहेंवहुतांकारणेंनिर्मिलें ॥ प्राणियांच्यामायांगृहकेलें ॥ उवामस्तकभक्षिती ॥ ५१ ॥ ऐसेंशरीरबहुतांचें ॥ मूर्खह्मणे आमुचें ॥ परंतुखाजेंजिवांचें ॥ तापत्रयींबोलिलें ॥ ६० ॥ देहपरमार्थी लाविलें ॥ तरीचयाचेंसार्थक्यझालें ॥ नाहींतरीहेंव्यर्थचिगेलें ॥ नानाआघातींमृत्युपंथें ॥ ६१ ॥ असोजेप्रपंचींमूर्ख ॥ तेकायजाणतीपरमार्थ ॥ त्यामूर्खांचींलक्षणेंकांहींएक ॥ पुढतीनिरोपिजेल ॥ ६२ ॥

---

## वेंचे, दासबोधांतील.

### ओंव्या.

### मूर्खांचीं लक्षणें.

जन्मलाजयाचेउदरीं ॥ तयाशींजोविरोधकरी ॥ सखीमानिलीअंतुरी ॥ तोएकमूर्खजाणावा ॥ १ ॥ परस्त्रियेशींप्रेमधरी ॥ श्वशुरगृहींवासकरी ॥ कुळनजाणोनिकन्यावरी ॥ तोएकमूर्ख ॥ २ ॥ समर्थासींअहंता ॥ अंतरीं मानीसमता ॥ सामर्थ्यावीणकरीसत्ता ॥ तोएकमूर्ख ॥ ३ ॥ आपणआपलीकरीस्तुती ॥ स्वदेशींभोगीविपत्ती ॥ सांगेवडिलांचीकीर्ती ॥ तोएक मूर्ख ॥ ४ ॥ औषधनघेअसूनव्यथा ॥ पथ्यनकरीसर्वथा ॥ नमिळेआलियापदार्था ॥ तोएकमूर्ख ॥ ५ ॥ संगियावीणविदेशकरी ॥ ओळखीवीणसंगधरी ॥ उडीघालीमहापुरीं ॥ तोएकमूर्ख ॥ ६ ॥ स्वयेंनेणेपरोपकार ॥ उपकाराचाअनुपकार ॥ करीथोडेंबोलेफार ॥ तोएकमूर्ख ॥ ७ ॥ दंतचक्षुआणिघ्राण ॥ पाणीवसनआणिचरण ॥ सार्वकाळजयाचेमळिण ॥ तोएकमूर्ख ॥ ८ ॥ आपणासिराखेनानापरी ॥ शरणागतासिअव्हेरी ॥ संपत्तीचाभरंवसाधरी ॥ तोएकमूर्ख ॥ ९ ॥ धनपुत्रआणिदारा ॥ इतु

काचिमानूनथारा ॥ विसरोनिगेलाईश्वरा ॥ तोएकमूर्ख ॥ १० ॥ परपीडेचेंमानीसुख ॥ परसुखेंमानीदुःख ॥ गेलेवस्तूचाकरीशोक ॥ तोएकमूर्ख ॥ ११ ॥ तस्करासीओळखसांगे ॥ देखिलीवस्तूमागे ॥ आपुलेंअनहितकरीरागें ॥ तोएकमूर्ख ॥ १२ ॥ समर्थासींवैरधरी ॥ अलभ्यवस्तूचाहेवाकरी ॥ घरचेघरींकरीचोरी ॥ तोएकमूर्ख ॥ १३ ॥ आपणवाचीनाकधीं ॥ कोणासवाचावयानेदी ॥ पुस्तकबांधोनिठेवीबंदीं ॥ तोएकमूर्ख ॥ १४ ॥ नवोलावतांपरगृहाजातो ॥ नपुसतांमातसांगतो ॥ राजासिमित्रह्मणतो ॥ तोएकमूर्ख ॥ १५ ॥ आपलेअवगुणनजाणणें ॥ परातेंदोषलावणें ॥ हेंजयाचेंमननजाणे ॥ तोएकमूर्ख ॥ १६ ॥ भरोनिवैभवाचेभरीं ॥ जीवमात्रासतुच्छकरी ॥ पाखांडमतस्वीकारी ॥ तोएकमूर्ख ॥ १७ ॥ नाहींभक्तीचेंसाधन ॥ नवैराग्यनाभजन ॥ क्रियेवीणब्रह्मज्ञान ॥ बोलेतोएकमूर्ख ॥ १८ ॥ ऐशींहींमूर्खाचींलक्षणें ॥ ऐकतांचातुर्यबाणे ॥ चित्तदेउनिशाहाणे ॥ ऐकतीसदा ॥ १९ ॥ लक्षणेंअपारअसती ॥ परिकांहींएकयथामती ॥ त्यागार्थबोलतांश्रोतीं ॥ क्षमाकेलीपाहिजे ॥ २० ॥ परममूर्खामाजीमूर्ख ॥ जोसंसारींमानीसुख ॥ संसारदुःखायेवढेंदुःख ॥ आणीकनाहीं ॥ २१ ॥

---

## वेंचे, मनाचेश्लोकांतील.

मनासज्जनाभक्तिपंथेंचिजावें ॥ तरीश्रीहरीपाविजेतोस्वभावें ॥
जनींनिंद्यतेंसर्वसोडूनद्यावें ॥ जनींवंद्यतेंसर्वभावेंकरावें ॥ १ ॥
मनावासनादुष्टकामानयेरे ॥ मनासर्वथापापबुद्धीनकोरे ॥
मनासर्वथानीतिसोडूंनकोहो ॥ मनाअंतरींसारवीचारराहो ॥ २ ॥
मनापापसंकल्पसोडोनिद्यावा ॥ मनासत्यसंकल्पजीवींधरावा ॥
मनाकल्पनातेनकोवीषयाची ॥ विकारेंघडेहोजनींसर्वछीछी ॥ ३ ॥
नकोरेमनाक्रोधहाखेदकारी ॥ नकोरेमनाकामनानाविकारी ॥
नकोरेमनासर्वदाअंगिकारूं ॥ नकोरेमनामत्सरूदंभभारू ॥ ४ ॥
मनाश्रेष्ठधारिष्टजीवींधरावें ॥ मनाबोलणेंनित्यसोसीतजावें ॥
स्वयेंसर्वदानम्रवाचेवदावें ॥ मनासर्वलोकांसिरेनीववावें ॥ ५ ॥
देहेत्यागितांकीर्तिमागेंउरावी ॥ मनासज्जनाहेचिक्रीयाधरावी ॥
मनाचंदनाचेपरित्वांझिजावें ॥ परीअंतरींसज्जनानीववावें ॥ ६ ॥

नकोरेमनाद्रव्यतेंपूढिलाचें ॥ अतीस्वार्थबुद्धीनकोपापसाचें ॥
घडेभोगणेंपापतेंकर्मखोटें ॥ नहोतांमनासारिखेंदुःखमोठें ॥ ७ ॥
जनींसर्वसूखीअसाकोण आहे ॥ विचारीमनातूंचिशोधोनिपाहें ॥
मनात्वांचिरेपूर्वसंचीतकेलें ॥ तयासारिखेंभोगणेंप्राप्तजालें ॥ ८ ॥
मनामानसींदुःखआणूंनकोरे ॥ मनासर्वथाशोकचिंतानकोरे ॥
विवेकेंदेहेबुद्धिसोडोनद्यावी ॥ विदेहीपणेंमुक्तिभोगीतजावी ॥ ९ ॥
जिवाकर्मयोगेंजनींजन्मजाला ॥ परीशेवटींकाळघेवोनिगेला ॥
महाथोरतेमृत्युपंथेंचिगेले ॥ असंख्याततेजन्मलेआणिमेले ॥ १० ॥
मनापाहतांसत्यहेमृत्युभूमी ॥ जितांबोलतीसर्वहीजीवमीमी ॥
चिरंजीवहेसर्वहीमानिताती ॥ अकस्मातसोडोनियांसर्वजाती ॥ ११ ॥
मरेएकत्याचादुजाशोकवाहे ॥ अकस्मातत्तोहीपुढेंजातआहे ॥
पुरेनाजनींलोभरेक्षोभहोतो ॥ ह्मणोनीजनींमागुतीजन्मघेतो ॥ १२ ॥
मनामानसींव्यर्थचिंतावहातें ॥ अकस्मातहोणारहोवोनिजातें ॥
घडेभोगनात्यागहीकर्मयोगें ॥ मतीमंदतोखेदमानीवियोगें ॥ १३ ॥
मनासर्वथासत्यसोडूंनकोरे ॥ मनासर्वथामिथ्यमांडूंनकोरे ॥
मनासत्यतेंसत्यवाचेवदावें ॥ मनामिथ्यतेंमिथ्यसोडोनिद्यावें ॥ १४ ॥
समर्थाचियासेवकावक्रपाहे ॥ असासर्वभूमंडळींकोणआहे ॥
जयाचीलिळावर्णितीलोकतीन्ही ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी । १५ ॥
अहिल्याशिळाराघवेंमुक्तकेली ॥ पदींलागतांदिव्यहोवोनिगेली ॥
जयावर्णितांशीणलीवेदवाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १६ ॥
सदासर्वदादेवसन्नीधआहे ॥ कृपाळूपणेंअल्पधारिष्टपाहे ॥
सुखानंदआनंदकैवल्यदानी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १७ ॥
असेहोजयाअंतरींभावजैसा ॥ वसेहोतयाअंतरींदेवतैसा ॥
अनन्यासरक्षीतसेचापपाणी ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १८ ॥
सदाचक्रवाकासिमार्तंडजैसा ॥ उडीघालितोसंकटींस्वामितैसा ॥
हरीभक्तिचाघावघालानिशाणीं ॥ नुपेक्षीकदारामदासाभिमानी ॥ १९ ॥
जयाचेनिसंगेंसमाधानभंगे ॥ अहंताअकस्मातयेऊनिलागे ॥
तयासंगतीचीजनींकोणगोडी ॥ जियेसंगतीनेंमनींरामजोडी ॥ २० ॥
सदाबोलण्यासारिखेंचालताहे ॥ अनेकींसदाएकदेवासिपाहे ॥
सगूणींभजेलेशनाहींभ्रमाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ २१ ॥

मदेंमत्सरेंसांडिलीस्वार्थबुद्धी ॥ प्रपंचीकनाहींजयातेंउपाधी ॥
सदाबोलणेंनम्रवाचासुवाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ २२ ॥
सदाआर्जवीप्रीयजोसर्वलोकीं ॥ सदासर्वदासत्यवादीविवेकी ॥
नबोलेकदामिथ्यवाचात्रिवाचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ २३ ॥
दिनाचादयाळूमनाचामवाळू ॥ स्नेहाळूकृपाळूजगींदासपाळू ॥
जयाअंतरींक्रोधसंतापकैंचा ॥ जगींधन्यतोदाससर्वोत्तमाचा ॥ २४ ॥
मनाकल्पनाकल्पितांकल्पकोटी ॥ नव्हेरेनव्हेसर्वदारामभेटी ॥
मनींकामनारामनाहींजयाला ॥ अतीआदरेंप्रेमनाहींतयाला ॥ २५ ॥
अतीमूढत्यादृढबुद्धीअसेना ॥ अतीकामत्यारामचित्तींवसेना ॥
अतीलोभत्याक्षोभहोईलजाणा ॥ अतीवीषयीसर्वदादैन्यवाणा ॥ २६ ॥
सुखानंदकारीनिवारीभयातें ॥ जनींभक्तिभावेंभजावेंतयातें ॥
विवेकेंत्यजावाअनाचारहेवा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ २७ ॥
जयाचेनिनामेंमहादोषजाती ॥ जयाचेनिनामेंगतीपाविजेती ॥
जयाचेनिनामेंघडेपुण्यठेवा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ २८ ॥
नवेंचेकदाग्रंथिचाअर्थकांहीं ॥ मुखेंनामउच्चारितांकष्टनाहीं ॥
महाघोरसंसारशत्रूजिणावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ २९ ॥
नव्हेकर्मनाधर्मनायोगकांहीं ॥ नव्हेभोगनात्यागनासांगकांहीं ॥
ह्मणेदासविश्वासनामींधरावा ॥ प्रभातेमनींरामचिंतीतजावा ॥ ३० ॥
भजारामविश्रामयोगेश्वराचा ॥ जपानेमिलानेमगौरीहराचा ॥
निवालास्वयेंतापसीचंद्रमौळी ॥ तुह्मांसोडवीरामहाअंतकाळीं ॥ ३१ ॥
मुखींनामनाहींतयामुक्तिकैंची ॥ अहंतागुणेंयातनातेफुकाची ॥
पुढेंअंतयेईलतोदैन्यवाणा ॥ ह्मणोनीह्मणारेह्मणादेवराणा ॥ ३२ ॥
यथासांगरेकर्मतेंहीघडेना ॥ घडेकर्मतेंपुण्यगांठींपडेना ॥
दयापाहतांसर्वभूतींअसेना ॥ फुकाचेंमुखींनामतेंहीवसेना ॥ ३३ ॥
अतीलीनतासर्वभावेंस्वभावें ॥ जनासज्जनालागिंसंतोषवावें ॥
देहेकारणींसर्वलावीतजावें ॥ सगूणींअतीआदरेंशीभजावें ॥ ३४ ॥
क्रियेवीणनानापरीबोलिजेतें ॥ परीचित्तदुश्चित्ततेंलाजवीतें ॥
मनाकल्पनाधीटसैराटधांवे ॥ तयामानवादेवकैसेनिपावे ॥ ३५ ॥
विवेकेंक्रियाआपुलीपालटावी ॥ अतीआदरेंशुद्धबुद्धीधरावी ॥
जनींबोलण्यासारखेंचालबापा ॥ मनींकल्पनासोडसंसारतापा ॥ ३६ ॥

डॉ. न. म. द. बा. पोतदार
ग्रंथ संग्रह

वरींस्नानसंध्याकरींएकनिष्ठा ॥ विवेकेंमनाआंवरींस्थानभ्रष्टा ॥
दयासर्वभूतींजयामानवाला ॥ सदाप्रेमळूभक्तिभावेंनिवाला ॥ ३७ ॥
सदासर्वदासज्जनाचेनियोगें ॥ क्रियापालटेभक्तिभावार्थलागे ॥
क्रियेवीणवाचाळतातेनिवारीं ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ ३८ ॥
तुटेवादसंवादत्यातेंह्मणावें ॥ विवेकेंअहंभावत्यातेंजिणावें ॥
अहंतागुणेंवादनानाविकारी ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ ३९ ॥
हिताकारणेंबोलणेंसत्यआहे ॥ हिताकारणेंसर्वशोधोनिपाहें ॥
हिताकारणेंबंडपाखंडवारीं ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ ४० ॥
जनींसांगतांऐकतांजन्मगेला ॥ परीवादवीवादतैसाचठेला ॥
उठेसंशयोवादहादंभधारी ॥ तुटेवादसंवादतोहीतकारी ॥ ४१ ॥
जनींहीतपंडीतसांगूनिगेले ॥ अहंतागुणेंब्रह्मराक्षेसजाले ॥
तयाहूनव्युत्पन्नतोकोणआहे ॥ मनासर्वजाणीवसांडूनराहें ॥ ४२ ॥
तुटेवादसंवादतेथेंकरावा ॥ विवेकेंअहंभावहापालटावा ॥
जनींबोलण्यासारिखेंआचरावें ॥ क्रियापालटेंभक्तिपंथेंचिजावें ॥ ४३ ॥
फुकाचेंमुखींबोलतांकायवेंचे ॥ दिसंदीसअभ्यंतरींगर्वसांचे ॥
क्रियेवीणवाचाळताव्यर्थआहे ॥ विचारेंतुझातूंचिशोधूनपाहें ॥ ४४ ॥
जनाकारणेंदेवलीलावतारी ॥ बहूतांपरीआदरेंवेषधारी ॥
तयानेणतीतजनींपापरूपी ॥ दुरात्मेमहानष्टचांडाळपापी ॥ ४५ ॥
गतीकारणेंसंगतीसज्जनाची ॥ मतीपालटेसूमतीदुर्जनाची ॥
रतीनायकाचापतीनष्टआहे ॥ ह्मणोनीमनातीतहोवोनिराहें ॥ ४६ ॥
मनाअल्पसंकल्पतोहीनसावा ॥ मनासत्यसंकल्पचित्तींवसावा ॥
जनींजल्पवीकल्पतोहीत्यजावा ॥ रमाकांतएकांतकाळींभजावा ॥ ४७ ॥
मनावासनावासुदेवींवसोंदे ॥ मनाकामनाकामसंगींनसोंदे ॥
मनाकल्पनावाउगीतेनकीजे ॥ मनासज्जनासज्जनींवस्तिकीजे ॥ ४८ ॥
नसेगर्वअंगींसदावीतरागी ॥ क्षमाशांतिभोगीदयादक्षयोगी ॥
नसेलोभनाक्षोभनादैन्यवाणा ॥ अशालक्षणींजाणिजेयोगिराणा ॥ ४९ ॥
धरींरेमनासंगतीसज्जनाची ॥ जिणेंवृत्तिहेपालटेदुर्जनाची ॥
बळेभावहावृत्तिसन्मार्गिंलागे ॥ महाक्रूरतोकाळविक्राळभंगे ॥ ५० ॥
जिवाश्रेष्ठतेस्पष्टसांगोनिगेले ॥ परीजीवअज्ञानतैसेचठेले ॥
देहेबुद्धिचानिश्चयोत्यांढळेना ॥ जुनेंटेवणेंमीपणेंतंटळेना ॥ ५१ ॥

जगींपाहतांसाचतेंकायआहे ॥ अतीआदरेंसर्वशोधोनिपाहें ॥
पुढेंपाहतांपाहतांदेवजोडे ॥ भ्रमभ्रांतिअज्ञानहेंसर्वमोडे ॥ ५२ ॥
दिसेनाजनींतेंचिशोधूनिपाहें ॥ बरेंपाहतांगूजतेथेंचिआहे ॥
करेंधेउंजातांकदाआकळेना ॥ जनींसर्वकोंदाटलेंतेंकळेना ॥ ५३ ॥
ह्मणेजाणतोंतोमनीं मूर्खआहे ॥ अतर्क्यासितर्कीअसाकोणआहे ॥
जनींमीपणेंपाहतांपाहवेना ॥ तयापाहतांवेगळेंराहवेना ॥ ५४ ॥
जयेंमक्षिकाभक्षिलीजाणिवेची ॥ तयाभोजनाचीरुचीप्राप्तिकैंची ॥
अहंभावज्यामानसींचाविरेना ॥ तयाज्ञानहेंअन्नपोटींजिरेना ॥ ५५ ॥
नकोरेनकोवादहाखेदकारी ॥ नकोरेनकोभेदनानाविकारी ॥
नकोरेमनाशीकऊंपूढिलाशी ॥ अहंभावजोराहिलातूजपाशीं ॥ ५६ ॥
अहंतागुणेंसर्वहीदुःखहोतें ॥ मुखेंबोलिलेंज्ञानतेंव्यर्थजातें ॥
सुखेंराहतांसर्वहीसूखआहे ॥ अहंतातुझीतूंचिशोधोनिपाहें ॥ ५७ ॥
फुटेनातुटेनाकदादेवराणा ॥ चळेनाढळेनाकदादैन्यवाणा ॥
कळेनावळेनाकदालोचनासी ॥ असेनादिसेनाजनामीपणासी ॥ ५८ ॥
जयामानलादेवतोपूजिताहे ॥ परीदेवशोधूनकोणीनपाहे ॥
जगींपाहतांदेवकोटयानुकोटी ॥ जयामानलीभक्तिजेतेचिमोठी ॥ ५९ ॥
तिन्हीलोकजेथूनिनिर्माणझाले ॥ तयादेवरायासिकोणीनबोले ॥
जगींथोरलादेवतोचोरिलासे ॥ गुरूवीणतोसर्वथाहीनदीसे ॥ ६० ॥
गुरूपाहतांलक्षकोटयानुकोटी ॥ बहूसाळमंत्रावळीशक्तिमोठी ॥
मनाकल्पनाचेटकेंघातपाता ॥ जनींव्यर्थरेतोनव्हेमुक्तिदाता ॥ ६१ ॥
नव्हेचेटकूचाळकूद्रव्यभोंदू ॥ नव्हेनिंदकूमत्सरूभक्तिमंदू ॥
नव्हेउन्मतूवेसनींसंगबाधू ॥ जनींज्ञानियातोचिसाधूअगाधू ॥ ६२ ॥
नव्हेवाउगीचावटीकामपोटीं ॥ क्रियेवीणवाचाळतातेचिमोठी ॥
मुखेंबोलिल्यासारिखेंचालताहे ॥ मनासद्गुरूतोचिशोधूनिपाहें ॥ ६३ ॥
नव्हेतेंचिजालेंनसेतेंचिआलें ॥ कळोंलागलेंसज्जनाचेनिबोलें ॥
अनिर्वाच्यतेंवाक्यवाचेवदावें ॥ मनासंतआनंतशोधीतजावें ॥ ६४ ॥
मनानाकळेनाढळेरूपज्याचें ॥ दुजेवीणतेंध्यानसर्वोत्तमाचें ॥
तयावीणतेंहीनदृष्टांतपाहे ॥ तिथेंसंगनिःसंगदोन्हीनसाहे ॥ ६५ ॥
नजायेंजपासीनजायेंतपासी ॥ नजायेंचिकाशीनजायेंगयेसी ॥
हरीचिंतनेंवीणकोठेंनजायें ॥ त्रिकाळींसदापायतूंतेंचिपाहें ॥ ६६ ॥

कदाओळखीमाजिदूजेंअसेना ॥ मनींमानसींद्वैतकांहींदिसेना ॥
बहूतांदिसींआपलीभेटिजाली ॥ विदेहीपणेंसर्वकायानिमाली ॥ ६७ ॥
मनागूजरेतूजलाप्राप्तजालें ॥ परीपाहिजेअंतरींयत्नकेले ॥
सदाऐकतांपाविजेनिश्चयासी ॥ धरींसज्जनींसंगतीधन्यहोसी ॥ ६८ ॥
मनासंगहासर्वसोडूनिद्यावा ॥ अतीआदरेंसज्जनाचाधरावा ॥
जयाचेनिसंगेंमहादु:खभंगे ॥ जनींसाधनेंवीणसन्मार्गलागे ॥ ६९ ॥
मनासंगहासर्वसंगासितोडी ॥ मनासंगहामोक्षसत्काळजोडी ॥
मनासंगहासाधकाशीघ्रजोडी ॥ मनासंगहाद्वैतनि:शेषमोडी ॥ ७० ॥
मनाचींशतेंऐकतांदोषजाती ॥ मतीमंदतेसाधनायोग्यहोती ॥
चढेज्ञानवैराग्यसामर्थ्यअंगीं ॥ ह्मणेदासविश्वासतांमुक्तिभोगी ॥ ७१ ॥

---

# मुक्तेश्वर.

जन्मशक १५३१.–इ० स० १६०९.

**याचे प्रसिद्ध ग्रंथ.**

भारताचीं पहिलीं चार पर्वें ओंवीबद्ध.

## वेंचे, आदिपर्वांतील.

ओंव्या.

दुष्यंतशकुंतलाख्यान.

कौरववंशींप्रख्यातकीर्ती ॥ दुष्यंतनामागुणैकमूर्ती ॥ श्रेष्ठभूपाळचक्रवर्ती ॥ वीर्येंशौर्येंआगळा ॥ १ ॥ प्राचीप्रतीचीदक्षिणोत्तरा ॥ चारीदिशा चतुःसमुद्रा ॥ आक्रमूनीमहीमहीध्रा ॥ सुरेंद्रतैसाभूलोकीं ॥ २ ॥ हिंसाकारीअधर्मकारी ॥ अथवावर्णसंकरकारी ॥ दुष्यंतराज्यींअनाचारी ॥ स्वप्नींहीपरीअसेना ॥ ३ ॥ धर्मरीतीधर्मधन ॥ सेवूनिसंतुष्टसर्वजन ॥ स्वस्वकर्मींसकळवर्ण ॥ विहिताचारेंवर्तती ॥ ४ ॥ रोगदारिद्र्यकींबंधन ॥ दुःखदुर्भिक्षअकालमरण ॥ सर्पवृश्चिकतस्करजाण ॥ दुष्यंतराज्यींअसेना ॥ ५ ॥ स्वकाळींपर्जन्यवोपीउदका ॥ रत्नधान्यसमृद्धिपिका ॥ पृथ्वी

पिकेहेमांत्रिका ॥ फळेजैसीश्रीविद्या ॥ ६ ॥ विष्णूसमानसत्ताबळ ॥ प्रतापतेजेंसूर्यतेजाळ ॥ धरातुल्यसहनशील ॥ अक्षोभजैसासागरू ॥ ७ ॥ निपुणशस्त्रास्त्रप्रहरणीं ॥ आरूढोंजाणेसर्ववहनीं ॥ ऐसाभूपाळचूडामणी ॥ दुष्यंतराजाभूलोकीं ॥ ८ ॥ सप्तसमुद्रींचेलोट ॥ धरामंडळींएकवट ॥ तैसेसेनेचेसंघाट ॥ घेऊनिवनाचालिला ॥ ९ ॥ वाजीवारणरथपदाती ॥ संख्याकरितांनधरवेगणती ॥ सेनावसनेंसर्वजगती ॥ पांघुरविलीसमर्थें ॥ १० ॥ देखेप्रचंडमहागिरी ॥ विशाळपर्वताचियादरी ॥ जळेंतुंबलींसरितासरीं ॥ समुद्रतुल्यअगाध ॥ ११ ॥ नानावृक्षांचींअचाट ॥ डांगेंलागलींघनदाट ॥ माजिनिर्झरोदकांचेपाट ॥ सरोवराधांवती ॥ १२ ॥ मस्तकेंउचलूनिदिनकर ॥ छायेंरक्षिलाअंधकार ॥ माजीश्वापदगणांचेभार ॥ सुखावलेसुखवस्ती ॥ १३ ॥ मृगमारूनिअसंख्यात ॥ भक्षूनिभर्जितअभर्जित ॥ पारधीखेळतांझालेश्रांत ॥ तेविश्रांतीपावले ॥ १४ ॥ अवलोकूनितेंवन ॥ राजाकरीपुढारांगमन ॥ तंवदेखिलेंकश्यपारण्य ॥ सिद्धसाधकींवसविलें ॥ १५ ॥ नदीमालिनीपवित्रजीवनी ॥ वाहेजैशीदेवतटिनी ॥ तरंगलिंगेंसुफेनसुमनीं ॥ सुपूजिताशोभती ॥ १६ ॥ साष्टांगकरूनियांनमन ॥ राहवूनिसेनाप्रधान ॥ निःसंगएकाकीआपण ॥ कश्यपाश्रमींप्रवेशे ॥ १७ ॥ अवलोकूनिकश्यपाश्रम ॥ आंतजोंपाहेनृपसत्तम ॥ तंवकण्वऋषीचाआश्रम ॥ अतिरमणीयदेखिला ॥ १८ ॥ आदरेंजाऊनितयानिकटीं ॥ आंतपाहेपर्णकुटी ॥ मनुष्याविणसर्वदृष्टी ॥ गृहसामग्रीदिसताहे ॥ १९ ॥ मगगर्जूनिनराधीशें ॥ ह्मणितलेंआश्रमींकोणअसे ॥ हेंपरिसोनिइंदिरावेशें ॥ लावण्यकलिकाप्रगटली ॥ २० ॥ कनकलतिकासौदामिनी ॥ कींचंद्रकालिकातनुधारिणी ॥ सुवर्णकेतकीपत्रवर्णी ॥ सुवर्णखाणीहारेणाक्षी ॥ २१ ॥ रूपयौवनचातुर्यलता ॥ बाहेरपातलीमुनीश्वरदुहिता ॥ अत्यादरेंधरित्रीकांता ॥ पवित्रासनवोपिलें ॥ २२ ॥ स्वागतवदूनियांवचनीं ॥ अर्घ्येंपाद्येंविधिपूजनीं ॥ राजातोषवूनिबहुमानीं ॥ कुशलवृत्तविचारिलें ॥ २३ ॥ दर्शनेंआनंदजाहलानयना ॥ नामश्रवणकरवावेंश्रवणा ॥ परिचयज्ञानेंअंतःकरणा ॥ आप्तभावभेटवणें ॥ २४ ॥ ऐकोनिचातुर्याचीगोष्टी ॥ राजाचमत्कारलापोटीं ॥ ह्मणेहेवयें अतिधाकुटी ॥ परिविचारेंवृद्धदिसताहे ॥ २५ ॥ राजाबोलेयाजगती ॥

दुष्यंतनामाचक्रवर्ती ॥ ऐकिलाअसेलतरीहेमूर्ती ॥ ओळखेंदृष्टीसुजाणे ॥ २६ ॥ कण्वऋषीचेंदर्शन ॥ इच्छूनियेथेंममागमन ॥ केंव्हांहोईलबोलवचन ॥ विलंबेंकींअविलंबें ॥ २७ ॥ शकुंतलाह्मणेनृपती ॥ ममपिताविवेकमूर्ती ॥ वनफळेंघेऊनिशीघ्रगती ॥ आतांचयेईलआश्रमा ॥ २८ ॥ यालागींनरेंद्रचूडामणी ॥ क्षणएकवैसावेंयास्थानीं ॥ इच्छितकामनाऋषिदर्शनीं ॥ पूर्णहोईलनिर्धारें ॥ २९ ॥ एकांतदेखूनिनिर्मळ ॥ राजत्हृदयींमहाप्रबळ ॥ कामार्णवाचेकल्लोळ ॥ हेलावतीअतिमात्रें ॥ ३० ॥ राजापुसेलावण्यराशी ॥ ऊर्ध्वरेताकण्वऋषी ॥ त्यासतूंकन्याझालीसकैशी ॥ हें मजकळलेंपाहिजे ॥ ३१ ॥ भुजंगवेणीधराचतुरा ॥ ह्मणेगाराजराजेश्वरा ॥ पूर्वीएकतपस्वीघरा ॥ ऋषिदर्शनापातला ॥ ३२ ॥ तेणेंपुशिलेंतुमचियाऐसें ॥ त्याप्रतिकण्वेंकथिलेंजैसें ॥ तेंमीसांगेनसावकाशें ॥ श्रवणकेलेंपाहिजे ॥ ३३ ॥ पूर्वीगाधिजमुनींद्रवर्यें ॥ खडतरकरितांतपश्चर्यें ॥ देखूनिसांडिलाधैर्यें ॥ देवेंद्रकांपेचळचळां ॥ ३४ ॥ ह्मणेइंद्रपदाचीचाड ॥ धरूनिविश्वामित्रेंवाड ॥ तपश्चर्याअतिअवघड ॥ मांडिलीअसेनिर्धारें ॥ ३५ ॥ यासिउपायकरावाकवण ॥ जेणेंतयाचेंसुकृतधन ॥ हारवूनिहाब्राह्मण ॥ दीनहोयसर्वस्वें ॥ ३६ ॥ तेवेळींअप्सरामाजिश्रेष्ठ ॥ मेनिकापाचारूनिनिकट ॥ तियेह्मणेहेंमाझेंसंकट ॥ वारेंऐसेंकरावें ॥ ३७ ॥ तुंवाजाऊनितपोवना ॥ कौशिकऋषीच्यादर्शना ॥ विघ्नकरावेंजेंविदाना ॥ दुरुक्तीनाशीक्षणार्धें ॥ ३८ ॥ मेनिकाह्मणेअमरोत्तमा ॥ प्रतिसृष्टीचाअपरब्रह्मा ॥ ज्याचेतपश्चर्येचेंतुह्मां ॥ भयसर्वदाअपार ॥ ३९ ॥ क्षोभवितांतयाचीप्रतिमा ॥ स्वर्गासहितआह्मांतुह्मां ॥ भस्मकरीलयेथेंश्रमा ॥ संशयाच्यानधरणें ॥ ४० ॥ सुरेंद्रह्मणेमृगडोळसे ॥ बोलसीतितुकेंठाउकेंअसे ॥ तथापिआमुच्याकार्योद्देशें ॥ अवश्यगेलेंपाहिजे ॥ ४१ ॥ शंकासांडोनिकरींगमना ॥ ऐशीहोतांसुरेंद्रआज्ञा ॥ मेनिकाआलीकौशिकवना ॥ सालंकारासुवस्त्रा ॥ ४२ ॥ विश्वामित्रासिकरूनिनमन ॥ त्याचेचदृष्टीपुढेंजाण ॥ क्रीडाकौतुकेंसुनर्तन ॥ दावितीझालीविनोदें ॥ ४३ ॥ तियेचाकटाक्षवज्राघात ॥ पडतांमुनिमानसगहनांत ॥ तपोधैर्याचापर्वत ॥ चूर्णझालाक्षणार्धें ॥ ४४ ॥ भंगलानेमाचातडाग ॥ नकळतउडालाकौपीनकाग ॥ मेनिकाचंदनतरूचेंआंग ॥ भुजाभुजंगींवेष्टिलें ॥ ४५ ॥ चिरकाळभोगेंपावलास्मृति ॥ तपश्चर्येसिनिघालापुढती ॥ सुरकाजसाधूनिसुरयुवती ॥ जातीझालीसुर

सदना ॥ ४६ ॥ ऋषीच्याअमोघवीर्येंधरी ॥ दिव्यगर्भकन्याकारी ॥ हिमवंतगिरीच्यापाटारीं ॥ सांडूनिगेलीअप्सरा ॥ ४७ ॥ वनींएकलेंसुंदर बाळ ॥ पडिलेंदेखोनिपक्षीसकळ ॥ पक्षमंडपातळींस्नेहाळ ॥ रक्षितेझाले साक्षेपें ॥ ४८ ॥ चंचूपुटींमधुसुढाळीं ॥ मुखींवोपितीक्षुधाकाळीं ॥ श्वापदेंयेऊंनदेतीजवळी ॥ झडपोनिलावितीपरौतें ॥ ४९ ॥ अकस्माततेणेंपंथें ॥ कण्वऋषीपावलातेथें ॥ बाळरक्षिलेंशकुंतें ॥ देखोनिकरीआश्चर्य ॥ ५० ॥ उचलोनिओसंगींघेतलें ॥ गृहाआणोनिप्रतिपाळिलें ॥ ह्मणूनिपितायेणेंबोलें ॥ कथिलेंतेंम्यांयथार्थ ॥ ५१ ॥ शकुंतींरक्षिलेंवेल्हाळा ॥ यालागींनामशकुंतला ॥ हाकाळपर्यंतभूपाळा ॥ पालनकेलेंस्नेहाळें ॥ ५२ ॥ वीर्यदानेंउपजविता ॥ अन्नदानेंप्रतिपाळिता ॥ संकटींप्राणरक्षिता ॥ हेतिघेपितेबोलिजेती ॥ ५३ ॥ पुसलियाप्रश्नाचेंउत्तर ॥ तुजसांगितलेंसाचार ॥ कथाऐकूनिराजेश्वर ॥ अतिसंतुष्टमानसीं ॥ ॥ ५४ ॥ ह्मणेहेमेनिकेच्याउदरीं ॥ जन्मलीऋषीश्वरवीर्येंखरी ॥ ह्मणून हेदिव्यस्त्रीनिर्धारीं ॥ मनुष्यलोकींदुर्लभ ॥ ५५ ॥ आमच्याठायींठेवूनिभाव ॥ भार्याहोयतोउपाव ॥ केलापाहिजेह्मणोनिराव ॥ बोलताझाला साक्षेपें ॥ ५६ ॥ राजाबोलेअत्यादरें ॥ ऐकेंमद्वाक्यसाचारें ॥ भार्याहोऊनियांचतुरे ॥ मनोरथपुरवावे ॥ ५७ ॥ ऐकूनिराजमुखींचीगोष्टी ॥ सारसाक्षीपैंगोरटी ॥ वचनसुमनेंश्रवणपुटीं ॥ पूजितीझालीनृपातें ॥ ५८ ॥ धराधीशाधर्मपाळा ॥ तुझियाशुद्धयशाचळा ॥ कीर्तिशृंगरविमंडळा ॥ भेदूनिगेलेंसतेज ॥ ५९ ॥ कुकर्मकुलिशघेऊनिहातीं ॥ अमरत्वातेंछेदूं इच्छिती ॥ हाउपावमाझियेमती ॥ अयुक्तऐसादिसताहे ॥ ६० ॥ अमृतह्मणोनिहाळाहळ ॥ प्राशीत्याचेंकवणफळ ॥ बाळह्मणोनिधरिला व्याळ ॥ अनर्थवोजेरोकडा ॥ ६१ ॥ आह्मास्त्रियांचीसंगती ॥ भलीनव्हेगामेदिनीपती ॥ मातलाकामभद्रजाती ॥ विवेकांकुशेंवळवावा ॥ ॥ ६२ ॥ राजाह्मणेकनकलतिके ॥ बोलसीतितुकेंपरमनिकें ॥ परस्त्रीअभिलाषितांदुःखें ॥ भोगितीहेमानव ॥ ६३ ॥ परस्त्रीआणिपरधन ॥ अखंडवांछीजयाचेंमन ॥ तोजीतचिप्रेतासमान ॥ त्यासीसज्जननातळती ॥ ६४ ॥ तूंतंवकुमारीऋषिबाळा ॥ हातींघेऊनिसुमनमाळा ॥ घालींमजवरनृपाच्यागळां ॥ होईंअंतुरीसुजाणे ॥ ६५ ॥ अयोग्यवासतुजकाननीं ॥ राजमंदिरींगृहस्वामिणी ॥ होऊनिनानावस्त्राभरणीं ॥ देहशृं

गारींमत्संगें ॥ ६६ ॥ शकुंतलाबोलेवचन ॥ विध्युक्तनहोतांपाणिग्रहण ॥
अविचारेंघडतांसंगमन ॥ अधःपातदोघांशी ॥ ६७ ॥ नृपह्मणेचातुर्यभ
रिते ॥ विशालाक्षीलावण्यसरिते ॥ विधिआटविवाहातें ॥ ऐसेंशास्त्रेंबोल
ती ॥ ६८ ॥ अष्टविवाहामाजियेथें ॥ गांधर्वबोलिजेश्रेष्ठग्रंथें ॥ तेणेंवि
धीविवाहत्वारितें ॥ करूनिअंकींआरूढें ॥ ६९ ॥ तयावरीचंद्रानना ॥
चारुहासामृगनयना ॥ ह्मणेराजयाविचक्षणा ॥ विहितधर्मबोलसी ॥ ७० ॥
कन्यादेहतंवनिश्चिती ॥ दिधलापाहिजेपुरुषाहातीं ॥ तुजऐसाविशिष्टनृ
पती ॥ परमदैवेंपाविजे ॥ ७१ ॥ तुझियाऐसेंमाझियाचित्तीं ॥ वर्ततांहेअत्यं
तप्रीती ॥ परिवडिलांनेणतांहेरीती ॥ व्यभिचारदोषआणील ॥ ७२ ॥ या
लागिंनावेकधरींधीरू ॥ आश्रमापेईलऋषीश्वरू ॥ वचनमान्यकरूनि
अत्यादरू ॥ मजवोपील तुजहातीं ॥ ७३ ॥ नरेंद्रह्मणेवोसुजाणी ॥ विचा
रेंआपेंआपधनी ॥ आदिमध्यअवसानीं ॥ संगींआपणआपणिया ॥ ७४ ॥
यालागींआपुल्यादेहदाना ॥ समर्थकरींतूंआपल्यामना ॥ माझेनिसंगें
सर्वकामना ॥ पूर्णतुझियाहोतील ॥ ७५ ॥ ऐसेंबोलतांधरारमण ॥ शकुं
तलाहास्यवदन ॥ ह्मणेआतांऐकवचन ॥ नियमाचेंअवधारीं ॥ ७६ ॥
तुजपासोनिमाझेपोटीं ॥ पुत्रजन्मेलतोयासृष्टी ॥ राज्यधरतोतुझियापाठीं ॥
पदाधिकारीत्वांकरणें ॥ ७७ ॥ ऐशियानेमादेशिलिभाकें ॥ तरीघडणारतें
घडोसुखें ॥ हेंऐकोनिअत्यंतहरिखें ॥ राजासरकेपुढारां ॥ ७८ ॥ हस्तध
रोनिस्वहस्तकें ॥ देताझालात्रिवारभाके ॥ तुझापुत्रनिजनिष्टंकें ॥ रा
ज्यासनींयुवराजा ॥ ७९ ॥ हेंमाझेंप्रतिज्ञावचन ॥ भंगूनशकेचतुराननं ॥
तेंपरिसोनिआग्रहवचन ॥ त्यागूनिभावेंअनुसरली ॥ ८० ॥ रायेंमानि
लादिव्यलाभ ॥ परिउटावलाऋषिभयाचाक्षोभ ॥ इंद्रापराधेंगौतमक्षोभ ॥
तैसाचिघडेलयेठाईं ॥ ८१ ॥ आतांयेथूनिशीघ्रगती ॥ गमनकरणेंहेचियु
क्ती ॥ ऐसेंविचारूनिनृपती ॥ भार्येप्रतीअनुवादे ॥ ८२ ॥ ह्मणेआतांतुज
लागून ॥ मूळधाडीननगराहून ॥ छत्रचामरेंशिबिकायान ॥ दासदासीं
समवेत ॥ ८३ ॥ ऐसेंबोलोनिजाताझाला ॥ दळेंशींनगराप्रवेशला ॥ मा
गेंमुहूर्तानंतरेंआला ॥ कण्वऋषीआश्रमा ॥ ८४ ॥ पुरुषसंगेंशंकायुक्त ॥
बाहेरनयेलज्जाभरित ॥ हेंदेखोनिसर्वज्ञनाथ ॥ जाणताझालामानसीं ॥
॥ ८५ ॥ ह्मणेमाझियेनिजात्मजे ॥ बाहेरयेईंसांडूनिलज्जे ॥ कर्तव्यहोतें
तेंसहजें ॥ सिद्धीसनेलेंप्रारब्धें ॥ ८६ ॥ ऐकोनिपित्याचीअभयवाणी ॥ क

न्यायेऊनिलागेचरणीं ॥ ह्मणेम्यांवरिलाभूपाळगुणी ॥ तोत्वांमान्यकरावा ॥ ८७ ॥ कृपानुग्रहवरप्रसादें ॥ गौरवीआशीर्वचनशब्दें ॥ ऋषिबोलेपरमाल्हादें ॥ चिरंजीवतवभर्ता ॥ ८८ ॥ शचीसुरेशासारिखें ॥ दोघेंअसाअक्षय्यसुखें ॥ विष्णुशक्तिसुतांशींतुके ॥ ऐसापुत्रलाधसी ॥ ८९ ॥ असोतोचिधरूनिदिवस ॥ चढतांवाढतांमासोमास ॥ शुक्लपक्षींताराधीश ॥ वृद्धिपावेपैंजैसा ॥ ९० ॥ काळहोतांसंपूर्ण ॥ पावताझालापुण्यजनन ॥ धरामंडळींदेदीप्यमान ॥ अपरभानुपैंजैसा ॥ ९१ ॥ कुमारसुकुमारदेवगर्भ ॥ कीर्तिप्रासादींविजयस्तंभ ॥ नानासौंदर्यतरूचाकोंभ ॥ धरामंडळींउगवला ॥ ९२ ॥ क्रूरश्वापदांचेगण ॥ बळेंकरीत्यांचेंदमन ॥ यालागिंठेविलेंअभिधान ॥ सर्वदमनतयाचें ॥ ९३ ॥ होकाउत्तमाचीकुमारी ॥ बहुकाळवर्ततांमाहेरीं ॥ उद्धताहोयविहिताचारीं ॥ लोकनिंदाकरिताती ॥ ९४ ॥ शिखास्वस्थानींसाजिरी ॥ भर्तृगृहींपवित्रनारी ॥ शोभाश्लाघ्यमान्यताथोरी ॥ उभयलोकींतेपावे ॥ ९५ ॥ यालागिंकण्वह्मणेशिष्यांशी ॥ शकुंतलासुपुत्रासरशी ॥ नेऊनिनिवेदारायासी ॥ हस्तनापुरींअविलंबें ॥ ९६ ॥ ऋषिआज्ञेनेंतापसमेळा ॥ सवेंभरतआणिशकुंतळा ॥ गजपुरापातलाडोळां ॥ लोकदेखतीकौतुकें ॥ ९७ ॥ सभामंडपींअसतांनृपती ॥ मुनिवरांसहराजयुवती ॥ राजकुमारधरूनिहातीं ॥ उभीठेलीसन्मुख ॥ ९८ ॥ आशीर्वादजयजयकार ॥ करूनिबैसलाऋषींचासंभार ॥ शकुंतलाआत्मकुमार ॥ करींधरूनिहोयपुढें ॥ ९९ ॥ बलौदार्यलावण्यखाणी ॥ तनुजलाविलाजनकचरणीं ॥ ह्मणेराजयाअंकासनीं ॥ ठावदेईंबैसावया ॥ १०० ॥ बहुतादिवसपाहिलीवाट ॥ निष्ठुरनव्हेसिकींलोभिष्ट ॥ मीतवगृहस्वामिणीश्रेष्ठ ॥ गृहापातलेंआपुल्या ॥ १ ॥ सत्यप्रतिज्ञानरेंद्रोत्तमा ॥ आठवूनिआपुल्यानेमा ॥ युवराज्यींभरतनामा ॥ पुत्रआपलाअभिषेकीं ॥ २ ॥ विश्वमूनिकण्वाश्रमीं ॥ जोअर्थकथिलावाङ्नियमीं ॥ तोयाकाळींक्रियाधर्मीं ॥ करूनिदावींयथार्थ ॥ ३ ॥ ऐकूनिशकुंतलेचेंवचन ॥ केल्याकर्माचीआठवण ॥ मनेंजाणतांहीआपण ॥ जालानेणतातेकाळीं ॥ ४ ॥ ह्मणेतूंकैंचीदुष्टतापसी ॥ कोणकोठीलकोणेदेशीं ॥ कोणेठायींएकांतवासीं ॥ संगझालामीनेणें ॥ ५ ॥ माझेनिवयेंवयसमान ॥ तालस्कंधबळसंपन्न ॥ स्वल्पकाळेंहानंदन ॥ झालाकैसानवलहें ॥ ६ ॥ पाहातांसाक्षीनमिळेकांहीं ॥ मजतोअणुमात्रआठ

ॐ, म. म. द वा. पोतदार

वनाहीं ॥ आतांआलेपंथेंजाईं ॥ शीघ्रयेथूनिनिर्लज्जे ॥ ७ ॥ आतांसां
डोनिमाझीगोष्टी ॥ संबंधवार्तानवदेंओठीं ॥ स्वाश्रमाजाऊनिराहटी ॥ आ
वडेतैसीवर्तेंकां ॥८॥ ऐसेंबोलतांमेदिनीपाळा ॥ क्रोधेंसंतापलीशकुंतळा ॥
जैशीप्रळयाग्नीचीज्वाळा ॥ स्पर्शोंधांवेगगनातें ॥ ९ ॥ आरक्तताले
ऊनिनयनें ॥ अंजनक्षाळिलेंअश्रुजीवनें ॥ अधरस्फूर्तीजेंविपवनें ॥ पद्मप
त्रेंथरकती ॥ १० ॥ ह्मणेधन्यगापुरुषोत्तमा ॥ उत्तमऐसेचिराक्षितीनेमा ॥
कर्मसाक्षीअंतरात्मा ॥ तृप्तझालायावचनीं ॥ ११ ॥ यथार्थजाणतांअं
तःकरणीं ॥ अन्यथाप्रतिपादीजोवचनीं ॥ तेणेंकोणतीपापकरणी ॥ के
लीनाहींसांगपां ॥ १२ ॥ मीएकजाणतासर्वसृष्टी ॥ ऐसाअभिमानवाहसी
पोटीं ॥ सकळमूर्खांच्याशेवटीं ॥ कर्मकरिशीत्यातुल्य ॥ १३ ॥ ज्याच्या
असत्याचारकुकर्मा ॥ देखोनिप्रलपेअंतरात्मा ॥ त्यासिओपोनियांयम
धामा ॥ दंडकरवीसुबद्धा ॥१४ ॥ आतांअसत्यपर्वतातळा ॥ उभानराहें
कुंभिनीपाळा ॥ वरिपडेलवज्रशिळा ॥ परमअकीर्तिदोषाची ॥ १५ ॥ म
स्तकहोईलसहस्रभाग ॥ याबोलानह्मणेवाउग ॥ न्यायेंबोलतांउद्वेग ॥ वि
वेकियानपवेचि ॥ १६ ॥ सकळऐश्वर्यघेऊनिभेटी ॥ पद्मापातलीपायेंलो
टी ॥ तोसभाग्यकींअभाग्यसृष्टी ॥ कायह्मणिजेसांगपां ॥ १७ ॥ अचल
श्रीअरोगकाया ॥ सगुणपुत्रपवित्रजाया ॥ बहुतजन्महरिहरांच्यापायां ॥
भजतांहेंफळपाविजे ॥ १८ ॥ आतांशेवटीलयावचना ॥ साचऐकेंगान
रभूषणा ॥ मीजातसेंकश्यपारण्या ॥ कण्वाश्रमासखेद ॥ १९ ॥ याआत्म
जाआपुलिया ॥ आदरेंअंगीकारावेंराया ॥ योग्यनहोसीत्यागावया ॥ स
त्यसत्यत्रिवाचा ॥ २० ॥ ब्रह्मवीर्येंमाझेंजनन ॥ वंचूनिपितासुहृज्जन ॥
तुजवोपिलेंदेहदान ॥ त्यातेंतूंउत्तीर्णझालासी ॥ २१ ॥ ऐशींप्रियेचींपवित्र
भाषणें ॥ दुष्यंतदूषीआपुल्यावचनें ॥ ह्मणेबहुभाषणीकवणें ॥ जिंकिली
वचनेंबोलतां ॥ २२ ॥ हीनजातीच्यात्याखुणा ॥ आतांजाणवल्यामना ॥
मेनिकातेपण्यांगना ॥ धर्मनष्टावंधकी ॥ २३ ॥ जिचेउदरींतवउत्पत्ती ॥
तिचीनिवडिलीऐशीरीती ॥ ह्मणोनिखाणतैशीमाती ॥ हेंचिलोकींप्रसिद्ध ॥
॥ २४ ॥ कौशिकतोहीकामाचार ॥ उपजतांउभयवीर्यविकार ॥ गर्भत्या
गूनिअनादरें ॥ दोघेंगेलींदोपंथीं ॥ २५ ॥ गळांपडोनिविषयस्वार्था ॥ सं
बंधलाविशीमजसमर्था ॥ अविचारबुद्धिसांडोनिआतां ॥ जाईंस्थळाआ
पुल्या ॥ २६ ॥ क्षोभोनिबोलेशकुंतळा ॥ पवित्रविश्वामित्रबाळा ॥ रा

याभूमंडळपाळा ॥ तूंचिअविचारेंजल्पसी ॥ २७ ॥ मेनिकात्रिदशपंक्ति पावन ॥ लोकमस्तकींजिचेंगमन ॥ मीहीजाणतिजसमान ॥ देवतादेही दिव्यस्त्री ॥ २८ ॥ नरसिंहासांडोनीकपट ॥ मांडियेवैसवींकुमारश्रेष्ठ ॥ सत्यधर्मकरींप्रकट ॥ सर्वांवडिलांदेखतां ॥ २९ ॥ सत्यापरतानाहींधर्म ॥ सत्यतेंचिपरब्रह्म ॥ सत्यापाशींपुरुषोत्तम ॥ सर्वकाळींतिष्ठत ॥ ३० ॥ असत्यतेंचिपैंपातक ॥ असत्यतोचिमहानरक ॥ असत्याचेनिसंगेंदुःख ॥ अनंतजन्मभोगिती ॥ ३१ ॥ सत्यामृताचीकनकवाटी ॥ जोडिलीनसांडेंभूतटीं ॥ असत्यविषाचीनरोटी ॥ पवित्रहातेंनातळें ॥ ३२ ॥ तेअवसरींअशरीरवाणी ॥ गंभीरमेघाचियेध्वनी ॥ होतांसकळसभास्थानीं ॥ ऐकतीमंत्रीआचार्य ॥ ३३ ॥ रेरेदुष्यंतराजनृपती ॥ ह्मणीअवमानिशीहेसती ॥ जीक्षोभल्यासर्वजगती ॥ जाळूंसकेक्षणार्धें ॥ ३४ ॥ यालागिंपुत्रआपुला घेणें ॥ मानिनीमानेंसदनानेणें ॥ आतांप्रतारणेचींवचनें ॥ नबोलेंचिबहुसाळ ॥ ३५ ॥ ऐशीऐकतांआकाशवाणी ॥ टाळीपिटिलीसभास्थानीं ॥ जयजयकाराचियेध्वनी ॥ परमआल्हादसमस्तां ॥ ३६ ॥ राजाह्मणेवृद्धहोऐका ॥ हासर्वअर्थमजठाउका ॥ परिशंकोनियांलौकिका ॥ कृत्रिमवाक्येंबोलिलों ॥ ३७ ॥ पहिलेंचिकारितोंअंगीकारू ॥ तरीलोकभावितेअनाचारू ॥ कामबुद्धीनेंराजेश्वरू ॥ निषिद्धमार्गींराहाटला ॥ ३८ ॥ मग उठोनिलवलाहें ॥ पुत्रकडियेघेतलामोहें ॥ आवडींचुंबुनियांपाहे ॥ वारंवारवदनातें ॥ ३९ ॥ करूनिमूर्द्धाअवघ्राण ॥ आवडींदेऊनिआलिंगन ॥ युवराज्यींअभिषेचन ॥ करिताझालातात्काळीं ॥ ४० ॥ आदरेंप्रियाधरूनिहातीं ॥ नेलीअंतरगृहाप्रती ॥ आलिंगूनिह्मणेचित्तीं ॥ विषादकांहींनमानावा ॥ ४१ ॥ सत्यवाटावयासाचारें ॥ वाक्यबोलिलोंलोकाचारें ॥ तेंतूंनमानूनियांचतुरे ॥ क्षमाकरणेंमजलागीं ॥ ४२ ॥ ह्मणोनिवस्त्रेंदिव्याभरणें ॥ वोपिलींजैशींशचीरमणें ॥ राजसंपत्तिनिजठेवणें ॥ निवेदिलीतिजहातीं ॥ ४३ ॥ पदमहिषीमाजीमुख्य ॥ पावलीअनेकभोगसुख ॥ पूर्वींच्यानेमाहुनिअधिक ॥ ऐसेंआलेंप्रतीती ॥ ४४ ॥ दुष्यंतानंतरभरत ॥ वीरप्रतापीख्यातवहुत ॥ दुसराराजाब्रह्मांडांत ॥ नाहींझालापुरुषार्थी ॥ १४५ ॥

---

## वेंचे, जरासंधवधप्रकरणांतील.

### ओंव्या.

( श्रीकृष्ण धर्मास ह्मणतो ) मागधराजाआपलेप्रौढी ॥ सप्तद्वीपसमुद्रथडी ॥ जिंकोनिराजेलक्षकोडी ॥ कारागृहींसूदिले ॥ १ ॥ यादवआणिहे पांडव ॥ भिन्नकरूनिराजेसर्व ॥ वृषभप्रायनरपार्थिव ॥ एक्यादांवींबांधिले ॥ २ ॥ तोहाजरासंधजाणा ॥ बळेंदळेंनावरेकोणा ॥ हाकाळवरीकुरुनंदना ॥ म्यांउपेक्षिलेंतयातें ॥३॥ यशआयुष्यझालेंपूर्ण ॥ बाहुयुद्धेंशस्त्राविण ॥ करावेंमागधाचेंकदन ॥ इच्छामातेंउदेली ॥ ४ ॥ असोआतांशब्दरचना ॥ जाणेंअसेमागधहनना ॥ आज्ञादेईंभीमार्जुना ॥ दोघांजायामजसवें ॥ ॥ ५ ॥ जातांबळिष्ठशत्रूच्याकदना ॥ यशअपेशनेणवेकोणा ॥ परिकुशलअसोभीमसेना ॥ ऐसेंमनींकल्पिसी ॥ ६ ॥ आह्मीदोघेसाक्षिभूत ॥ भीमहस्तेंशत्रूचानिपात ॥ होईलऐसानिश्चितार्थ ॥ धर्मराजाजाणपां ॥ ७ ॥ धर्मह्मणेगापुरुषोत्तमा ॥ तुझीकृपाकवचआह्मां ॥ पांडवरक्षिताहामहिमा ॥ लोकत्रयींप्रसिद्ध ॥ ८ ॥ करावयामागधकदन ॥ सवेंनिघालेतिघेजण ॥ भीमाअंगींआवेशदारुण ॥ बाहुस्फुरणहोतसे ॥ ९ ॥ असोहेतिघेपुरुषव्याघ्र ॥ तयानगरापातलेशीघ्र ॥ तिहींभेदोनिव्यग्र ॥ द्वारमाथां वळंघले ॥ १० ॥ स्नानकरोनिश्वेतवसनीं ॥ चंदनलेपनमाळासुमनी ॥ मार्गसोडोनिराजसदनीं ॥ अमार्गेंचिप्रवेशिले ॥ ११ ॥ कुंजरवनामाजी केसरी ॥ कींगोठणींप्रवेशिजेव्याघ्रीं ॥ तैसेतिघेहोमागारीं ॥ जरासंधेंदेखिले ॥ १२ ॥ नवोलतांआशीर्वचनीं ॥ स्तंभप्रायउभेमौनी ॥ रायेंदेखोनिसन्मानी ॥ प्रत्युत्थानींगौरविले ॥ १३ ॥ कोठोनियेणेंकोठवरी ॥ इच्छाकेउतीपुढारीं ॥ मानसींअसेलतीउत्तरीं ॥ प्रकटकेलीपाहिजे ॥ १४ ॥ असोततुमचेंगुणागुण ॥ मागालतेंदेईनदान ॥ यानिश्चयेंस्वस्थमन ॥ करूनिबोलायाचकहो ॥ १५ ॥ कृष्णह्मणेऐकवचन ॥ वैरासिकरणेंनलगेयत्न ॥ दुष्टजयाचेंआचरण ॥ तोचिवैरीविष्णूचा ॥ १६ ॥ राजेधरूनिलक्षावधी ॥ बद्धकरूनिसूदलेवंदीं ॥ त्यांचाहोमकरणेंविधी ॥ करूंपाहसीसांगपां ॥ १७ ॥ आतांराजेकरींमुक्त ॥ हेंचिमागणेंआमुचेंयेथ ॥ नाहीं ह्मणसीतरीअनर्थ ॥ येचिकाळींदिसताहे ॥ १८ ॥ राजेसोडविलियाविणें ॥ आह्मांसिसहसानाहींजाणें ॥ पैजेनेंप्राणदेणेंघेणें ॥ द्यूतखेळणेंहेंयेथें ॥

॥ १९ ॥ हावनधरिशीसंग्रामीं ॥ तरीबळात्कारेंउठवूंआह्मी ॥ ऐसेंबोलतां पराक्रमी ॥ जरासंधक्षोभला ॥ २० ॥ पुसोनियांउभयनेत्र ॥ न्याहाळूनि पाहेवक्त्र ॥ ह्मणेहापांडवांचामित्र ॥ होयकींविचारें ॥ २१ ॥ जोअटींव जेठियाऐसा ॥ चढततेजमुखप्रकाशा ॥ भीमाऐसाआंगठसा ॥ माझेदृष्टी दिसतसे ॥ २२ तिसराजोकाआजानुबाहो ॥ तोद्रौपदीचातिसरानाहो ॥ जेणेंकरूनिखांडवदाहो ॥ तोषविलेंत्रिपादातें ॥ २३ ॥ जरासंधअसतां जीत ॥ नरेंद्रमोचनाचीमात ॥ करीऐसावीरश्रीकांत ॥ भुवनत्रयींअसेना ॥ २४ ॥ खद्योतमिरवेरविमंडळा ॥ मुंगीउचलीब्रह्मगोळा ॥ तेंवि तुझेंबोलणेंवरळा ॥ शक्तीहूनीअचाट ॥ २५ ॥ अवलोकूनिआपणाकडे ॥ शक्तीसारिखेंबोलिजेथोडें ॥ याचकजीविकेचियाचाडे ॥ मागूंयेतांमा गावें ॥ २६ ॥ कंसारीसंसारगजकेसरी ॥ हासोनिबोलेश्रीकृष्णशौरी ॥ पां डुकुमरहेनिर्धारीं ॥ भीमार्जुनजाणपां ॥ २७ ॥ मागांअपराधकेलेक्षमा ॥ तेकार्याकारणपुरुषाधमा ॥ लोटलीमर्यादेचीसीमा ॥ शेवटीलफळभो गिजे ॥ २८ ॥ सरलासुकृताचातंतू ॥ आयुष्यतैलाझालाअंतू ॥ मा झियेहस्तींव्यजनवातू ॥ भीमरूपेंउदेला ॥ २९ ॥ तोझडपतांसत्वर गती ॥ प्राणदीपपंचकज्योती ॥ मालवोनिपडेलक्षिती ॥ गात्रपात्रपाल थें ॥ ३० ॥ असेलवांचावयाचीआर्ती ॥ तरीकरींबंधमुक्ती ॥ मगआह्मां तुह्मांअर्थाअर्थीं ॥ वैरसंबंधअसेना ॥ ३१ ॥ करींराजयांचेंमोचन ॥ कीं उठींयुद्धानलागतांक्षण ॥ यावेगळाविचारअन्य ॥ करणेंआतांघडेना ॥ ३२ ॥ आतांबोलिलासिवचन ॥ मागालेंतेंदेईनदान ॥ नकरितांनृपांचेंमोचन ॥ ऊठवेगींसंग्रामा ॥ ३३ ॥ तिघांमाजीजोआवडे ॥ त्यासींभिडेंवाडेपोंड ॥ मागधह्मणेमृषातोंडें ॥ जल्पनाकरिशीवाजटा ॥ ३४ ॥ तूंबहुरूपेंखेळ सीसोंगें ॥ कोणतेंयुद्धजिंकिलेंआंगें ॥ वेडींबागडींभाविकेंभणंगें ॥ तुझें शूरत्वत्यांमाजी ॥ ३५ ॥ पार्थपृथेचेंसुकुमारबाळ ॥ शस्त्राभ्यासेंक्रमिला काळ ॥ मजसींअयोग्यपरीअळुमाळ ॥ भीमकांहींसादिसतसे ॥ ३६ ॥ तोहीमंदजडआळशी ॥ आहारनिद्राबहुतयासी ॥ आयुष्यपुरलेंह्मणूनिऐ शी ॥ बुद्धिउदेलीतुह्मांतें ॥ ३७ ॥ तिघांतेंहाणोनिचडकणा ॥ क्षणांतमेळवी नमरणा ॥ बळेंसर्पाचियासदना ॥ मंडूकवस्तीपातला ॥ ३८ ॥ ( कृष्ण ह्मणतो ) मंडूककिंवातिघेगरूड ॥ आतांचिहोईलहानिवाड ॥ समयप्रा प्तझालियावाड ॥ बोलघेतीमाघारे ॥ ३९ ॥ ऐसेंबोलतांचक्रपाणी ॥ उ

भेठेलेसमरांगणीं ॥ जरासंधेंराज्यासनीं ॥ अभिषेकिलेंपुत्रासी ॥ ४० ॥ सरसावूनिवीरगुंठी ॥ भीमलक्षिलादारुणदृष्टी ॥ जैसामदोन्मत्तकरटी ॥ सिंहेश्वरेंलक्षावा ॥ ४१ ॥ भीमाआंगींवीरश्रीलोटु ॥ धरितांनधरवेअतिउद्भटु ॥ अगस्तीधांवेसमुद्रघोटुं ॥ तैसातगटेपुढारां ॥ ४२ ॥दोघांनींपिटिलींपाणितळें ॥ जानुमूळेंबाहुमूळें ॥ महीताडितांपादतळें ॥ शैलमौळेंथरकती ॥ ४३ ॥ धांवोनिभीमाचीवीरगुंठी ॥ मागधेंकवळूनियांमुष्टी ॥ दक्षिणहस्तसूदलाकंठीं ॥ काळपाशासारिखा ॥ ४४ ॥ दांतचावोनिकरकराटी ॥ गुडघाताडिलाहृदयपुटीं ॥ सावधह्मणतीकृष्णकिरीटी ॥ बापाभीमाबळिष्ठा ॥ ४५ ॥ भीमेंभैरवाकारदृष्टी ॥ हृदयींहाणोनिवज्रमुष्टी ॥ सोडवोनिमगरमिठी ॥ झिंजाडोनिलोटिला ॥ ४६ ॥ तेणेंमागुतीविकळ ॥ पाडिलाजैसाविशाळताळ ॥ पुढतीउठोनिउतावेळ ॥ भीममध्यकवळिला ॥ ४७ ॥ दोन्हीकोंपरदोन्हीमुष्टी ॥ चारीआघातओपिलेपृष्ठीं ॥ मागधेंक्षोभोनिउल्हाटी ॥ हुमणीहाणिलीमस्तकीं ॥ ४८ ॥ झोंबीसोडवोनितवकें ॥ मस्तकेंमस्तकादेतीथडके ॥ सहस्रसंख्यालोटतांभडके ॥ अशुद्धाचेलोटती ॥ ४९ ॥ हस्तवोढितीतोडावया ॥ पायकवळितीमोडावया ॥ डोळेताडितीफोडावया ॥ पाडावयादशनांतें ॥ ५० ॥ कूर्परप्रहारलत्ताप्रहार ॥ मुष्टिप्रहारमस्तकप्रहार ॥ मोजोनिमारितीशतसहस्र ॥ उसणेंघेघेह्मणोनी ॥ ५१ ॥ बाहुगदाबाहुमुसळें ॥ बाहुकातियाकरवाळें ॥ बाहुमुद्गरबाहुत्रिशूळें ॥ धांवोनियांमारिती ॥ ५२ ॥ नरनारीनागरिकलोक ॥ पाहतीदोघांचेंकौतुक ॥ विमानयानींवृंदारक ॥ जयइच्छितीभीमातें ॥ ५३ ॥ निराहारनिरुदक ॥ विसांवानघेतांपळएक ॥ तेरादिवसपर्यंतदेख ॥ युद्धझालेंदोघांचें ॥ ५४ ॥ चवदावेदिवसाचेअंतीं ॥ मूर्छापावलामागधनृपती ॥ तैंसंकेतदावीहातीं ॥ पांडवातेंमाधव ॥ ५५ ॥ पायकवळोनिकरतळीं ॥ चिरोनिकरावादोन्हीफाळीं ॥ जरेनेंसांधिलातोउखळीं ॥ सांधावेगींबळिष्ठा ॥ ५६ ॥ यावेगळाउपायआन ॥ करितांमागधनपावेमरण ॥ आतांचिहोवोनिसावधान ॥ युद्धकरीलमागुती ॥ ५७ ॥ भीमेंरगडोनिदाढा ॥ मध्यभागींकर्षिलागाढा ॥ माथांवाहोनियांभवंडा ॥ चक्राकारदाविला ॥ ५८ ॥ तेथोनियांटाकीभूतळीं ॥ लातवेपीवक्षस्थळीं ॥ वज्रेंताडोनियांमौळीं ॥ शक्रजेंवीपर्वत ॥ ५९ ॥ तेंवीपाडोनिउताणा ॥ वामपायदक्षिणचरणा ॥रगडोनिसव्यपायजाणा ॥ उभयहस्तेंकवळिला ॥ ६० ॥

आंसडोनिकाळोद्रटें ॥ मध्येंउतटिलातटाटें ॥ अशुद्धनदीखळखळाटें ॥ रंगभूमिकेलोटली ॥ ६१ ॥ भीमसेनेंआपुल्याहातीं ॥ करोनिशकलेंसांडिलींक्षिती ॥ जरासंधादिधलीमुक्ती ॥ कुंतीकुमरेंयापरी ॥ ६२ ॥

---

## वेंचे, सभापर्वांतील.

### ओंव्या.

### द्रौपदीवस्त्रहरण.

दुर्योधनह्मणेगाविदुरा ॥ जावोनिबोधवींपांडवदारा ॥ आमुचीदासीआमुच्याघरा ॥ सामोपचारेंपाठवीं ॥ १ ॥ ऐकोनिविदुरचढलाकोपा ॥ कायजल्पसीपापरूपा ॥ बळेंपतंगकवळीदीपा ॥ तेंवितूतेंजालेंसे ॥ २ ॥ कैंचेंद्यूतकैंचीपैज ॥ द्रौपदीपांचासिंहांचीभाज ॥ दासीह्मणतांनवाटेलाज ॥ तुजकैसीअपवित्रा ॥ ३ ॥ अजूनितरीहोईंशाहणा ॥ करींवांचावयाचीसूचना ॥ धृतराष्ट्राचियावंशवना ॥ कांदावाग्नीलाविसी ॥ ४ ॥ ऐकोनिदुर्योधनभोवंडीनेत्र ॥ ह्मणेहापांडवांचामित्र ॥ प्रतिकामीदासीपुत्र ॥ पैंसत्वरउठविला ॥ ५ ॥ ह्मणेजाऊनिगृहाआंत ॥ सांगेंवर्तलावृत्तांत ॥ पाचारोनिआणींयेथ ॥ दासीद्रौपदीआमुची ॥ ६ ॥ सरलेंदशादेवीचेंवारें ॥ दासीआमुचीतेनिर्धारें ॥ गृहानेवोनिबळात्कारें ॥ दासीकामींयोजावी ॥ ॥ ७ ॥ येरूप्रवेशोनिसदनीं ॥ ह्मणेपरिसेंहोयाज्ञसेनी ॥ धर्मेंडावखेळतांपणीं ॥ तुजस्वामिणीहारविलें ॥ ८ ॥ पडिलादुष्टासींसंबंधू ॥ नचलेकोण्हाचाहीशब्दु ॥ त्दृदयींचासांडोनिविषादु ॥ सभेसीआलेंपाहिजे ॥ ९ ॥ प्रलयवीजतडकेशिरीं ॥ कींडोंगरकोसळेअंगावरी ॥ तैसीऐकोनिघाबरी ॥ पांडवपत्नीतेकाळीं ॥ १० ॥ ह्मणेऐकेंसारथीपुत्रा ॥ रजस्वलामीएकवस्त्रा ॥ सभानायकांपवित्रां ॥ भीष्मद्रोणांजाणवीं ॥ ११ ॥ सभेसीनेणेंहेंअनुचित ॥ म्यांहीयेऊंनयेतेथ ॥ वडीलसुत्दृदसर्वआप्त ॥ असतांऐसेंहोऊंनये ॥ १२ ॥ आणीकएकअसेभावो ॥ आधींजितोनिधर्मरावो ॥ मगटाकिलामाझाडावो ॥ तोप्रमाणदिसेना ॥ १३ ॥ पांचाजणांचीमीजाया ॥ पांचहीजणहरविलिया ॥ तरीसंबंधवोलणेंवायां ॥ पतिव्रताह्मणउनी ॥ १४ ॥ प्रतिकामीआलासभास्थानीं ॥ बोलेद्रौपदीस्त्रीधर्मिणी ॥ सभेसीबोलावितांवाणी ॥ मुखांतूननकाढावी ॥ १५ ॥ एकवस्त्रापद्मनेत्री ॥ कैंविबोलाऊंराजपुत्री ॥ विचारूनिमजपवित्रीं ॥ आज्ञादिधलीपाहिजे ॥

॥ १६ ॥ दुर्योधनह्मणेहानपुंसकू ॥ वाहेपांडवांचाधाकू ॥ नधरीतमोगु
णाचातवकू ॥ दुःशासनाउठविलें ॥ १७ ॥ ह्मणेजाऊनिनिर्भयचित्तें ॥
द्रौपदीपाचारावीयेथें ॥ नयेह्मणेलतरीत्वांतेथें ॥ स्त्रीमर्यादानधरावी ॥ १८ ॥
केशकवळोनियांमुष्टी ॥ ओढूनिआणावीतेगोरटी ॥ तिचियेसतीपणाची
राहाटी ॥ दाखऊंदृष्टीजनातें ॥ १९ ॥ मागीलपातिव्रतानारी ॥ त्याह्मणे
आपुल्याकिंकरी ॥ आणिआपणपावेतिचीसरी ॥ ऐसागर्वतियेतें ॥ २० ॥
शरीरओढवीपांचांजणां ॥ ह्मणवीपवित्रकुळांगना ॥ आजिदाखऊंलोक
नयना ॥ वर्तणूकतियेची ॥ २१ ॥ ग्रहणींराहूखवळेगगनीं ॥ कींव्याघ्र
चेतवेपशुगोठणीं ॥ तैसाप्रवेशलासदनीं ॥ दुःशासनदुरात्मा ॥ २२ ॥ हो
मशाळेमाजीलअन्न ॥ स्पर्शावयाधांवेश्वान ॥ तैसाउद्युक्तदुःशासन ॥
पांडवपत्नीआणावया ॥ २३ ॥ देखोनिमदाचाआवेशु ॥ द्रौपदीभावीका
ळपुरुषु ॥ शक्तिआंगाझगटेमहिषु ॥ तेंविउभाजवळिकें ॥ २४ ॥ ह्मणेव
हिनीजीसुकृतमहिमा ॥ तुमचेंऐश्वर्यलाधलेंआह्मां ॥ पवित्रजालीसतूं
दासीधर्मा ॥ पांडवांपाठींबैसलिया ॥ २५ ॥ धर्मेंहारविलाडावो ॥ तुला
पाचारीकौरवरावो ॥ सांडूनिसंशयाचाभावो ॥ शीघ्रउठिलेंपाहिजे ॥ २६ ॥
द्रौपदीह्मणेदुःशासना ॥ मीपतिव्रतापांडवांगना ॥ स्त्रीधर्मिणीएकवसना ॥
कैंविमातेंपाचारितां ॥ २७ ॥ तुह्मीराजेपवित्रगुणी ॥ मानाभिमानाचेध
नी ॥ आनकरितांदुष्टकरणी ॥ तुह्मींवर्जिलेंपाहिजे ॥ २८ ॥ ज्येष्ठबंधूची
अंतुरी ॥ तुह्मांसमान्यसर्वोपरी ॥ स्नेहेंगांधारीचियेसरी ॥ मानदीधला
पाहिजे ॥ २९ ॥ निर्दयह्मणेवोवाचाळे ॥ उठींसत्वरसांडींचाळे ॥ टाको
निआलेंजेंकपाळें ॥ भोगिल्यावीणसुटेना ॥ ३० ॥ रजस्वलाहोकींशुचि
ष्मंता ॥ एकवस्त्राहोकींवस्त्ररहिता ॥ सभेसीनेलियावीणसर्वथा ॥ मीत
त्वतांराहेंना ॥ ३१ ॥ हरणीसांडोनियांफांसा ॥ जाऊंपाहेदूरदेशा ॥ तें
विद्रौपदीराणीवसा ॥ प्राणधाकेंसंचरे ॥ ३२ ॥ वृद्धस्त्रियांचियेदाटी ॥
भयेंप्रवेशेतेगोरटी ॥ तंवलगबगधांवेपाठी ॥ दुष्टकपटीदुरात्मा ॥ ३३ ॥ हा
तघालोनियांकुरळीं ॥ आंसडूनिपाडिलीभूतळीं ॥ जैसीउलथेकर्पूरकद
ळी ॥ मत्तकरीओढितां ॥ ३४ ॥ हाकमारितांयाज्ञसेनी ॥ कांपेथरथरां
धरणी ॥ खचोनिपडोंपाहेतरणी ॥ चंद्रशकलेंभूतळीं ॥ ३५ ॥ आंदोळ
लागिरिकैलासु ॥ ढळलावैकुंठींचाकळसु ॥ देवांगनामानूनित्रासु ॥ शो
ककरितीआक्रोशें ॥ ३६ ॥ उमारमारेणुकासती ॥ लोपामुद्राअरुंधती ॥

क्षोभोनिउदकघेतीहातीं ॥ शापमुखेंवदावया ॥ ३७ ॥ शंकरनयनींचाप्र
ळयाग्नी ॥ उसळोनिसर्वोपाहेधरणी ॥ कौरवकुळाचियेकाननीं ॥ बीज
निर्मूळकरावया ॥ ३८ ॥ कपिलादीकसिद्धऋषीश ॥ त्यांनानावरेअद्भुत
रोष ॥ ह्मणतीक्षमाकरीलईश ॥ परीआमुतेंनकरवे ॥ ३९ ॥ तयांशांतवी
पद्मयोनी ॥ पांडवांरक्षकचक्रपाणी ॥ तुह्मीक्षमाधरूनिनयनीं ॥ कृष्ण
कौतुकविलोका ॥ ४० ॥ व्याघ्रेंधरोनियांगाये ॥ थारियाप्रतिघेवोनिजा
ये ॥ तेंवित्याआणिलीपापियें ॥ राजसभेद्रौपदी ॥ ४१ ॥ रुदनाकरीतअ
धोमुखें ॥ भूमीसिंपीतनेत्रोदकें ॥ संतमहंतपाहतांदुःखें ॥ नेत्रकमळेंझां
किती ॥ ४२ ॥ खेदपक्षियातरुवरा ॥ बैसकाभंगिल्यागिरिवरा ॥ रक्तोद
काच्यासागरा ॥ लोटआलाअद्भुत ॥ ४३ ॥ सभेआणितांयाज्ञसेनी ॥ अ
श्रुपातसकळांनयनीं ॥ शकुनीदुर्योधनामनीं ॥ परमानंदनसांठे ॥ ४४ ॥
परस्परेंपिटोनिटाळी ॥ हास्यकरितीगदारोळी ॥ ह्मणतीपहाहोपांचाळी ॥
रूपलक्षणेंनेटकी ॥ ४५ ॥ गौरजानुकटिमंडळ ॥ उदरींत्रिवळीकुचवर्तुळ ॥
नयनघ्राणअधरप्रवाळ ॥ सुकोमळसाजिरे ॥ ४६ ॥ कर्णह्मणेहोद्रौपदी ॥
तुटलीसधर्माचेसंबंधीं ॥ दुर्योधनाचेराज्यपदीं ॥ तूंस्वामिणीसर्वस्वें ॥ ४७ ॥
पट्टामाजिमुख्यराणी ॥ होवोनिआरूढेंअंकासनीं ॥ भोगभोगींहेमसदनीं ॥
शक्ररमणीसारिखे ॥ ४८ ॥ हेऐकतांपापवाणी ॥ पवित्रबोटेंघालतीकानीं
ह्मणतीयातेंप्राणहानी ॥ निकटआलीदिसतसे ॥ ४९ ॥ क्षोभोनियांपद्मन
यना ॥ क्रोधदृष्टीभीमार्जुना ॥ अवलोकितांभीमसेना ॥ हृदयस्फोटहो
तसे ॥ ५० ॥ रगडोनियांअधरदांत ॥ गदामुष्टीघातलाहात ॥ ह्मणेपापी
समस्त ॥ निर्दाळीनयेकाळीं ॥ ५१ ॥ असंख्यकुंजरांच्याथाटी ॥ एक
लासिंहअंगेंनिवटी ॥ कींअजादिकांचियाकोटी ॥ व्याघ्रएकलाविभां
डी ॥ ५२ ॥ तेंविकौरवांचियाश्रेणी ॥ निर्दाळीनएकेचिक्षणीं ॥ जेंविप्र
ळयींशूळपाणी ॥ नाशकरीविश्वातें ॥ ५३ ॥ उचलोनिगदापाणी ॥ उ
सळोंपाहेयुद्धकदनीं ॥ हेंदेखोनिआज्ञावचनीं ॥ धर्मवारीभीमातें ॥ ५४ ॥
ह्मणेक्रोधनावरेतुझियाचित्ता ॥ तरीगदावोपींमाझियामाथां ॥ परीअसत्यदोषकुं
तीसुता ॥ स्पर्शेऐसेंनकरावें ॥ ५५ ॥ सत्यरक्षावयारामें ॥ अरण्यसेविलें
पुरुषोत्तमें ॥ पिताप्राणगेलियासीमे ॥ नुल्लंघीचमर्यादा ॥ ५६ ॥ *कपो
तशरणागतपातलें ॥ +शिबीनेंनिजमांसखंडिलें ॥ दधीचीऋषीनेंदीधलें ॥

* पारवा ( एक पारवा शिबिराजास शरण गेला होता. ) + विशेषनाम.

देहदानद्विजातें ॥ ५७ ॥ लटिकेंसाचकरोनिस्वप्न ॥ राज्यब्राह्मणादिधलें
दान ॥ तयाहरिश्चंद्राचेंकथन ॥ ग्रंथकर्तेबोलती ॥ ५८ ॥ पार्वतीचेनि
प्राणनाथें ॥ सत्वेंछळितांश्रियाळातें ॥ पुत्रवधोनिआपुल्याहातें ॥ मांसदी
धलेंभोजना ॥ ५९ ॥ तैसेंयेथेंअवघडकाइ ॥ विचारींपांआपुल्येत्हृदइं ॥
सत्वनिष्ठातेंअपाइं ॥ ईश्वरनघालीसर्वथा ॥ ६० ॥ द्यूतींहारविलापण ॥
तेथेंयाचाअन्यायकवण ॥ धर्मवंतींनेमवचन ॥ कीर्तीलागींरक्षावें ॥ ६१ ॥
बापशांतीक्षमेचासिंधू ॥ विचारेंवारिलेदोघेबंधू साधूह्मणतीसाधुसाधु ॥
यामुकुंदूनुपेक्षी ॥ ६२ ॥ नावरेक्रोधासिंधूचालोट ॥ नधरवेआवेशउद्भट ॥
ह्मणेसहदेवाहव्यवाट ॥ प्रदीप्तकरींयेकाळीं ॥ ६३ ॥ छेदूनिधर्माचेद्वयह
स्त ॥ भस्मकरीनअग्नीआंत ॥ वर्जितांखेळोनिद्यूत ॥ महाव्यसनींपाडिलें
॥ ६४ ॥ राज्यहानीऐश्वर्यहानी ॥ हाखेदनाहींमाझियामनीं ॥ परीद्रौप
दीचेअवलोकनीं ॥ त्हृदयझालेंदुखंड ॥ ६५ ॥ गदाउचलितांभद्रजाती ॥
धरिलाधनंजयेंहातीं ॥ ह्मणेभीमाअधर्मपंथीं ॥ चळोंनेदींमानस ॥ ६६ ॥
गुरुस्वामीवडीलबंधू ॥ पवित्रधार्मिकसत्यसिंधू ॥ येणेंनेमागोंविलाशब्दु ॥
तोचप्रमाणआमुतें ॥ ६७ ॥ लाधलासीवळाचीप्रौढी ॥ त्याचीकायहेचि
जोडी ॥ जेधर्मासीमारूनिब्रह्मांडीं ॥ अपकीर्तीशब्दउरवणें ॥ ६८ ॥ स
त्यसन्मार्गींवर्ततांनर ॥ त्याचाकैवारीजगदीश्वर ॥ त्याचेंकार्यसारंगधर ॥
आपणआंगेंसंपादी ॥ ६९ ॥ स्वप्नप्रायसंसारक्षणिक ॥ लटिकेंसर्वसाधन
ऐक ॥ सत्यस्वधर्मसाद्विवेक ॥ साधोनिजातीजाणते ॥ ७० ॥ ऐसेंअर्जुन
अनुवादोन ॥ विझविलासंतापहुताशन ॥ क्षमाधरोनिभीमसेन ॥ स्वस्था
नींवैसाविला ॥ ७१ ॥ यालागींवरुनीशांतीभाज ॥ मौनधरोनिपाहेंचोज ॥
तुंवाकरावेंतेंकाज ॥ ईश्वरकरीलनिर्धारें ॥ ७२ ॥ केशकवळूनिदुःशास
नें ॥ झोंकेमारितांवळसत्राणें ॥ द्रौपदीह्मणेव्यथाप्राणें ॥ सोसवेंनासर्वथा
॥ ७३ ॥ रजस्वलाहोएकांवरा ॥ ढळतांवक्षस्थळींचियापदरा ॥ पाणीत
ळेंपयोधरा ॥ आच्छादोनिआक्रंदे ॥ ७४ ॥ राजसूययज्ञाच्याशेवटीं ॥
अवभृतस्नानेंजेवीरगुंठी ॥सिंचलीतेहोपापमुष्टी ॥ दुःशासनेंधरिलीसे॥७५॥
झोंटीधरोनिहस्तकें ॥ दुःशासनआंसुडीतवकें ॥ कृष्णाप्रलापेनिदुःखें ॥
भीष्मद्रोणांविलोकी ॥ ७६ ॥ ह्मणेपांचाचियेवचनीं ॥ पुरुषवरितीपाणि
ग्रहणीं ॥ तेंवितुह्मांवडिलांचियेवचनीं ॥ अंगीकारीनमीयातें ॥ ७७ ॥
परीयाचियेप्रबळपीडे ॥ साहोंनशकेंमीसभेपुढें ॥ यालागींसाधूहोबोला

तोंडें ॥ दासीमीहोययथार्थ ॥ ७८ ॥ देवब्राह्मणवेदवन्ही ॥ साक्षीकरोनि
पिताजननी ॥ कन्यावोपितीपाणिग्रहणीं ॥ वरहस्तींस्वधर्मे ॥ ७९ ॥ तें
विसत्यस्मरोनिवचनें ॥ मजाजींतिलेंदुर्योधनें ॥ ऐसींतुह्मीवदावचनें ॥ पु
ढेंहोणारहोतसे ॥ ८० ॥ साक्षीकरोनिल्हृदयवासी ॥ पंचभूतेंपवित्रऋषी ॥
यांतेंयथार्थमानेऐसी ॥ आज्ञावदावडीलहो ॥ ८१ ॥ भीष्मह्मणेज्ञानसरितें॥
धर्माचेंतत्वनकळेमातें ॥ ह्मणोनियांमौनयेथें ॥ पडलेंसभेदेखतां ॥ ८२ ॥
त्रैलोक्यराज्यअथवाप्राण ॥ गेलियाधर्ममानीतृण ॥ परीसांडीलसत्यव
चन ॥ हेंसर्वथाघडेना ॥ ८३ ॥ हाआपुलेनिमुखेंह्मणे ॥ मजजिंतिलेंदुर्यो
धनें ॥ तेथेंआह्मींवदावींवचनें ॥ बोलोंकोण्हीनशकती ॥ ८४ ॥ द्रोण
ह्मणेहोशुभकल्याणी ॥ देहसांडिलापंचप्राणीं ॥ तेथेंजैसीनफुटेवाणी ॥
तेंविमीयेथेंजाणपां ॥ ८५ ॥ हंऐकोनिवीरविकर्ण ॥ गर्जोनिबोलेकोपा
यमान ॥ शंकासांडोनिसत्यवचन ॥ बोलूंकोण्हीनशकती ॥ ८६ ॥ आ
ज्ञादेतांह्मोनेदितां ॥ मीएकबोलेंतुमच्याहिता ॥ कोपमानितीतेस्वार्था ॥
पुण्यपरमार्थानागवती ॥ ८७ ॥ द्यूतेंद्रौपदीजिंतिली ॥ हेसर्वथाअसत्य
बोली ॥ ईश्वरानमानेतेवर्तली ॥ कर्णानिवचेउत्तमा ॥ ८८ ॥ हेनिश्चयें
अन्यायसभा ॥ मुकलीआपपरउभयलाभा ॥ ईश्वरपाहोनियांक्षोभा ॥
बळेंअन्यायकरवीतु ॥ ८९ ॥ धृतराष्ट्रसत्वासांडावला ॥ पुत्रलोभेंभ्रमेंभु
लला ॥ भीष्महीस्वधर्माभ्रंशला ॥ सत्यसाचारनबोले ॥ ९० ॥ त्रिवा
चाबोलेगर्जोनिहाके ॥ द्रौपदीजिंतिलीहेंलटिकें ॥ जिंतिलीह्मणतीलतयां
पातकें ॥ लिप्तहोतीनिर्द्धारीं ॥ ९१ ॥ अनंतयुगींअनंतराजे ॥ घालूनि
कुळस्त्रीचेंपैजे ॥ द्यूतखेळोनिकवणवोजे ॥ क्षेमकल्याणपावले ॥ ९२ ॥
ध्यावयासमस्तांचेप्राण ॥ द्यूतखेळोनिदुर्योधन ॥ शकुनीरूपेंहुताशन ॥
धृतराष्ट्रगेहालाविला ॥ ९३ ॥ नाहींद्रौपदीसींसंबंधु ॥ कुळक्षयबोलतां
शब्दु ॥ स्पर्शतांहोयअप्रमादु ॥ तोकोणतानेणवे ॥ ९४॥ ऐकोनिविक
र्णाचीवाणी ॥ गर्जिन्नल्यासंतश्रेणी ॥ ह्मणतीधन्यधन्यरेजननी ॥ तुज
एकाप्रसवली ॥ ९५ ॥ जयजयकारकेलासुरीं ॥ पुष्पांजळीवोपिल्याशि
रीं ॥ माथेतुकाविलेऋषीश्वरीं ॥ भलारेभलाह्मणउनी ॥ ९६ ॥ न्यायेंबोल
तांविकर्ण ॥ अत्यंतकोपाचढलाकर्ण ॥ दक्षिणहस्तउभारून ॥ क्रोधदृष्टी
विलोकी ॥ ९७ ॥ सकळांदेखतांसभास्थानीं ॥ हारविलीयाज्ञसेनी ॥ स
कळऐश्वर्यजिंतिलेंपणीं ॥ धर्मन्यायेंसौबळें ॥ ९८ ॥ तोहासर्वकरोनिवि

फळ ॥ ह्मणेहेअसत्यवादीसकळ ॥ आणीकबोलतातरीतात्काळ ॥ दंड पावतामजहस्तीं ॥ ९९ ॥ पुरुषह्मणतीहेहारविली ॥ द्रौपदीसहजेंदासी जाली ॥ तेअसत्यकरोनियांबोली ॥ न्यायसांगेआमुतें ॥ १०० ॥ बळें वडिलातेंमूर्खह्मणत ॥ हाचिमर्यादाभंगयांत ॥ दासीआणितांसभेआंत ॥ दोषकांहींअसेना ॥ १ ॥ एकपुरुषपवित्रगृहिणी ॥ दोघांस्पर्शेजारिणी ॥ तिघींगुह्यदेखतांनयनीं ॥ पण्यांगनाबोलिजे ॥ २ ॥ नित्यअनुभविती पांचपुरुष ॥ नग्नकरितांनाहींदोष ॥ हरापांडवांचेंवास ॥ पाठीनग्नहेक रा ॥ ३ ॥ ऐसींऐकतांवचनें ॥ पांचहीजणींसांडिलींवसनें ॥ वेढोनियां वल्कलाजिनें ॥ सभांगणींबैसले ॥ ४ ॥ कर्दळीस्तंभप्रायसुकुमार ॥ जानूविशाळसरळगौर ॥ देखोनिदुर्योधनकामातुर ॥ पांचाळीतेंदावितु ॥ ॥ ५ ॥ पापबुद्धीदुर्योधनु ॥ उघडीकरोनिदाखवीजानु ॥ गदाउचलोनि भीमसेनु ॥ हस्ततुळनादावितु ॥ ६ ॥ हेचिजानुरणचत्वरीं ॥ चूर्ण करितांगदाप्रहारीं ॥ जैसाक्षोभोनिवज्रधारी ॥ शृंगभंगीशैलाचें ॥ ७ ॥ हें देखोनिदुराचारी ॥ ह्मणेद्रुपदाचियेकुमरी ॥ येऊनिबैसेंमांडियेवरी ॥ हो यअंतुरीपाटाची ॥ ८ ॥ पापशब्दपडतांश्रवणीं ॥ ह्रदयींधडकलाक्रोधाग्नी ॥ ह्मणेरेदुरात्मयावाणी ॥ जळोतुझीपापिष्ठा ॥ ९ ॥ प्रळयवीजमाथांप डो ॥ दृष्टीफुटोहेजिव्हाझडो ॥ कायापासूनिप्राणविघडो ॥ तात्काळिक पैंतुझा ॥ १० ॥ भीमाकरींमिरवली ॥ गदानोवरीसगुणाथिली ॥ वाग् निश्चयेंतुजनेमिली ॥ गोत्रघटीतींनिर्धारें ॥ ११ ॥ बहुलेंनेमिलेंरणतळवट ॥ आयुष्यअवधीचाअंत्रपाट ॥ हातेंसारोनिबळीवरिष्ठ ॥ लग्नलावीलस्वहस्तें ॥ १२ ॥ रक्तहरिद्रातनुलेपनी ॥ माथांअक्षतापायापिटणी ॥ स्त्रियाप्रलाप वाद्यध्वनी ॥ सुखसोहळाभोगिसी ॥ १३ ॥ तेगदाघेऊनिमांडीवरी ॥ र णमंचकींनिद्राकरीं ॥ प्राणपारिखेदवडोनिदुरी ॥ मगएकांतींपहुडेंकां ॥ ॥ १४ ॥ पुढतीजागानहोसिकदा ॥ ऐकोनिशापोक्तिनिंदानुवादा ॥ दु र्योधनचढलाक्रोधा ॥ काळखवळेज्यापरी ॥ १५ ॥ ह्मणेजिव्हाछेदाशस्त्रें ॥ खंडविखंडकरागात्रें ॥ नग्नकराहिरावस्त्रें ॥ पांचापुरुषांदेखतां ॥ १६ ॥ दुःशासनाप्रेरीवचनीं ॥ कौतुककायपाहसीनयनीं ॥ वस्त्रेंहिरोनियाज्ञ सेनी ॥ नग्नदावींसभेतें ॥ १७ ॥ वामहस्ततोवेणीये ॥ सव्यसूदलावस्त्रनि रिये ॥ इतुक्यामाजीद्वारावतीये ॥ मनोदूतधांवंडिला ॥ १८ ॥ जालीस वांचीनिराशा ॥ सांडिलीआप्तवर्गांचीआशा ॥ ह्मणेसोडवींपांद्वारकाधी

शा ॥ कृष्णपरेशामजएकु ॥ १९ ॥ लावोनियांनेत्रपातीं ॥ हृदईंचिं
तिलीकृष्णमूर्ती ॥ ह्मणेधांवधांवगाश्रीपती ॥ येआकांतींस्वामिया ॥
॥ २० ॥ पडतींबहुतांचींकारणें ॥ करिसीबहुतांचेंधांवणें ॥ सर्वसांडोनि
मजकारणें ॥ येआकांतींपावेंका ॥ २१ ॥ कृष्णामीतुझीकुमरी ॥ यथा
र्थजन्मलेंतुझियेउदरीं ॥ स्नेहेंसुभद्रेचियेपरी ॥ मानदीधलापाहिजे ॥ २२॥
परीमजएवढेंभाग्यकैंचें ॥मीदासीकिंकरीसाचें ॥ पादुकेतळीलमृत्तिकेचें ॥
रजलाभेलजरीह्मणे ॥ २३ ॥ तेंहीदुर्लभसनकादिकां ॥ तेथेंमीकितीयदु
नायका ॥ मस्तकओढवीपादोदका ॥ शंकरआपणनिजांगें ॥ २४ ॥ प
क्षियातेंतुझेंनाम ॥ ठेवोनिकुंटिणीस्मरेराम ॥ तियेलागींवैकुंठधाम ॥ व
स्तीसीतुंवादीधलें ॥ २५ ॥ पायस्पर्शूनिमुरारी ॥ शिळाकेलीदिव्यनारी ॥
तियेअहिल्येचेसरी ॥ मजउद्धरींश्रीकृष्णा ॥ २६ ॥ सहस्रव्याघ्रामाजी
गाय ॥ सांपडतांजेंवीबोभाय ॥ तेंवितूतेंम्यांमोकलिलीधाय ॥ कृष्णा
धांवह्मणउनी ॥ २७ ॥ हरिसीबहुतांचींसंकटें ॥ खंडिसीदासांचींदुर्घटें ॥
तोपुरुषार्थआजिचकोठें ॥ आच्छादिलासांगपां ॥ २८ ॥ सर्वव्यापकतूं
अनंत ॥ जाणसीजिवाचेंमनोगत ॥ नकळेमाझावृत्तांत ॥ हेंकांअज्ञानतुज
आलें ॥ २९ ॥ कृष्णातूंजनकजननी॥वित्तगोतचक्रपाणी॥तुजवेगळेंनदिसे
कोण्ही ॥ मजनिर्वाणींसोइरें ॥३०॥ तूंचिमाझीकुळस्वामिणी ॥ मानसतुळजा
पूरवासिनी ॥ कौरवमहिषासुरमर्दिनी ॥ पावेंपावेंधांवणीये ॥ ३१ ॥ मा
झेंमानससरोवर ॥ प्रेमकल्हारींसुमनोहर ॥ राजहंसरुक्मिणीवर ॥ सदा
स्वानंदेंक्रीडसी ॥ ४९ ॥ आजिगेलासीकवणियाठायां ॥ मुक्तमुक्ताफळें
चरावया ॥ गेलासिह्मणउनीमाया ॥ माझीत्वांसांडिली ॥ ५० ॥ वृंदाव
नींचेविहारिणी ॥ कृष्णेसखियेसांगातिणी ॥ धांवपावमायबहिणी ॥ वे
ळनलावींस्नेहाळे ॥ ५१ ॥ सगुणउपासकाचेपुजे ॥ कींयोगियाचेसमा
धींसेजे ॥ विश्रामलीसह्मणूनमाझें ॥ स्मरणतुतेंनकळेचि ॥ ५२ ॥ माते
सीदाटलानिद्राभर ॥ बाळककरीपालकींसोर ॥ जीवआकांतलाथोर ॥
तरीउमजपडेना ॥ ५३ ॥ तेंविधांवाकरितांतुझा॥ कंठशोषलाअधोक्षजा ॥
हृदयस्फोटजालामाझा ॥ तुजबोभातांआकांतीं ॥ ५४ ॥ तरीजागीनव्हे
सीचमाये ॥ सांगेंआतांकरूंकाये ॥ प्राणधाडूंद्वारावतीये ॥ प्रेतओपूंपा
पिया ॥ ५५ ॥ तुझेंव्यापकत्वकायजालें ॥ माझेंहृदयकांसांडिलें ॥ एवढें

निर्वाणकांमांडिलें ॥ अहोकृष्णेजननीये ॥ ५६ ॥ सर्वीसर्वत्रतुझेकान ॥ सर्वदेखणेतुझेनयन ॥ माझेंनायकसीवचन ॥ एवढेंव्यसननदेखसी ॥५७॥ कृष्णेतूंस्नेहाळमाउली ॥ तूंचिकृपेचीसाउली ॥ तुंवाउपेक्षाहीकेली ॥ तरीमगजिणेंकायसें ॥ ५८ ॥ ह्मणेअपराधपापबहुत ॥ तेणेंतूंजालासिद यारहित ॥ तरीतुझेंचिनामएकपवित्र ॥ पर्वतजाळीपापाचे ॥ ५९ ॥ रेखू निसहस्रनामाचेंस्तोत्र ॥ जिव्हाकेलीपुस्तकपात्र ॥ यालागींमजतुल्यप वित्र ॥ भुवनत्रयींअसेना ॥ ६० ॥ नामघेतांतुझीमूर्ती ॥ उभीठाकेस्मर तयाप्रती ॥ तुझीब्रीदावळीश्रीपती ॥ गळोनिपडलीकेउती ॥ ६१ ॥ वस्त्रें हिरोनिअवकळा ॥ येथेंझालियागोपाळा ॥ तुझेपाययाचिडोळां ॥ क वण्यामुखेंअवलोकूं ॥ ६२ ॥ ऐसाद्रौपदीमुखयंत्रींचा ॥ यंत्रगोळउसळ लासाचा ॥ करुणातेजेंसुतेजाचा ॥ बाळभानुज्यापरी ॥ ६३ ॥ तोझगटो निकृष्णश्रवणीं ॥ आदळलाहृदयभुवनीं ॥ तेणेंसुखनिद्रेच्यासदनीं ॥ जागरानळूझळकला ॥ ६४ ॥ कींतेसुशब्दराजहंसी ॥ उड्डाणकरोनिचिदा काशीं ॥ रिघोनिकृष्णाचेमानसीं ॥ निद्रामृतडहुळलें ॥ ८० ॥ कींद्रौप दीमुखींचाबाण ॥ करुणातेजेंअतीतीक्ष्ण ॥ कृष्णश्रवणींरिघूनिपूर्ण ॥ हृ दयवर्मीखडतरला ॥ ८१ ॥ जागृतहोतांजनार्दन ॥ आंखुडिलादक्षिणच रण ॥ रुक्मिणीह्मणेहेंनिधान ॥ कांहातिचेंनिष्टलें ॥ ८२ ॥ मुखावरूनि पीतांबर ॥ काढोनिउठलाजगदीश्वर ॥ पाठीमोकळेंकबरीभार ॥ दिव्य कुसुमेंसांडती ॥ ८३ ॥ पुसिलाकस्तूरीमळवट ॥ कौस्तुभमाळासांवरीनी ट ॥ गंहिवरेंदाटलादिसेकंठ ॥ दीनदयाळह्मणउनी ॥ ८४ ॥ विश्वअव लोकीसर्वदेखणा ॥ तंवगांजितांदेखेपांडवांगना ॥ दुःशासनझोंबेवसना ॥ निरीहातेंआंसुडीत ॥ ८५ ॥ बापभक्तीचीआवडीमोठी ॥ लगबगांधांविं नलाजगजेठी ॥ मंदटह्मणोनिपरतालोटी ॥ गरुडाआणीमनातें ॥ ८६ ॥ मनपवनगरुडतिघे ॥ सत्वरकरितीपाठिलाग ॥ तरीनातुडेचिश्रीरंग ॥ टा कोटाकीजातसे ॥८७॥ ऐसियातांतडीधांविंनला ॥ द्रौपदीमागेंउभाठेला ॥ नातोहृदयींचाप्रगटला ॥ पाठिराखाकैंवारी ॥ ८८ ॥ कैवारियाच्याउभ यकरीं ॥ पीतांबरटाकिलाद्रौपदीवरी ॥ विजूतळपेतैसियापरी ॥ सभेवरी उजेड ॥ ९७ ॥ तोसुवासनसांठवेगगनीं ॥ आल्हादिलीयाज्ञसेनी ॥ ह्मणे मजपावलाचक्रपाणी ॥ आतांनभियेंकळिकाळा ॥ ९८ ॥ पीतांबरदेखो निदिठी ॥ धर्माजाणवलेंपोटीं ॥ अनुजाखूणदाखवीबोटीं ॥ ह्मणेजगजे

ठीपावला ॥ ९९ ॥ विदुरेंदेखिलेंकृष्णवसन ॥ अश्रुधारास्रवतीनयन ॥ अष्टभावींदाटलापूर्ण ॥ मननिमग्नश्रीकृष्णीं ॥२००॥ भीष्मबोधलाहृदय कमळीं ॥ ह्मणेईसपावलावनमाळी ॥ आजिहोतीलतोंडेंकाळीं ॥ कौरवां चींनिर्द्धारें ॥ १ ॥ तंवदुर्योधनआलाक्रोधा ॥ ह्मणेरेदुःशासनामंदा ॥ अजुनीदुष्टापापप्रमदा ॥ नग्नहातेंनकरिसी ॥ २ ॥ तेणेंआंसुडिलेंवसन ॥ तंवआंतदेखेकनकवर्ण ॥ तळींआच्छादूनिचरण ॥ भाळमस्तकझांकिलें ॥ ३ ॥ ह्मणतीनकळेस्त्रीचरित्र ॥ नेसलीवस्त्राआडवस्त्र ॥ तेंहीफेडींरेविचित्र ॥ कितीनिघतीपाहोंपां ॥ ४ ॥ रागेंफेडिलेंतेंअंशुक ॥ तंवमाझारीं देखेक्षीरोदक ॥ तेंहीओढितांतवकें ॥ जासवनीत्यातळीं ॥ ५ ॥ तेंही आंसुडितांवेगीं ॥ देखेदाडिंबीकुसुमरंगी ॥ तयाआडूनिझगमगी ॥ शुद्ध जरतारीपाटाऊ ॥ ६ ॥ तेंहीफेडितांअपवित्र ॥ तंवमाझारींदेखेश्वेततगटी वस्त्र ॥ जडितपालवविचित्र ॥ हंसमयूररेखिले ॥ ७ ॥ हांवेपडोनिदुःशासनें ॥ रागेंअधरचाविलेदशनें ॥ उभयहस्तेंप्रसादवसनें ॥ लागेवेगेंआंसुडी ॥ ८ ॥ सभाझालीलिखितचित्र ॥ पातींढाळोंविसरलेनेत्र ॥ देखतीवस्त्रावरवस्त्र ॥ मोलागळेंनिघतसे ॥ ९ ॥ गौरवोनियांपांडववनिता ॥ पाल ऊआणिलावैरियामाथां ॥ अंगुष्ठहीनदिसेरिता ॥ तेथेंमुखकेउतें ॥ ३७ ॥ ग्राहीकदेखोनिप्रचंड ॥ सोडोनिब्रह्मांडाचेंदिंड ॥ वस्त्रेंओपितांउदंड ॥ लेखाशेषानकरवे ॥ ३८ ॥ वैकुंठराजपेठेचाचाटा ॥ मोकलीकापडाचियामोटा ॥ द्रौपदीदुःशासनभाटा ॥ वोंवाळणीदेतसे ॥ ३९ ॥ देवनेसवी अनंतहस्तीं ॥ दोभुजांनींफेडीलकिती ॥ मंदलीदुःशासनाचीशक्ती ॥ वस्त्रसंपत्तीअनुमानें ॥४०॥ गळालादुर्जनाचातवकू ॥ वस्त्रेंगणितांनकरवेलेखू ॥ उघडेंनपडेचिअंगुष्ठनखू ॥ नदिसेमुखअपवित्रां ॥४१॥ प्रावरणाचापीतांबर ॥ शेवटींनेसवीजगदीश्वर ॥ जेंविग्रीष्मींचादिनकर ॥ किंवाविजूप्रळयींची ॥४२॥ ह्मणेयासिलावितांहात ॥ करीनदुष्टाचानिःपात ॥ सुदर्शनधगधगीत ॥ हातींवसविलेंतात्काळीं ॥ ४३ ॥ नेत्रींधडकेवैश्वानर ॥ रत्नदशनबिंबाकार ॥ चावोनियांतुकीशीर ॥ कौरवांतेंलक्षुनी ॥४४॥ हेंदेखोनिविदुरभक्तें ॥ दाखविताझालाकुरुवृद्धातें ॥ भीष्मह्मणेअभाग्यातें ॥ उमजअजुनीपडेना ॥ ४५ ॥ मगह्मणेअविचारखाणी ॥ कायनिर्वाणपहासीअजुनी ॥ ब्रह्मांडदाहोयेचक्षणीं ॥ होतासमयपातला ॥ ४६ ॥ होईंपरतादुःशासना ॥ नातळेंद्रौपदीचियावसना ॥ आत्मघातकियादुर्जना ॥ विष्णुमाहिमानेणवे ॥ ४७ ॥

दचकबैसलादुर्योधना ॥ हातेंवारीदुःशासना ॥ ह्मणेवस्त्रभारनाना ॥ भां
डारगृहींठेवावे ॥ ४८ ॥ तंवएकहीनदिसेतेथें ॥ जेंविकांनिधानअभाग्या
तें ॥ कींविश्वब्रह्मांडअज्ञानातें ॥ भेदभ्रमेंलक्षेना ॥ ४९ ॥ तंवजंबूकउलू
काचेशब्द ॥ यज्ञशाळेउठलेविविध ॥ अवचिन्हह्मणतीज्योतिर्विद ॥ म
हाअनर्थदिसताहे ॥ ५० ॥ सभानायकींनगरजनीं ॥ स्तवनींस्तविलीया
ज्ञसेनी ॥ कौरवांतेंनिंदावचनीं ॥ शापदेतीसमस्त ॥ ५१ ॥ काळाग्निरु
द्रातुल्यउद्भट ॥ भीमाभरलाक्रोधअचाट ॥ रागेंस्फुरतीअधरपुट ॥ दांत
खातकरकरां ॥५२॥ ह्मणेपरिसाप्रतिज्ञोत्तरा ॥ बोलिलाबोलनकरींखरा ॥
तरीअधोगतीहोकांपितरां ॥ सप्तपूर्वजांमाझिया ॥ ५३ ॥ जिहींस्पर्शिली
पांचाळी ॥ तेभुजउपटोनिसमूळीं ॥ दुःशासनाचेवक्षस्थळीं ॥ छिद्रपाडी
ननिर्घातें ॥ ५४ ॥ नकरींरक्तोदकप्राशन ॥ तरीजितचिप्रेतपाषाण ॥ भ
रतादिकांअधःपतन ॥ होदूसरेंनह्मणतसें ॥५५॥ गजबजिलेतेचिस्थानीं ॥
रक्तवर्षावदेखतीधरणी ॥ रुदितश्वानरासभध्वनी ॥ राजसदनींउदेले ॥
॥ ५६ ॥ ऱ्हदयपिटोनिदोन्हीकरीं ॥ बोलेआक्रोशेंगांधारी ॥ दुर्योधनग
दाप्रहारीं ॥ निमालादिसेनिर्द्धारें ॥ ५७ ॥ भयपावोनिमगअपार ॥ प्रज्ञा
चक्षूराजेश्वर ॥ मधुरोत्तरींसांत्वनथोर ॥ पांडवांचेंकरितसे ॥५८॥ पाचा
रोनिपांचहीजण ॥ आदरेंदीधलेंआलिंगन ॥ ह्मणेधर्मातुझेंमन ॥ कपट
रहितमीजाणें ॥ ५९ ॥ मजलागींहोऊनस्नेहाळ ॥ नाठवींमत्पुत्राचेंकुटि
ळ ॥ तुमचीराज्यलक्ष्मीअचळ ॥ असोतुह्मांतेंअक्षई ॥६०॥ पाचारोनियां
पांचाळी ॥ मौळस्पर्शिलेंनिजकरतळीं ॥ ह्मणेपवित्रेंऱ्हदयकमळीं॥ व्यथाकां
हींनधरिजे ॥ ६१॥स्नुषामाझीतूंमुखरणी ॥ कौरवकुळतारिणी ॥ तुझीपवित्र
तानिर्मळगुणी॥मीसंतुष्टसर्वदा ॥६२॥ इच्छाअसेलमानसीं ॥ तोवरमागेंवोम
जपासीं॥सकळऐश्वर्यगुणैकरासी॥तुझेंचअसेजाणपां ॥ ६३ ॥ द्रौपदीह्मणेजी
मामा ॥ कुळपाळकाकल्पद्रुमा ॥ पांचहीभ्रतारदासनामा ॥ पासुनिमुक्तक
रावे ॥ ६४ ॥ प्रतिविंध्यादिमाझेपुत्र ॥ तेनह्मणावेदासीपुत्र ॥ हामजदेवो
निप्रथमवर ॥ गौरविलेंपाहिजे ॥ ६५ ॥ दीधलेंह्मणोनिबोलेराजा ॥ आ
णीकवरमागकांदुजा ॥ विचारोनिद्रुपदात्मजा ॥ वाक्यबोलेवडिलांसीं ॥
॥ ६६ ॥ धनुष्यबाणसहितरथ ॥ द्यूतपणापासोनिमुक्त ॥ पांचहीपांडवपृ
थ्वीआंत ॥ स्वेच्छासत्तावर्तावे ॥ ६७ ॥ अवश्यह्मणेकौरवनाथ ॥ तृतीय
वरमागकांत्वरित ॥ येरीह्मणेबहूतस्वार्थ ॥ आतांनकरींसर्वथा ॥ ६८ ॥ वर

एकवैश्यवर्णांतें ॥ वरद्वयबोलिजेस्त्रियांतें ॥ वरत्रयक्षात्रियांतें ॥ ब्राह्मणा तेंशतवर ॥ ६९ ॥ यालागींमागणेंपुरेआतां ॥ ह्मणऊनिचरणींठेविलामाथा ॥ राजाह्मणेसौभाग्यसरिता ॥ अक्षय्यजलप्रवाहें ॥ ७० ॥ उपहासूनिराधेयह्मणे ॥ पुरुषींराहतांपुरुषचिन्हें ॥ शक्तीक्षीणजालियाजिणें ॥ स्त्रियेचेनिउपायें ॥ ७१ ॥ पुरुषवाग्बंधनींपडिले ॥ तेस्त्रीप्रयत्नेंमुक्तझाले ॥ ऐशीकीर्तीजोडोनिझाले ॥ तेचिधन्यसंसारीं ॥ ७२ ॥ ह्मणेद्रौपदीहेनौकाखरी ॥ अप्रतिष्ठेच्यासमुद्रोदरीं ॥ पुरुषपडिलेतेनिर्धारीं ॥ जियेंअवलीळेंतारिले ॥ ७३ ॥ पुरुषजालियानिर्व्यापारी ॥ जारकर्माप्रवर्तेनारी ॥ तेणेंपुरुषातेंपोशीघरीं ॥ हेंहीतसेंचिदिसताहे ॥ ७४ ॥ अर्जुनह्मणेकौळिकपुत्रा ॥ शब्दरूपेंताडिसीशस्त्रा ॥ सकळश्लाघ्यतासुपवित्रा ॥ तुजसाधेएकातें ॥ ७५ ॥ क्लीबउपहासीसुपुरुषा ॥ गर्भांधहिणावीडोळसा ॥ राजहंसातेंकोळसा ॥ वायसह्मणेज्यापरी ॥ ७६ ॥ स्त्रीपुत्रआणिविद्या ॥ चुकवितीकुश्चितकर्मबाधा ॥ पाववितीपरमपदा ॥ साक्षीदेतीपुराणें ॥ ७७ ॥ क्लीबअथवापुरुषगाढे ॥ सहजेंकळोंयेईलपुढें ॥ अकाळमेघातुल्यतोंडें ॥ कायआतांअनुवादों ॥ ॥ ७८ ॥ द्वारावतीचीकुळदेवता ॥ स्मरोनिनवसिलीशत्रुघाता ॥ ह्मणेपुरवीलमनोरथा ॥ श्रीकृष्णदेवदयाळू ॥ ७९ ॥ अवलोकोनियांकर्णातें ॥ माथातुकविलेंवीरेंपार्थें ॥ श्मश्रुस्पर्शोनियांहातें ॥ ह्मणेआटवअसोंदे ॥ ॥ ८० ॥ धर्मराजह्मणेताता ॥ प्रसन्नपणेंनिरोपींआतां ॥ तुझीआज्ञातेतत्वतां ॥ वेदप्रमाणआमुतें ॥ ८१ ॥ आह्मींअसावेंकवणेरिती ॥ कवणेस्थळींकरावीवस्ती ॥ आपदासंपदाउभयअसती ॥ कोणतेंआह्मींभोगणें ॥ ८२ ॥ संतोषोनिकुरुनंदन ॥ करीधर्माचेंशांतवन ॥ ह्मणेपुत्रातूंनिधान ॥ पुत्रांमाजीमीमानीं ॥ ८३ ॥ माझेठाईंधरोनिआस्था ॥ स्वस्थकरीनित्वद्यावस्था ॥ गमनकरावेंइंद्रप्रस्था ॥ राज्यासनाआपलीया ॥ ८४ ॥ मजवरीठेवोनियांदृष्टी ॥ कांहींनाठवावेंपोटीं ॥ मजअंधातेंधरोनिबोटीं ॥ मोक्षमार्गीलावावें ॥ ८५ ॥ आपुलेंराज्यसंपदाधन ॥ भोगोनिकरींद्विजपाळण ॥ वृद्धपिताचक्षुहीन ॥ मजवरीकरुणाअसोंदे ॥ ८६ ॥ आरूढोनियांकनकरथीं ॥ गमनकरावेंस्वस्थळाप्रती ॥ नमस्कारोनियांपांचहीमूर्ती ॥ शक्रप्रस्थाचालिले ॥ ८७ ॥ पृथामातायाज्ञसेनी ॥ रथारूढएकासनीं ॥ गमनकरितांसकळजनीं ॥ परमआल्हादमानिला ॥ ८८ ॥ लपऊनिजनाचियादृष्टी ॥ कृष्णींजाल्याअंतरभेटी ॥ ह्मणेहोईलतेंपाहिजेदृष्टी ॥ कौतुकमाझि

येलीलेचें ॥ ९० ॥ अंतरींभ्रताराचेंसुख ॥ असतांसासुरवासाचेंदुःख ॥ नाठवेतेंवितुझीहारिख ॥ भोगामाझेनिचिंतनें ॥ ९१ ॥ सभापर्वरसविद्गदें ॥ व्यासभारतअर्थसंवादें ॥ लीलाविश्वंभरप्रसादें ॥ मुक्तेश्वरकवीवदे ॥ २९२ ॥

---

## श्रीधर.

मरणकाल सुमारें शके १६५०—इ० स० १७२८.

### याचे प्रसिद्ध ग्रंथ.

हरिविजय. रामविजय शके १६२५.

पांडवप्रताप शके १६३४. शिवलीलामृत शके १६४०

### वेंचे, हरिविजयांतील.

ओंव्या.

अध्याय अठरावा.

ऐकोनिहरिप्रतापउदंड ॥ कंसचिंताक्रांतअखंड ॥ ह्मणेकृष्णेंदैत्यमारिले प्रचंड ॥ देवसमस्तभीतीजया ॥ १६ ॥ पंचाननाचाप्रतापऐकोन ॥ भयाभीतजेंविवारण ॥ कींयशवंतविनतानंदन ॥ दंदशूकऐकोनतटस्थ ॥ १७ ॥ तैसाभयेंव्यापिलाकंस ॥ गोडकांहींनवाटेजिवास ॥ नाठवेविलासरात्रंदिवस ॥ परमपुरुषदृष्टीपडे ॥ १८ ॥ देखिलानसतांचक्रपाणी ॥ दुरूनिऐकतांप्रतापश्रवणीं ॥ तैसीचमूर्तीध्यानींमनीं ॥ ठसाउनियांबैसली ॥ १९ ॥ मेळऊनियांप्रधानचतुर ॥ विचारींबैसलेसकळनृपवर ॥ ह्मणतीआह्मांसीनाटोपेनंदकुमर ॥ कैसाप्रकारकरावा ॥ २० ॥ प्रधानह्मणतीधनुर्याग ॥ आरंभावासवेग ॥ बळिरामआणिश्रीरंग ॥ आदरेंकरूनिआणावे ॥ २१ ॥ नंदगौळियांसमवेतें ॥ मानदेऊनियांआणावायेथें ॥ नम्रवचनबोलूनत्यातें ॥ शेवटींघातकरावा ॥ २२ ॥ दिवाभीताचेघरींजाण ॥ कागगेलियानम्रताधरून ॥ तैसागौळियांसमवेतकृष्ण ॥ येथेंकोंडोनिवधावे ॥ ॥ २३ ॥ विषवल्लीजोंवाढनेघे ॥ तोंखंडूनियांटाकावीवेगें ॥ तरीचआपणासुखभोगे ॥ चिरकाळनृपवरा ॥ २४ ॥ पुढांअनर्थबहुदिसताहे ॥ ह्मणऊनिसुखनिद्राकरूंनये ॥ सत्वरशोधावाउपाये ॥ तरीचकुशळआपुलें ॥

॥ २५ ॥ नयनींहरळखुपतां ॥ सत्वरकाढावेंतत्वतां ॥ कंटकपदींभेदितां॥
आधींकाढिजेकोरोनि ॥ २६ ॥ तैसानानाउपायकरूनी ॥ रामकृष्णां
सीआणूनी ॥ विश्वासंध्यावाप्राणयेचक्षणीं ॥ तरीचहेंकार्यसाधेल ॥ २७॥
दाऊनियांआंगपतन ॥ पाषाणफोडीलोहोघन ॥ कांकांटेचरणींलागून ॥
जैसेजिव्हारभेदिती ॥ २८ ॥ मस्तककरूनियांखालतें ॥ पारधीविंधी
मृगातें ॥ सरांटेजेंविमहागजातें ॥ कळलाउनीउभेकरिती ॥ २९ ॥ कीं
बचनागमुखींघालितां ॥ जिव्हेसीगोडलागेतत्वतां ॥ मगसर्वेचिमृत्युव्य
था ॥ प्राप्तकरीतात्काळ ॥ ३० ॥ वरीआमिषलाऊनिसाचार ॥ क्षणमा
त्रेंगळभेदीजिव्हार ॥ कींचणेटाकूनिवानर ॥ विश्वासवूनिधरितीपैं ॥ ३१॥
कींवरवरबोलेगोडमैंद ॥ परीआपुल्याकार्यासीसावध ॥ तैसेबळदेवआ
णिगोविंद ॥ विश्वासवूनिवधावें ॥ ३२ ॥ ऐकूनिप्रधानाचीयुक्ती ॥ कं
सासिहर्षनसमायचित्तीं ॥ ह्मणेतुमचेबुद्धीपुढेंबृहस्पती ॥ उणावाटेमज
लागीं ॥ ३३ ॥ तरीआतांपाठवावाकोण ॥ नम्रतेंबोलेविचक्षण ॥ ना
नायुक्तीकरून ॥ रामकृष्णांआणील ॥ ३४ ॥ प्रधानह्मणतीपाठवावाअ
क्रूर ॥ स्थिरबुद्धीपरमचतुर ॥ त्याचियाबोलेंक्षणमात्र ॥ नलगतांये
थेंयेतीलते ॥ ३५ ॥ मगबोलावूनिअक्रूर ॥ त्याससांगेमनींचाविचार ॥
गोकुळाजाऊनिसत्वर ॥ रामकृष्णांसीआणावें ॥ ३६ ॥ धनुर्यागमांडि
लायेथें ॥ सांगावेंनंदादिगौळियांतें ॥ महोत्सावपाहोनिमागुतें ॥ गोकु
ळासीजाइजे ॥ ३७ ॥ आमुचादिव्यरथजावाघेऊनी ॥ त्यावरीबैसवीं
रामचक्रपाणी ॥ उदयीकसत्वरदोघांसिआणोनी ॥ महोत्सावदाखवावा ॥
॥ ३८ ॥ आज्ञावंदूनिअक्रूर ॥ रथघेऊननिघालासत्वर ॥ ह्मणेमाझिया
सुकृततरुवरें ॥ वाढआजीघेतली ॥ ३९ ॥ मनांतचिंतावाटेथोर ॥ ह्मणेकं
सचांडाळदुराचार ॥ बळरामआणियदुवीर ॥ दोघेसुकुमारकैसेआणूं ॥
॥ ४० ॥ मागुतीश्रीकृष्णचरित्र ॥ अद्भुतआठवीमनांत ॥ संहारिलेदारु
णदैत्य ॥ केशीअघवकादिक ॥ ४१ ॥ कृष्णप्रतापप्रचंडदेख ॥ कायकरी
लकंसमशक ॥ जगद्वंद्यासीआवश्यक ॥ नेईनआतांनिर्धारें ॥ ४२ ॥ आ
णीकएकचिंताअंतरीं ॥ विश्वासधरीकींनधरी ॥ हाकंससेवकह्मणोनिम
जवरी ॥ कोपेलकायजगदात्मा ॥ ४३ ॥ तोतरीसर्वात्मासर्वसाक्षी ॥ जो
अनंतब्रह्मांडेंचित्तींपरीक्षी ॥ भक्ताभक्तांचींलक्षणेंलक्षी ॥ संकटींरक्षीनि
जदासां ॥ ४४ ॥ ह्मणेआजिधन्यनयन ॥ देखेनवैकुंठींचेंनिधान ॥ पू

र्णब्रह्मसनातन ॥ मीपाहेनडोळेभरी ॥ ४५ ॥ जोदशशतमुखांगशयन ॥
मीत्याचेपदींभाळठेवीन ॥ जोनीलग्रीवाचेंहृदयध्यान ॥ चतुराननबा
ळज्याचें ॥ ४६ ॥ जोक्षीराब्धिवासीपूर्णब्रह्म ॥ वेदशास्त्रासिनकळेवर्म ॥
त्याहरीसीआजिक्षेम ॥ मीदेईनप्रेमावडी ॥ ४७ ॥ जोनिर्गुणनिर्विकार ॥
जोदेशकाळातीतअपार ॥ तोगोकुळींयादवेश्वर ॥ डोळेभरीपाहीनमी ॥
॥ ४८ ॥ दुरूनिगोकुळअक्रूरेंदेखतां ॥ साष्टांगघातलेंदंडवता ॥ ह्मणेधन्यव्र
जवासीसमस्त ॥ नित्यमुखपाहतीहरीचें ॥ ५४ ॥ तोंगोखुरांमागेंचांगलीं ॥
पाउलेंहरीचींउमटलीं ॥ अक्रूरेंघेऊनियांधुळी ॥ लाविलीभाळींआपुले ॥ ५६ ॥
जोडोनियांदोन्हीहात ॥ चरणचालीअक्रूरचालत ॥ कंठझालासद्गदित ॥
अश्रुपातवाहती ॥ ५७ ॥ पदमुद्राउमटल्याजेथें ॥ मागुतीप्रणिपातकरीते
थें ॥ तोंवृक्षदेखिलेनिजभक्तें ॥ कायत्यांतेंबोलत ॥ ५८ ॥ ह्मणेधन्यधन्य
तुह्मीवृक्ष ॥ तुमचेछायेसिबैसलाकमलाक्ष ॥ जोभूतांतरात्माकर्माध्यक्ष ॥
सहस्राक्षशरणजया ॥ ५९ ॥ तोंसायंकाळींपरतलागोभार ॥ गोपांसहीत
यादवेश्वर ॥ सर्वज्येष्ठबंधुबळिभद्रवीर ॥ वाद्यगजरबहुहोती ॥ ६० ॥
गोरजधूळीदाटलीबहुत ॥ तेणेंझांकोळलाअक्रूररथ ॥ नंदमंदिराजवळि
अकस्मात ॥ अक्रूरतेथवांपातला ॥ ६१ ॥ अक्रूरेंनंददेखोन ॥ धांवोनिदि
धलेंक्षेमालिंगन ॥ तोंपातलेदोघेजण ॥ शेषनारायणतेकाळीं ॥ ६२ ॥ दे
खलात्रिभुवननाथडोळां ॥ नीळजीमूतवर्णघनसांवळा ॥ रुळतीआपाद
वनमाळा ॥ गोरजेंडौरलावदनचंद्र ॥ ६३ ॥ उदारश्रीमुखआकर्णनयन ॥
कुंडलांसभोंवतीकिरण ॥ हरितनूचाआश्रयपूर्ण ॥ अलंकारघवघवित ॥
॥ ६४ ॥ अक्रूरयादवांचावडीलबहुत ॥ देखूनियांश्रीकृष्णनाथ ॥ चरणवं
दावयाधांवत ॥ तोंअक्रूरेंदंडवतघातलें ॥ ६५ ॥ नेत्रींचालल्याप्रेमांबुधा
रा ॥ ऐसेंदेखोनिपरात्परसोइरा ॥ अक्रूराचाकरधरोनिसत्वरा ॥ उठवू
नियांक्षेमदीधलें ॥ ६६ ॥ अक्रूराचेगळांमिठी ॥ दृढघालीतजगजेठी ॥
रेवतीरमणपरमेष्ठी ॥ त्यासहीभेटीनोहेची ॥ ६७ ॥ निजभक्तजाणतीगोडी ॥
समाधीकायसीबापुडी ॥ तीर्थीव्रतांचियाकोडी ॥ करूनियांवोंवाळिजे ॥
॥ ६८ ॥ क्षणक्षणांतोअक्रूर ॥ कृष्णमुखन्याहाळोनिसुंदर ॥ धरीहरिचर
णवारंवार ॥ तृप्तिनोहेसर्वथा ॥ ६९ ॥ बळिरामासीनमून ॥ अक्रूरेंदीध
लेंआलिंगन ॥ साक्षात्शेषनारायण ॥ अवतारपुरुषदेखिला ॥ ७० ॥ अ
क्रूराचेदोन्हीहात ॥ बळदेवआणिअनंत ॥ धरूनिप्रवेशलेमंदिरांत ॥ नं

दासहिततेधवां ॥ ७१ ॥ यशोदेसीनमस्कारीअक्रूर ॥ आसनींबैसलासाद
र ॥ सांगेमथुरेचासमाचार ॥ सविस्तरसाद्यंत ॥ ७२ ॥ नंदासिह्मणेअक्रू
र ॥ कंसेंबोलाविलेंतुह्मांसिसत्वर ॥ बळदेवआणियादवेश्वर ॥ यागपा
हावयाचलावें ॥ ७३ ॥ धनुर्यागपाहोनियांमागुती ॥ सवेंचियावेंगोकुळा
प्रती ॥ उदयायेतांगभस्ती ॥ अतिसत्वरनिघावें ॥ ७४ ॥ तोंनंदयशोदा
बोलत ॥ मथुरेसिनेतांश्रीकृष्णनाथ ॥ तेचिक्षणींआमुचाप्राणांत ॥ होई
लजाणअक्रूरा ॥ ७५ ॥ कृष्णाचाकरावयाघात ॥ कंसअहोरात्रजपत ॥
अक्रूरातूंआमुचापरमआप्त ॥ पाहेंविचारूनिमानसीं ॥ ७६ ॥ अक्रूर
हांसोनियांबोलत ॥ तुमचेदृष्टीसहाबाळदिसत ॥ परीकृतांतासीशिक्षाकरी
त ॥ कृष्णनाथनिर्धारें ॥ ७७ ॥ हरीबोलेतेचिसमयीं ॥ अंतरींभयधरूंन
काकांहीं ॥ चलामथुरेसीलवलाहीं ॥ गौळीसमागमेंघेऊनी ॥ ७८ ॥
अक्रूरबोलेनलगतांएकक्षण ॥ कंसासिमारीलश्रीकृष्ण ॥ मुष्टीकचाणूरयां
चेंमरण ॥ जवळिबहुधापातलें ॥ ७९ ॥ कृष्णेंपूर्वींपराक्रमकेले ॥ तेनंद
यशोदेशीआठवले ॥ थोरदैत्यसंहारिले ॥ अघबककेशीप्रलंब ॥ ८० ॥
गोवर्धनपर्वतउचलिला ॥ काळियामर्दोनिअग्नीप्राशिला ॥ आखंडलशरण
आला ॥ तोहिदेखिलासकळिकीं ॥ ८१ ॥ हाअसेनिर्भयसर्वदापाहें ॥
यासीकळिकाळाचेंनाहींभये ॥ बुद्धिबळाचासमुद्रयादवराय ॥ तेगोष्टीमान
वलीसमस्तांसी ॥ ८२ ॥ कर्ताहर्ताभुवनगोप्ता ॥ सरीसर्वत्रजयाचीस
त्ता ॥ तोहायशोदेतवसुता ॥ नाहींभयकंसाचें ॥ ८३ ॥ अक्रूरह्मणेप्रात:
काळीं ॥ निघावेनंदादिसर्वगौळी ॥ गोकुळींमातप्रगटली ॥ कींवन
माळीउद्यांजातो ॥ ८४ ॥ तोंउगवलावासरमणी ॥ स्नानसंध्यादिभो
जनसारूनी ॥ बळदेवआणिचक्रपाणी ॥ सिद्धजालेतेधवां ॥ ८५ ॥ दि
व्यरथअक्रूरेंसजिला ॥ गौळीयांचामेळानिघाला ॥ गोरसकावडीतेवे
ळां ॥ भरोनिघेतल्याकंसभेटी ॥ ८६ ॥ यशोदाआणिरोहिणीयांतें ॥
नमस्कारिलेंबळिरामकृष्णनाथें ॥ हातजोडोनियांह्मणतीमाते ॥ जाऊनिये
तोंपूढतीं ॥ ८७ ॥ यशोदाह्मणेहेजगजेठी ॥ आतांकैंचीतुझीभेटी ॥ स्ने
हाचेउमाळेउठतीपोटीं ॥ स्तनींपान्हाफूटला ॥ ८८ ॥ तूंजातोसिमनमो
हना ॥ मीआतांनठेवींआपुल्याप्राणा ॥ माझियाविसांव्याराजीवनय
ना ॥ मनरंजनाश्रीहरी ॥ ८९ ॥ ममसांवळेकान्हाई ॥ जगन्मोहनेकृ
ष्णाबाई ॥ तुझेगुणआठऊंकितीकाई ॥ मितीनाहींतयांतें ॥ ९० ॥ वि

स्वरूपदाविलेंनयनीं ॥ गोवर्धनउचलिलाचक्रपाणी ॥ द्वादशगांवेंमहाअ
ग्नी ॥ गिळोनितुवांरक्षिलें ॥ ९१ ॥ नंदबुडालायमुनाजीवनीं ॥ घेऊनिआ
लासिसारंगपाणी ॥ सर्पेंगिळिलेंशक्तिस्थानीं ॥ तेथेंरक्षिलेंपाडसा ॥ ९२ ॥
ब्रह्मांडनायकातवजननी ॥ ह्मणतांलज्जावाटेमनीं ॥ मातापिताबंधुभगि
नी ॥ तूंचिमाझाश्रीरंगा ॥ ९३ ॥ मातेचियाचरणावरी ॥ मस्तकठेवी
श्रीमुरारी ॥ माताह्मणेपूतनारी ॥ उपेक्षाकांकेलीतुवांमाझी ॥ ९४ ॥
तंवगोपिकाआल्याधांवत ॥ दोहींहातींह्रदयपिटित ॥ कितीएकपडती
मूर्छागत ॥ थोरप्राणांतवोढवला ॥ ९५ ॥ एकधरणीवरीलोळती ॥ एक
दीर्घस्वरेंहाकादेती ॥ एकअवनीवरीकपाळपिटिती ॥ प्राणांतगतीवोढव
ली ॥ ९६ ॥ एकह्मणतीगेलासांवळा ॥ आतांअग्निलावागोकुळा ॥
गोकुळींचाप्राणचालिला ॥ प्रेतकळाआलीपैं ॥ ९७ ॥ हाचांडाळाअक्रू
रापरियेसीं ॥ अकस्मातकोठूनिआलासी ॥ आहागोकुळींचाप्राणनेतोसी ॥
निर्दयहोसीतूंसाच ॥ ९८ ॥ सकळगौळिणींचियाहत्या ॥ अक्रूरापडती
लतुझियामाथां ॥ नेवोंनकोश्रीकृष्णनाथा ॥ इतुकेंआतांआह्मांसिदेईं
॥ ९९ ॥ तुझेंनामठेविलेंअक्रूर ॥ परितुजसारिखानसेनिर्दयथोर ॥ बहुतझा
लासीकांक्रूर ॥ परमनिष्ठुरतूंहोसी ॥ १०० ॥ तंवरामकृष्णरथावरी ॥ बैसोनि
यांचालिलेसत्वरी ॥ रथापुढेंयेऊनिव्रजनारी ॥ धरणीवरीआडव्यापडती ॥ १ ॥
एकअक्रूरापुढेंपदरपसरोन ॥ ह्मणतीआह्मीअनाथदीन ॥ करींआजिकृष्णदा
न ॥ कीर्तीत्रिभुवनींभरोंदे ॥ २ ॥ अक्रूरदेखतांघेऊनियांमाती ॥ गोपीआपुल्या
मुखींघालिती ॥ ह्मणतीमनमोहनायदुपती ॥ भेटसीआतांकधींतूं ॥ ३ ॥ ऐसेंदे
खोनित्याअवसरा ॥ अष्टभावनावरतीअक्रूरा ॥ नयनींचालिल्याअश्रुधारा ॥
प्रेमदेखोनिगोपिकांचें ॥ ४ ॥ ह्मणेधन्यधन्ययांचेंप्रेम ॥ यांनींवश्यकेलापु
रुषोत्तम ॥ जोनिर्विकारपरब्रह्म ॥ नामरूपातीतजो ॥ ५ ॥ गोपींचिया
शोकासिनाहींपार ॥ जैसावनासिजातांरघुवीर ॥ पाठीलागेअयोध्यान
गर ॥ तैसेंचियेथेंजाहलें ॥ ६ ॥ जीवनावीणमीनजैसे ॥ गोकुळींचेलोकत
ळमळतीतैसे ॥ यशोदेशीमूर्छायेतसे ॥ धांवतसेरथापाठीं ॥ ७ ॥ माझेविसांवि
याजगजीवना ॥ तुझेंमुखपाहोंदेमनमोहना ॥ आलामजप्रेमाचापान्हा ॥
पाजूंकोणासांगपां ॥ ८ ॥ माझेसांवळेकान्हाई ॥ उभीराहेंकृष्णाबाई ॥
तुजवेगळ्यादिशादाही ॥ वोसझाल्यामजआतां ॥ ९ ॥ व्रजस्त्रियांचा
आकांतभारी ॥ ऐकोनिश्रीकृष्णरथावरी ॥ हातानेंदुरूनिखुणाकरी ॥

येईनलौकरीह्मणोनी ॥ १० ॥ हरीह्मणेअक्रूरा ॥ आतांरथचालेंद्यासत्व रा ॥ तरीचयागोपिकासुंदरा ॥ दुरीमागेंराहतील ॥ १७ ॥ रथघडघडांस मीरगती ॥ क्रमूनिमागेंटाकिलीजगती ॥ तेथवांगोपिकामूर्छागतपडती ॥ हाकाफोडितीकृष्णनामें ॥ १८ ॥ ह्मणतीसखयावनमाळी ॥ तुझावियो गानळआह्माजाळी ॥ एकह्मणतीरथाजवळी ॥ धांवोनिजाऊंचलागे ॥ ॥ २१ ॥ अक्रूरासिघालोनिकृष्णाचीआण ॥ रथवेगेंआणावापरतोन ॥ नेदीतरीवळेंहिरोन ॥ आणूंमनमोहनआतांची ॥ २२ ॥ आह्मीआहोंक इतुक्यासुंदरी ॥ अक्रूरएकलाकायकरी ॥ तोंरथगेलाबहुतदुरी ॥ विकळ नारीपडियेल्या ॥ २३ ॥ रथउतरलाखोलभूमीस ॥ नदिसेध्वजआणि कलश ॥ मगहोऊनियांनिराश ॥ गोपीसमस्तपरतल्या ॥ २५ ॥ अव घ्यागोपीआकांतकरीत ॥ गोकुळाचालिल्यासमस्त ॥ एकह्मणतीआग त्वरित ॥ लावाआतांगोकुळा ॥ २६ ॥ ऐसाशोककरीतसुंदरी ॥ प्रवे शल्यायशोदेचियामंदिरीं ॥ यशोदाह्मणेतेअवसरीं ॥ माझाश्रीहरीदावा गे ॥ २७ ॥ सकळगोपीयशोदेचेकंठीं ॥ घालितीतेथवांदृढमिठी ॥ शोकके लातोनमायसृष्टी ॥ नवर्णवेचिकोण्हातें ॥ २९ ॥ श्रीकृष्णाचींवाळलेणीं ॥ टाकिलींगोपींपुढेंआणोनी ॥ हरीचींखेळणींपोटींधरूनी ॥ मायरडेतेथवां ॥ ३३ ॥ असोतेखेदकरीतगौळिणी ॥ प्रवेशलीयाआपुलेसदनीं ॥ गृह कृत्यकरितांचक्रपाणी ॥ गीतगातीसर्वदा ॥ ४६ ॥

---

## वेंचे, रामविजयांतील.

### ओंव्या

### अध्याय पहिला.

जयजयगजवदनानिरुपमा ॥ अगाधनवर्णवेतुझामहिमा ॥ तुझियागु णाचीपावावयासीमा ॥ कैसासरताहोईनमी ॥ १९ ॥ काखेसीमेरूघेवू निदेखा ॥ कैसीनृत्यकरीलपिपीलिका ॥ कैसेंब्रह्मांडउचलेलमश्यका ॥ भूगोळमक्षिकाकेंविहालवी ॥ २० ॥ चंद्रासीकर्पूराचेंउटणें ॥ वासरमणी सीदर्पणदाखवणें ॥ हिमनगासीवाराघालणें ॥ मेघासीसमर्पणउदकांजुळी ॥ २१ ॥ सुरतरूपुढेंठेविलेंबदरीफळ ॥ मलयानिळासीसुगंधपरिमळ ॥ कामधेनूसीशुष्कतृणकवळ ॥ आणोनियांसमर्पिलें ॥ २२ ॥ क्षीरसिंधूसीस

मर्पिलेंअजाक्षीर ॥ कनकाद्रीपुढेंठेविलीगार ॥ तैसेंप्राकृतबोलेंअपार ॥ तुझेंमहत्वकेंविवर्णूं ॥ २३ ॥ परीजोछंदघेतबाळक ॥ स्नेहेंकरूनपुरवीजनक ॥ तरीहारामविजयग्रंथसुरेख ॥ सिद्धीपावोतवकृपें ॥ २४ ॥ आतांनमूंसरसिजोद्भवकुमरी ॥ जेविलसेसदाकविजिव्हाग्रीं ॥ जीचेवरदेंमूकहीकरी ॥ वाचस्पतीसींविवादा ॥ २५ ॥ जेआनंदसरोवरमराळिका ॥ जेचातुर्यचंपककळिका ॥ जिचेकृपेचीकरूननौका ॥ कविबाळकानेतपरतीरा ॥ २६ ॥ कृपेंतुझे विरंचीकुमारी ॥ जन्मांधहोतीमहाजोहरी ॥ अतीमूढतोवेदार्थकरी ॥ शक्रपदींबैसेरंक ॥ २७ ॥ अंबेतूंकवित्हृदयाब्जभ्रमरी ॥ कींनिजानंदसागरींचीलहरी ॥ वाग्वल्लीतूंबैसेंजिव्हाग्रीं ॥ विरूढेंसफळसर्वदा ॥ २८ ॥ विवेकहंसशुद्धधवळ ॥ त्यावरीतुझेंआसनचंचळ ॥ तप्तकांचनजैसेंसुढाळ ॥ तैसेंनिर्मळनिजांगतुझें ॥ २९ ॥ शुभ्रकंचुकीशुभ्रअंबर ॥ दिव्यमुक्तलगअलंकार ॥ निजबोधवीणाघेऊनिसुस्वर ॥ गायनकरिसीस्वानंदें ॥ ३० ॥ ऐकतांशारदेचेंगायन ॥ तन्मयविधीविष्णुईशान ॥ अंबेतुझेंसौंदर्यपाहून ॥ मीनकेतनतटस्थ ॥ ३१ ॥ रंभाउर्वशीतिलोत्तमा ॥ सावित्रीआणिमुख्यरमा ॥ तुझ्याचातुर्यसमुद्राचीसीमा ॥ त्याहीकदानपवती ॥ ३२ ॥ अंबे तुझेगुणकेंविवर्णावे ॥ केंविअर्कासीअर्कीसुमनेंपूजावें ॥ अंबरकैसेंमुष्टींतसांठवे ॥ पालवींबांधवेवायुकैसा ॥ ३३ ॥ नकरवेउर्वीचेंवजन ॥ नगणवेसिंधूचेंजीवन ॥ सप्तावरणेंभेदून ॥ मश्यककेंवीजाऊंशके ॥ ३४ ॥ ऐकोनिबाळकाचींवचनें ॥ जननीत्हृदयींधरीप्रीतीनें ॥ तैसेंसरस्वतीनें निजकृपेनें ॥ घातलेंठाणेंजिव्हाग्रीं ॥ ३५ ॥ माझेंमनमूढचकोर ॥ कुहूपाजीइच्छीरोहिणीवर ॥ परीसरस्वतीकृपाळूथोर ॥ शुद्धबीजप्रघटली ॥ ३६ ॥ बीजेपासूनचढत्याकळा ॥ तोचकोरासीअधीकसोहळा ॥ तैसीचयेथेंरघुनाथलीळा ॥ चढेआगळारसपुढें ॥ ३७ ॥ ज्ञानाचेअनंतडोळे ॥ उघडिलेएकेचिवेळे ॥ आतांवंदूंसद्गुरूचींपाउलें ॥ ज्याचेनिप्रघटेदिव्यज्ञान ॥ ३८ ॥ जोअज्ञानतिमिरच्छेदक ॥ जोप्रघटवेदांतज्ञानार्क ॥ तो ब्रह्मानंदमहाराजदेख ॥ परमाद्भुतमहिमाज्याचा ॥ ३९ ॥ जोकापांडुरंगनगरविख्यात ॥ जोभक्तभीमातटींसमाधिस्थ ॥ तोयतिराजमहिमाअद्भुत ॥ कवणवर्णूंशकेपैं ॥ ४० ॥ जागृतीस्वप्नसुषुप्तीतुर्यापूर्ण ॥ चहूंअवस्थेवरीज्याचेंआसन ॥ उन्मनीहीनिरसून ॥ स्वसुखींपूर्णसमाधिस्थ ॥ ४१ ॥ चांदणेंकैंचेंनसतांमृगांक ॥ कींकिरणेंकैंचींनुगवतांअर्क ॥

जीवनावांचोनीबीजदेख ॥ सहसाअंकुरफुटेना ॥ ४२ ॥ जरीनेत्रेंवीणन दिसेपदार्थ ॥ मथनेंवीणननिवडेनवनीत ॥ तैसासद्गुरूवांचूनिपरमार्थ ॥ ठाईनपडेजीवासी ॥ ४३ ॥ वरनसतांव्यर्थवऱ्हाड ॥ शीरनसतांकाय सेंधड ॥ तैसेंगुरुकृपेवीणव्यर्थकाबाड ॥ व्रतेंतपेंसाधनें ॥ ४४ ॥ अंजनें वीणनसांपडेनिधान ॥ कींगायत्रीवीणब्राह्मणपूर्ण ॥ सीमाकैंचीग्रामावी ण॥ तैसेंगुरूवीणज्ञाननघडे ॥ ४५ ॥ ह्मणोनितनुमनधनेंसींअनन्य ॥ ब्र ह्मानंदस्वामीसशरण ॥ आरंभींश्रीरामकथागहन ॥ ग्रंथसंपूर्णसिद्धीपावो ॥ ४६ ॥ ऐसेंऐकतांसप्रेमबोल ॥ बोलिलाश्रीगुरुदयाळ ॥ चकोराकार णेंउतावेळ ॥ मृगांकजैसाउगवे ॥ ४७ ॥ कींचातकालागींधांवेजलधर ॥ कींक्षुधितापुढेंक्षीरसागर ॥ कींकल्पवृक्षशोधीतआलाघर ॥ दरिद्रियाचें साक्षेपें ॥ ४८ ॥ तैसाश्रीगुरुदयासागर ॥ तेणेंदीधलाअक्षय्यवर ॥ ह्मणे सिद्धीपावेलसाचार ॥ रामविजयग्रंथहा ॥ ४९ ॥ आतांवंदूंसंतसज्जन ॥ जेवैराग्यवनींचेपंचानन ॥ जेज्ञानांबरींचेचंडकिरण ॥ उदयअस्तनसे जयां ॥ ५० ॥ जेभक्तिसरोवरींचेराजहंस ॥ जेकांअविद्यारण्यहुताश ॥ कींतेपद्महस्तीविशेष ॥ भवरोगावैद्यहे ॥ ५१ ॥ कींजीवपावेआपुल्या स्वपदासी ॥ ऐसेमुहूर्तदेणारजोशी ॥ कींतेपंचाक्षरीनिश्चयेसीं ॥ जेपंचभू तांसीपळविती ॥ ५२ ॥ कींदैवीसंपत्तीचेभाग्यवंत ॥ मुमुक्षांसीकरितीद रिद्ररहित ॥ कींसद्विद्येचींअद्भुत ॥ गोपुरेंकायउंचावलीं ॥ ५३ ॥ संत श्रोतेचतुरपंडित ॥ माझेंबोलणेंआर्षअत्यंत ॥ जैसेंसरस्वतीपुढेंमूढबहुत ॥ वाग्विलासदावितसे ॥ ५४ ॥ सूर्यापुढेंजैसादीपदेख ॥ जान्हवीसन्हाणीथि ल्लरोदक ॥ कींकनकाद्रीअतिसुरेख ॥ त्यासीअलंकारपितळेचे ॥ ५५ ॥ कामधेनूससमर्पिलेंअजाक्षीर ॥ चंद्रासीसीतळकरीरंभापत्र ॥ कल्पतरू कल्पिलेंदेणार ॥ त्यासिनिंबोळ्यासमर्पिल्या ॥ ५६ ॥ रत्नाकरापुढेंका चवटीसमर्पिली ॥ तैसीमाझीआर्षबोली ॥ परितुह्मींप्रीतीठेविली ॥ प्राकृ तशब्दींनवलहें ॥ ५७ ॥ विष्णूसीभूषणेंअपार ॥ परितुळसीवरीआवडी थोर ॥ कींअपर्णापतीसीबिल्वपत्र ॥ भक्तींवाहतांआवडत ॥ ५८ ॥ रायें पाठिसींदासीघालितां ॥ तिचीसर्वांवरीचालेसत्ता ॥ प्रभूअल्पमोलाचेअलं कारलेतां ॥ जनांसमस्तांथोरादिसे ॥ ५९ ॥ ह्मणोनितुह्मीसंतप्रभूथोर ॥ महिमार्णवींचींजाहाजेंअपार ॥ मोटेंतवांधवेलसमीर ॥ चरणींअंबरक्र मवेलपैं ॥ ६० ॥ गणवेलपृथिवीचेरजःकण ॥ मोजवेलसागरींचेंजीव

न ॥ कनकाद्रीचाचेंडूकरून ॥ उडविजेलसर्वथा ॥ ६१ ॥ भोगींद्रमस्त
कींचामणी ॥ आणवेलएकादेक्षणीं ॥ सूर्यजातांधरवेलगगनीं ॥ नक्षत्रें
गुणींओंविजे ॥ ६२ ॥ काढवेलशशिमंडळींचेंअमृत ॥ मोडिजेलऐरावता
चेदंत ॥ दिग्गजआणोनिसमस्त ॥ एकेठायींबांधिजेती ॥ ६३ ॥ तुरंगक
रुनीप्रभंजन ॥ सर्वांठायींकरवेलगमन ॥ परीतेंसंतांचेंमहिमान ॥ ब्रह्मानं
देंपूर्णनवर्णवे ॥ ६४ ॥ तोंसंतबोलतीआनंदघन ॥ मननिवालेंतुझेबोलऐ
कोन ॥ आह्मीकरूंइच्छितोंरामकथाश्रवण ॥ वरीदृष्टांतगोडतुझे ॥ ६५ ॥
मेरूसुंदररत्नेंकरून ॥ नक्षत्रींमंडितगगन ॥ कींवृक्षफळींपरिपूर्ण ॥ दृष्टां
तींसंपूर्णग्रंथशोभा ॥ ६६ ॥ कींशांतीक्षमादयाविशेष ॥ तेणेंमंडितसत्पुरु
ष ॥ कींपरिवारासमवेतनरेश ॥ दृष्टांतेंसुरसग्रंथशोभा ॥ ६७ ॥ आधीं
चभूकलागलीबहुत ॥ त्याहीवरीवाढिलेंपंचामृत ॥ कींदुर्वळासीअकस्मा
त ॥ कल्पतरूभेटला ॥ ६८ ॥ कन्यार्थीहिंडतांभूमंडळ ॥ त्यासीराजक
न्याघालीमाळ ॥ कींरोगियारसायणनिर्मळ ॥ अकस्मातजोडलें ॥ ६९ ॥
आतांबहुतटाकुनीशब्दजाळ ॥ बोलेंरामकथारसाळ ॥ जैसीसिकतासां
डोनिमराळ ॥ मुक्ताफळेंसेविती ॥ ७० ॥ कींकोशगृहींप्रवेशोनी ॥ भांडा
रीरत्नेंकाढीनिवडोनी ॥ कींदोषटाकोनिसज्जनीं ॥ उत्तमगुणस्वीकारिजे
॥ ७१ ॥ ऐसेसंताचेबोलपरिकर ॥ ऐकोनिब्रह्मानंदश्रीधर ॥ साष्टांगघा
लोनिनमस्कार ॥ ह्मणेसादरपरिसीजे ॥ ७२ ॥ असंभाव्यश्रीरामचरित्र ॥
शतकोटिग्रंथविस्तार ॥ वाल्मीकिबोलिलाअपार ॥ कथासमुद्रअगम्य ॥
॥ ७३ ॥ मुळापासोनइतुक्याकथा ॥ कैशावर्णवतीलतत्वतां ॥ त्यामाजि
वाल्मीकीरामायणनाटकग्रंथा ॥ श्रीरामविजयालागींकथूं ॥ ८५ ॥ सम
स्तकवींसीनमस्कार ॥ जोजगद्गुरुआचार्यशंकर ॥ जेणेंमतेंउच्छेदूनिसम
ग्र ॥ शुद्धमार्गवाढविला ॥ ८६ ॥ जोश्रीधराचार्यटीकाकार ॥ त्यासीन
मस्कारीतश्रीधर ॥ मधुसूदनादिकनरेंद्र ॥ ग्रंथअपारजयांचे ॥ ९२ ॥
जोशृंगारवनींचाविहंगमजाण ॥ तोजयदेवपद्मावतीरमण ॥ ज्याचीकाव्य
कलापाहोन ॥ पंडितजनतटस्थ ॥ ९३ ॥ जोवेदांतक्षीरार्णवींचामीन ॥
जेणेंविवेकसिंधूनिर्मिलापूर्ण ॥ तोमुकुंदराजगुणनिधान ॥ तयाचेचरणवं
दिले ॥ ९४ ॥ तारावयाजगसमग्र ॥ पुन्हाअवतरलारमावर ॥ गीतार्थ
केलासाचार ॥ तोज्ञानेश्वरजगद्गुरू ॥ ९५ ॥ जोभानुदासकुलभूषण ॥
प्रतिष्ठानवासीपरिपूर्ण ॥ त्याएकनाथेंग्रंथसंपूर्ण ॥ बहुरसाळकथियेले॥९६॥

जेचातुर्यराजधानीचेकळस ॥ मुक्तेश्वरमुद्गलदास ॥ ज्यांचेग्रंथपाहातां
सुरस ॥ ब्रह्मानंदउचंबळे ॥ ९७ ॥ जैसाचंडांशुसतेजव्योमीं ॥ तैसाचिके
वळवामनस्वामी ॥ ज्याचीश्लोकरचनायेभूमी ॥ भूमंडळावरीअपूर्व ॥ ९८॥
कृष्णदासजयराम ॥ जेंशांतिदयेचेंनिजधाम ॥ ज्याचेग्रंथज्ञानभरितपर
म ॥ जोनिःसीमब्रह्मचारी ॥ ९९ ॥ श्रीरामउपासकनिर्मळ ॥ जोभजन
सरोवरींचामराळ ॥ तोरामदासमहाराजकेवळ ॥ भक्तीप्रबळवीजना ॥
॥ १०० ॥ ब्रह्मानंदस्वामीचाबंधूसत्य ॥ नामतयाचेंश्रीरंगनाथ ॥ ज्याची
कवितासमस्त ॥ अपारजनउद्धरीले ॥१॥ आतांअसोसमस्तकविवर ॥ अ
वघेब्रह्मानंदरूपसाचार ॥ त्यांसीअनन्यशरणश्रीधर ॥ द्यावावरग्रंथासी
॥ २ ॥ रविकुळींअवतरलाश्रीधर ॥ कैसेंकेलेंलीलाचरित्र ॥ तरलावाल्मी
किसाचार ॥ कथाअपारबोलिला ॥ ३ ॥ हेंवर्णितांश्रीरामचरित्र ॥ तर
लावाल्मीकिसाचार ॥ पापआचरलाअपार ॥ ऐकासादरगोष्टीते ॥ ४ ॥वा
ल्मीकिपूर्वीद्विजसुत ॥ त्यजोनिआचारयज्ञोपवीत ॥ किरातसंगेंवाटपाडित॥
अतिउन्मत्तविषयांध ॥ ५ ॥ महादुर्धरकानन ॥ देखतांभयाभीतहोयम
न ॥ पर्वतदरीमाजीस्थळकरोन ॥ सहपरिवारेंवसेतेथें ॥६॥ भोंवतेंद्वादश
गावेंपर्यंत ॥ पाळतीराखोनिवाटपाडित ॥ केल्याब्रह्महत्याअसंख्यात ॥
नाहींगणतीइतरजीवां ॥ ७ ॥ मच्छधरावयालागींबक ॥ जैसाहोऊनिबसे
सात्विक ॥ कींमूषकालागींबिडाळिक ॥ बैसेटपतजयापरी ॥ ८ ॥ कींअं
गसंकोचेंपारधी ॥ जाणोनितात्काळमृगसाधी ॥ तैसावाल्ह्याजीववधी ॥
पापबुद्धीनिर्दय ॥ ९ ॥ अपारजीवमारिले ॥ पापाचेपर्वतसंचिले ॥ जैसे
अंत्यजगृहाभोंवतेपडिले ॥ ढीगपशुअस्थींचे ॥ १० ॥ ऐसेंकरितांपापाच
रण ॥ तयासीआलेंवृद्धपण ॥ पुत्रजालेअतितरुण ॥ परीआंगवणनसांडी
॥ ११ ॥ हातींशस्त्रघेऊनिवाल्ह्या ॥ मार्गलक्षीतजोंबैसला ॥ तोंअकस्मात
नारदप्रघटला ॥ पूर्वपुण्येंकरोनी ॥ १२ ॥ चंद्रवेष्टितीनक्षत्रेंजैसीं ॥ भोंव
तीऋषींचीमांदीतैसी ॥ तोंपाळतीसांगतीवाल्हियासी ॥ जातीतापसीबहु
साल ॥ १३ ॥ वाटेसीधांवूनआडवाआला ॥ शस्त्रउभारूनितेवेळां ॥ द
टाऊनिऋषींचामेळा ॥ उभाकेलाक्षणभरी ॥ १४ ॥ कींस्वर्गपंथेंजातांने
टें ॥ जैसीयमपुरीलागेवाटे ॥ कींपुण्येंआचरितांउद्भटें ॥ कामक्रोधआड
विती ॥ १५ ॥ असावाल्ह्याह्मणेतयांसी ॥ यात्राआणारेमजपासीं ॥ नाहीं
तरीमुकालप्राणासी ॥ माझेहस्तेंकरोनि ॥ १६ ॥ मगपुढेंहोऊनब्रह्मनंद

न ॥ ह्मणेऐकऐकमाझेंवचन ॥ तुजआलेंवृद्धपण ॥ पापेंअपारघडलींकीं ॥
॥ १७ ॥ द्रव्यजोडिलेंतुवांअपार ॥ जालेदुष्कृताचेसंभार ॥ तुझ्यापापासी
वांटेकर ॥ कोण्हीआहेतकींविचारीं ॥ १८ ॥ आलेंतुजजवळीमरण ॥
यमजेव्हांगांजीलदारुण ॥ तेव्हांतुजसोडवीलकोण ॥ पाहेंविचारोनिअं
तरीं ॥ १९ ॥ दारापुत्रधनयौवन ॥ बंधूसेवकआप्तजन ॥ शस्त्रेंअस्त्रेंचातु
रंगसैन्य ॥ नयेकामातेवेळे ॥ २० ॥ जींजींकर्मेंप्राणीकरिती ॥ तितुकींदे
वविलोकिती ॥ सकलतत्वेंव्यापूनवर्तती ॥ मगसाक्षदेतीपरत्रींते ॥ २१ ॥
यमपुरीसचित्रगुप्त ॥ पत्रेंकाढोनिवाचीत ॥ मगत्यासारिखादंडकरी
त ॥ कोणतेथेंसोडवील ॥ २२ ॥ जेपुण्यपंथेंनचालेनर ॥ निंदीती
र्थयात्रासमग्र ॥ त्यासताम्रभूमीतप्तअपार ॥ चालवितीत्यावरीहळूह
ळू ॥ २३ ॥ जेपरोपकारनकरिती ॥ त्यांसीअसिपत्रावरीहिंडवि
ती ॥ इकडूनतिकडेशस्त्रेंफुटती ॥ कोणसोडवीलतेस्थानीं ॥ २४ ॥ तप्त
लोहस्तंभदारुण ॥ त्यासींभेटवितीनेऊन ॥ देवद्विजांनकरीनमन ॥ त्यास
हीजाणतेचिगती ॥ २५ ॥ जोसंतांसदेखोंनशकेअपवित्र ॥ त्याचेगीधफो
डितीनेत्र ॥ जोकीर्तनस्मरणनकरीअणुमात्र ॥ जिव्हातोडितीतयाची ॥
॥ २६ ॥ गुरुदेवब्राह्मणसांडोनी ॥ जोशरणनयेपापखाणी ॥ महानरकीं
चेंपाणी ॥ त्याचेवदनींओतिती ॥ २७ ॥ जोतीर्थेंस्नानेंनिंदीखळ ॥ त्या
सीतप्तकढईमाजीतेल ॥ त्यांततळवितीतात्काळ ॥ कोणसोडवीतेथेंपां ॥
॥ २८ ॥ जेसाधुसंतांसीपीडिती ॥ त्यांचेआंगींचींसालेंकाढिती ॥ जेद्विज
गुरुतीर्थेंअव्हेरिती ॥ तोंडींघालितीविष्ठामूत्र ॥ २९ ॥ धर्मवाटधरोनिहरि
तीधन ॥ त्यांसीकुंभीपाकामाजीघालून ॥ खालींचेतवितीकृशान ॥ त्या
माजीआक्रंदोनिचडफडती ॥ ३० ॥ लोहदंडकरोनितप्त ॥ नखींरोंविती
यमदूत ॥ जोनायकेहरिकथामृत ॥ गतीनिश्चितीत्यासिहे ॥ ३१ ॥ ऐसें
बोलतांनारदऋषी ॥ अनुतापजालात्याचेमानसीं ॥ वेगेंआलानिजसद
नासी ॥ स्त्रीसुतादिकांसीपूसत ॥ ३२ ॥ जींजींपापेंघडलींमजलागीं ॥ को
ण्हीहोतांकायत्याचेविभागी ॥ तंवतेह्मणतीआमुचेअंगीं ॥ नलगतीपापें
सर्वथा ॥ ३३ ॥ भाग्याचेवांटेकरीसमस्त ॥ पापेंतुझींतूंभोगींयथार्थ ॥
वाल्ह्याझालासद्गदीत ॥ ह्मणेकैसाअनर्थटाळूंआतां ॥ ३४ ॥ हानरदेहउ
त्तमपूर्ण ॥ केवळभगवत्प्राप्तीचेंस्थान ॥ म्यांआत्महितनकरून ॥ बुडा
लोंकींअंधतमीं ॥ ३५ ॥ यत्नेंपुण्यक्षेत्रसरसावलें ॥ तेथेंकनकबीजपेरिलें॥

कनकामृताचेंताटघडलें ॥ त्यांतवाढिलेंतृणबीज ॥ ३६ ॥ सुधारसकुंभदैवें जोडला ॥ तोनेऊनउकरड्यांतओतिला ॥ चिंतामणीफोडोनिघातला ॥ पायरीसअभाग्यें ॥ ३७ ॥ सुरभीशोधीतआलीघर ॥ तिसीकरूनिकाष्ठ प्रहार ॥ अभाग्येंघातलीबाहेर ॥ तोचिप्रकारमजजाला ॥ ३८ ॥ बळेंकल्पवृक्षतोडोन ॥ वाढविलेंकंटकीवन ॥ राजहंसदवडोन ॥ दिवाभी तेंपाळिलीं ॥ ३९ ॥ रंभातोडोनिमहामूर्खें ॥ अर्कीवाढविल्यासकौतुकें ॥ ओसंडोनिसतेजमुक्तें ॥ सिकताहरळभरियेल्या ॥ ४० ॥ असोऐसाअनुता पेंवाल्या ॥ नारदापासींपरतोनिआला ॥ सद्गदकंठअश्रुडोळां ॥ साष्टांग घातलानमस्कार ॥ ४१ ॥ तनुमनधनेसींअनन्य ॥ स्वामीतुजमीआलों शरण ॥ कृपेचीनौकाकरोन ॥ तारींमजभवसागरीं ॥ ४२ ॥ महाराज तूंधन्वंतरी ॥ माझाभवरोगतूंदूरकरीं ॥ जळतोंपावोनविषयाभीतरीं ॥ मेघझडकरीवर्षेंतूं ॥ ४३ ॥ पडिलोंमायेचियेमेळीं ॥ पंचभूतेंमजझोंबलीं ॥ वासनाविवशीगळांपडली ॥ कदाकाळींसोडीना ॥ ४४ ॥ अहंदेहबुद्धी डांकीण ॥ ममतासटवीदारुण ॥ लोभझोटिंगएकक्षण ॥ उमसघेऊंनेदीच ॥ ४५ ॥ क्रोधह्मैसासुरदारुण ॥ कामवेताळेंझडपिलेंपूर्ण ॥ तृष्णामाया राणीअनुदिन ॥ सर्वदाहीनसोडीते ॥ ४६ ॥ जालोंमीअत्यंतक्षीण ॥ पंचाक्षरीतूंब्रह्मनंदन ॥ सकळभूतेंटाकींझाडोन ॥ ह्मणोनिचरणधरियेले ॥ ४७ ॥ अष्टभावेंझालासद्गदित ॥ मगमनींविचारीब्रह्मसुत ॥ रोगपाहू निवैद्यनिश्चित ॥ दिव्यमात्राकाढिजेवि ॥ ४८ ॥ ह्मणेहाअनधिकारी परम ॥ माराऐसेंसांगेनाम ॥ ह्मणेहेंचितुवांजपावेंसप्रेम ॥ मुख्यवर्मजाणपां ॥ ४९ ॥ तेंजीवननामजपत ॥ तेथेंचिबैसलाध्यानस्थ ॥ अंगावरीवारूळ वाढत ॥ ध्वनीउमटतआंतूनी ॥ ५० ॥ टोणपियाचावृक्षझाला ॥ तों नारदबहुकाळेंपातला ॥ त्यातरूखालींउभाराहिला ॥ श्रवणींऐकिलाना मघोष ॥ ५१ ॥ वारुळछिद्रामधूनी ॥ रामनामाचामधुरध्वनी ॥ चातुर्य समुद्रनारदमुनी ॥ जाणिलामनींसर्ववृत्तांत ॥ ५२ ॥ मगउकरोनियांवा रुळ ॥ बाहेरकाढिलातोपुण्यशीळ ॥ दिव्यौषधीमस्तकींमर्दूनिसकळ ॥ सावधकेलातेधवां ॥ ५३ ॥ जैसाभूमीवरीअर्कउतरला ॥ तैसाश्रीगुरूना रददेखिला ॥ धांवोनिलागेचरणकमळा ॥ पापाझालासंहारू ॥ ५४ ॥ नामजपतांश्रीरामाचें ॥ दोषगेलेअनंतजन्मींचे ॥ जैसेपर्वततृणाचे ॥ अग्नि

संगेंभस्महोती ॥ ५५ ॥ पापेंजळावयासमस्त ॥ नामामाजीप्रतापबहुत ॥
॥ नामाचेनीनजळेनिश्चित ॥ ऐसेंपापनसेचिकीं ॥ ५६ ॥ वाल्मिकेंके
लींजींपापें ॥ तींभस्मजालींनामप्रतापें ॥ नामापुढेंआणीकतपें ॥ तुच्छऐ
सींजाणिजे ॥ ५७ ॥ जैसापर्वतहोतांप्रदीप्त ॥ मगझाडेंझुडपेंनराहतीतेथ
॥ नामाग्नीपुढेंतैसींसमस्त पापारण्येंभस्महोती ॥ ५८ ॥ जैसींस्वप्नींघडती
दुष्कृतेंबहुत ॥ जागृतींततींमिथ्याभूत ॥ तैसींरामनामेंसमस्त ॥ पापेंसमू
ळभस्महोती ॥ ५९ ॥ तोंवरीचतमाचीदाटणी ॥ जोंवरीनुगवेवासरमणी ॥
तोंवरीचमदकीजेवारणीं ॥ जोंवरीसिंहदेखिलानाहीं ॥ ६० ॥ सिंधूचेंग
र्जनतोंवरीचपाहीं ॥ जोंवरीकलशोद्भवदेखिलानाहीं ॥ तोंवरीभूतांची
परमघाई ॥ जोंवरीमंत्रवादीनाहींपावला ॥ ६१ ॥ तोंवरीपापांचेसंभार ॥
जोंनामींनधरिलाआदर ॥ नामप्रतापअद्भुतथोर ॥ तरलावाल्मिकीसाचार
॥ ६२ ॥ असोवाल्मिकीह्मणेश्रीगुरुनाथा ॥ मीकसाकाळक्रमूंआतां ॥
नारदह्मणेश्रीरामकथा ॥ सविस्तरकरावी ॥ ६३ ॥ मगवाल्मीकेंरचिला
ग्रंथ ॥ तोभारद्वाजमुखेंसमस्त ॥ असंख्यऋषीश्रवणकरित ॥ ब्रह्मानंदें
करोनी ॥ ६४ ॥ नारदाप्रतीसरसिजोद्भव ॥ सांगेरामकथाअभिनव ॥
बद्रिकाश्रमींऋषीसर्व ॥ व्यासमुखेंऐकती ॥ ८१ ॥ तेंप्राकृतभाषेंनिवाडे ॥
श्रीधरवर्णीसंतांपुढें ॥ जैसेंबाळचाळेकरीलाडें ॥ परीआवडेजननीये ॥ ८२
॥ प्राकृतभाषाह्मणोनी ॥ अव्हेरनकरावापंडितजनीं ॥ जैसींकृष्णावेणीचीं
तिरेंदोन्ही ॥ परीउदकजाणएकचि ॥ ८३ ॥ तैसेंप्राकृतआणिसंस्कृत ॥
दोहींतएकचिअर्थ ॥ जैशादोघीस्त्रियाएकाचेकांत ॥ कींदोन्हीहस्तएका
चेचि ॥ ८४ ॥ दोन्हीदाढाएकाचिस्वर ॥ एकपाहणेंदोन्हीनेत्र ॥
कींदोंपात्रांतपवित्र ॥ एकाचिदुग्धघातलें ॥ ८५ ॥ दोन्हीमाजीगोडीएक
॥ जैसेंत्रिवेणीसभरलेंउदक ॥ एकसुवर्णकूपिकाअलोलिक ॥ ताम्रधातूची
एकघडली ॥ ८६ ॥ दोन्हीकुप्यानेऊनदेख ॥ श्रीरामेश्वरासीकेलाअभि
षेक ॥ दोनधातुएकउदक ॥ देवाससमचिआवडे ॥ ८७ ॥ अबळांसनकळे
संस्कृतवाणी ॥ जैसेंआडांतीलगोडपाणी ॥ परीतेंदोरपात्रावांचोनी ॥
अशक्तजनाकेंविनिघे ॥ ८८ ॥ तोचितडागासीयेतांत्वरें ॥ तात्काळ
चितृषाहरे ॥ अबळाजनातारावयाईश्वरें ॥ प्राकृतग्रंथनिर्मिले ॥ ८९ ॥
मुख्यसंस्कृतपद्मावें ॥ परीतेंअबळांसीनुगवे ॥ महागजकैसाबांधवे ॥
कमळतंतूघेउनी ॥ ९० ॥ सर्वांसमान्यगीर्वाण ॥ जरीअसेलपू

वैपुण्य ॥ तरीचतेथींचेंहोईलज्ञान ॥ तरीअबळाजनकेंवितरती ॥ ९१ ॥ उत्तमवस्त्रेंलेतीनृपती ॥ तींदुर्बळांसीकेंविप्राप्तहोती ॥ मगतेघोंगडीचपांघरती ॥ सीतोष्णनिवारणा ॥ ९२ ॥ जैसेंदधीमंथितांबहूत ॥ त्यांतूननिघेनवनीत ॥ कींस्वातीजळापासोनिअद्भुत ॥ मुक्ताफळनिपजे ॥ ९३ ॥ कींइक्षुरसापोटींशर्करा ॥ रसनेसिगोडीतेचिविचारा ॥ कींराजियापासून राजपुत्रा ॥ मान्यताहोयबहुतचि ॥ ९४ ॥ मऱ्हाटीवचनेंनिश्चित ॥ परी अत्यंतरसभरीत ॥ मधुमक्षिकांचेमुखींहूनीस्रवत ॥ अतीसुरसजैसाकां ॥ ९५ ॥ गीर्वाणहेंशशीमंडळअद्भुत ॥ त्याचीप्रभाहेप्राकृत ॥ संस्कृतग्रंथ वर्णितीपंडित ॥ अर्थप्राकृतकरितीपैं ॥ ९६ ॥ सिकतेमाजीदिव्यरत्न ॥ जरीसांपडेनकरितांप्रेत्न ॥ तरीचतुरींकरावेंजतन ॥ किंवाअव्हेरकरावा ॥ ९८ ॥ कष्टेंवीणराज्यआलेंहाता ॥ तरीकांवोसंडावेंतत्वतां ॥ प्राकृतभाषाऐकोनिकथा ॥ लाभश्रोताघेईजेतेंवि ॥ ९९ ॥ मुक्ताफळाचियामाळा ॥ वरीसुवाससूटलाआगळा ॥ तरीचतुरींकांनघालावीगळां ॥ अतीआवडीकरूनी ॥ २०० ॥ आधींचइक्षुदंडगोड ॥ त्यावरीआलेशर्करेचेघड ॥ तैसीरघुनाथकथासुवाड ॥ त्यावरीसाहित्यपुरविलें ॥ २०१ ॥

---

Prof. Datto Vaman Potdar, B. A. Poona

## वेंचे, पांडवप्रतापांतील.

### ओंव्या.

### अभिमन्युवध. अध्याय ४५.

जोसच्चिदानंदकमळापती ॥ तोजालापार्थाचासारथी ॥ जोभक्ताचेमनोरथीं ॥ बैसोनिसूत्रहालवी ॥ १ ॥ युद्धासगोंविलाअर्जुन ॥ इकडेकाय झालेंवर्तमान ॥ चक्रव्यूहगुरुद्रोण ॥ रचिताजालाअद्भुत ॥ ४ ॥ सुपर्णव्यूहपांडवरचित ॥ धर्मासिअवघेचिरक्षित ॥ युद्धमांडलेंअद्भुत ॥ द्रोणेंआणिभीमसेनें ॥ ५ ॥ नकुळसहदेवपांचाळ ॥ अवघेयुद्धकरितीसबळ ॥ परीचक्रव्यूहभेदावयाबळ ॥ कोणासहीदिसेना ॥ ६ ॥ धर्मह्मणेअसता पार्थ ॥ तरीहाव्यूहभेदितानिश्चित ॥ तोंपुढेंयेऊनसुभद्रासुत ॥ धर्मराजासविनवीतसे ॥ ७ ॥ तुह्मीमजआज्ञाद्यालजरी ॥ तरीहाव्यूहभेदीननिर्धारीं ॥ धर्मह्मणेतेअवसरीं ॥ तूंबाळकसुकुमार ॥ ८ ॥ मगबोलेपार्थनंदन ॥ आह्मांक्षत्रियांरणतेंचिधन ॥ तातातुमचेदयेकरून ॥ व्यूहभेदूनजाईनमी ॥ ९ ॥ परमसुंदरसुभद्रासुत ॥ रूपासींतुळितांउणामन्मथ ॥ दुसरा

श्रीकृष्णचिमूर्तिमंत ॥ विराटजामातजोहोय ॥ १० ॥ घनश्यामवर्णरा
जीवनयन ॥ आजानुबाहुसुहास्यवदन ॥ जोपांडवांसीप्राणाहून ॥ आ
वडतापांचांसही ॥ ११ ॥ ऐसातोउत्तरावर ॥ रथावरीचढलासत्वर ॥ उ
दयाद्रीवरीदिनकर ॥ तैसासुंदरदिसतसे ॥ १२ ॥ केलाधर्मासनमस्कार ॥
युद्धानिघालापार्थकुमर ॥ तोंसहस्रावधीराजपुत्र ॥ व्यूहाप्रतीरक्षिती ॥ १३ ॥
व्यूहभेदीतजायसौभद्र ॥ दहासहस्रमारिलेकुंजर ॥ एकअयुतमहावीर ॥
अश्वांसहितपाडिले ॥ १४ ॥ एकअयुतमहारथी ॥ तात्काळपाडीउ
त्तरापती ॥ जेथेंशंभरराजपुत्ररक्षिती ॥ त्यास्थळासीपातला ॥ १५ ॥
दळासहितराजकुमर ॥ एकल्यावरीसोडितीशर ॥ परीतोआनकदुंदुभीक
न्याकुमर ॥ तितुकेतोडीक्षणमात्रें ॥ १६ ॥ तितुक्यांचेबाणजाळ ॥ एकस
रेंभेदीसुभद्राबाळ ॥ जैसेंउगवतांसूर्यमंडळ ॥ भगणेंसर्वलोपती ॥ १७ ॥
एकउठतांविनायक ॥ असंख्यसंहारतीदंदशूक ॥ कींसुटतांचंडवातदेख ॥
जळदजाळवितुळत ॥ १८ ॥ एकविष्णुनामेंकरून ॥ असंख्यदुरितेंजाती
जळून ॥ कींचेततांकृशान ॥ असंख्यवनेंदग्धती ॥ १९ ॥ कींमूढाचेंवाग्जा
ळसमस्त ॥ एक्याशब्देंउडवीपंडित ॥ कींएकासिंहनागबहुत ॥ पडतीगत
प्राणहोउनी ॥ २० ॥ त्दयींप्रगटतांबोध ॥ सहपरिवारेंपळतीकामक्रो
ध ॥ कींप्रत्ययायेतांब्रह्मानंद ॥ क्षुद्रानंदविरमती ॥ २१ ॥ तैसाएकलाच
धनंजयकुमर ॥ परीसैन्येंकेलींअवघींजर्जर ॥ कोणीउचलितांकर ॥ श
स्त्रासहितभुजाछेदी ॥ २२ ॥ दुर्योधनाचापुत्रलक्ष्मण ॥ त्यासींयुद्धकेलें
निर्वाण ॥ घेतलातात्काळत्याचाप्राण ॥ शीरउडऊनिपाडिलें ॥ २३ ॥
बाणसोडीतधांवलाकर्ण ॥ दोंबाणींछेदिलेत्याचेकर्ण ॥ आंगकाढूनभानुनंद
न ॥ पळताझालाएकीकडे ॥ २५ ॥ दशबाणींसुयोधनखिळिला ॥ द्रोण
पांचबाणींविंधिला ॥ जयद्रथतात्काळपळविला ॥ एकाबाणेंकरोनी ॥ २६ ॥
अश्वत्थामाकृपाचार्य ॥ हेहीपळतीगतवीर्य ॥ देखोनिअभिमन्यूचेंशौर्य ॥
द्रोणमस्तकडोलवी ॥ २७ ॥ व्यूहामाजीसांपडलापार्थकुमार ॥ साहाजण
महावीर ॥ सोडितेझालेनिर्वाणशर ॥ एकलियाबाळावरी ॥ ३१ ॥ सुकुमा
रतोसौभद्र ॥ एकल्यासीहाणितीमहावीर ॥ चहूंकडेपाहेसुंदर ॥ आपुलें
कोण्हीदिसेना ॥ ३२ ॥ असतापिताअर्जुन ॥ तरीसाह्यकरितायेथेंपूर्ण ॥ ज

---

१ वसुदेव कन्या सुभद्रा तिचा कुमर अभिमन्यु.

यद्रथव्यूहद्वारधरून ॥ शिववरदेंनाटोपे ॥ ३३ ॥ आकांतभोंवेपांडवदळीं ॥ जवळिनाहींपार्थवनमाळी ॥ व्यूहफोडीऐसाबळी ॥ कोण्हीनाहींपांडवांत ॥ ३४ ॥ युद्धकरितअभिमन्य ॥ कर्णेंसोडिलेनिर्वाणबाण ॥ हातींचेंधनुतोडून ॥ बाणभाताछेदिला ॥ ३५ ॥ सारथीघोडेतेवेळे ॥ द्रोणाचार्येंमारिले ॥ मगअभिमन्येंशस्त्रघेतलें ॥ रथाखालींउतरला ॥ ३६ ॥ जैशीवीजलयोनिजाय ॥ तैसाअभिमन्यतळपताहे ॥ तोंदुर्योधनेंखड्गलवलाहे ॥ एकेबाणेंछेदिला ॥ ३७ ॥ मगगदाघेऊनपार्थसुत ॥ अमितवीरांतेंपाडित ॥ तोंदुःशासनेंत्वरित ॥ गदाछेदिलीहातींची ॥ ३८ ॥ मगघेतलेंरथचक्र ॥ रणींतळपेसुभद्राकुमर ॥ जैसाकृष्णचक्रधर ॥ तैसावीरदिसतसे ॥ ३९ ॥ कर्णद्रोणदुर्योधन ॥ सोडितीबाणापाठींबाण ॥ हातींचेंरथचक्रजाण ॥ अश्वत्थामियानेंछेदिलें ॥ ४० ॥ तोंदुःशासनाचापुत्रदुःशासनी ॥ वेगेंआलागदाघेउनी ॥ अभिमन्येंतेचक्षणीं ॥ गदादुसरीघेतली ॥ ४१ ॥ दोघींगदायुद्धमांडिलें ॥ सकळींबाणजाळघातलें ॥ दुःशासनीसकेलें ॥ अभिमन्येंमूर्छीत ॥ ४२ ॥ सवेंचदुःशासनसुतें ॥ हाणीतलेंअभिमन्यातें ॥ दोघेपावलेमूर्छेतें ॥ गदाघातेंएकमेक ॥ ४३ ॥ मूर्छासांवरोनिदुःशासनी ॥ वेगेंआलागदाघेउनी ॥ विकळसौभद्रपडलियारणीं ॥ त्याचेमस्तकीं घातली ॥ ४४ ॥ तेणेंचूर्णजालेंशिर ॥ पडलापार्थाचाकुमर ॥ तोंअशरीरिणीवदलीउत्तर ॥ धर्मयुद्धनव्हेहें ॥ ४५ ॥ सकळदळभारएकवटला ॥ भोंवतापाहावयापाळापडला ॥ त्यांतजयद्रथेंहाणीतला ॥ अभिमन्युलातेनें ॥ ४६ ॥ द्रोणेंधिक्कारिलेंजयद्रथा ॥ दुर्जनावीराहाणिशीलत्ता ॥ त्याअभिमन्येंबाणावारींझोडितां ॥ पळालासीसत्वर ॥ ४७ ॥ कौरवगेलेसमस्त ॥ अभिमन्यघायेंविलपत ॥ श्रीहरीचेंस्मरणकरीत ॥ वाटपाहातपार्थाची ॥ ४८ ॥ पांडवबळींआकांतदारुण ॥ धर्मराजकरीरुदन ॥ आतांयेईल अर्जुन ॥ त्यासिकायवदनदाखऊं ॥ ४९ ॥ दिवसगेलाअस्तमानासी ॥ वधूनयेतांसमसप्तकांसी ॥ अपशकुनपार्थासी ॥ मार्गीयेतांहोतसे ॥ ५० ॥ धर्माजवळिआलाअर्जुन ॥ अवघेदेखिलेअधोवदन ॥ पार्थपुसेकोठेंअभिमन्य ॥ कांउत्साहमंदिरींनदिसे ॥ ५१ ॥ धर्मबैसलाअधोवदन ॥ कांमौन्यधरीभीमसेन ॥ ह्मणेसंसारमायाअभिमन्य ॥ त्यजूनिगेलास्वर्गातें ॥ ५२ ॥ रथाखालींपडलाअर्जुन ॥ पुत्रशोकेंकरीरुदन ॥ मगश्रीकृष्णेंसंबोखून ॥ सावधकेलेंपार्थासी ॥ ५३ ॥ अर्जुनअवध्यांसी

ग्र. म. ब. ग्रं.

धिक्कारित ॥ जळोजळोतुमचापुरुषार्थ ॥ इतुकेअसतांमाझासुत ॥ कां पाठविलासंग्रामा ॥ ५४ ॥ उपलव्यनगरीहुनी ॥ उत्तरासुभद्राधांऊनी ॥ त्वरेंआल्याबसोनिवहनीं ॥ हृदयपिटीतअतिदुःखें ॥ ५५ ॥ सुभद्रेतें नधरवेधीर ॥ शरीरटाकिलेंपृथ्वीवर ॥ माझाअभिमन्यसकुमार ॥ दावाएकदापाहीनमी ॥ ५६ ॥ हेअभिमन्याकमळलोचना ॥ हेसौ भद्राचंद्रवदना ॥ हेकोमलांगामधुरभाषणा ॥ येधांवूनिमजभेटें ॥ ५८ ॥ हेघनश्यामवर्णा ॥ हेअभिमन्याप्रतिअर्जुना ॥ हेमहावीरासुहास्यवदना ॥ येधांऊनिमजभेटें ॥ ५९ ॥ द्रौपदीह्मणेअभिमन्या ॥ हेवत्सासद्गु णानिधाना ॥ हेतरुणातुझीअंगना ॥ उत्तराआतांकरीलकाय ॥ ६० ॥ हेकिशोरवयापरमउदारा ॥ समरधीराप्रतापशूरा ॥ पांडवकुलदीपका सुंदरा ॥ केलीत्वरासर्वांआधीं ॥ ६२ ॥ उत्तरेच्यागळांमिठीघालिती ॥ सुभद्राद्रौपदीशोककरिती ॥ तेंदेखोनिपार्थश्रीपती ॥ शोकार्णवींबुडाले ॥ ६३ ॥ बोलेसुभद्रावेल्हाळ ॥ इतुकेवीरअसतांसबळ ॥ सांपडलाव्यू हामाजीबाळ ॥ पाठीकोण्हीनराखेची ॥ ६६ ॥ विकळपडतांमाझा किशोर ॥ जयद्रथेंदिधलालत्ताप्रहार ॥ धिक्‌गांडीवधिक्‌तूणीर ॥ धिक्‌यदुवीरपार्थपैं ॥ ६७ ॥ यावेगळाअपारिमित ॥ धर्माच्याशोकासिना हींअंत ॥ तोंव्यासआणिब्रह्मसुत ॥ नारदस्वामीप्रगटला ॥ ६८ ॥ सर्वां चेंहीसमाधान ॥ करीसत्यवतीहृदयरत्न ॥ ह्मणतीसुभद्रेतूंसुजाण ॥ भ गिनीहोसीसर्वोत्तमाची ॥ ७० ॥ वीरपत्नीवीरजननी ॥ वीरकुमारीयदु वीरभगिनी ॥ अभिमन्युपडलासमरांगणीं ॥ शोकनकरींतयाचा ॥ ७१ ॥ ऐकेंधर्माभीमार्जुना ॥ शोककारितांकोण्याकारणा ॥ हेअवघीब्रह्मांडरच ना ॥ लयाजाणारकल्पांतीं ॥ ७५ ॥ संसारहेंदीर्घस्वप्न ॥ जाजावती मीमाझेंह्मणोन ॥ सावधव्हाउघडानयन ॥ निजसदनविचारा ॥ ८० ॥ असोव्यासेंसांगोनिबहुतकथा ॥ सावधानकेलेंकुंतीसुतां ॥ नारदआणि श्रीशुकपिता ॥ अंतर्धानपावले ॥ ८१ ॥ सुभद्रेसीह्मणेपार्थ ॥ उद्यांवधी नजयद्रथ ॥ कौरवदळसमस्त ॥ तृणवतजाळीनपैं ॥ ८२ ॥ हेंजरीनव्हे माझेनीं ॥ तरीवृथाप्रसवलीपृथाजननी ॥ लाजलागलीकुरुवंशालागुनी ॥ कृष्णदास्यव्यर्थगेलें ॥ ८३ ॥ कोठेंपडलारणींबाळ ॥ तोपहावयापार्थघन नीळ ॥ निघतेझालेतात्काळ ॥ निशीमाजीतेधवां ॥ ८४ ॥ रथवेगेंचाल विला ॥ चंद्रज्योतीचाप्रकाशकेला ॥ रणशोधावयानिघाला ॥ पार्थवीर

तेधवां ॥ ८९ ॥ देखतीसौभद्रेंपाडिलेंरण ॥ आश्चर्यकरितीकृष्णअर्जुन ॥
बहुतकेलेंरणशोधन ॥ परीबाळकोठेंनसांपडे ॥ ८६ ॥ तोंमंजुळहरीचेंस्म
रण ॥ ऐकताहोयअर्जुन ॥ हेजगन्निवासमनमोहन ॥ मधुसूदनश्रीहरी
॥ ८७ ॥ अभिमन्याचेशब्दकोमळ ॥ अर्जुनेंबोळखिलेतात्काळ ॥ रथा
रूढपार्थघननीळ ॥ आलेजवळधांवोनी ॥९०॥ सौभद्रेंनेत्रउघडिले ॥ पा
र्थेंआंगधरणीसीटाकिलें ॥ अभिमन्यासीपोटींधरिलें ॥ पार्थेंमांडिलेंशोका
तें ॥ ९१ ॥ अरेमाझियासुकुमारा ॥ बाळाअभिमन्यासुंदरा ॥ मजवांचू
निराजकुमरा ॥ कांआलासीयेस्थळीं ॥ ९२ ॥ तैंपार्थाचीयेकानीं ॥ ह
ळूचअभिमन्यबोलेवाणी ॥ मीपडलोंघोरधरणीं ॥ याचाखेदमजनवाटे
॥ ९४ ॥ मीनिचेष्टितपडलोंयेथें ॥ मजलत्ताप्रहारकेलाजयद्रथें ॥ तेणेंसर्वां
गतिडकतें ॥ हेंमजदुःखअतिभारी ॥ ९५ ॥ ऐसेंऐकोनवचन ॥ मगसंबो
खीवीरअर्जुन ॥ तुझेंउसणेंघेईन ॥ कांहींखेदनकरावा ॥ ९६ ॥ बारेसकु
मारापरियेसीं ॥ उद्यांजरीनमारीनजयद्रथासी ॥ तरीअग्निकाष्ठभक्षीन
निश्चयेसीं ॥ तुझीचआणअभिमन्या ॥ ९७ ॥ तोंन्यहाळीतकृष्णवदन ॥
मुखींकरीतहरिस्मरण ॥ अभिमन्येंसोडिलाप्राण ॥ श्रीकृष्णआपणपाह
तसे ॥ ९८ ॥ असोपार्थकृष्णेंसंबोखिला ॥ रथींबैसवूनिशिबिरानेला ॥
निद्रानाहींअवघ्यांला ॥ चिंताग्नींतपडियेले ॥ १०० ॥ पार्थेंप्रतिज्ञाकेली
दुस्तर ॥ सिद्धीसपाववोसर्वेश्वर ॥ ऐसेंबोलोनियादेवेंद्र ॥ जाताझालास्व
शिबिरा ॥ १ ॥ केशवासीह्मणेपार्थ ॥ म्यांजेकेलीदृढशपथ ॥ तेतुजवी
णकोणसमर्थ ॥ सिद्धीप्रतीपाववी ॥ ८ ॥ भक्तकैवारियामाधवा ॥ पण
आतांसिद्धीन्यावा ॥ दीनबंधोकरुणार्णवा ॥ ब्रीदआपुलेंसांभाळीं ॥ ९ ॥
काष्ठानबुडवीजीवन ॥ आपणवाढविलेंह्मणोन ॥ पांडवप्रतिपाळकहेंब्री
दपूर्ण ॥ ब्रह्मांडोदरींगाजतसे ॥ ११ ॥ मागीलउपकारआठवतां ॥ पृथ्वी
नपुरेयशलिहितां ॥ विश्वव्यापकाअच्युता ॥ ऋणाईतआमुचातूं ॥ १३ ॥
पार्थाच्यामनींचिंतादेखा ॥ हेंजाणोनिविश्वव्यापका ॥ रात्रींनिद्रानयेवै
कुंठनायका ॥ मगदारुकाप्रतीबोलत ॥ १४ ॥ उदईकअसेनिर्वाणपण ॥
कैसापुरवीलअर्जुन ॥ धनंजयकेवळमाझाप्राण ॥ मजत्यावीणनगमेची
॥ १५ ॥ दारुकाऐकएकवचन ॥ उद्यांसिद्धकरींमाझास्यंदन ॥ चारीघो
डेजुंपून ॥ शैब्यसुग्रीवादिशृंगारीं ॥ १६ ॥ सतेजआयुधेंपरम ॥ शंखच
क्रगदापद्म ॥ वरीठेवूनिउत्तम ॥ सिद्धस्यंदनअसोंदे ॥ १७ ॥ पार्थासीप

डलियाविपरीत ॥ मीतुजदावीनसंकेत ॥ मनोवेगेंआणीरथ ॥ बैसावयाम जतेंऱ्हां ॥ १८ ॥ सोडोनियांसुदर्शन ॥ संहारीनकौरवदुर्जन ॥ ऐसेंसां गोनजगन्मोहन ॥ शयनावरीपहुडला ॥ १९ ॥

---

## वेंचे, शिवलीलामृतांतील.

### ओंव्या.

#### अध्याय पहिला.

श्रोतेंऱ्हावेंसावधचित्त ॥ स्कंदपुराणींबोलिलाश्रीशुकतात ॥ अगाधशिव लीलामृत ॥ ब्रह्मोत्तरखंडींजें ॥ ३३ ॥ नैमिषारण्यींशौनकादिसुमती ॥ सूताप्रतिप्रश्नकारिती ॥ तूंचिदाकाशींचारोहिणीपती ॥ करवींतृप्तिश्रवण चकोरा ॥ ३४ ॥ तुवांपुराणेंबहुत ॥ रामायणभारतभागवत ॥ ऐकवून केलेंतृप्त ॥ परिशिवलीलामृतऐकवीं ॥ ३५ ॥ यावरीव्यासशिष्यश्रीसूत ॥ ह्मणेऐकाआतांदत्तचित्त ॥ शिवचरित्रपरमाद्भुत ॥ श्रवणेंपातकेंसर्वजळ ती ॥ ३७ ॥ सकळजपामाजीजपथोर ॥ ह्मणालजपावाकोणतामंत्र ॥ तरीमंत्रराजशिवषडक्षर ॥ बीजासहितजपावा ॥ ४० ॥ दुजामंत्रशिवपं चाक्षर ॥ दोहींचेंएकाचिफळसाचार ॥ उतरीसंसारार्णवपरपार ॥ ब्रह्मादि सुरऋषीजपती ॥ ४१ ॥ हामंत्रआत्मप्राप्तीचीखाणी ॥ कैवल्यमार्गींचाप्र काशतरणी ॥ अविद्याकाननदाहकब्रह्माग्नी ॥ सनकादिज्ञानीहाचिजप ती ॥ ४८ ॥ शिवमंत्रध्वनीपंचानन ॥ कर्णींऐकतांदोषवारण ॥ उभ्यांच सांडितीप्राण ॥ नलगतांक्षणभस्महोती ॥ ५० ॥ मथुरानामेंमहानगर ॥ यादववंशींपरमपवित्र ॥ दाशार्हनामेंराजेश्वर ॥ अतिउदारसुलक्षणी ॥ ६९ ॥ सर्वराजेदेतीकरभार ॥ करजोडोनिनमितीवारंवार ॥ त्यांच्यामुकुटरत्न किरणींसाचार ॥ प्रपदेंतयाचींउजळती ॥ ७० ॥ मुकुटदर्शनेंकरूनी ॥ कोणीपडलेदिसतीचरणीं ॥ जेणेंसत्तावसनपसरोनी ॥ पालाणिलीकुंभि नीहे ॥ ७१ ॥ उभारिलायशध्वज ॥ जेंविशरत्काळींचाद्विजराज ॥ सा पत्नप्रजाआणिद्विज ॥ चिंतितीकल्याणरायाचें ॥ ७२ ॥ जैसाशुद्धद्विती येचाहिमांशु ॥ तेंविऐश्वर्यचढलेंविशेष ॥ जोदुर्बुद्धिदासीस ॥ स्पर्शनक रीकालत्रयीं ॥ ७३ ॥ सद्बुद्धिधर्मपत्नीशींरत ॥ स्वरूपाशींतुळिजेरति कांत ॥ दानशस्त्रेंदरिद्रसमस्त ॥ याचकांचेंनिवटिलें ॥ ७४ ॥ चतुर्दशवि द्याचौसष्टकळा ॥ आकळीजेंविकरतळींचाआंवळा ॥ जेणेंदानमेघेंनिव

टिला ॥ दरिद्रधुरोळायाचकांचा ॥ ७६ ॥ ज्याचेंबोलणेंअतिमधुर ॥ जें विमेघगर्जेगंभीर ॥ प्रजाजनाचेंचित्तमयूर ॥ नृत्यकरितीआनंदें ॥ ७७ ॥ ज्याचासेनासिंधुदेखोनअद्भुत ॥ जळसिंधुहोयभयाभीत ॥ निश्चयेंअंबरींध्रुवसत्य ॥ वचनेंतेंविनचळती ॥ ७८ ॥ त्याचीकांतारूपवतीसती ॥ काशिराजकुमरीकलावती ॥ जीचेंस्वरूपवर्णीसरस्वती ॥ विश्ववदनेंकरूनियां ॥ ७९ ॥ जेलावण्यामृतसागरींचीलहरी ॥ खंजनाक्षीबिंबाधरी ॥ मृदुभाषणीपिकस्वरी ॥ हंसगमनाहरिमध्या ॥ ८० ॥ शशिवदना भुजंगवेणी ॥ अळंकारांसिशोभाआणी ॥ दशनझळकतीजेंविहिरकणी ॥ बोलतांसदनींप्रकाशपडे ॥ ८१ ॥ सकळकळानिपुण ॥ यालागिंकलावतीनांवपूर्ण ॥ जेंसौंदर्यवैरागरींचेंरत्न ॥ जेंचातुर्यनिधानभूमीचें ॥ ८२ ॥ आंगींचासुवासनमायसदनांत ॥ जिचेंमुखदेखूनिनृपनाथ ॥ नेत्रमिलिंदरूंजीघालीत ॥ धणीपाहतांनपुरेची ॥ ८३ ॥ नूतनपर्णूनआणिलीजाण ॥ अंतरींआकर्षिलेंरायाचेंमन ॥ बोलावूंपाठवीप्रीतीकरून ॥ परितेनयेप्रार्थितां ॥ ८४ ॥ स्वरूपशृंगारजाळेंपसरून ॥ आकर्षिलेंनृपमानसमीन ॥ यालागिंदाशार्हउठोन ॥ आपणचिगेलातिजजवळी ॥ ८५ ॥ ह्मणेशृंगारवल्लीशुभांगी ॥ ममतनुवृक्षासिआलिंगीं ॥ उत्तमफळप्रसवसीजगीं ॥ सर्वेदेखत्याआनंद ॥ ८६ ॥ तंवतेशृंगारसरोवरमराळी ॥ बोलेसुहास्यवदनवेल्हाळी ॥ ह्मणेम्यांउपासिलाशशिमौळी ॥ सर्वकाळव्रतस्थ ॥ ८७ ॥ रावकाममदेंमत्तउदंड ॥ रतिभरेंपसरोनिदोर्दंड ॥ आलिंगनदेतांप्रचंड ॥ शरीरत्याचेंपोळलें ॥ ९१ ॥ लोहार्गळातप्तअत्यंत ॥ तैशीरायाचीतनुपोळत ॥ नृपवेगळाहोऊनपुसत ॥ कैसावृत्तांतसांगहा ॥ ९२ ॥ शृंगारवनविलासिनी ॥ ममत्दृदयानंदवर्धिनी ॥ सकलसंशयटाकोनी ॥ मुळींहूनिगोष्टसांगें ॥ ९३ ॥ ह्मणेहेराजमुकुटअवतंसा ॥ क्रोधेंभरोंनेदीमानसा ॥ मजगुरुआहेस्वामीदुर्वासा ॥ अनुसूयात्मजमहाराज ॥ ९४ ॥ त्यागुरूनेंपरमपवित्र ॥ मजदिधलाशिवपंचाक्षरीमंत्र ॥ तोजपतांअहोरात्र ॥ परमपावनपुनीतमी ॥ ९५ ॥ ममांगशीतळअत्यंत ॥ तवकलेवरपापसंयुक्त ॥ अगम्यागमनकेलेंविचाररहित ॥ अभक्षतितुकेंभक्षिलें ॥ ९६ ॥ मजशिवदयेंकरून ॥ राजेंद्राआहेत्रिकाळज्ञान ॥ तुजजपआणिशिवार्चन ॥ घडलेंनाहींसर्वथा ॥ ९७ ॥ घडलेंनाहींगुरुसेवन ॥ पुढेंराज्यांतींनरकदारुण ॥ ऐकतांरावअनुतापेंकरून ॥ सद्गदीतझालातत्काळ ॥ ९८ ॥ ह्मणे

कलावतीगुणगंभीरे ॥ तोशिवमंत्रमजदेईआदरें ॥ ज्याचेनिजपेंसर्वत्रें ॥ पापेंमहाभस्महोती ॥ ९९ ॥ तेह्मणेहेभूभुजेंद्रा ॥ मजसांगावयानाहींअधिकारा ॥ ममवल्लभाप्राणेश्वरा ॥ गुरूनिर्धारेंतूंमाझा ॥ १०० ॥ तरी यादववंशींगुरुवरिष्ठ ॥ गर्गमुनीमहाराजश्रेष्ठ ॥ जोज्ञानियांमाजिदिव्यमुगुट ॥ विद्यावरिष्ठतयाची ॥ १ ॥ जैसेवसिष्ठवामदेवज्ञानी ॥ तैसाचमहाराजगर्गमुनी ॥ त्यासिनृपश्रेष्ठाशरणजाऊनी ॥ शिवदीक्षाघेईजे ॥ २ ॥ मगकलावतीसहितभूपाळ ॥ गर्गाश्रमींपावलातात्काळ ॥ साष्टांगींनमुनी करकमळ ॥ जोडोनिउभाराहिला ॥ ३ ॥ अष्टभावेंवंदूनित्दृदयीं ॥ ह्मणेशिवदीक्षामजदेई ॥ वदोनिपुढतीलागेपाईं ॥ मितीनाहींभावार्था ॥ ॥ ४ ॥ यावरीतोगर्गमुनी ॥ कृतांतभगिनीतीरायेउनी ॥ पुण्यवृक्षातळीं बैसोनी ॥ स्नानकरवीयमुनेचें ॥ ५ ॥ उभयतांकरूनिस्नान ॥ केलें यथासांगाशिवपूजन ॥ यावरीदिव्यरत्नेंआणून ॥ अभिषेककेलागुरूसी ॥ ६ ॥ दिव्याभरणेंदिव्यवस्त्रें ॥ गुरुपूजिलानृपेंआदरें ॥ गुरुदक्षिणेसिभांडारें ॥ दाशार्हरायेंउघाडिलीं ॥ ७ ॥ तनुमनधनेशींउदार ॥ गुरुचरणींलागलानृपवर ॥ असोनिवंचितीजेपामर ॥ तेदारुणनिरयभोगिती ॥ ८ ॥ श्रीगुरूचेघरींआपदा ॥ आपणभोगीसर्वसंपदा ॥ कैंचेंज्ञानत्यामतिमंदा ॥ गुरुब्रह्मानंदाजेनभजती ॥ ९ ॥ एकह्मणतीतनुमनधन ॥ नाशवंतकायगुरूसिअर्पून ॥ परमचांडाळत्याचेंशठज्ञान ॥ कदावदननपहावें ॥ ११० धिग्विद्याधिग्ज्ञान ॥ धिग्वैराग्यधिग्साधन ॥ वेदशास्त्रव्याकरण ॥ धिग्पठणतयाचें ॥ ११ ॥ जैसाखरपृष्ठासीचंदन ॥ षड्सींदर्वीव्यर्थफिरवून ॥ जेंविमापानेंतांदुळमोजून ॥ इकडूनतिकडेटाकिले ॥ १२ ॥ घाणाइक्षुदंडगाळी ॥ इतरसेवितीरसनवाळी ॥ कींपात्रांतशर्करासांठवली ॥ परिगोडीनकळेतियेची ॥ १३ ॥ असोततेअभाविकखळ ॥ तैसानव्हेतोदाशार्हनृपाळ ॥ षोडशोपचारेंनिर्मळ ॥ पूजनकेलेंगुरूचें ॥ १४ ॥ उभाठाकलाकरजोडून ॥ मगगर्गेंत्दृदयींधरून ॥ मस्तकींहस्तठेवून ॥ शिवषडक्षरीमंत्र उपदेशिला ॥ १५ ॥ त्दृदयाकाशभुवनीं ॥ उगवलानिजबोधतरणी ॥ अज्ञानतमतेचिक्षणीं ॥ निरसोनिनवलजाहलें ॥ १६ ॥ अद्भुतमंत्राचेंमहिमान ॥ राजयाच्याशरीरामधोन ॥ कोटयावधीकागानेघोन ॥ पळतेझाले तेधवां ॥ १७ ॥ कित्येकांचेपक्षजळाले ॥ चडफडोनिबाहेरआले ॥ अवघेचिभस्मझाले ॥ संख्यानाहींतयांची ॥ १८ ॥ जैसाकिंचित्कृशान ॥ प

डतांदग्धकरीकंटकवन ॥ तैसेकागगेलेजळोन ॥ विस्मितमनरायाचें ॥१९॥
गुरूसीनमनकरीनृप ॥ कागकैंचेनिघालेअमुप ॥ माझेंजाहलेंदिव्यरूप ॥
निर्जराहूनीआगळें ॥ १२० ॥ गुरुह्मणेऐकसाक्षेपें ॥ अनेकजन्मींचींमहा
पापें ॥ बाहेरनिघालींकागरूपें ॥ शिवमंत्रप्रतापेंभस्मजालीं ॥ २१ ॥ निः
पापजालानृपवर ॥ गुरुस्तवनकरीवारंवार ॥ धन्यधन्यमंत्रपंचाक्षर ॥
धन्यगुरूदयाळतो ॥ २२ ॥ पंचभूतांचीझाडणीकरून ॥ सावधकेलेंमज
लागून ॥ [१]चाऱ्हीदेहनिरसोन ॥ केलेंपावनगुरुराया ॥ २३ ॥ पंचवीस
तत्वांचामेळ ॥ त्यांतसांपडलोंबहुकाळ ॥ क्रोधह्मैसासुरसबळ ॥ कामवे
ताळधुसधुसी ॥ २४ ॥ आशामनसातृष्णाकल्पना ॥ भ्रांतीभुलीइच्छावा
सना ॥ ह्याक्रूरडाकिनीनाना ॥ विटंबीतमजहोत्या ॥ २५ ॥ ऐसाहाअव
घामायामेळ ॥ तुवांनिरसिलातात्काळ ॥ धन्यपंचाक्षरीमंत्रनिर्मळ ॥ गु
रुदयाळधन्यतूं ॥ २६ ॥ सहस्त्रजन्मपरियंत ॥ मजज्ञानझालेंसमस्त ॥ पा
पेंजळालींअसंख्यात ॥ कागरूपेंदेखिलींम्यां ॥ २७ ॥ सुवर्णचोरअभक्ष
भक्षक ॥ सुरापानगुरुतल्पक ॥ परदारागमनगुरुनिंदक ॥ गुरुदारागमन
महापापें ॥ २८ ॥ मित्रद्रोहीगुरुद्रोही ॥ प्रासादभेदलिंगभेदपाहीं ॥ पंक्ति
भेदहरिहरभेदही ॥ मजपासोनिजाहले ॥ २९ ॥ ब्रह्महत्यागोहत्याधर्मलो
पक ॥ स्त्रीहत्यागुरुहत्याब्राह्मणछळक ॥ निर्दयसाधुनिंदापशुहिंसक ॥
वृत्तिहारकअधस्त्रीगमन ॥ १३० ॥ पुस्तकचोरपक्षीघातक ॥ पाखांडम
तमिथ्यावादक ॥ भेदबुद्धिमार्गस्थापक ॥ मातृपितृघातकजो ॥ ३१ ॥
दुर्बळघातकमार्गघ्न ॥ दीनहत्यारीपैशून्य ॥ तृणदाहकपीडितासज्जन ॥ गो
त्रवधभगिनीवध ॥ ३२ ॥ कन्याविक्रयगोविक्रय ॥ हयविक्रयरसविक्र
य ॥ ग्रामदाहकआत्महत्यापाहे ॥ भ्रूणहत्यामहापापें ॥ ३३ ॥ हींमहा
पापेंसांगितलीं ॥ क्षुद्रपापेंनाहींगाणिलीं ॥ इतुकींकागरूपेंनिघालीं ॥ भ
स्मजाहलींप्रत्यक्ष ॥ ३४ ॥ कांहींगांठींपुण्यहोतेंपरम ॥ तेणेंपावलोंनर
देहउत्तम ॥ गुरुप्रतापेंतरलोंनिःसीम ॥ कायमहिमाबोलूंआतां ॥ ३५ ॥
जपतांशिवमंत्रनिर्मळ ॥ राज्यवर्धमानजाहलेंसकळ ॥ अवर्षणदोषदुष्का
ळ ॥ देशांतूनिपळाले ॥ ३६ ॥ वैधव्यअथवारोगमृत्यु ॥ नाहींकोठेंनगरां
तु ॥ आलिंगितांकलावतीसनृपनाथु ॥ शशीऐशीशीतळवाटे ॥ ३७ ॥ शि
वभजनींलाविलेसर्वजन ॥ घरोघरींहोतसेशिवकीर्तन ॥ रुद्राभिषेकशिव

---

१ स्थूळ–सूक्ष्म–कारण–लिंग–हे चार देह.

पूजन ॥ ब्राह्मणभोजनयथाविधी ॥ ३८ ॥ दाशार्हरायाचेंआख्यान ॥ लिहितीपढवितीकरितीपठण ॥ प्रीतीनेंकरितांग्रंथरक्षण ॥ अनुमोदनदेती जे ॥ ३९ ॥ सुफळत्यांचासंसार ॥ त्यांसिनिजांगेंरक्षीशंकर ॥ धन्यधन्य तेचिनर ॥ शिवमहिमावर्णितीजे ॥ १४० ॥ पुढेंकथारसिकफार ॥ अमृताहोनिसुरससार ॥ ऐकोतपंडितचतुर ॥ गुरुभक्तप्रेमळज्ञानीजे ॥ ४१॥ पूर्णब्रह्मानंदशूळपाणी ॥ श्रीधरमुखनिमित्तकरोनी ॥ तोचिबोलवीविचारोनी ॥ पाहावेंमनींनिर्धारें ॥ ४२ ॥ श्रीधरवरदपांडुरंग ॥ तेणेंशिरींधरिलेंशिवलिंग ॥ पूर्णब्रह्मानंदअभंग ॥ नव्हेवियोगकाळत्रयीं ॥ १४३ ॥

---

# अमृतराव.

मरणकाळ सुमारें शके १६७५.—इ० स० सुमारें १७५३.

### याचे प्रसिद्ध ग्रंथ.

कटिबंध किंवा कटाव. पदें.

### वेंचे.

### कटिबंध रामचंद्रावर.

राजाधिराजरामचंद्रगावाहो ॥ ध्रु० ॥ असितसजलघनघटातशीतनु, पोटावरित्रिवळि, कटावरूनिपितपटासिलपटुनिकटारखोंवि, करपुटांतशरधनु, वोटांतमुदि, मनगटांत, पहुंची, फेटाशिरिंजरिबुटा, अजबबापभेटावयासिबाह्याकोटाळुनिधरितां, वाटेतयासिरामजवळिअसावा, अंकींसततबसावा, नित्यनयनिंदिसावा, कोठेंकिमपीनजावाहो, राजाधिराजरामचंद्रगावाहो.

---

### कटिबंध जीवदशा.

सज्जनहोनिजगुजआपुलेंउमजाना हरिलागिंभजाना ॥ ध्रु० ॥ नऊमास गर्भांतसांपडे, मूत्रमलादिकफारसांकडें, तनुसितोडितिजंतूकीडे, बहुश्रमानेंबाहेरपडे, स्मरणमुळींचेंसर्वविसरला, सोहंकोहंरडूंलागला, दिवसांमासांवृद्धिपावला, क्षणक्षणाअपघातचूकला, धनमदगर्वेंफारदाटला, अहंपणाचापूरलोटला, पांचांविषयांमाजिबाटला, पापाचरणेंमनींकाटला, भलाथाटला, संसारअपार, थोरकारितोकारभार, महालमुलुखजाहागीरइजारा, कमाविसदारी, भारिपसारासावकारी, हत्तीघोडे, सैन्यशीबिका, बापोषा

खकानिंचौकडा, सुंदरवनिताप्रियानवोढा, शाहणपणाचागर्वगाढा, मन सोव्याचाकरीनिवाडा, वाडारंगित, रंगमाहाल, सोनेरीबैठका, जरीभर्जरी तमामऐने, काममुलायम, फिरंगाणी, विल्लोरीफानसें, मिनेगारिकिनखा पीपडदे, खणोखणींरेशमीगालिचे, बागवगीचे, रागरंगामधिंगुंगवेटा, निसंगमोठा, अभिमानाचाचढलाताठा, जारचोरटा, उन्मतखोटा, धर्मांविषयींफारकरंटा, त्याच्यावंधुनिधरल्यावाटा, अग्नीतस्करकरितिचपेटा, आटापीटा, राजदंडऊदंडउदेले, भंडनिघालें, लंडपणेंप्रपंचभोगिलें, परोपरीची, छीथूअवघी, मारामारी,जरबंदकडाकडसोटेमारी, कमचापाठींउडती भारी, यायापरिचेजाचशरीरीं, त्हृदयिंमस्तकींशिळाभारी, वोढवितांजड खोडाबेडी, पायिंरोकडी, प्राप्तदेहुडी, तरीयेइनाकबूलकवडी, अधिकारी घरदारसांवडी, सर्वहिनेलींघोडींपिडीं, उरलीनाहींएकहिकवडी, पहिलीं होतीबिनीवांकडी, शालजोडिलाशेलाजोडी, देवद्विजगुरुतडीतापडी, त्यांसिक्रोधेंफारझडाडी, ईश्वरत्याचीमस्तीमोडी, आतांकैचीउप्परमाडी, देशधडीवरगुढीलागली, दुष्कर्माचींअभ्रेंदाटलीं, पहापहारेडोळेउघडुनि, पुढेंयातनायमलोकींच्या, नानापरिंच्या, जाणुनियेथेंचिकांसावधव्हाना, हरिलागींभजाना.

---

## कटिबंध दुर्वासयात्रा.

दुर्योधनदुर्वासऋषीला, प्रार्थुनिह्मणतोजायनिशीला, अन्नेंनेदीद्रौपदिशीला, तुह्मीपाहिजेधर्मदूषिला, ऐसेंउत्तरऐकुनिकानीं, ऋषीसर्वहीसवेंघेउनी, आलापांडववसतेस्थानीं, दीर्घस्वरानेंहाकमारुनी, तंवतेधर्मभीमार्जुन येउनी, माद्रितनयसहपायनमोनी, स्तवितेझालेतेमृदुवचनीं, धन्यधन्य हेआजचिरजनी, ह्मणेतयांतेंदुर्वासमुनी, पुजनस्तवननकोमजलागुनी, इच्छाएकचिभोजनपानीं, ऐकुनिउत्तर, द्रौपदिमुखपाहातयुधिष्ठिर, हरिकरुणाकर, असतांश्रीवर, अंतर्यामीं, स्नानेंस्वामी, करोनियावेंवोलेधामीं, तंवतेसर्वऋषीश्वरगेले, पांडवतेस्थळिंस्तब्धचिठेले, धर्मराजबंधुप्रतिबोले, कैसेंसंकटआजिउदेलें, तंवतेंद्रौपदि, वृंदावनिंजाउनिवृंदापति, वृंदारकजनवृंदवंद्यजो, वृंदानायक, वृंदावनिंज्यावासनिरंतर, प्रार्थितिसुंदर, दनुजभयंकर, रूपमनोहर, नामचिमुरहर, तेंचिब्रह्मनिर्गुणनिरामय, निर्विकल्पनिःसंगनिरन्वय, निर्भयचिन्मय, व्यक्ताव्यक्तचियेउनिराहे, त्याप्र

तिबाहे, धांवधांववातूंश्रीरंगा, अद्वयरंगा, भवभयभंगा, तूंनिःसंगा, तवप दिंगंगा, उद्धवलीतापत्रयभंगा, पवित्रचांगा, धांवउणिवजोंनपवेआंगा, ऋषीसर्वहीकरितीदंगा, येअव्यंगा, श्रीकरतूंमुनिमानसभृंगा, तुजनह्मणों लघुअथवातुंगा, संगातीततूंअनंगताता, लाभसिसंता, हरिसिअहंता, यो गीसेवितितुजएकांता, योगीतन्मयसांडुनिकांता, स्वरूपशांता, दातात्रिभु वनिंलक्षुमिकांता, युगायुगींअवतारचारित्रें, परमपवित्रें, चाळुनिऐशीली लामात्रें, मच्छकूर्मवाराहनृसिंहा, वामनभार्गवरामाधैर्या, कैटभकदना, तूंरघुवर्या, षड्रिपुनाशनमहाशौर्या, उत्पत्तिस्थितिसंहारकार्या, साक्षी तूंया, पर्यायेंपाहतांनिजनिपुणा, एकवेळदावितूंआपणा, करिंकींकरुणा, कैवारीतूंपांडवप्राणा, ऐशीस्तुतिऐकुनिश्रीहरी, भोजनसांडुनिलवलाहे शीं, खगपाचारी, नयेचिसत्वर, तांतडझालीलगबगमोठी, तोजगजेठी, आलाधांवुनि, द्रौपदिसाठीं, कृष्णापाहुनिअनंदपोटीं, तेंसुखसहस्रानवदे, होटीं, जिवाशिवाशींपडलीगांठी, बाहुनिबोलतकांहोभगिनी, धांवाकेला, सांगावहिला, द्रौपदिह्मणेऋषिस्नानागेला, साठीसहस्रखंड्यात्याला, अन्न पाहिजेत्याअशनाला, याविरहीतसमग्रऋषींला, यास्तवतुजमीप्रार्थिंअ जाला, धर्मराजतोविस्मितझाला, कांहींविवेकनसुचेत्याला, वचनऐकु नीश्रीहरिबोले, माझेआधींप्राणभुकेले, कृष्णेजेऊंघालींवहिलें, तंवतेबो लेसत्वघेतलें, सर्वसाक्षिअसतांकांछळसी, थालीपालथीघातलिपाहीं, अन्नचिनाहीं, मागसिकाई, कृष्णह्मणेतूंपहाहोबाई, तवतेपाहे, स्थाली माजी, स्वल्पाचिभाजी, कृष्णह्मणेमीवहूतराजी, करींघेउनीमुखींघालितां, त्रिभुवनधालें, भावभक्तिसंतुष्टअंतरीं, ममभजकालाहेंपावे, श्रीकृष्णकृष्णे लागींअतिसंकटसमयींपावे ॥ १ ॥

---

## कटिबंध सुदामचरित्र.

श्रीकृष्णेंसुदामजीलासोन्याचीनगरीदिधली, स्वानुभूतत्वदयामधिली ॥ ॥ ध्रु० ॥ ब्राह्मणब्रह्मनिष्ठबहुमोटा, त्याचाप्रपंचहीनकरंटा, मुलेंभुकेनेंक रतीतंटा, घरांतवाजेनकारघंटा, स्त्रीवरवंटा, धैर्याचावरवंटा, मनांतपरवं टानें, पोटवळेंवेंटाळुनिबाहू, कंवटाळुनिकधिकंटाळेना, पुरुषवचनतेंटा ळुनचित्तविटाळूनेणे, नसतांमूठपसाभरदाणे, पतिव्रतातीव्रतानजाणे, कां तातेंएकांतींनेउन, म्लानवदनमृदुबोलबोलिली, केविलवाणेंजीजीस्वा मी, द्वारकेंत, श्रीकृष्णविष्णुगोपाळतूमचाबाळमित्र, चिरकाळनांदतो, ऐ

सेंऐकियलेंहोकानें, त्याचेंतुमचेंदर्शनहोतां, अपारधनदेइलसंमानें, समर्थश्रीहरिसखासुखानें, तुह्मांसिअर्पिलसोनेंवानें, प्रेमेंआलिंगीलजिवानें, तुह्मीकुटुंबीसदाहिनवाणें, कांपतसांदारिद्र्याहिंवानें, हरिभेटतोआर्जवानें, उचितदिसेजीतेथेंजाणें, यापरिब्राह्मणदुबळा, त्याचीअबळा, तेबुबुळातें फिरवुनि, बळानुजप्रभुयदुपतिभेटीसाठींमृदुमृदुवाक्येंवदली ॥ १ ॥ श्रीकृष्णेंसुदामजीलासोन्याची० ॥ सुदामबोलेसाधुस्वभावें, कांतेद्वारकेसजरिजावें, हरिचेभेटिसकायन्यावें, लाजिरवाणेंकायह्मणावें, निष्कामत्वेंत्यासिपहावें, पुण्यश्लोकाअवलोकावें, तेंऐकुनियांक्षमाशीळ, क्षुत्क्षामारामा, श्यामांगीनें, चौठायींयाचनाकरूनियां, चारमुष्टिपोह्यांचेंचूर्ण, चैलखंडचिंध्याजोडुनियां, चौपटपदरीं, लहानशीगांठोडीबांधुनि, चारुमतीनें, चतुरगतीनें, चित्तहरणचैतन्यवृत्तिनें, अहंब्रह्मसिद्धांतरितीनें, पतीपुढेंठेवियलीतीनें, गळतिलकणह्मणुनीतेणें कक्षिपुटींरक्षियली ॥ २ ॥ श्रीकृष्णेंसुदाम० ॥ झाल्यावरिप्रातःस्नान, संध्योपासनदर्भासन, गुंडाळुनियांकुशांगुळीये, कुशस्थळीच्याशुभप्रयाणीं, पाणीपियासिपाणीजोडुनि, अंजलिपात्रमात्रसहाय, यात्राकरूंपंथांतविराग, मनोरथाचासाज, बांधिलामाज, आजयदुराजहरीचा, मुलाजमतिचा, विलाजकैसासलज्जचित्तीं, जातांजातांवाजनहोतां, गरीबनवाजमाधवजीची, दुरूनिद्वारकादेखिली ॥ ३ ॥ श्रीकृष्णेंसुदाम० ॥ चरतीकामधेनुखिल्लारें, सुवर्णरत्नखचितधवलारें, फुललींकांचनमयकल्हारें, कौतुकरचिलेंहरिमल्लारें, समुद्रवलयितमलयमेरुसम, निलयहरीचें, प्रलयसंपल्याकुवलयउगवे, करुणालवाल, यादवप्रवाल, वल्लीभलीउगवली, कृष्णघनकल्पद्रुमफळली, कोमळतासत्वेंपालवली, मुक्ताफळेंचौदेशींस्रवलीं, अमृतफळेंनम्रत्वेंलवलीं, सोमवंशतेजेंटवटवलीं, स्थैर्यमंडपावरिसांठविलीं, यद्वासंतवसंतभेटतांशांतीलवली, धवलीभूतप्रभाउद्भवली ॥ ४ ॥ श्रीकृष्णेंसुदाम० ॥ जाल्याहातपायांच्यानळ्या, नाडीवरदिसतीवेगळ्या, सुकलेंमासपडल्यावळ्या, नखींवेष्टियल्याआंगोळ्या, उपवासेंचिरकाळेंजालीं, सरकाळेंअंगाचींवाळुनि, देहतपेंजालासेजर्जर, उभाअस्तिचाकेवळपंजर, तोभूनिर्जर, निगमगर्भकृशदुर्भरबोटीं, दर्भपवित्रपवित्रसदामुखीं, ब्रह्मसूत्रासितसूत्रगळांपरि, निबरदोडका, तेंविरोडका, धर्मजोडका, जवळीनाहींतथापिअडका, अडकाठीनकरितां, तीनदेवड्यावोलांडुनियां, चवथेंमुक्तद्वारहरीचें, वेंघतांचि

देखिलाहरीनें, लगबगलगबगअंकींरुक्मिणि, वसलीतेपर्यंकींलोटुनि, उडीटाकुनी, धांवतधांवत, ब्राह्मणचरणीं, मिठीघालुनी, दंडवतानें, उठींउठीं ह्मणतांचिसुदामा, चहूंभुजांनींकडकडोनिआलिंगुनीप्रेमेंबाष्पवारितेंलोचनस्पंदनें, काडियेघेउनि, नाचतनाचत, पूर्तिनव्हेप्रिय, मूर्तिद्विजाची, निजासनींवैसविली ॥ ५ ॥ श्रीकृष्णेंसुदामजी० ॥ ब्राह्मणवैसविलापर्यंकीं, त्याचेचरणमळियलेपंकीं, तेठेवुनियांआपुलेअंकीं, शंकितमतिनाहींद्विजरंकीं, जिंकितकेवळ, अंकितसाआकळीलपंकज, अंकुरहस्तें, शंकरसमान, शंकरसुदाम, भूदेवाचे, पायचूरले, जानूजंघाप्रपदेंअतिकठोरभगळाअगळानखमातीसहीततेसावरिले, हळुहळुपदतळ, कुरवाळुनियां, कंटकहारिले, सुगंधशीतळ, जळरखुमाई, कांचनपात्रें, अंचळवस्त्रें, पुसोननिश्चळ, हृदयींधरिले, नेत्रिंलाविले, मुकुटकाढुनी, मस्तकिंवरिले, चंदनचौकी, वरिविस्तारें, क्षणक्षणाअवलोकुनिप्रेमें, बहुआदरिले, स्वागतसुखशब्दांहींभरिले, धन्योहंकृतकृत्यमतीनें, मस्तकिंधरिले, चरणोदकसहकुटुंवसेवुनि, दांडेवांसिस्तंभासिंपिले, नवकेशरघनसारमलयपाटीरघनरसें, भाळचर्चिलें, ब्राह्मणचरणीं, तनुमनधनसर्वस्वअर्पिलें, दशांगगुग्गुळ, धूपयूपसम, तुळयवर्तिका, सूपसुविस्तर, दीपमाळिका, भूपलाविले, अमूपमर्घ्यें, भूपविप्रवर, रूपदिव्यभर, पूरदिव्यकर्पूरदिवेबहु, घवघवघवघवपरिमळवाहे, वक्रकरंज्या, स्वच्छफेणिया, पंचखाद्यनैवेद्य, दुग्धदधि, वाद्यपुरस्कर, गद्यपद्यअनवद्यसदयशुभ, नद्यजलाशय, मधेंमधेंपाणियासहित, श्रीआद्यहरीनें, नैवेद्यसमर्पण, करावयाब्राह्मणापुढेंत्या, भरुनिपराता, त्वराकरुनियां, पृथक्पात्रेंनिवेदिलीं ॥ ६ ॥ श्रीकृष्णेंसुदाम० ॥ कृष्णेंवृत्तिकरुनपांगोळी, आपुलीवागवूनिआंगोळी, घालुनिमोत्यांचीरांगोळी, करवीब्राह्मणासिआंघोळी, चौकनाहाणविहिणीचेंतैसें, ब्राह्मणश्रीबहिणीचेंहिरवे, नवेकेळिचेखांबकोंवळे, लांबलांबसह, इक्षुदंडवरि, मंडपसाखर, निंवोळ्यांचे, घोंसपोसले, लालदुरंग्या, नारंग्यासारंग्यालटकती, द्राक्षांचेघडपिकलेरसाळ, मुक्तलोंबती, मधुपझोंवती, पारिजातवारिजातनयन, शुभ्रचांदवे, तयांतखुलले, कमलफुलारे, विठावाइनें, इठाणसोडुनि, ठाणवयालखलखितरोंवल्या, नवरत्नांच्याचौरंगावर, श्रीरंगानें, झुलतविप्र, सुप्रसन्नवैसविला, पीतांवरपडदणीसखंबाइतिनेसविला, दीनवंधुनेंसुगंधराय, चमेलीवरिचांपेलभुजाचा, पेलदेउनी, बेलफुलेलबुक्याचें

उटणें, कृष्णहस्तिचेंउष्णउष्णजळ, मधेंमधेंकर्पूरवीटिका, वाजंत्र्यांचाबाजा, त्याफुलवाजा, नळेहवया, हातनळेचंद्रजोतिसुटती, मखरींघागरमाळालोंबती, घंटाघणघणभोंवत्याभोंवत्या, फिरतिबायका, अष्टनायका, द्वारावतिचे, कृष्णरावजी, त्याचेबंधुवडिलभाउजी, महासाउजी, जडावाचिया, खडावांतहळु, हळुहळुचपायदेउनि, क्षीरोदकपरिधानसुधाकर, उंचदुशालखुशालसमोर, मशालअतिविशाल, त्यांतुनसुदाममूर्तिमाजघरांतभोजनाप्रतिचालयली ॥ ७ ॥ श्रीकृष्णें० ॥ मांडुनस्वस्तिकसुवर्णपाट, अडणीवरसोन्याचेंताट, भोंवताफळशाखांचाथाट, कांठींवरणापिंवळेंदाट, मीठमिरेंवरि, आलेंलिंबू, तूतियाखोबरें, किसूनकोशिंबीरसुंदर, अम्लरायतें, रुचिरआयतें, कोमळआंगी, सगळींवांगीं, आणिकारलीं, मेथीपोथीबोंथींकेळें, कोथिंबिरहाळदीसहीत, काथीताथीसाईचरुसह, चुकाचाकवत, चवळीविवळी, कवळ्याशेंगा, चानकुरादळचिरुनिचांगलें, चमचमीतफोडणी, चरारीतशी, चारोळ्यांचेंसांभारें, मउचिमणींबोंडें, चारपानचिचोळींतोंडें, कोहाळाकाशीफळकांकडीकुहिर्या, कमळकंदकोंवळीकाचरीयादुग्धभोंपळे, दिव्यदोडके, वालवाळके, शेंगासुरण, अरुवारपडवळें, पडोळीतोंडलींकाटण, कंदमुळेंफुलपत्रतरु, वेलमात्रघृतपाचितशाखा, वडेनसति, वावडेसारआवडे, कोरवडेपापडबीजवडे, शिऱ्यासगटगटपुऱ्यासांजोऱ्या, काचोऱ्यामालत्यादेटवे, शुभ्रवोटवे, साखरशेवया, सरसहीतशीतपायसलुचया, मांडेपांढुरवर्णपोळिया, घृतेंघोळिल्या, द्विजेंगीळिल्या, धिरडींभाजुकसाजुकनाजुक, राजसवाणे, कानवलेदेखुनमानवले, साखरफेण्या, घिवरघारगे, मोतीचूर, जिलब्यादळया, देतअनुमदे, घमघमाटअनु, मोदनराहे, भातकेशरी, परमकूसरी, दुग्धदधीघृतमधुरसाखररावजांबभर, पन्हेफुटांचे, मटमटाबहु, मधुरलाबसी, लोणकडेंथिजलेंगाईचें, मधुरसुवासिकतूपचांगलें, वाटीभरएकएकाघरचें, सोळासहस्रघरचेपदार्थ, आलेनिजभाग्येंभोजनीं, अन्नब्रह्मरसानुभवानें, विप्रजेविलाउरलेंमानें, सादरनम्रसमारंभानें, पंचारतिकरितीप्रीतीनें, सहस्रनवगंगेरीपानें, विडाअर्पिलाअतिसन्मानें, कातरुक्मरंगेरीवानें, चिकणसुपारीसोनेंकोनें, लवंगसोनिरीसवंगकेले, वेळाजायफळ, सौवर्णांकित, मोतींभाजुनि, चुनाअर्कनिभ, अर्कवर्कसंपर्कशर्करा, संक्षाळितहस्तेंसेवितांचि, कर्कगुरुसम, गर्कसुदामा, तर्करहितनृपअलर्कतैसा, समाधिशयनीं,

शयनकरुनी, इंद्रभुवनपदसुवर्णपट्टण, आत्मलक्षदक्षणालक्षशत, मूर्तिमंत आगोदरदेवें, त्यासिनकळतांहुंडीकरोनिगांवाचीचगांत्रींपाठविली ॥ ८ ॥ श्रीकृष्णेंसुदामजीलासोन्याचीनगरीदिधली० ॥

## कटाव द्रौपदी वस्त्रहरण.

भगवंतभक्तजनाचेंनिजनामेंसंकटवारी, करुणाकरकृष्णमुरारी ॥ ध्रु० ॥ कौरवसभेसिपांडवनारी, छळितांकोणिनसेसहकारी, तेंव्हांभक्तराजकैवारी, हृदयींआठविलाकंसारी, शत्रुसभेंतअधोवदनें, भयभीतमनें, करुणावचनें, सतीबोलियली, ब्रह्मांडनायका, यदुकुळटिळका, तूंचिबंधुगणगोतआप्तप्रिय, मायबापनिजमित्रसोयरा, जीवप्राणतुजविणयेथमज, कोणरक्षिता, सांगअनंता, कमळाकांता, अनाथनाथा, व्यापकतूंहृदयस्थ असोनी, नजाणशीहेंअतिसंकटदुर्धटवोढवलें, तुजकांनकळे, मजगांजितिहे दुर्जनकोठें, आहेशिनपावशिकेंविजगीं, मजलाअपमानिशियेसययीं, झणि मोकलिशी, मीकवणकशी, मजलागुनिहेगतिपाहिंविचारुनियांमनिं, तूंअसतांशिरींद्रुपदसुता, अतीपुनीता, पांडुसुतांचीहेवनिता,कुरुळिंधरुनिदुःशासनवोढितदुष्टकसा, शिष्टांचेसन्मुख, नष्टकसाझोंबतसेवसना, भीष्मद्रोणा, कर्णविकर्णा, संतसज्जना, दुष्टदुर्जना, देखतमीआंतुडलेंव्यसना, आझूनिकायसरोरुहनयना, माझीकरुणा, नयेचिकांतुजनामस्मरतां, उडिघालुनियां, तांतडिनेंगज, सोडविला, प्रल्हादपरोपरीवांचविला, ध्रुवबाळक अचलपदींवैसविला, उपमन्युकृपानिधिगौरविला, अतिहीनअजामिळ उद्धरिला, उचलूनिगिरिव्रजराखियला, महिमाअसिव्यासमुनीवदला, अजितोपुरुषार्थकसात्यजिला, हरिलौकरियें, कणवाळपणें, गरुडावरिवैसोनरक्षमला, श्रमसंकटनासुनिभक्तवत्सला, दीनदयाळा, परमकृपाळा, धांवगोपाळा ॥ १ ॥ ऐसेंबोलुनियांगुणवती, लावीनिजनयनांचींपातीं, गेलीशरणहरीतेंचित्तीं, मानसअर्पियलेंभगवंतीं, जोसुज्ञसमर्थ, सनातनसर्वोत्तमसर्वेश, सर्वगतसर्वसाक्षीसर्वांतव्यापक, सर्वसखाहृदयस्थसदा, जवळीचअसे, सकळांतवसे, कवणानदिसे, परिकर्मशुभाशुभपाहतसे, अधिकारअसे, फळभोगितसे, हरिदूरिनसे, पळत्याप्रातिहेअपराधअसे, कळतेनकसे, स्वजनास्तवअवतारधरूनि, युगायुगींखळमारितसे, भवसागरींभाविकवारितसे, करुणाघनआजिकायउपेक्षिल, द्रौपदिच्याव

चनांतअसे, प्रगटेनिजपीतपटेंतनुझांकितसे, नेसविलींवसनेंकरिकौतुक, आंसुडितांनिरियाअपवित्रें, वस्त्रांआंतनिघालींवस्त्रें, बहुवर्णीबहुचित्रविचित्रें, कृष्णकरींचींपरमपवित्रें, देखुनिस्तब्धसभेचींनेत्रें, कौरवमानिति युवतिचरित्रें, सज्जनगर्जतिजयजयमंत्रें, लाजरक्षिलीदेवाकिपुत्रें, आकळलाप्रेमाच्यासूत्रें, पाहतिलतेभगिनीचींगात्रें, ह्मणउनिझांकिलिंकरुणापात्रें, लडिवाळेंनकरीपरतंत्रें, कुरवाळीनिजकरशतपत्रें, रक्षितअसतांशंकरमित्रें, तेथेंकायकिजेअन्यत्रें, जालींचकितसमस्तआमित्रें, दिसतीजैसीं निर्जिवचित्रें, मारिलशेवटिंलीलामात्रें, पावनहींभक्ताचींस्तोत्रें, निर्भियलींभवजीर्णितवस्त्रें, तापत्रयेंतयाचींशस्त्रें, श्रीकृष्णकृपेचींक्षेत्रें, रमाकलत्रें, सच्चिन्मात्रें, स्वयेंस्वतंत्रें, तैंचिघातलींनिजप्राप्तीचींसत्रें ॥ २ ॥ निर्भयजालीमनिंपांचाळी, आलाकैवारीवनमाळी, हर्षेंसज्जनवाहतिटाळी, जालेंअतिकौतुकतेकाळीं, दुर्योधनसंकेतेंलवकरि, दुःशासनकरिं, आंसुडितांनिरि, निघतीवसनेंदिव्यपरोपरि, क्षीरोदकजरतारीवारिक, कळसपाकराधावळिगुजरी, सोनसळीचंद्रकळाचवडी, गंगासागरलिंगाची, बहुमुंगिदुरंगीभिंगाची, कितीचिंचपानशेलारकलंदर, बोटधारनामावळितगटी, ताडपत्रमोतेचुरिपातळ, कपिलकल्हाईतमाजबंदीपाटावदुतारी, राजमाहालखारवाफुटाणी, राजावळकरकोटपरकळे, गगनमहालपाचेची बारिक, रुद्रगांठचिंचोरिफुलकडी, खंबाईतसुरपालघटेची, वरिमाणिकचंद्रिकाकशीदी, कुसुंबीचिकदोजीकुरळे, चिरीवनखुले, झुणेतपशिले, रंगितशेले, वनसकटारे, शेंवतीसाडी, खडीखसखसी, तिघडिरुमाली, बिंबबादली, खिचडिगुलाली, छिटेंबंदरी, संगमनेरी, रंगाकिनारी, हंसधवलसुखमाणिकसुधार, कोकिलजास्वनजांबूअतसी, इंद्रगोपकाश्मीरकेतकी, किंशुकचंपकजातदाडिमी, सुमनसाजरी, भडकभरजरी, बहुतबहुपरी, प्रसादवसनें, परमसोज्वळें, भरितपरिमळें, एकाहुनिपटएकअधिकमनिं, तवकधरुनिदुःशासनवोढित, दोहिंकरोंनिकरेंथकलामग, चांचपडेउघडेंनपडेनख, लाजविलेंरिपु, भागविलेंगौरविलीहरिनें, भगिनीअसिदाखविली, अतिअद्भुतलौकिककरणी ॥३ ॥

---

## कटिबंध ध्रुवचरित्र.

प्रथमब्रह्मदेवदेवापासुनि, मुख्यशतरूपास्वायंभु, मनूत्याच्यातनूपासुनि,

प्रियव्रतसुशीलआत्म, निरतदुजालोकभरण, सौख्यकरण, उत्तानचरण, विहितआचरण, श्रीहरिशिशरण, त्यालादोघीस्त्रियातयांमधें, एकप्रिया, सुरुचितिचा, आवडताउत्तमतो, मांडीवरिबसवितेथें, नावडतीसुनीतिति चा, ध्रुवाहिपावे, बसूंधांवे, टाकीअंकींपाय, त्यालावर्जीसावत्रमाय, कलहकारिणीबलाय, मारिशब्दशस्त्रघाय, ह्मणेपोरापरतजाय, वृथावुरिसिकाय, हातोअनधिकारीकाय, तुझावसायाचाठाय, नोहेनोहेनेणेराय, कारेंपुरलाआयुर्दाय, भाग्यदायनसेतूजऐकराज्यसांप्रदाय, हासमुदाय, तोंमदीय, तुलाव्यालीसापत्नमाय, ऐकुनिमोकलुनीधाय, रुदनकरील वायवाय, वायसाचेपरीवाक्यचुंचुसायकांनींटोंचियला, बायकोअपाय रूपबोलतसे, उपायसुकृतआय, पदरिंकरुनिघेव्यवाय, विमुखमुनीसिवाय, नुमजतसेदिव्यईश, दर्शनपर्याय, अंतरस्थजोअमाय, तयाश्रीहरिसीगाय, तूंउरुगायआर्जउनिमानिंएकनिष्ठध्याय, त्याच्याकृपाबळेंमाझेंउदरराजसुतसराय, येथेंयेउनियांसमाय, तेव्हांनृपाजवळिबसेंकदान घडेअंतराय, आधिंसमजअभिप्राय, गायवांसराचेपरीमुलामलाहेचि माय, बोभायजननिमजाचिबराशिकुनिघेईन्याय, नपावसीप्रत्यवाय, पिसिलराज्यदुग्धसाय, हरिरसायणसेविल्याविणव्यर्थचिव्यवसाय, वेगीं अपसरसरमागेंहांहांरेंवेगींअपसरसरमागेंरे ॥ १ ॥ मुलावयतुझेंलहान, तुलालागल्यातहान, उदकनमिळतांचिहान, धैर्यपाहिजेमहान, तुझीबाल्यबुद्धिअसोआतांमजपासींगाहाण, हेंशाहाणपणत्यजोनिसंतपाइंचीवाहाण, होऊनिजेव्हांफिरसितेव्हांदेवभेटल, संशयतुटल, दुःखआटल, सौख्यवाटल, विषयविटल, दुरितघटल, लाजफिटल, कुमतिसुटल, नयनपटलकाटल, पुढेंवाटल, नेत्रयेउनिनेटल, प्रेमदाटल, विठ्ठलरूपाहोयतो, तुझेंमाझेंबरेंहोइल, जाइलदैन्ययेइलभाग्य, देइलदेवध्रुपदमग, सार्वभौमराज्ययेथिल, कथिलजसेंसोन्यापुढें, कथिलकोणस्वहिततुला, शिथिलदेहहोयतोंवरि, मथिलेंपाहिजेनिगमदहीं, आतांसुतातपकरिंकरिंजाईंरेवेगेंरतिधरेंहरिपाईंरे ॥ २ ॥ ऐकुनिमातेचेबोल, दिल्हावनाकडेडोल, पुढेंदऱ्याखोऱ्याखोल, खोलपर्वताचेगोल, कैंचींउदकाचीओल, गोटेमोठेमोठेवाटेमधेंकांटेतेंणेंफाटे, पायवाटेदुःखमहा, जातीउपवासेंझोल, बळेंसांभाळितो तोल, वदनकोमाइलेंअधरसहितसुकलेकपोल, काकपक्षहीअलोल, बहुततपनतपतखडतरजणुवर्षतिविंगोळ, उठतिमृगजलकल्लोळ, येतीउष्णा

च्याअह्या, पाईलाह्या, भाजतीवाह्या, पांघुरणाविनाराह्यालागुनिठावनाहीं, वृक्षकोटरढोल, चित्तवृत्तिहिआंदोलताति, मोलनसेअसेंराज्यमानियलेंफोल, आतांकायकरूंकसेंकरूंकसामलाहरीभेटल, कसादिसलकेंव्हांपाहिन, राहिनपाईंह्मणुनिपरम, आवडिनेंप्रेमभरेंरडेपडेझडेपुढें, धीरवीरपुरुषवरें, सुरतरुसमपरमगुरुवरनारदमुनिदेखियलाहो ॥ ३ ॥ चूर्णिका ॥ रेरेआदिराजवंशावतंसा, स्वराज्यसरोवरवियोगितबालकलहंसा, अंसावरोनिगलितोत्तरीयपुंसा, चौसाचागर्भकंसारीगिंवसावयालागिंधिवसाधरोनिवागतोसिनिश्वसनविरागधिंसा, तरीयेथेंपाहिजेमुख्यअहिंसा, तेंव्हांचिहरिदर्शनेंहोसीलाहिंसा, अंगीकारावीउत्तरमीमांसा, शीर्णपर्णानिलाहारेंशुष्ककरावेंस्वदेहमांसा, संसारदुःखविध्वंसावयालागिंआत्मप्रशंसाविवर्जितपरमहंसाचियापदपांसामाजिसांसारिकजनहितअसावें, केवळविविक्तदेशीं, त्यक्तवासनादुर्वासनारहितमृद्वासनावरीमैत्र्यादिवासनायुक्तहर्युपासनाकरीतबसावें, आब्रह्मादिभुवनभोगींरुसावें, यदृच्छालाभसंतुष्टद्वंद्वातीतविमत्सरपणेंविलसावें, अमानित्वादिसाधनभगवद्गीतेसिपुसावें, अंतर्बाह्यवैराग्यभाग्यामाजियोग्यसदाचरणेंमानसकसावें, दुराग्रहवितंडवादनकरोनिसच्छास्त्रसद्गुरुवाक्यपरिसावें, तार्तीयभागउर्वरितउठावें, निरलसपणेंचित्तठसावें, ब्राह्ममुहूर्तापासूनिशय्यासनस्थपर्यंतनित्यापरोक्षपरब्रह्मवस्तुआपणअनुभवुनिब्रह्मरंध्रींसहस्त्रदलपंकजींसद्गुरुध्यानमानसपूजनअजपाजपनिवेदनानंतरप्रातःस्नानसंध्याब्रह्मसनातनजपकरोनियथापद्धतीवैदिकतांत्रिकमिश्रितपरमेश्वरार्चनआरंभावें, ऐसाबहुबहुप्रकारेंसज्जनसांप्रदायेंशिक्षिला, मगदीक्षाधिकारार्थपूर्णकृपाकटाक्षेंलक्षिला, वरदपद्महस्तेंमस्तकस्पर्शिला, दक्षिणश्रवणींलागोनिश्रवणमनादिइंद्रियांसिनकळतांप्रणवसहितद्वादशाक्षरवासुदेवमंत्रउपदेशिला, तोआत्मषट्कोपनिषदोक्तस्वात्योदकबृहत्बिंदुश्रवणशुक्तिपुटींप्रवेशला, तोअहमादिवासुदेवस्वतःसिद्धपहिलेंचिप्राप्तिवत्प्राप्तिमानुनिकृतकृत्यराहिला, कंठगतचामीकरवत्गुरूपदिष्टआदर्शदर्शनेंलाभला, अपरिहार्यउपकारकर्ताब्रह्मपुत्रदेशिकरायप्रदक्षिणोनिनमस्कारिला, यानंतरप्रचीतिपावला, असतांसगुणसाक्षात्कारार्थमधुवनींचालेला, तेथेंभगवत्सांनिध्यजाणोनिप्रशस्तकालिंदीतटींस्थिरजाहला ॥

---

## कटाव गणपतीचा.

आनंदेंवंदावागणनायकतो, मंगलदायकतो ॥ ध्रु० ॥ मुंडमथनकरिजन निजनकनिज, रुंडमालधर, अमळकुंडतो, तृतीयनयनपरि, तनयविन यविभु, वक्रतुंडजेथें, धुंडिराजकारिं, शुंडसरळमुनि, धुंडितिजानिंर्वानिं, झुं डनिकाबहु, विकटतुंड, गणपुंडरीक, मणिहारप्रलंबित, कुंडलीशकटि, बं धतनूद्भवपुंडदमन, मणिकुंडलश्रुतियुगिं, गंडस्थळिंअळि, चंद्रखंडधर, गु णगणमंडित, कीर्तिअखंडित, खंडदुरितचय, पंडितगामिनि, तांडवकरिजो, पद्मभवांडीं, मंडलाकृति, चंडपराक्रम, वितंडखंडन, विपक्षदंडन, स्वभक्त मंडन, सुरवरमुनिवर, सकलचराचर, पावनकरिनिज, प्रसाददेउनि, पु रविमनोरय, मंगलदायक, विघ्नविनाशकतो ॥ १ ॥ परमकृपालय, भा लविलसदलि, मालदानरस, पानकरितिकलि, कालकांपति, परनिर्दाळ ण, करितसमरिंजो, पालनकरिसुरचालकत्रिभुवनिं, शंभुबालभव, जाल तेचजंजाळ, कटनकरवाल, स्मरणतें, सप्ततालकरिनृत्यसरसतो॥ झुण ४ क्वणितनूपुरें, खुळ ४ वाळेवांकिपदिं, फुं २ करिनागवंधकटिं, लळ ४ ललितकुंडलें, चप ४ न्यस्तपाउलें, किणि ४ क्षुद्रघंटिका, दण ४ उठवि मंजुरव, गुं ४ भ्रमरगुंजती, खण ४ तालवाजती, धिद्धिद्धिलांगमृदंगरव मृदु, धिमि २ किट, थ ४, थरिकिटथरिकिट, सरिगमपधनी, निधपमग रिसा, सप्तस्वरमुखिं, भेदअलापित, स्वरवर्तुनियां, वेष्टनसंगीत, तननं २ रागरागिणी, ध्रुपदत्रिवटगति, गद्यपद्यविभु, त्द्दद्यसद्यकारि, प्रबंधनि बंध, जगनगलगबग, विसरुनितटस्थ, मौन्यमुद्रा, धरूनिसादर, समुदाय आइकतो ॥ २ ॥ शूर्पकानविभु, गानसरसकारि, तानमानबंधानयथा स्थित, विमानिंसुरवर, मानवतिमनीं, वर्षुनिसुमनीं, दानवमानव, थक्कि तमानसिं, देहभानानिज, नेणतिकिंनर, कनकवसनपरिधानविराजित, सिद्धिबुद्धिसह, शोभामानतो, सृष्टिस्थितिअव, सानकरिक्षणिं, वरप्र दानदे, प्रधानपुरुषतोसमानजगनग, कीर्तिमानतो, वर्तमानअवर्तमानभ विं, तारीधरूनिअभिमानसुजनीं, अमृतरायकविसदापदानमि, वारणमु खतो, विघ्ननिवारण, स्थिरचरकारण, चारणवर्णिति, त्रिभुवनधारण, उदरिंकारितजो, धर्मस्थापन, आगमाविरचीधर्मविधायकतो ॥ मंगलदा यकतो ॥ ३ ॥

## चूर्णिका.

श्रीशंकरपदपंकजभजनांकितांमाजिअग्रेसरें ॥ मृकंडतपोधनाचियाकुमारें ॥ देहगेहमोहत्यजोनिएकेसरें, सकलविषयविषासमानमानिलेविराग अवसरें, श्रीचंद्रचूडचरणनलिनध्यानाविनानाठवेदुसरें ॥ प्रज्ञेचेनिप्रसरें॥ दंडधरप्रचंडभयमानोनिषोडशवर्षातींगंडसमजोनितांडवाधीश्वराचीअखंडआराधनाआरंभिली ॥१॥ मंदाकिनीजळतिलतंदुलबिल्वदळीं, मंदारकरवीरइंदीवरबकुळीं, श्रीचंदनकेशरकस्तूरिकादिपरिमळीं, भक्तांमाजिपरमबळी, पूजीशांभवलिंग, मानसयोजीधीरअभंग, गर्जुनीनामेंनीटनिःसंग, करुणांभोदशंभोमंगलप्रदअसावें ॥ २ ॥ ऐशियेअवसरींचिन्मयध्यानींतन्मयहोवोनिबैसतांमुनिराजकेसरीतंवजाणोनिआयुष्यअवसानावरी, जैसेंगिरिवरोनिउतरेमहाप्रवाहवारी, तैसेहाकितटाकितगर्जतगर्जत आलेदूतअचाट, गर्जतिजैसेघोरपिसाट, पाहतिपूजापूर्तीचीवाट, तोंमुनिझालाशंकरभाट, वर्णुनिहाजीमुनिजनकाजीमीभयवाजीयेवोनिप्रार्थितोंहरहरा, निजनिटिलनयननिर्गतज्वलनज्वालाभस्मीकृतस्मरा, तांडवावसानसंभ्रमतूंजटाधरा, पाहिमांपाहिमांशंभो ॥ ३ ॥ ऐसीऐकोनीदीनवाणी, श्रीमत्पिनाकपाणी, लिंगापासुनिउठला, नृसिंहेंप्रल्हादापरीरक्षिला, चिरंजीवचिरंजीवह्मणोनिसंबोखिला, तोनित्यानंदाशिवपादपंकजींरतला ॥ ४ ॥

---

# महीपति बावा.

सुमारें शके १७००. इ० स० सुमारें १७७८.

### याचे प्रसिद्ध ग्रंथ.

भक्त विजय शके १६८४. भक्तलीलामृत.
संतविजय. संतलीलामृत.
कथासारअमृत.

### वेंचे, भक्तविजयांतील.

### ओंव्या.

### अध्याय पहिला.

जयजयभीमातीरविहारा ॥ भक्तवत्सलारुपासागरा ॥ व्यापूनियांचरा

चरा ॥ अससीनिराळासर्वातीत ॥ १ ॥ गणेशसरस्वतीरूप ॥ तूंचिनट
लासीअनेक ॥ ह्मणउनिसारजाविनायक ॥ ग्रंथारंभींनमियेला ॥ २ ॥
आतांनमूंमहाकवी ॥ व्यासवाल्मीकमुनिभार्गवी ॥ शुकनारदउशनाक
वी ॥ जयमुनीआदीनमिले ॥ ३ ॥ आतांनमूंसंतसज्जन ॥ जेहरिसीआव
डतीजीवाहून ॥ कलियुगींअवतारधरून ॥ जडअज्ञानतारिले ॥ ४ ॥ न
मूंसद्गुरुतुकाराम ॥ जेणेंनिरासिलाभवभ्रम ॥ आपुलेनामींदेऊनिप्रेम ॥ भ
वबंधननिवारिलें ॥ ५ ॥ आरंभिलाभक्तविजयग्रंथ ॥ हासिद्धिपाव्वावा
तुह्मीसमस्त ॥ जेदुर्बळाघरींमांडतांकृत्य ॥ साहित्यश्रीमंतकरिताती ॥६ ॥
कींडोळसअसतांकृपाघन ॥ अंधासिहिंडवीतीर्थाटन ॥ तेंवितुह्मीकृपादा
न॥ सरतीवचनेंकरावीं ॥ ७ ॥ मंदमतीमीअज्ञान ॥ नाहींकेलेंकाव्यपठण॥
नाहींपाहिलींग्रंथपुराणें ॥ नेणेंभाषागीर्वाणी ॥ ८ ॥ परंतुयेथेंअसेपरी ॥
जेभक्तचरित्रेंआवडतीहरी ॥ ऐसेंबोलिलात्रिपुरारी ॥ भविष्योत्तरपुराणीं
॥ ९ ॥ ह्मणऊनिधिवसाचित्तीं ॥ मजउपजलीअतिप्रीति ॥ चंचूनेंटिटवी
अपांपती ॥ कोरडाकरीनह्मणतसे ॥ १० ॥ ज्याहरीचेवर्णितांगुण ॥ श्रु
तीसिपडलेंअतिमौन्य ॥ शेषाच्याजिव्हाचिरल्याजाण ॥ केलेंआंथरुण
आंगाचें ॥ ११ ॥ ब्रह्माइंद्रआणिहर ॥ हेहीनेणतीज्याचापार ॥ तेथेंमी
कायपामर ॥ गुणवर्णावयातयाचे ॥ १२ ॥ बाळकेंअघटितघेतलीआळ ॥
मातापुरवीतात्काळ ॥ तैसातोदीनदयाळ ॥ आळमाझीपुरवीलकीं ॥१३॥
मागेंसंतवरदानी ॥ एकनाथबोलिलेरामायणीं ॥ तैशींमाझींप्रसादबोल
णीं ॥ वरदवाणीनसेकीं ॥ १९ ॥ नामदेवमुक्तेश्वरांनीं ॥ भारतींवर्णिलाच
क्रपाणी ॥ तैसींमाझींप्रसादबोलणीं ॥ वरदवाणीनसेकीं ॥ २० ॥ श्रीभा
गवतींटीकावामनी ॥ हरिविजयकेलाश्रीधरांनीं ॥ तैसींमाझींप्रसादबोल
णीं ॥ वरदवाणीनसेकीं ॥ २१ ॥ बोधराजरामदासानीं ॥ गीतींआळ
विलाकैवल्यदानी ॥ तैशींमाझींप्रसादबोलणीं ॥ वरदवाणीनसेकीं ॥२२ ॥
मीमतिमंदअसतांजाण ॥ निजभक्तांचेवर्णितांगुण ॥ कृपाकरीलरुक्मिणी
रमण ॥ भक्तभूषणकृपाळू ॥ २९ ॥ उपजलोंजयाच्यागोत्रींजाण ॥ तया
वसिष्ठासीसाष्टांगनमन ॥ तेहीआपुलेकृपेकरून ॥ ग्रंथसिद्धीसपाववितील
॥ ३० ॥ आतांनमूंमातापिता ॥ जेसकळतीर्थांसीवरिष्ठता ॥ ज्यांचेनि
नरदेहतत्वतां॥ लाधलाअवचितानिजभाग्यें ॥३१॥ आमचेकुळींचेंदैवत॥
उभयपक्षींश्रीरुक्मिणीकांत ॥ तयासनमितांदेवतासमस्त ॥ तृप्तहोतीनि

र्थोरें ॥ ३२ ॥ तोबुद्धिदाताचक्रपाणी ॥ जैशीवदवीलकवित्ववाणी ॥ तैं सादरहोऊनिसंतसज्जनीं ॥ परिसावेंश्रवणींनिजप्रेमें ॥ ३६ ॥ ह्मणाल निजबुद्धीनेंत्वरित ॥ आपुलेचिमतेंरचिलाग्रंथ ॥ तरीतैसेंनव्हेनिश्चित ॥ विकल्पचित्तांतनधरावा ॥ ३७ ॥ तरीउत्तरदेशींसाचार ॥ नाभाजीविरंचीचाअवतार ॥ त्यानेंसंतचरित्रग्रंथथोर ॥ ग्वालेरभाषेंतलिहिलाअसे ॥ ३८ ॥ मानदेशींउद्धवाचिद्घन ॥ त्यांनींभक्तचरित्रेंवर्णिलींजाण ॥ दोहींचेंसंमतएककरून ॥ हाभक्तविजयग्रंथआरंभिला ॥ ३९ ॥ श्रीभीमातीरवासीरुक्मिणीरमण ॥ त्यानेंदिधलेंआश्वासन ॥ ग्रंथप्राकृतवदविलागहन ॥ तोपरिसासज्जननिजप्रीति ॥ ४० ॥ बाळकबोबडेंबोलेवचन ॥ परीमाताचोजकरीऐकोन ॥ तैसेंमाझेंआरुषभाषण ॥ अंगीकारालवाटतें ॥ ४१ ॥ कींगंगेसीओहळगेलाजाण ॥ तिनेंकेलाआपुल्यासमान ॥ तेंवितुमचेकृपेनेंसरतींवचनें ॥ होतीलऐसेंवाटतें ॥ ४२ ॥ कींकस्तूरींतमृत्तिकागेलीमिळोन ॥ मोलाचढलीतिजसमान ॥ तैसेंचमाझेंप्राकृतभाषण ॥ करालमान्यवाटतें ॥ ४३ ॥ कींदुग्धांतपडलेंकिंचित्जीवन ॥ पयेंकेलेंआपुल्यासमान ॥ तेंवितुह्मांसींसलगीकारितांजाण ॥ सरतींवचनेंहोतीलकीं ॥ ४४ ॥ तुह्मीसंतईश्वरमूर्ती ॥ ऐसानिश्चयदृढचित्तीं ॥ ह्मणोनियांमहीपती ॥ नमनकरीसद्भावें ॥ ४६ ॥

---

## एकनाथचरित्र.

### भक्तविजय, अध्याय ४५.

त्याभानुदासासपुत्रसद्गुणी ॥ त्याचेंनांवठेविलेंचक्रपाणी ॥ तोपरमभाविकवैष्णवज्ञानी ॥ श्रीहरिभजनींनिमग्न ॥ १० ॥ त्याचापुत्रसूर्यनारायण ॥ जोज्ञानप्रकाशेंदैदीप्यमान ॥ त्याचीकांतासुलक्षण ॥ नांवरुक्मिणीतियेचें ॥ ११ ॥ तेनिजउदरींप्रसवलीसुत ॥ नामतयाचेंएकनाथ ॥ तोजगद्गुरुअवतरलासाक्षात ॥ परिसाचारित्रतयाचें ॥ १२ ॥ तोदिवसेंदिवसजाहलाथोर ॥ व्रतबंधलग्नकेलेंसत्वर ॥ मायबापेंतयावर ॥ कृपाअपारकरिताती ॥ १३ ॥ तेथेंजनार्दनपंतसुज्ञानराशी ॥ दत्तात्रेयदर्शनहोतसेत्यासी ॥ एकनाथउठोनिएकेदिवसीं ॥ गेलेदर्शनासीतयाच्या ॥ १४ ॥ आंगडेंटाकोनीमस्तकावरी ॥ सद्भावेंतयासीनमस्कारकरी ॥ जनार्दनेंदेखोनितेअवसरीं ॥ विस्मितअंतरींहोतसे ॥ १५ ॥ ह्मणेतूंकोण

चासांगत्वरितें ॥ कशास्तवआलासीयेथें ॥ जनार्दनसंबोखूनहातें ॥ वृत्तांतपुसततेधवां ॥ १६ ॥ कींटाकोनिमातापितयांसी ॥ रुसोनिआला सीआह्मांपासीं ॥ हेंयथार्थसांगावेंमजपासीं ॥ संकोचमानसींनधरितां ॥ ॥ १७ ॥ मगजोडोनियांदोन्हीकर ॥ एकनाथबोलेमधुरोत्तर ॥ ह्मणेमीऋग्वेदीब्राह्मणकुमर ॥ दर्शनासाचारपातलों ॥ १८ ॥ मायबापां वरीनरुसतां ॥ उगाचिअनुतापवाटलाचित्ता ॥ कींदेहींजडलीप्रपंचमम ता ॥ कामक्रोधेंचित्तागांजिलें ॥ १९ ॥ लोभमायादंभअहंकार ॥ हेदेहींदिसतीअनिवार ॥ ह्मणोनिस्वामिदर्शनासीसत्वर ॥ आलोंसाचार निजप्रेमें ॥ २० ॥ आतांहेचिइच्छाआहेमानसीं ॥ निरंतरराहावेंतुह्मां पासीं ॥ सेवाकरावीअहर्निसी ॥ निजभावेंसीआवडी ॥ २१ ॥ मीपती तशरणआलोंपाहें ॥ अंगीकारकरींसद्गुरुमाये ॥ ऐसेंबोलोनिलवलाहें ॥ धरिलेपायसद्भावें ॥ २२ ॥ एकनाथाचेंऐकोनिवचन ॥ आश्चर्यकरिती जनार्दन ॥ ह्मणेवयतोदिसताहेलहान ॥ परिविशाळज्ञानअनुपम्य ॥ २३॥ मगजनार्दनेंअभयदेऊनत्यासी ॥ ह्मणितलेंसुखेंअसावेंआह्मांपासीं ॥ हेंवचनऐकोनिमानसीं ॥ उल्हासचित्तासीवाटला ॥ २४ ॥ जैसा द्वैपायनपडतांसंशयवनीं ॥ तयासीभेटलानारदमुनी ॥ तेंविजनार्दनाचे अभयवचनीं ॥ एकनाथमनींसंतोषले ॥ २५ ॥ स्वामीसेवेसीनिरंतर ॥ अहोरात्रअसेतत्पर ॥ कोणेविशींनपडेअंतर ॥ भावार्थथोरधरियेला ॥ ॥ २७ ॥ रात्रींनिजतांजनार्दन ॥ स्वकरेंचुरीतबैसेचरण ॥ निद्रालागतां त्याजकारणें ॥ परीनाहींउठणेंसर्वथा ॥ २८ ॥ विडाकरूनानिजहस्तें ॥ सर्वसाहित्यघालोनियांत्यांत ॥ जनार्दनासीहोऊनिविनत ॥ मुखांतघाली निजप्रेमें ॥ २९ ॥ मुखप्रक्षाळावयासीतस्त ॥ निजकरेंपुढेंआणोनिठेवित ॥ स्नानघालोनिआपुल्याहातें ॥ साहित्यदेतपुजेचें ॥ ३० ॥ जेवितांशेष उच्छिष्टराहत ॥ तेंप्रीतीनेंभक्षीएकनाथ ॥ ऐसीसेवादिवसबहुत ॥ असेकरीतनिजप्रेमें ॥ ३१ ॥ हेंजनार्दनदृष्टींसीदेखतां ॥ मगआश्चर्य करितीनिजाचित्ता ॥ ह्मणेमनुष्यह्मणोंनयेएकनाथा ॥ सकळगुरुभक्तां वरिष्ठकीं ॥ ३५ ॥ एकांतपाहोनिएकेदिवसीं ॥ जनार्दनकृपेनंपुसती तयासी ॥ तूंसेवाकरिसिआह्मांपासीं ॥ मायबापांसीनकळतां ॥ ३६ ॥ तुह्मीतोविरक्तदिसतांजाण ॥ घरींपाहिजेवस्त्रअन्न ॥ वडीलवृद्ध दोघेजण ॥ चिंतादारुणकरितीलकीं ॥ ३७ ॥ ऐसेंजाणोनिजनार्द

न ॥ घरींपाठवीतवस्त्रअन्न ॥ वडिलांसिकळतांवर्तमान ॥ समाधान वाटलें ॥ ३८ ॥ जनार्दनविचारूनिअंतरीं ॥ ह्मणेयासिसांगावीकांहीं चाकरी ॥ मगएकनाथासीआज्ञाकरी ॥ हिशोबदप्तरींराखावा ॥ ३९ ॥ तूंतेथेंअसशीलजरीप्रवीण ॥ तरीकळोंयेईलअवघेंज्ञान ॥ मगअवश्यह्म णोनिकेलेंनमन ॥ आज्ञाप्रमाणस्वामीची ॥ ४० ॥ गुरुसेवेसिनपडतां अंतर ॥ हिशोबराखीनिरंतर ॥ जनार्दनह्मणतीहापरमचतुर ॥ कळला विचारमजलागीं ॥ ४१ ॥ तरीकांहींनिमित्यकरूनजाण ॥ स्वरूपींला वावेंत्याचेंमन ॥ एकनाथासीजवळबोलाऊन ॥ ह्मणेहिशोबदाखवणें आह्मांसी ॥ ४२ ॥ पाहोनिखर्डाखतावणी ॥ हिशोबदाखवींआह्मांला गोनी ॥ अवश्यह्मणोनितयेक्षणीं ॥ पुढतीचरणींलागले ॥ ४३ ॥ सेवे चासारोनिनित्यनेम ॥ रात्रींदीपकासीघातलेंभरण ॥ एकनाथआडका राहिलाचुकोन ॥ तोचिधुंडोनिपाहातसे ॥ ४४ ॥ तोकोठेंनसांपडेतयास ॥ ताळानपडेचिहिशोबास ॥ मगएकाग्रकरोनिचित्तास ॥ हिशोबपा हातबैसला ॥ ४५ ॥ क्षणभरीकांहींचनकरीशयन ॥ नमानुनीनिजदेहा चाशीण ॥ तृषालागलीअतिदारुण ॥ परीउदकपानकरीना ॥ ४६ ॥ ह्म णेउपहारकरूनउदकासघेतां ॥ तरीनिद्राआळसयेईलआतां ॥ मग कायसांगावेंगुरुनाथा ॥ विवेकचिंताकरीतसे ॥ ४७ ॥ जनार्दनजागृत होऊनित्वरित ॥ सभोंवतेंविलोकूनजोंपाहात ॥ तोंएकनाथनादिसेतेथ ॥ ह्मणऊनीविस्मितजाहले ॥ ४८ ॥ अंतरगृहींधुंडितांचिदेखा ॥ तोंहिशो बपाहातबैसलाएका ॥ भरणघालोनियांदीपका ॥ धुंडीतआडकानिश्च ळत्वें ॥ ४९ ॥ तोंअकस्मातताळापडतां ॥ हारुषवाटलाएकनाथा ॥ म गआपुल्याचहातेंटाळीपिटितां ॥ दुसरानसतांसन्निध ॥ ५० ॥ मागेंउ भाराहोनितेथें ॥ जनार्दनकौतुकपाहात ॥ मगसन्मूखहोऊनित्वरित ॥ स्वमुखेंपुसततयासी ॥ ५१ ॥ सद्गुरुह्मणतीएकनाथा ॥ कायआश्चर्यवा टलेंआतां ॥ ह्मणउनीहर्षमानुनीचित्ता ॥ हांसलासितूंयेक्षणीं ॥ ५२ ॥ ऐसेंऐकोनियांवचन ॥ वरतेंपाहेविलोकोन ॥ मगसत्वरउभाराहोन ॥ केलें नमनसद्भावें ॥ ५३ ॥ ह्मणेसर्वहिशोबशोधूनपाहतां ॥ त्यांतएकअ डकाचुकलाहोता ॥ त्याचाअकस्माातताळापडतां ॥ उल्हासचित्तावाट ला ॥ ५४ ॥ ह्मणउनीसंतोषपावोनिमनें ॥ हांसेंआलेंमजकारणें ॥ ऐसें ऐकोनिवचन ॥ जनार्दनविस्मितजाहला ॥ ५५ ॥ मगएकनाथासीस

बाहेपाहेतदार्ष्णींतिळसहिततयासोडिजेकांनपाणी ॥ २१ ॥

---

१ लज्जाकारी. २ सुख. ३ देवपणातें. ४ उपभोगातें. ५ जादूतें. ६ स्वीकृत आहे उद्दाम गदा ज्यानें. ७ कृष्णपुत्र प्रद्युम्न. ८ आपली निंदा. ९ धनुष्याची दोरी. १० फुलें. ११ कामानें.

काळव्याळविषाग्निचीचधरिलीजाणोकरींजीभया ॥
मारायातरवारि[1]वारिदनिभादेवाहिदेंजीभया ॥
शत्रूचेंसकिरीटकुंडलशिरच्छेदीक्षणेंहोयज्या ॥
कांहींनश्रमकोमळेंहिखुडितांजैसेंनखेंतोयजा[2] ॥ २२ ॥
जेहोतेउत्सवास्यांनिरखितअमरव्यापुनीअंबरारे ॥
दुष्टांजादुर्गतीतेंह्मणतिनिजपुराजाप्रभोशंबरारे[3] ॥
प्रद्युम्नातूंस्मरस्त्रीरतिबहुदिवसांयुक्तजालाबराहो ॥
हायोगस्वाप्तमूर्तोत्सवाचिनघटिकायावरीलांबराहो ॥ २३ ॥
ऐसाचिप्राज्यनित्योत्सवखळमथनेंसज्जनादेवसेना ॥
शत्रुत्रासत्रिलोकींकरुनियशअसेंहर्षवींदेवसेना ॥
दुष्टांचेंसाधुपीडाकरखरअसिनेंतेरणींबाहुताशीं ॥
व्हावेंद्वेषीपतंगत्वादिषु[4]मुखिंवसोशक्तिजीबाहुताशीं ॥ २४ ॥
गेलेतेंपुष्पवृष्टिस्तुतिकरुनिमुखेंशंबरांतोत्सवासी ॥
पाहोनिप्रेक्षणीयाकृति[5]रतिपतिसिंस्त्रीसखस्वर्गवासी ॥
नेलामायावतीनेंमगगगनपथेंमन्मथद्वारकेला ॥
विद्युन्मेघभ्रमेंचिक्षणभरिकुतुकी[6]तोसुहृद्वार[7]केला ॥ २५ ॥
व्योमापासुनिजेधवांउतरलाअंतःपुरींदेखिला ॥
दारांनींप्रभुच्याक्षणस्वहृदयींतोश्रीहरीलेखिला ॥
शोभाआकृतिवर्णवेषसकळभ्रांतिप्रदस्त्रीसती ॥
लज्जेनेंलपतीमगप्रतिनिधित्वेंतींचत्यांदीसती ॥ २६ ॥
पतिप्रतिनिधिप्रतिप्रभुवरास्त्रियापाहती ॥
तयाचिभंवतींउभ्यापरमकौतुकेंराहती ॥
परस्परअसेंतदावदतिकींकसेंयासये ॥
मुकुंदनिजरूपहेंहरिसजाणवूंयासये ॥ २७ ॥
कृष्णासींजसिरुक्मिणीतसिचहेयासींसुशोभासती ॥
आदर्शीं[8]प्रतिबिंबकींहिनअशींतुल्येंगुणेंभासती ॥

---

१ मेघासारिखी कांति ज्यास. २ कमळाला. ३ प्रद्युम्ना. ४ बाणांत. ५ पाहण्याजोगी आकृति आहे ज्याची. ६ आश्चर्यभरित. ७ सुहृदांचा समुदाय. ८ आरशांत.

ऐसेंबोलतियादवेंद्रयुवतीत्याविस्मितांसन्मती ॥
तींयेतेथपहावयासिउदरींयाचेंजिच्याजन्मती ॥ २८ ॥
वैदर्भीयासपाहेद्रवत्द्दयधरीतत्क्षणींस्तैन्यवाहे ॥
कींतेआनंदलाहेजरितनुजअसेंज्ञातहोणेंचिआहे ॥
बाष्पानेंकंठदाटेसकळतनुवरिक्षिप्ररोमांचथाटे ॥
शोकाचासिंधुआटेत्वरितपरमतद्दर्शनींलाभवाटे ॥ २९ ॥
ह्मणेहाकोणश्रीयदुपतिसमश्रीनरमणी ॥
गमेयापुत्रासप्रसवलिनराचींनरमणी ॥
अशारत्नाचीजीखनिंजनिंतिचाधन्यकुसवा ॥
स्वयेंयाचेंवृत्तप्रियसखिपुसागेनपुसवा ॥ ३० ॥
यालावण्यांबुधीलाअनुसरलिअसेजीअनन्यानईचें ॥
पत्नीचेंभाग्यलोकींअतुळसुकृतजेंमोजवेतेंनईचें ॥
तीधन्याहोयऐसेंविमळउपजलेंरत्नजीच्यांकुशीला ॥
नस्पर्शावीतुलावारुचिरतरतनोद्दष्टिजीकींकुशीला ॥ ३१ ॥
माझाहीपहिलाअनिर्दशशिशूनेलास्वगेहांतुनी ॥
दैवेंहारपलाअनर्घ्यसुमणीजैसापडेहातुनी ॥
तोजीवंतअसेलशंकरदयाधात्रीनिजांकींजरी ॥
वाटेबुद्धिसयेवढाचिमुवयेंझालाअसावातरी ॥ ३२ ॥
देताझालाकृपेनेंवरदसुरमणिस्वद्रुतेंतोकदान ॥
ज्ञानिध्येयांघ्रिपद्मप्रभुहारिलंपुन्हाबाळसातोकदान ॥
दैवेंनेलाह्मणावेंतरिजगदुदयत्राणसंहारशक्त ॥
श्रीकंठाचेकसेतेअशिवनतबळीपंगुगांजीलभक्त ॥ ३३ ॥
हाकेंसंपावलाहेंअसुलभहरिचेंदिव्यसारूप्यशंका ॥
हेमोठीराजयाच्यातनुजनिविणतल्लक्षणप्राप्तिरंका ॥
वाटेमत्पुत्रआलाश्रवणाहितमुखेंवृत्तझालेंअसेल ॥
प्राप्तप्रौढत्वासिंहीतनयनपळहीक्रोष्टृयूथींवसेल ॥ ३४ ॥
घडेलकायहेंआलामत्सुतद्वारकापुरा ॥

---

१ रुक्मिणी. २ दूध. ३ अमूल्य. ४ दाई. ५ कल्पवृक्षास. ६ ज्ञान्यांनीं चिंत्य आहे पदकमळ ज्याचें. ७ थंड आहे गति ज्याची, शनि. ८ जन्म. ९ कोल्ह्यांच्या समुदायांत.

निवेलआलिंगुनित्यासप्सुत्द्वार्कापुरा ॥ ३५ ॥
दिसेयाच्याठायींसहजअधिकप्रीतिंभुजही ॥
स्फुरेडावाआहेविदितह्मणतोरीतितुजंही ॥
मलालम्मापूर्वीप्रियकथनदक्षेंकळविली ॥
स्वयेंकृष्णप्राप्तीस्फुरुनिनिजचिंतापळविली ॥ ३६ ॥
प्रभुप्रियतमाअसामनिंविचारजोंतेंकरी ॥
स्वतातजननीसहत्वरिततेथआलाहरी ॥
कळेपरिनतोवदेकिमपिविश्वसाक्षीधरी ॥
अविज्ञजनरीतिलांतरिंचरित्रतेंउद्धरी ॥ ३७ ॥
जोलोकत्रितयींफिरेस्थिरनसेताटींजसापारद[1] ॥
स्वांतध्येयपदींचनिश्चळभवांभोधींतजोपारद[2] ॥
जोवर्णेंगगनोदरींक्षणदिसेपूर्णेंदुकींशारद ॥
श्रीशांत:पुरचत्वरींचउतरेतोसन्मुनीनारद ॥३८ ॥
नाभिस्थानासिनेणेंमृगहुडकिंजसाघेतरानांतवास ॥
तैसेदोघेंहिनेणांजवळिहित्द्दयींयाधरानातवास ॥
शौरेहावासुदेवात्मजंसुतसुतहादेवकीओळखावा ॥
तोहावैदर्भिजेणंप्रथमचितुजलालागलाबोळखावा ॥ ३९ ॥
वर्णाकारनिरीक्षणंस्मितंगतिंव्याहारहेसांगती ॥
कींकृष्णप्रतिबिंबहानवळखासर्वभ्रमामागती ॥
जोनि:शंकगृहांतयेइतरतोकैसातुह्मीधीरधी ॥
नेणांहेंबळकृष्णकौतुककरालोकांतचिन्हींरधी ॥ ४० ॥
टाकीयासपयोनिधींतहरुनीदुर्बुद्धितोशंबर ॥
ग्रासीमीनअसेसुखेंतदुदरींजैसेंघटींअंबर ॥
दाशांनींदिधलाखळासिझषंतोतत्रापिविश्वंभर ॥
त्राताहोयजयासकायकरितीविघ्नेंतयाशंभर ॥ ४१ ॥
नेत्रेंपाहुनिमीनशंबरधरीतोभक्षणेच्छोंदिला ॥
तेणेंसूदंकरींचपाकसदनींत्यांहींमगच्छेदिला ॥
तोंतोबाळविशाळभाळउगवेआभाळजातांजसा ॥

१ पारा. २ पार देणारा. ३ अंगण्यांत. ४ बोलणें. ५ अनंत बुद्धि ज्यास असे.
६ मासा. ७ स्वयंपाक्याच्या हातीं.

तारापाळकपाचकींनिरखिलेंतेसेंचियाराजसा ॥ ४२ ॥
करीतहोतीतेथेंचनवसांगरतीरती॥पावेत्यापासुनीचिंतानवसागरतीरती ४३
मीनोदरींसांपडलाअकल्पितलहानसा ॥
ओळखेनारतीहेंजोंतोंमीगेलोंमहानसा ॥ ४४ ॥
म्यांसारेंकथिलेंरहस्येंनह्मणेनिद्राशरीरक्षण ॥
स्नेहेंमायतशीरतिस्वपतिचेंतेथेंकरीरक्षण ॥
झालीआपुलिआपणप्रियपरित्राणार्थसासूनती ॥
स्तुत्यर्हापरिगौरवासमुचितेंसासूअसासूनती ॥ ४५ ॥
पावेप्रद्युम्नहातानिजरिपुपतगींवन्हिभावायुवाहे ॥
सद्विद्यानीतिवृत्तस्मरणकरुनिदेतोमहावायुवाहे ॥
सेवायादूरआलीक्रमुनिपथरतीहीपिपासूनद्याहो ॥
पार्जाआशीरसांजेंत्वदभिमतइलाआजपासूनद्याहो ॥ ४६ ॥
प्रद्युम्नावसुदेवरामहरिहेसप्रेमभव्याकुळ ॥
ज्येष्ठाभेटतिहोतिहुंगुनिशिरींबाष्पोद्गमव्याकुळ ॥
तत्पत्नीहिसदारदारकतनुस्पर्शामृतींमज्जना ॥
पावोनीनिवतीनतोषवदवेतोलेशंधीमज्जना ॥ ४७ ॥
जाहलाचिनपरासुकुमार ॥ प्राप्तहोउनिपरासुकुमार ॥
वांचलानवलहानगरांत ॥ प्राज्यदेनवलहानगरांत ॥ ४८ ॥
आलाकाढोनिकांटाअमरत्वदायेंचामन्मथद्वारकेला ॥
होतेंशोकाख्यशल्यस्वजनत्वदुदरींतत्समुद्धारकेला ॥
जोस्वीकारीहरायाविषयरतजगद्भून्मळालाविभूती ॥
दुष्टांसत्रासशिष्टांअभयसुखहिदेप्रेमळांलाविभूती ॥ ४९ ॥
सौंदर्याकरसोहळेपुरविताजोदृष्टिचेंतोरमा ॥
लीलामंदिरज्यानसेचिउपमात्रैलोक्यंचेतोरमा ॥
ऐशाचेंप्रतिबिंबकांनइतरस्त्रीचित्तमोहीलया ॥
मातांचीक्षणनेधृतीनकविच्याधींकेंविंमोहींलया ॥ ५० ॥
मेघाचेंप्रतिबिंबपाहुनिसुखेंनाचोंचिलागेंभुले ॥

---

१ पतिव्रता. २ गुप्त. ३ आशीर्वादाचा रस. ४ बुडणें—पोहणें. ५ बुद्धिमान् जनास.
६ मृत.

मानीसर्वमनोरथद्रुमफळींओथंवलेआपुले ॥
ऐसाभक्तमयूरचातकहिजोनेणेदुजींभावुकें ॥
तोसाक्षात्घनदर्शनींकितिसुखीतेंप्रेमळाठावुकें ॥ ५१ ॥

---

## वेंचे, भागवत दशमस्कंध.

### सज्जनप्रार्थना.

माझाप्रेमासुदामाहरिसखदुबळाशब्दसंदोहजो हे ॥
साधूंपासींश्रुतीनेंपदरपसरुनीजोडिलेस्वल्पपोहे ॥
यादीनोपायनातेंबुधजनभगवान्प्रीतिनेंफारगोडी ॥
आणोनीश्रोत्रवक्त्रींभरिलबहुदयामानुनीतेहिथोडी ॥ १ ॥
नसेतादृक्चेतोहरगुणजरींसाधुतरिया ॥
वरूचूडारत्नींकृतविधुहिजैसाधुतरिया ॥
भलेसद्विद्यांचेनदकरितितेलोभविहिरा ॥
तयांचामीकर्त्याजडहिघडिलाशोभविहिरा ॥ २ ॥
अभयदिधलेंआहेवाहेशुचिप्रतिभाझरा ॥
विधुमणिचियासारातारापकारणपाझरा ॥
जडहिकविताजोडीगोडीगुणींहरिच्याधरी ॥
सहजतुमचाहीनादीनाप्रसादसमुद्धरी ॥ ३ ॥
प्रसादतुमचाकळानिधिहुनीगुणेंआगळा ॥
हरीनतमतोमळानिजसुरद्रुमाचामळा ॥
करीरतसदावळानुजपदींमनाचंचळा ॥
सुखेंचिपुरवीलळासुचिरकीर्तिदेउज्वळा ॥ ४ ॥
श्रीमद्भागवतामृतोदधितुह्मीअर्थज्ञतेमेघसे ॥
आह्मीचातकपाहतोंमुखतृषासंशुष्कज्यांचेघसे ॥
पीतांद्वित्रिकणक्षणींसुखगमेतृप्त्यर्थगाढेंकर ॥
आह्मीचाहिलिहोंशकोचिनअसोतेंग्रंथहाढेंकर ॥ ५ ॥

# रघुनाथ पंडित.

सुमारें शके १७००.

## नलदमयंतिस्वयंवराख्यान.

श्लोक ॥ पुण्यश्लोकनृपावळींतपहिलाहोवोनिजोराहिला ॥ तोराजाअसतांसमस्तमहिलाविश्रांतिशेषाहिला ॥ व्यासोक्तेंअवगाहिलाबुधजनींनानागुणींगायिला ॥ जोनामेंनळतत्कथौघलिहिलातोपाहिजेपाहिला ॥ ॥ १ ॥ आर्या ॥ इंद्रादिकवरअसतांकसीनलसतीचहोयदमयंती ॥ सुंदरसकळवधूतेंकसीनलसतीचहोयदमयंती ॥ २ ॥ दिंडी ॥ कथाबोलूंहेमधुरसुधाधारा ॥ होयशृंगाराकरुणरसाधारा ॥ निषधराजानळनामधेय होता ॥ वीरसेनाचातनयमहाहोता ॥ ३ ॥ चौगुणीनेंजरिपूर्णशीतभानू ॥ नळाऐसातरिंकळानिधीवानू ॥ प्रतापाचाजोनमालवेभानू ॥ तयासमानकोणदुजामानू ॥ ४ ॥ श्लोक ॥ चंद्रासिलागतिकळाउपरागयेतो ॥ गंगेशिभंगवहुपाणउतारहोतो ॥ जेंहोयचूर्णतरिमौक्तिकतेंकशाला ॥ नाहींसमाननळराजमहायशाला ॥ ५ ॥ वाजीचेंमनजाणतासकळहीराजीशिपार्थीजया ॥ याजीहोउनियांद्विजांसिह्मणतोयांजीधनेंध्यावया ॥ त्याजीजोधनदापरीसुकृतजेंत्याजीवऐसेंगणी ॥ गाजीतोनळभूपहूपधरुनींगाजीगुणींच्यागणीं ॥ ६ ॥ दिंडी ॥ लोकबंधूजोहोयरवीऐसा ॥ कुवलयाचाजोसुखदचंद्रजैसा ॥ सांगनोहेतोकुसुमचापतैसा ॥ निषधरायाशींतुल्यरूपकैसा ॥ ७ ॥ आर्या ॥ नाडीज्ञानजयांचें सरोगबंधूचतुष्पदगणावे ॥ सुततेजीतुरंगींचे नळसमसुंदरकदापिनह्मणावे ॥ ८ ॥ श्लोक ॥ कदानेणोंवोढीशरधितुनिकाढीशरकदा ॥ कदाधन्वींजोडीवरिविरिहिसोडीतरिकदा ॥ विपक्षाच्यावक्षावरिविवरलक्षास्तवरणीं ॥ कळेराजेंद्राची त्वरितशरसंधानकरणी ॥ ९ ॥ धालेधनीपुढिलयाचकयानळाचे ॥ येतांफिरोनिसमुदायपथींतयांचे ॥ मागावयासधनमागिलदेखियेले ॥ त्यांहींचतेसकळपूरितकामकेले ॥ १० ॥ दिंडी ॥ अशीअगणितगुणकीर्तिनैष

---

१ गर्वहर्त्री. २ चौषष्टीनें ( चौसष्टकळांनीं युक्त. ) ३ सोळाकळांनीं युक्त पौर्णिमेचा चंद्र. ४ याज्ञिक. ५ अश्विनीकुमार.

धाची ॥ फिरेभुवनत्रयिंजान्हवीचसाची ॥ असेंअसतांद्विजपांचसातयाची ॥ भेटिघेतीवैदर्भराजयाची ॥ ११ ॥ श्लोक ॥ द्वारिंझुलेतगजसंघहिसो ततेजी ॥ गाजीतुलासकललोकअसोतराजी ॥ सोमाभिरामवदनासदनां[1] तरंगीं ॥ क्रीडाकरोतुजसवेंललनापलंगीं ॥ १२ ॥ दिंडी ॥ अशाआशी र्वादासितिहिंकेलें ॥ भीमभूपेंमगतयांबोलिजेलें ॥ तुह्मीआलांकोठूनिअ शाबोलें ॥ द्विजींनिषधापासावह्मणीजेलें ॥ १३ ॥ भीमभूपाळगिराव देऐसी ॥ निषधदेशींनळराजरीतिकैसी ॥ असेंऐकोनीवदातिविप्रत्या सी ॥ विप्रयासींवक्तृत्वयेजयांसी ॥ १४ ॥ श्लोक ॥ हेवामनैकपदभूमिन सोनिजंघी ॥ एकेदिशींचदिनराजनभासलंघी ॥ वार्राशिवानरविलंघित होयतोकीं ॥ लोकींनसेनलयशस्तुलनाविलोकीं ॥ १५ ॥ जोपाहेसदसद्विचा रत्द्दयींजोपो[2]जनाचीकरी ॥ जोपावेसमयीं, विशेषगणिलाजोपावनाभी तरी ॥ सोपाजोसकळांद्विजांसुमतिचासोपासदालाभतो ॥ कोपातेंनधरीचतो नळमहीगोपायिताशोभतो ॥ १६ ॥ जोधैर्येंधरसासहस्रकरसातेजेंतमादूर सा ॥ जोरत्नाकरसागभीरशिरसाभूपायशोहारसा ॥ ज्ञाताजोसरसावलान वरसांमाझारिशृंगारसा ॥ शोभेतामरसाक्षतोनळरसानाथस्तवूंकारसा ॥ ॥ १७ ॥ दिंडी ॥ अशीहोतांनळचरितकथाकांहीं ॥ भीमनामाभूपाळप रिसतांही ॥ जवळिहोतीलडिवाळजेसदाही ॥ सुतादमयंतीनामजीसपा हीं ॥ १८ ॥ श्लोक ॥ निषधपतिकथाहेजेसुधेतेंजयंती ॥ परिसुनिदमयं तीरंजलीरंजयंती ॥ नवलमजनभासेचंद्रवंशैक[3]शाली ॥ नळतरिवनमाळी भीमकीहेचिजाली ॥ १९ ॥ नळराजकथासुधाचिसाजे ॥ दमयंतीवरव र्णिनीविराजे ॥ मिळणीउभयांशिहोयजेथें ॥ अधिकारीअधिकानुरागते थें ॥ २० ॥ दिंडी ॥ नैषधीतेमोहिलीगुप्तरूपें ॥ मनींलावियलावेधकुसुम चापें ॥ असोगौरविलेविप्रतिच्याबापें ॥ धनेंवसनेंत्यांदीधलींअमूपें ॥ २१ ॥ कथातेथीलहोयअसोऐसी ॥ अलेजासूदवदतिनैषधासी ॥ तुझ्याकथनीं विदर्भराजयासी ॥ प्रीतिहोतीतनयां[4]हितयापासीं ॥ २२ ॥ श्लोक ॥ बापा च्याउजवेकडेसिवसलीम्यांपाहिलीनोवरी ॥ व्यापारांतरटाकुनीतवक थालापों[5]सिजेआदरी ॥ तापातेंहरितेकरोनिमधुरालापां[6]सिजेसुंदरी ॥ ज्या पावेजगदीशसांगसुमनश्चापानृपात्यावरी ॥ २३ ॥ जेंअंतरंगापिवळेंसरसी

---

१ चंद्रासारिखें रमविणारें आहे मुख जिचें. २ पालन. ३ चंद्रवंशास शोभविणारा नळराजा. ४ दमयंती. ५ कथन. ६ गायन.

रुहाचें ॥ भासेमनांतमजअंगतसेंतियेचें ॥ गोरोचनापरिसगौरअसेंगणावें ॥ सोनेंचबावनकसीनकसेंह्मणावें ॥ २४ ॥ दिंडी ॥ असेंबोलतांचा[1]रसमाचारा ॥ करीदमयंतीनळमनींविहारा ॥ नोवरीतेमजहोयकसीदारा ॥ करूंलागलाभूपयाविचारा ॥ २५ ॥ विभूतीनेंझांकलाअनळसातो ॥ गुप्तदमयंतीविरहनृपाहोतो ॥ नित्यपोटींवडवाग्निपेटघेतो ॥ सागरानेंतोकाय सांगिजेतो ॥ २६ ॥ श्लोक ॥ मानीमनोजशरहारतुरेफुलांचे ॥ कंदर्प[2]कोपवचनेंध्वनिकोकिलांचे ॥ राकाशशीमदनदर्पणभाविलाहे ॥ नेघेचितोनपरिसेनतयासिपाहे ॥ २७ ॥ छायानायक[3]सानिदा[4]घसमयींछायाकरीतोविधू ॥ वायांयात्ददयाश्रमासिकरितोदायाद[5]साहामधूं[6] ॥ जायाजेरुचलीमनींतिजकडेजायानयेकींपहा ॥ रायालानगमेनजायरजनीआयासहोतीमहा ॥ २८ ॥ आर्या ॥ रजनीदिवसगमेना नृपतिससंगीतहीसुखगमेना॥ मनकोठेंहिरमेना ह्मणोनिकरिवनविहारसहसेना ॥ २९ ॥ श्लोक ॥ गंगातरंगसमजोनिजदेहवर्णी ॥ भृंगापरीरुचिरकांतिजयाशिकर्णी ॥ जंघालजोपवनसंगतिचीसवेंघे ॥ शृंगारिलाहयतयावरिभूपवेंघे ॥ ३० ॥ जोअंबरींउफळतांखुरलागलाहे ॥ तोचंद्रमानिजतनूवरिडागलाहे ॥ जोयायशास्तवकसेंधवलत्वनेघे ॥ शृंगारिलाहयतयावरिभूपवेंघे ॥ ३१ ॥ दिंडी ॥ सवेंसेनाभूपाळनिघालाहे ॥ शींवलंघीउद्यानएकपाहे ॥ रिघेतेथेंमितसेवकांसिवाहे ॥ फौजसारीबाहेरउभीराहे ॥ ३२ ॥ पनसजंबूजंबीरविविधनिंबें ॥ कुंदचंदनमाकंदसुदाडिंबें ॥ तुंगनारिंगेंविकसिलींकदंबें ॥ वसतितेथेंशुकसारिकाकदंबें ॥ ३३ ॥ श्लोक ॥ लतेतळींरुंदनिरुंदकालवे ॥ गळोनितेथेंमकरंदकालवे ॥ परागहीसांर्द्रतयांतरंगती ॥ फुलांसवेंभृंगततीतरंगती ॥ ३४ ॥ आर्या ॥उपरिसकंटकसाचे परंतुसांचेजयांतसुरसांचे॥ घोंसअसेफणसांचे षण्मासांचेकितेकवरसांचे ॥ ३५ ॥ श्लोक ॥ तयावनींएकतटाकतोयें ॥ तुडुंबलेंतामर[7]सानपायें ॥ निरंतरामंदमरंदवाहे ॥ तापांतहीयास्तवरिक्तनोहे ॥ ३६ ॥ अमृतहीपयहीह्मणवीतसे ॥ उभयहोयतसीरुचिवीतसे ॥ मधुरसारसतेंजलगातसे ॥ मधुरसारसयास्तवगातसे ॥ ॥ ३७॥ पीतांमरंदउदरंभरवंभराचें ॥ जेंहोयमंदिरहिसुंदरइंदिरेचें ॥ जेंपद्म

---

१ दूत. २ मदन. ३ सूर्य. ४ उष्णता. ५ शत्रु. ६ वसंतकाळ. ७ आंग. ८ दाट. ९ कमळांच्या स्थितीनें.

तेथिलसहस्रदळांधरीतें ॥ प्रत्यक्षसूर्यकिरणांसविसाववीतें ॥ ३८ ॥ दिंडी ॥ तयासरोवरींराजहंसपाहे ॥ राजहंसांचाकळपपोहताहे ॥ तयांसाठींहे वापिकाचपोहे ॥ नळेंकेलीहेंकोणह्मणेनोहे ॥ ३९ ॥ तयाहंसांचेदेहकांचनाचे ॥ पक्षझळकतीवीजजशीनाचे ॥ रंगमाणिकसेचंचुचेपदाचे ॥ जसेअधरींचेभीमकन्यकेचे ॥ ४० ॥ श्लोक ॥ त्यांतीलएककलहंसतटींनिजेला ॥ जोभागलाजळविहारविशेषकेला ॥ पोटींचएकपदलांबविलादुजा तो ॥ पक्षींतनूलपविभूपतयापहातो ॥ ४१ ॥ टाकीउपानहपदेंअतिमंदठेवी ॥ केलीविजारवरिडौरहिमौनसेवी ॥ हस्तींकरीवलयउंचअशाउपायीं ॥ भूपेंहळूचधरिलाकलहंसपायीं ॥ ४२ ॥ कलकलकलहंसेंफारकेलासुटाया ॥ फडफडनिजपक्षींदाविलेंकींउडाया ॥ नृपतिसमणिबंधींटोंचिताहोयचंचू ॥ धरिसुदृढजयातोकायसोडीलपंचू ॥ ४३ ॥ तदितरखगभेणेंवेगळालेपळाले ॥ उपवनजळकेलीजेकरायामिळाले ॥ स्वजनगवसलाजोत्याजपाशींनसेतो ॥ कठिणसमययेतांकोणकामासियेतो ॥ ४४ ॥ ॥ दिंडी ॥ नसोडीहानळभूमिपाळमातें ॥ असेंजाणोनीहंसवदेत्यातें ॥ हंसाहिंसानचघडोतुझ्याहातें ॥ स्वस्थळातेंपावेनपक्षपातें ॥ ४५ ॥ पदोपदीं आहेतवीरकोटी ॥ भलेझुंजारशक्तिजयांमोटी ॥ तयांमारायाधैर्यधरींपोटीं ॥ पांखरूंहेंमारणेंबुद्धिखोटी ॥ ४६ ॥ वधुनिमाझीहेकनकरूपकाया ॥ कटकमुकुटादीभूषणेंकराया ॥ कशीआशाउपजलीतूजराया ॥ वहुतऔदार्यथोरदयामाया ॥ ४७ ॥ श्लोक ॥ ह्मातारीउडतांनयेचातिजलामाता मदीयाअशी ॥ कांताकायवदोंनवप्रसवतेसातादिसांचीतशी ॥ पातात्या उभयांसमीमजविधीघातासयोजीअसें ॥ हातामाजिनृपातुझ्यागवसलों आतांकरावेंकसें ॥ ४८ ॥ पद ॥ हरहरसांपडलों, सांपडलों ॥ कैसाफांशींपडलों ॥ ध्रु० ॥ इतरंनदींजळटांकीं ॥ टाकुनिआलोंयाचतटाकीं ॥ ॥ ४९ ॥ सोडुनिमानसकेली ॥ कापुनिध्यायाआलोंशेली ॥ ५० ॥ ठेविनतवपदिंमाथा ॥ आतांसोडविंमजरघुनाथा ॥ ५१ ॥ दिंडी ॥ सखे माझेपरतोनिघरायेतां ॥ तुवांसजणेहासमाचारघेतां ॥ तयाशोकेंघायाळत्दृदयहोतां ॥ कशीहोशिलतेंआठवितोंआतां ॥ ५२ ॥ थोरहोतिलबाळकेंतुझींबाळें ॥ तुलाकामायेतीलवेल्हाळें ॥ मायमाझीवैसेलशो

१ नळ. २ जोडे. ३ ह्मगा.



ग्रं. का. म. ह. वा. पोतदार

कशाळे ॥ मलाआठवितांत्हृदयतिचेंपोळे ॥ ५३ ॥ श्लोक ॥ सदयत्द
दययाचेंभूपहातापहारी ॥ ह्मणुनिपरिसतोंमीहोययेथेंविहारी ॥ मज
हिवधकरायापातकीपातलाजो ॥ वरुनिपतितसाहीभूमिकेशीनलाजो
॥ ५४ ॥ येणेंपरीपरिसतांअतिदीनवाचा ॥ हेलावलानळपयोधिदया
रसाचा ॥ सोडीह्मणेविहरजाअथवाफिराया ॥ राहेंयथानिजमनोरथहं
सराया ॥ ५५ ॥ सुटुनिखगपळालाबैसलाशालशाखे ॥ क्षणभरिनिजदे
हींमुक्तिविश्रांतिचाखे ॥ स्वजनतंवतयाचेभोंवतालेमिळाले ॥ कवळि
तिनिजबंधूबाष्पबिंदूगळाले ॥ ५६ ॥ विसावाघेकांहींउडुनिलवलाहींप
रतला ॥ नृपाळाचेस्कंधींबसुनिमणिबंधींउतरला ॥ ह्मणेहंसक्षोणीपति
सतुजकोण्हीसमनसे ॥ दयेचाहीठेवातुजजवळिदेवाबहुवसे ॥ ५७ ॥
॥ दिंडी ॥ ऐकरायातूंथोरदयासिंधू ॥ नीतिसागरहीतूंचिदीनबंधू ॥ नि
खंदूनीबोलिलेंनकोनिंदूं ॥ सकलवदसीजरिपायतुझेवंदूं ॥ ५८ ॥ पारधी
माजीखगामृगाराजे ॥ करितिहिंसाजीतीचिबरीसाजे ॥ तुवांदिधलीमज
मोकळीकवाजे ॥ दयाकेलीहीकीर्तितुझीगाजे ॥ ५९ ॥ हंसमिळणेंहें
कठिणमहीलोकीं ॥ सोनियाचातोनवलहेंविलोकीं ॥ तशामजलाहीसो
डिलेंतुवांकीं ॥ तुझाऐसाउपकारमीनझांकीं ॥ ६० ॥ तुझाकरपंजरहो
यमलाथारा ॥ तुझावचनौघतोचिदुग्धधारा ॥ तुझेंमानसबहुथोरगाउ
दारा ॥ सत्यलोकेशातूंचिगुणागारा ॥ ६१ ॥ कितीरावेअसतीलतुझे
धामीं ॥ कितीकोकीळासारिकातसामी ॥ चित्तलागलेंहेंतूझियालगा
मीं ॥ नृपास्वामीमजयोजिंतुझ्याकामीं ॥ ६२ ॥ श्लोक ॥ हेंपांखरूं
मजसियेइलकायकामा ॥ ऐसेंनृपानवदपूरितलोककामा ॥ मोलेंउणें
व्यजनतेंधरितांपुढारी ॥ छायाकरीतपनदीप्तिसहीनिवारी ॥ ६३ ॥ वि
रहिसादिसतोसिमहानळा ॥ परिहरीनतुझ्याविरहानळा ॥ चतुरजीत
रुणीत्[१]हृदयंगमा ॥ करवितोंतिजशींतुजसंगमा ॥ ६४ ॥ वैर[२]नृपतिविरा
जेभीमहेंनामज्याला ॥ वरदमनऋषीनेंदीधलाकींतयाला ॥ वैर[३]सुतद
मनामादांतनामद्वितीया ॥ वर[४]तनुदमयंतीनंदिनीतेतृतीया ॥ ६५ ॥ ते
जोनिधीसतनयायमुनाजसीते ॥ सीतेपरीसुजनकाजनकातसीते ॥ ते

---

१ त्हृदयांत गमन करणारी. २ वरल्या देशीं. ३ पहिलामुलगा. ४ श्रेष्ठ
तनु आहे जिला.

आवडेसुतहितेनतसेतयाला ॥ तेनोवरीकरवितोंतुजमीदयाला ॥ ६६ ॥
रायातिचेंमुखसुधाकरयाद्वयाला ॥ नाहींचवेगळिकहेंमगतेंमनाला ॥ संपूर्ण
नित्यअसतानसताकलंकी॥हाचंद्रहेंमुखअसेंमगकोणशंकी॥६७॥ चांपेकळी
परिसहीसरळत्वनाकीं ॥ जीचाधरीअधरविद्रुमभावनाकीं ॥ भासेमनांतमज
बिंबफळभ्रमानें ॥ कींसत्यचंचुपुटवोढविलेंशुकानें ॥६८॥ तींडोंगरींउपजलीं
पिवळींविशाळें ॥ निंबेंतशींनवघनस्तनचक्रवाळें ॥ त्यापंकजांतमिनलाअ
लिसक्ततोकीं ॥ जोनीलिमासुनयनींसुजनाविलोकीं ॥ ६९ ॥ जोंजोंघन
स्तनभरूंअवकाशदेतो ॥ तोंतोंतिचाउरभरींवदिसोनियेतो ॥ जोंजोंदि
सेउरभरींवतयाशितोंतों ॥ रायाउरोजमयरूपअसेंपहातों ॥ ७० ॥
विस्तीर्णवर्तुळउदग्रकठोरभारी ॥ वर्धिष्णुतेस्तनतिचेकनकानुकारी ॥
ज्याचेउरींउमटतीलठसेतयांचे ॥ बोलोंकितीसुकृतसंघसख्यातयाचे ॥
॥ ७१ ॥ नोहेचनाभितरिकायसुरंगआहे ॥ रोमावळीगमतसेमजशृंखळा
हे ॥ रायाअसेस्तनतिचेंगडध्यावयातो ॥ राजामनोभवउपायजणो
करीतो ॥ ७२ ॥ पद ॥ रूपवतीतेभूपसुताअनुरूपनसेदुसरीवनिता ॥
रूपधरूनिवरींतिजलाअनुरूपपयोधिजसीसरिता ॥ ध्रु० ॥ वीजअचं
चळशीतळजेतजवीजकशीतुजहेनुमजे ॥ नीजजशीतुझियानयनासुख
बीजसपल्लवभा[1]वलता ॥ १ ॥ सुंदरतातवतीजविणेंअतिमंदगमेतारिकाय
जिणें ॥ कुंदरदांतरमंदरधीरासुंदरिलावशहोकरिता ॥ २ ॥ नूतननीर
जनूतमुखीपुरुहूतवधूसिसखीनिरखी ॥ दूततुझापरिमीचसुखीकरवीन
ह्मणेरघुनाथमता ॥ ३ ॥ श्लोक ॥ धाताकरींचकरितामृदुहेनहोती ॥
याकारणास्तवमनोमयमूसओती ॥ तेथेंभरोनिपहि[2]लारसपूर्णकेली ॥
ओतींवहेनघडितांकृतिबोलिजेली ॥ ७३ ॥ रंभाकायतिच्यापुढेंविग[3]त
भारंभादिसेमेनका ॥ जंभाराति[4]नितंबिनीपरितदाहं[5]भावतेहीनका ॥ कुं
भाकारकुचामहावरवधूसंभावना[6]गाहिनी ॥ रंभादं[7]भजयासमोरु[8]सरलस्तं
भामनोमोहिनी ॥ ७४ ॥ ऐसींखगेंद्रवचनेंवदतांतयाला ॥ विश्रांति
हीविरहखेदहिफारझाला ॥ आधारहामजह्मणोनिगणोनिडोले ॥ झाला

---

१ मान. २ शृंगार. ३ कांतीचा लेशही नाहीं जीस अशी. ४ इंद्राणी. ५ सवांस वाटत्ये. ६ महावरवधूंच्या कल्पनांत बुडणारी. ७ केळीचा दंभ जिंकणारी. ८ सरळ स्तंभासारिख्या जिच्या मांड्या.

सर्वेंचविरहीनळराजबोले ॥ ७५ ॥ वेल्हाळतेनदिसतांविरहांधकारीं ॥
चालूनमीहळुचचांचपतांपुढारीं ॥ [१]चक्रापरीचसजलोंअसतांफिराया ॥
हं[२]सोतुझाउदयहोउसुखीकराया ॥ ७६ ॥ ध्यानींधरूनितिजलामनहें
निरीक्षी ॥ दृष्टीपुढेंचिदिसतेमजतेमृगाक्षी ॥ आहेजणोजवळिहेगजराज
गामी ॥ ऐसाचभावतंवबोलतसेंतिलामी ॥ ७७ ॥ भृंगेंविराजितनवीं
अरविंदपत्रें ॥ पाहूनिमानुनितिचींचविशालनेत्रें ॥ घालीनअंजनअशा
मतिनेंतटाकीं ॥ आहावृथाउतरलोंभिजलोंविलोकीं ॥ ७८ ॥ हंसावि
लोकुनिसुधाकरअष्टमीचा ॥ म्यांमानिलानिटिलदेशतिचाचसाचा ॥ शं
ख[३]द्वयींधरुनिकुंकुमकीरवाणी ॥ लावावयातिलकलांबविलास्यपाणी ॥
॥ ७९ ॥ दिंडी ॥ भलामाझातूंहंसगडीराया ॥ विरहदुस्तरविस्तार
निस्तराया ॥ चित्तनेघेमजतूजजाह्मणाया ॥ तें[४]चिवाहनतरितूंकरीं
फिराया ॥ ८० ॥ असेंबोलोनीनळेंरंजवीला ॥ अंजुळीमाजीहंसबैस
वीला ॥ गमेचंपककुसुमौघहारझेला ॥ पाठवायायुवतीससिद्धकेला ॥
॥ ८१ ॥ त्वरितपुनरागमअसोतुझायेथें ॥ झेंपघालींसुखरूपगगनपं
थें ॥ नकोविसरूंआह्मांसिअसोंयेथें ॥ वदुनिधरिजेगहिंवरामहीनाथें ॥
॥ ८२ ॥ बरेंयेतोंह्मणवूनिहंसबोले ॥ उडुनिजातांबहुशकुनतयाझाले ॥
पवनचंचळमधुबिंदुमुखींआले ॥ वामभागींउभयतांगरुडगेले ॥ ८३ ॥
उडतहोतेखगवायसादिजाणा ॥ तयांभासलाहंसतोससाणा ॥ नभामा
नूनीनिकषपाषाणा ॥ स्वर्णरेखातेंतेजमनींआणा ॥ ८४ ॥ असातोहं
सनभामाजिधांवे ॥ तयाविदर्भदेशींझेंपावे ॥ तेथकुंडिननगरासमीपपावे ॥
राजप्रासादींगोपुरींविसावे ॥ ८५ ॥ श्लोक ॥ खगमगनगरीचेगोपुरींझें
पघाली ॥ मृदुपवनगवा[५]क्षींबैसतांझोंपआली ॥ तदुपरिज[६]वशालीवेंघला
चंद्रशाला ॥ निरखिविततशालाराजधानीविशाला ॥ ८६ ॥ चूर्णिका ॥
सकळभुवनललामायमाना ॥ माना[७]धिकविभवधनिकसदनशतविराज
माना ॥ कलशजनि[८]तमुनिचकितजलधिशरणातिविस्तृतपरिखांतरीपा
यमाना ॥ चंद्रशालाविजितसुरविमाना ॥ जिचे[९]सौधेंगगनमंडपाधारस्तं
भचिमाना ॥ लावितींतेजलदानिजमाना ॥ वासवचापजयांसकमाना ॥
ऐसींकुंडिननामधेयनगरीराजहंसेंपाहिली ॥ श्लोक ॥ कोणीवणिकूजन

१ पक्षीविशेष. २ श्लेषानें सूर्य असा अर्थ घ्यावयाचा. ३ दोन्ही गालांस. ४ चित्त. ५ खिडकी. ६ वेगवान्. ७ मान होत नाहीं असें. ८ अगस्ति. ९ मंदिर, वाडा.

विकीतुळितांतराजे ॥ कस्तूरिकातिजसवेंअलिनीविराजे ॥ दोन्हीसमा ननिरखीविकणारदेतो ॥ घेणारतोनसमजोनिउगाचघेतो ॥ ८७ ॥ तेणेंत सेंनगरतेंधरितांनिडोरीं॥तेथेंविलासवनएकदिसेपुढारीं॥जेथेंसुशीतळमहीत ळसांद्रसोई॥ जाईजुईफुलमईबहुअंबराई ॥ ८८ ॥ पद ॥तयावनींखेळेभूपसुता ॥ध्रु०॥ खेळविताबहुमेळविलासखिमेळतयासहिता॥ १ ॥ राजसतेद्विजराजमुखीगजराजगतीललितां ॥ २ ॥ ध्यातअसेनळराजकथारघुनाथकवींद्रनुता ॥ ३ ॥ श्लोक ॥ तोमंडळाकृतिफिरेउतरावयाला ॥ भैमीमुखेंदुपरिवेषह्मणोंतयाला ॥ तेथेंमहीवरिकसाखगवैसताहे ॥ तेंसुंदरीनिजकुतूहलजेंविपाहे ॥ ८९ ॥ जोबैसतांचपळपक्षपुटींधरेला ॥ हाणीतसेफडफडांध्वनिहोउदेला ॥ पाहेतयाखगवरासिवराननाहे ॥ मानीमनींनवलहीमगबोलताहे ॥ ९० ॥ असापक्षीलक्षीबहुविहगलक्षींनमिळता ॥ सुवर्णीजोवर्णींवदकवणवर्णीकवयिता ॥ अगाईहाबाईत्वरितवरिजाईलपळुनी ॥ धरूंजातेंहातेंहळुहळुतयातेंनकळुनी ॥ ९१॥ ऐसेंवदेमगतयासधरावयाहे ॥ तेहोयहंसगमनापहिलीचआहे ॥ वाजेचनावलयनूपुरनादनोहे ॥ तोतद्गतीसानिरखूनिकसानमोहे ॥ ९२ ॥ हेमंदमंदपदसुंदरकुंददंती ॥ चालेजसामदधुरंधरइंद्रदंती ॥ हंसाधरूंजवळिंजायकृशोदरीते ॥ निष्कंपकंकणकरासिपुढेंकरीते ॥ ९३ ॥ गवसलाचतसाखगभासला ॥ तरितदीयसखीजनहांसला ॥ मगसवेंचबुझावुनिहांकिला ॥ उडविलाचिपिटाळुनिटाकिला ॥ ९४ ॥ कांहींउडोनिगगनींमगनीटयेतो ॥ नाहींचदूरनसमीपबसेतसातो ॥ पाहेसुधाकरमुखीकलहंसराया ॥ लाहेमनोरथतयासपुन्हाधराया ॥ ९५ ॥ सवाई ॥ हंसधरीनह्मणोनिमनोरथहामजहोयविनोदतुह्माला ॥ हाकलहंसपिटाळवितांहिपुन्हाउडवालतयाविहगाला ॥ जापरत्याचतुह्मीनलगेचअसेंवदुनीनृपराजसुताते ॥ राहविलासखिचाजनआपणमात्रतयासधरूंमगजाते ॥ ९६ ॥ श्लोक ॥ रागेजलीअरुणकांतिविराजवीते ॥ हेएकलीसुतनुचंद्रकलातसीते ॥ गेलीहळूचकलहंससमीपकेला ॥ कांहींपुढेंफडकलाअवलोकिजेला ॥ ९७ ॥ आणीकहीपदनवाजतमंदचाले ॥ जोचालतांपदरसांवारिलानहाले ॥ हेहीकरीनिजकरींखगसांपडेसा ॥ तोहीहळूहळुचहोयपलीकडेसा ॥ ॥ ९८ ॥ मदगजगमनेनेंमागुतीचालकेली ॥ विनततनुलताहेतत्समी

१ दृष्टांत. २ झाडी. ३ चंद्र. ४ स्त्री. ५ खेळ. ६ चंद्रमुखी.

पासनेली ॥ पुनरपिफडकेहाफारसादूरनाहीं ॥ जवळिजवळिऐसाभा
सलाहंसकांहीं ॥ ९९ ॥ हंसेंतसीचतुरसंमतयुक्तिकेली ॥ तेचालवीत
सुतनूबहुदूरनेली ॥ छायातियेशिदुसरीतिमरीवनाळी ॥ जेसांवळीयुव
तितुल्यदिसेनिराळी ॥ १०० ॥ तयावनांतएकली ॥ विलासिनीविलो
किली ॥ मदेंभरोनिडोलतो ॥ तियेसहंसबोलतो ॥ १०१ ॥ दिंडी ॥
भूमिभागींफिरणारतूंतुलामी ॥ कसासांपडेनसांगगगनगामी ॥ बाळ
बाळेजरिहोयचंद्रकामी ॥ हस्तत्याचालागेलकायसोमीं ॥ १०२ ॥ क
सेंनांदेतारुण्यतुझ्यादेहीं ॥ बाल्यगेलेंतेंनेणसीचकांहीं ॥ उगवतांहीस
हस्रभानुपाहीं ॥ कायनलिनीसंकोचजातनाहीं ॥ १०३ ॥ असोसां
पडतोंतुझ्याकरामाजी ॥ पुन्हासुटकाकारितेसकायमाझी ॥ कसापातेजूं
बाळबुद्धितूझी ॥ स्त्रीस्वभावेंबहुआणशीलबाजी ॥ १०४ ॥ आर्यागी
ति ॥ पाषाणरूपहातें ॥ भ्रमवितयातेंधरूनितद्देहातें ॥ जींवंतहीगव
सला ॥ समजतियेचेगृहींचतोमगवसला ॥ १०५ ॥ श्लोक ॥ चतुरनर
जसाहाबोलतोहंसतैसा ॥ तरिनधरिमृगाक्षीविस्मयींभावकैसा ॥ पळु
निमजनिखंदीतीसतोखेदनाहीं ॥ शिणहिविसरलीतेबोलतीहोयकांहीं ॥
॥ १०६ ॥ दिंडी ॥ कोणतूंगाकोठीलकवणियाचा ॥ कसाजालातवदेह
सोनियाचा ॥ कशीआलीहीतूजमनुजवाचा ॥ कायभाग्योदयतूंचिया
वनाचा ॥ १०७ ॥ धरिलपाहिलसोडीलअसापाहीं ॥ मजवर
ताविश्वासतुझानाहीं ॥ असोपुसतेंतेसांगकथाकांहीं ॥ जाइंअथवा
मगयाचवनींराहीं ॥ १०८ ॥ असेंबोलोनीमौनधरुनिराहे ॥ कायबोलतो
हंसअसेंपाहे ॥ तदात्याचावचनौघअसावाहे ॥ राजकन्येतूंआयकेंगि
राहे ॥ १०९ ॥ ब्रह्मदेवाचेबहुविमानवाही ॥ हंसआहेतऐकिलेतुवांही ॥
तयावंशींसौवर्णदेहहाही ॥ ज्यासमानसखिसर्वमान्यनाहीं ॥ ११० ॥
श्लोक ॥ मंदाकिनीमधिलजींकनकारविंदें ॥ तींजेवितोंमृदुलनालमृ
णालकंदें ॥ आह्मीअसोंनृपसुतेतरिकांचनाचे ॥ जेंकार्यतेंधारिलकींगु
णकारणाचे ॥ १११ ॥ जोमानसींविहरतोविहरोपरीतो ॥ कांआमुची
कुळेंसतीअसतीकरीतो ॥ राखींनळानिजयशोमयहंसराया ॥ आलोंमहीवर
फिरादअशीकराया ॥ ११२ ॥ मीगुंतलोंनळमहींद्रगुणौघपाशीं ॥ सेवे
सहीमगकरोनितयाचपाशीं ॥ आलोकुनीकवणयाचतुराननाचे ॥ लो

१ चंद्रप्राप्तीच्छु. २ आकाशगंगा. ३ मानससरोवरीं, पक्षीं मनांत. ४ कीर्ति. ५ अपकीर्ति.

केशवाविभवहीचतुराननाचे ॥ ११३ ॥ गंगोदकींघडिघडीसबुडीसदेतों ॥ पंखासिशीतळकरोनितसाचयेतों ॥ तेणेंनळाशिकारितेंमगवीजनातें ॥ बाळेतसानधरितोसुरतश्रमातें ॥ ११४ ॥ एकांतलेखनहिवाचनहीकरीतो ॥ माझीतनूद्युतिसमीपतदाधरीतो ॥ याकारणेंनळमलाबहुआप्तमानी ॥ तोसांगतानिजमनोरथहोयकानीं ॥ ११५ ॥ आधींचनैषधकथानवनीतभेला ॥ होतांअलंकरणरूपइच्याजिभेला ॥ हंसोदयेंविघरतांअधरींधरीते ॥ स्वीकारितांवचनतेंमगआदरीते ॥ ११६ ॥ दिंडी ॥ नळेंतुजशींएकांतकायकेला ॥ तोचिऐकायाजीवहाभुकेला ॥ तयाबोलोनींनिववियाभुकेला ॥ ऐकवावेंमजह्मणुनिनायिकेला ॥ ११७ ॥ नळाशींजोएकांततुझातोकां ॥ प्रकटकीजेम्यांसांगइतरलोकां ॥ धन्यडोळेनकरोनितदालोका ॥ नळकथेनेंहेकर्णधन्यहोका ॥ ११८ ॥ निषधराजींहेफारादिसेराजी ॥ असेंहंसेंजाणोनिमनामाजी ॥ बोलिजेली नळराजकथाहेजी ॥ भलाहेजीर्वत्याशिह्मणेहंजी ॥ ११९ ॥ नळह्मणालामजसरळधरुनिबाहीं ॥ तुलाकोठेंहीवंकअटकनाहीं ॥ सकळभुवनें बरिफिरुनिराजगेहीं ॥ एकनवरीमजयोग्यबरीपाहीं ॥ १२० ॥ श्लोक ॥ एकांतहाचवदलातुजजाणबाळे ॥ तूंसांगतोवरतुलारुचलारसाळे ॥ येणेंपरीपरिसतांचतयाअनन्या ॥ तेवोलतेचतुरसुंदरराजकन्या ॥ १२१ ॥ मीजाणदेवनळहीस्वकरींधराया ॥ सांगेनकायचतुरामजलाजजाया ॥ काळेंकरूनिसुखजोंवरिहोयलेखीं ॥ हेंबोलणेंखगमनाउभयार्थलेखीं ॥ ॥ १२२ ॥ श्लेषशब्देंइणेंभावसांगीतला ॥ नैषधाधीशतोनाथमागीतला ॥ होयजाणीयलीघेत्रपाकंचुला ॥ हंसबोलावयाहालवीचंचुला ॥ १२३ ॥ गांठ्याळजेंत्हृदयसांद्रनहोयज्याचें ॥ नामेंचिदेवनळकार्यनसेतयाचें ॥ धत्तूरहाकनकनामसदाधरीतो ॥ होईलकायरसिकाकनकापरीतो ॥ १२४ ॥ तीबोलतेयुवतिलाजमनींदडाली ॥ होतीतुवांविघरतांमनहीउडाली ॥ आतां वरूंनळवरासितुलानवाजूं ॥ गाजूंतुझीस्तुतिकरूनिकशासलाजूं ॥ १२५॥ परिसुनिवचऐसेंजेंइणेंबोलिजेलें ॥ पतगकुलवतंसेंअंतरींध्याइजेलें ॥ परवशहृदयाहेनैषधेंराजहंसें ॥ ह्मणुनिसमजताहेबोलिजेराजहंसें ॥ १२६ ॥ दिंडी ॥ जशीरंजलीसितूंनिषधभूपीं ॥ तसातोहीरंजलातुझ्यारूपीं ॥ दैवघटनेंअन्योन्यव्हालसोपीं ॥ तुह्मीनांदालसत्यहेंनिरोपीं ॥ १२७ ॥

१ पंखा. २ गोळा, ३ सूर्योदयें. पक्षीं हंसागमनानें. ४ वितळतां. ५ दूत. ६ हंसें.

कोणयोजावीनोवरीनळाला ॥ ब्रह्मदेवानेंहाविचारकेला ॥ तुझानामाक्षरसंघघेइजेला ॥ असेंभासतसेमाझियामनाला ॥ १२८ ॥ श्लोक ॥ नळरहितवराशींतूजयोजूनिपाहे ॥ तरिमगविधिऐसाकोणतोमूढआहे ॥ अचतुरनरतोहीजाहल्याजेवितांकीं ॥ सळमिसळकरीनासर्वथाक्षीरताकीं ॥ १२९ ॥ दिंडी ॥ कशालाहेंबोलणेंकाययेणें ॥ तुवांवरिलानळराजतूंहितेणें ॥ सफळमाझेंहेंयेथवरीयेणें ॥ राजकन्येनीरोपमलादेणें ॥ १३० ॥ चतुरसुंदरतोतरुणनिषधराजा ॥ तुवांराजीकेलाचतूंघराजा ॥ धन्यवैदर्भीदैवयोगतूझा ॥ बोलमानींयथार्थमनींमाझा ॥ ॥ १३१ ॥ जाउनिऐसेंतूंबोलराजहंसा ॥ तुझीदासीजाहलेंराजहंसा ॥ नकोचिंतातूंकरूंअरिध्वंसा ॥ ऐकशुभ्रांशुवंशजावतंसा ॥ १३२ ॥ नकोपाहूंतूंनोवरीनळाशी ॥ मीचभावेंहोईनसत्यदाशी ॥ जरीयावेंआतांचितयापाशीं ॥ गोष्टभासेविपरीतलौकिकाशी ॥ १३३ ॥ श्लोक ॥ करुनिमजरवानाराजसेतूजसाठीं ॥ नृपतिनिरखिमाझीवाटआरामवाटीं ॥ बसवुनिनिजपाठींतूजनेईनतेथें ॥ परिचुकुरतुझेहेलोकहोतीलयेथें ॥ १३४ ॥ येरीकडेनृपतिधाडुनिराजहंसा ॥ तोबैसलाकरितआपणतत्प्रशंसा ॥ येईलशीघ्रघटनाकरुनीतियेची ॥ होईलभेटिमजआजतयेप्रियेची ॥ १३५ ॥ आरामींविरहोत्करेंतरुतलींथाराकरोनीस्वयें ॥ वाराघेतबसेतपेतपनसातारापतीनिश्चयें ॥ माराचाशरमारनावरिह्मणेदाराघडेतीकशी ॥ हाराजीवदलाक्षमाधवजनोद्धाराकुपाहोअशी ॥ १३६ ॥ तोंचिन्हेंशुभपाहुनीनृपह्मणेलाभेललाभावळी ॥ आलासन्मुखराजहंसानिरखीवाहूयुगेंआंवळी ॥ बोलेमंजुळवाक्ययेथवसलेंलावूनिलत्थ्यानरे ॥ जालेंवृत्तसमग्रसांगुनिकरींहंसासमाधानरे ॥ १३७ ॥ दिंडी ॥ कायवदलीतुजसवेंहंसराया ॥ मान्यझालीकींतीमलावराया ॥ कधींभेटेलनिजकरींधराया ॥ विरहबाधामजनयेआंवराया ॥ १३८ ॥ हंसबोलेनृपराजसगुणसारा ॥ माळघालीतेतीतुलाउदारा ॥ तुझ्याध्यानीं जाहलीजेंविवारा ॥ सत्यमानींतीहोयतुझीदारा ॥ १३९ ॥ जाइंनगरातूंनृपाकृपाराशी ॥ पत्रयेतांचीजास्वयंवराशी ॥ स्वयेंयेतेचालोनिमंदिराशी ॥ फारवदणेंनलगेसुखोत्कराशी ॥ १४० ॥ बरेंयेतोंह्मणोनिपायहातें ॥ नमुनिचालेसप्रेमतोगृहातें ॥ नृपानिघालासहचमूनिजपुरातें ॥ हंसध्यानींलावुनीअंतरातें

१ राजश्रेष्ठा नळा, २ चंद्रवंशभूषणा, ३ विरहाधिक्य.

॥ १४१ ॥ जनकतनयेशींपवनतनयसातो ॥ वदुनिवेगेंउड्डाणनभींघेतो ॥ नळापाशींवृत्तांतनिवेदीतो ॥ स्वधामातेंपावोनिसुखीहोतो ॥ १४२ ॥ असोऐशीहेकथासौरसाची ॥ श्रवणकरितांबहुगोडगमेसाची ॥ धन्यलीलात्याऐकनैषधाची ॥ प्रकटवाणीरघुनाथपंडिताची ॥ १४३ ॥ असोआल्याइजवळिसख्याऐशा ॥ बोलतीत्यामगतीससकळकेशा ॥ हंसधरुनीपरिपूर्णतुझीआशा ॥ कायगेलातोउडुनिगगनदेशा ॥ १४४ ॥ श्लोक ॥ धरुनिकरसखींनींसौधशालेंतनेली ॥ खगवचनमधूनेंजेमनींमोहिजेली ॥ नळविरहभरानेंपोळ्ळीगुप्तरूपें ॥ नवलकनकशीतेगौरहींतप्तरूपें ॥ १४५॥ होणारजोवरतदीयवियोगदाही ॥ सांगावयासहिनयेलपवावयाही ॥ यासांगवीमदनलाजनसांगवीतें ॥ कींयादुहींत[१]शिणलेंमनरंगवीतें ॥ १४६ ॥ नरंजेकारंजेंनिरखुनिफणीतिफणफणी ॥ मुदेनेंमोदेनानलगुणगणींजेगुणगुणी ॥ नबैसेजेसेजेवरिनपरिसेंजेंशुकगिरा ॥ ननाहेमानाहेनधरिललनहितुदुसरा ॥ १४७ ॥ लज्जावतीयुवतिहेवडिलासिधाके ॥ झांकीतसेविरहपावकतोनझांके ॥ जोपंजरींलपविलावसनांतराळीं ॥ तोझांकिलागगनदीपतरीझळाळी ॥ १४८ ॥ तीचेमनींनळमनोभववीरहोते ॥ होतांतयांशिकथिलेंजथिलेंअहोते ॥ त्यांहींचतेदुखविलीसुतनूनिजेली ॥ मूर्छावतीनिजजनींअवलोकिजेली ॥ १४९ ॥ गजबजबहुझालीमायधांवोनिआली ॥ धरुनित्द्दयदेशींतीजलासेजकेली ॥ करितिविझणवारेत्यासख्यावेगळाल्या ॥ वडिलवडिलदायाजाणत्याहीमिळाल्या ॥ १५० ॥ आर्या ॥ तेशीतळोपचारीं जागीझालीहळूचमगबोले ॥ औषधनळगे[२]मजला परिसुनिजननीवरेंह्मणुनिडोले ॥ १५१ ॥ दिंडी ॥ मूलउपवरहेजाहलीइयेला ॥ पाहिजेकींवरयोग्यपाहिजेला ॥ असेंऐकोनीवधूचियाबोला ॥ सैंवराचामगयत्ननृपेंकेला ॥ १५२ ॥ नगरसारेंशृंगारविलेंतैसें ॥ भूमिलोकींवैकुंठदिसेजैसें ॥ लिखितपाठविलेंसकळनृपांकैसें ॥ तुह्मींयावेंजासैंवरासिऐसें ॥ ॥ १५३ ॥ निषधराजासीलिखितपाठवीतो ॥ प्रतिद्वीपींभूपतिसहीलिहितो ॥ अशायत्नींलागलानृपअहोतो ॥ पुढेंपरिसावृत्तांतकसाहोतो ॥ १५४ ॥ ऋषीनारदअसतांनभोविहारी ॥ दिसेवैजयंतीजयामनोहारी ॥ मणीरमणीयकनककलशभारी ॥ सुरपतीचाजोसौधमहाभारी ॥ १५५ ॥ तयाप्रासादीं जायऋषीपाहे ॥ सभाकेलीदेवेंद्रबैसलाहे ॥ फारआदरिलेंतयादेवरायें ॥

१ विकल्प. २ नळगे ह्मणजे नको. पक्षीं औषध नळ, भगे.

अर्घ्यपाद्यादिककरुनिविनतकायें ॥ १५६ ॥ श्लोक ॥ समुद्रोद्भवाअप्स
रासाठकोटी ॥ जयांचीद्युतीतेरतीलाहिलोटी ॥ विधीनेंतशात्यातुळूंपाहि
जेल्या ॥ जियेशींहिळूजाहल्याउंचगेल्या ॥ १५७ ॥ उपवरदमयंतीजाहली
नोवरीते ॥ कवणवरकळेनाहेजयातेंवरीते ॥ दृढतरनिजलज्जागव्हरींसिंह
केला ॥ जिवलगहिसखीलाजोनसेसांगिजेला ॥ १५८ ॥ दिंडी ॥ नवेतरणे
नृपवरतीजसाठीं ॥ मोहिलेतेकरितातियत्नकोटी ॥ कलहवार्ताहीमानि
तातिपोटीं ॥ तयायुवतीचीआसतयांमोठी ॥ १५९ ॥ असेंनारदबोलोनितो
निघाला ॥ जायत्दृदयासीमानल्यास्थळाला ॥ थोरचिंतामगहोयसुरेंद्रा
ला ॥ ह्मणेकैसीतेवरिलआपणाला ॥ १६० ॥ वरुणपावकयमइंद्रहेमिळा
ले ॥ असेचौघेहीरथारूढझाले ॥ महीलोकाशीयावयानिघाले ॥ तया
कुंडिननगरासमीपआले ॥ १६१ ॥ श्लोक ॥ तंवतयाचवघांसतयापथीं ॥
निषधनायकयेतदिसेरथीं ॥ तरुणसुंदरजोचतुरोग्रणी ॥ अतुळवैभवराज
शिरोमणी ॥ १६२ ॥ निरखुनिनिषधेंद्राइंद्रतोबोलताहे ॥ युवतिउभयता
हीलभ्यआह्मांसिनोहे ॥ वरिलजरिनळालातेतयालाभलीजे ॥ नवरित
रिअह्मासीमूढतेकायकीजे ॥ १६३ ॥ नळातेंपाचारीसुरपतिविचारीकुशळ
तो ॥ ह्मणेआह्मापाशींतवगुरुविलासीनिवसतो ॥ खुणात्याच्याज्याज्या
तुजजवळिराजानिरखितों ॥ खरातूंतद्वंशीह्मणउनितदंशीसमजतों ॥१६४॥
तोवन्हितोवरुणतोयमइंद्रगामी ॥ झालोंतुलासकळहेविदितस्वनामीं ॥
बोलेमहीरमणहानळचंद्रवंशी ॥ वंदीपदासतुमच्यातुमचाचअंशी ॥ १६५॥
॥ दिंडी ॥ नळाकोठेंजातोसिअसेंबोले ॥ नळेंइंद्रासीअसेंबोलिजेलें ॥ भी
मभूपेंहेलिखितपाठवीलें ॥ सैंवरालागींयेइजेवहीलें ॥ १६६ ॥ बोलताहेदे
वेंद्रनृपवराला ॥ नैषधातूंआलाशिसैंवराला ॥ समजआह्मीतुजजवळियाच
नेला॥करूंआलोंमनिंधरुनिकामनेला॥ १६७ ॥ श्लोक ॥ जेहेदिशापतिविशा
लयशातशाला ॥ आशावशाकुवलयांतदशाकशाला ॥ हाबोलतूंनवदतू
जसमीपयेतों ॥ आह्मीमखींनिजमुखींअवदानघेतों ॥ १६८ ॥ केलाविचा
रत्दृदयींनळराजयानें ॥ हाजीवहीधनहिदेइनानिश्चयानें ॥ देवेंद्रदेजरि
ह्मणेलकदापिभैमी ॥ तेदेववेलमजकायकरीनगेमी ॥ १६९ ॥ दिंडी ॥ ह्मणे
राजेंद्रतयादेवदेवा ॥ कायआज्ञाजीकायकरूंसेवा ॥ वीरसेनाचाथोरपुण्य
ठेवा ॥ मजमिळालातोदर्शनाख्यमेवा ॥ १७० ॥ श्लोक ॥ बोलेसुराधि

---

१ हलक्या. २ चतुरशिरोमणी. ३ पूर्वज. ४ कानाडोळा.

पंनराधिपतीसराया ॥ भैमीजसीमजवरीलतसेंकराया ॥ बोलावयासति जशींतिचियाघराजा ॥ तूंबोलकाचतुरकेवळकायराजा ॥ १७१ ॥ मगह ळुचसुरेंद्राबोलिजेभूपतीनें ॥ मजनिजसुमनाचीघातलीमाळतीनें ॥ त्दृदय तरितियेचेंसांद्रजालेंसुवासें ॥ चलितनकरवेतेंकोणत्याहीप्रयासें ॥१७२ ॥ दिंडी ॥ पुन्हाबोलेदेवेंद्रनृपवराया ॥ तुलाजालेंवशत्दृदयतिचेंराया ॥ तरिच आलोंहेयाचनाकराया ॥ तुझ्यावाक्येंआह्मांसितेवराया ॥ १७३ ॥ श्लोक ॥ दातव्यहीस्ववशआपणजाणताही ॥ पर्यायेंउत्तरवदेचनदेचकांहीं ॥ दाता असाशठकसाठकसाकदापि ॥ जोयाचकावरिदयानकरीचपापी ॥ १७४ ॥ गहिंवरतगळाहीचावळेजीभवाळे ॥ विकळपणशरीरींकंपहीयानिराळे ॥ धनिकविमुखहोतांअंतरींशोकराहे ॥ हरहरमजभासेयातनायाचनाहे ॥ ॥ १७५ ॥ भांबावलाधनमदेंभलतेंचबोले ॥ तोबोलहीसरसमानुनिलोक डोले ॥ मांसेंकरूनिफुगलागळसाचभावे ॥ ज्यादीनमीनधरितांवळसा चपावे ॥१७६ ॥ दिंडी ॥ असेपरिसोनीबोलवासवाचे ॥ तयानळराजा कायवदेवाचे ॥ तुह्मीजाणतेथोरथोरसाचे ॥ असांसाक्षीतुह्मिमाझियामनाचे ॥ १७७ ॥ ज्याशिजेथेंसामर्थ्यनसेत्यातें ॥ कसेंतेंकार्यतुह्मीसांगिजेतें ॥ बाळतान्हेंउचलीलकायजांतें ॥ बोलणाराचेंमोलफोलजातें ॥ १७८ ॥ सातवंकांहीपलीकडेहोतें ॥ राजकन्येचीभेटकशीहोते ॥ त्यजुनिराज्यत्व दूतताकशीते ॥ धरावीम्यांत्दृदयासिजेकशीते ॥ १७९ ॥ श्लोक ॥ बोलेसुरेंद्रनृपसौधसुखेंफिराया ॥ आकारगुप्तवरदेइनदेवराया ॥ जायींवि दर्भवसुधेससुतेसशोधीं ॥ आह्मांशितेतरिवरीलतुझ्याचबोधीं ॥ १८० ॥ ओंव्या ॥ इंद्रत्रैलोक्यनायक ॥ तोहीझालासेयाचक ॥ दाक्षिण्यानेंभूपाळक ॥ यांच्यावाक्येंगुंतला ॥१८१॥ बरेंह्मणेनीउत्तरें ॥ रथावरोनिऊतरे ॥ तयाराजपु रींभरे ॥ शोभातेथीलपहातो ॥ १८२ ॥ श्लोक ॥ तोजाहलानृपवरास्थिरदूत भावीं ॥ मानीचनायुवतिच्याविरहासभावी ॥ कुंभोद्भवेंतारिमहोदाधिपानकेलें ॥ दुर्वारवाडवशिखेसनमानिजेलें ॥ १८३ ॥ प्राणापरीचत्दृदयींनगरांतरीं तो ॥ गुप्तस्वरूपनलरूपतदाधरीतो ॥ बंकींरिघेतंवतयादिसतातिबंके ॥ पंकेरुहास्यनदिसेचितयांनशंके ॥ १८४ ॥ ओंव्या ॥ तयाराजसौधांतरीं ॥ शोभापाहेपरोपरी ॥ कोठेंआहेतेसुंदरी ॥ धुंडावयालागला ॥

१ मिष. २ अगस्तीनें.

॥ १८५ ॥ कोणीयेकदोघीदूती ॥ तेथेंअन्योन्यबोलती ॥ येथेंआहेद मयंती ॥ जाईंबोलेनियेईं ॥ १८६ ॥ तिजसवेंसौधांतरीं ॥ राजा जायअंतःपुरीं ॥ तेथेंदेखिलीसुंदरी ॥ जैसापूर्णचंद्रमा ॥ १८७ ॥ सुमन सेजेच्यापलंगीं ॥ बैसलीसेतन्वंगी ॥ सख्याखेळतातीसंगीं ॥ बहुअप्सरा त्याजैशा ॥ १८८ ॥ श्लोक ॥ प्रगटतिजपुढारांजाहलाराजमौ[1]ळी ॥ पदरवरिनघेतांहारतैसाझळाळी ॥ निजत्द्दयनिवासीकायबाहीरआला ॥ निरखुनिदमयंतीतेविमानीतयाला ॥ १८९ ॥ गजवजोनिसमस्तातिच्या सख्या ॥ गजगमाउठल्यातिजसारिख्या ॥ पदरसांवरितांनृपबाळिका ॥ झळकतीत्द्दयींमणिमाळिका ॥ १९० ॥ कोणीयेकसखीविलोकुनिनळक्षो णीश्व[2]रामोहिली ॥ कोणीततनुकांतिसिंधुपतितद्रो[3]णीपरीपोंहली ॥ कोणी हामजलाननाथह्मणुनीलोणीतशीपाझरे ॥ कोणीएकतयासलाजुनिविरेको णीवियोगेंझुरे ॥ १९१ ॥ रामातेंजनकक्ष्मापतिसुतारामां[4]जशीरेवती ॥ कामारी[5]सनगाधिराजत[6]नयाकामासिजैशीरती ॥ यामानूनितसीविदर्भदुहि तारामामनींभाविते ॥ हामाझात्द्दयाब्जसूर्यह्मणुनीत्यामानिनीबोलते ॥ १९२ ॥ साकी ॥ कोणतुह्मीकवणाचेकोठुनियेथेंकांआलांहो ॥ कायनिमित्तें दिधलामजलाहानिजदर्शनलाहो ॥ अटकनकेलीतुह्मांसियेतांत्यासातांही वकीं ॥ हींमाझ्यानयनाचींसुकृतेंविशेषमीहेंशंकीं ॥ संभवलांकवणाचे वंशींसांगाहोअकळंकीं ॥ उभेअसांकांभागतसांहोयाबैसापर्यंकीं ॥ १९३ ॥ श्लोक ॥ राजेअसालतरिधन्यवसुंधराहे ॥ शोभालदेवतरिनाकयथार्थआहे ॥ भोगीतुह्मीउपजलांजरिनागलोकीं ॥ खालींअसोनिसकळांवरिहोयतोकीं ॥ १९४ ॥ साकी ॥ दुग्धपूरनसतांनिजरूपींक्षीरासिंधुतोजैसा ॥ वसंतआलानाहींतरितोउद्यानभागजैसा ॥ अमृतकराचाउदयनहोतांरजनी समयोजैसा ॥ तुमच्याविरहेंआजिजाहलाकवणदेशतोऐसा ॥ १९५ ॥ ॥ श्लोक ॥ भूपाळजोममनोमुकुरींउभासे ॥ तोनैषधेंद्रतुमचाअनुबिंब भासे ॥ रूपेंतरीचदिसतातिदिगंतराळीं ॥ तींहींकसींह्मणवितोल वुह्मांनिराळीं ॥ १९६ ॥ साकी ॥ सरसद्युतिपदकुलशिरसाचेंमृदुकुलले स्वभावें ॥ चालवालकितिदूरतयातेंअदयत्द्दयभावें ॥ कर्णयुगुलहेंध

---

१ राजांत श्रेष्ठ असा नळ. २ भुगति. ३ होडी. ४ बळरामास. ५ शिवास. ६ पार्वती. ७ आरशांत.

न्यकरावेंसांगुननीजनावें ॥ स्तवनकरीरघुनाथतयाचेंकवनआदरावें ॥
॥ १९७ ॥ श्लोक ॥ तुजवरिमनईचेंयापरीकांइयेला ॥ त्यजसिसुमशरानें
हाअसावोधकेला ॥ तृणकणगणिजैसेंत्यासिधैर्येंगणीतो ॥ युवतिसिमग
बोलेराजचूडामणीतो ॥ १९८ ॥ आहेसकींसुखवतीकमनीयेलीळे ॥ नि
श्चितकींत्दृदयहोयतुझेंसुशीळे ॥ आतांनकोचअवलंबविलंबनाचा ॥ हेजी
वमीसमजमुख्यसुराधिपाचा ॥१९९॥ जोधरीनिजकरींशतकोटी ॥ ज्याशि
नम्रसुमनःशतकोटी ॥ तोसुरेंद्रहितुलानतयाची ॥ हाअसोवरतुलांनतया
ची ॥ २०० ॥ घनाक्षरी ॥ तयाइंद्राकरींधरीं ॥ अथवातयाचेशेजारीं ॥
नांदेजोतेजोनिधीभारी ॥ तयावरींराजसे ॥ २०१॥ तोहीयेईनाजरी
मना ॥ तरीवरावेंशमना ॥ अथवाकरूनिकरुणा ॥ त्यावरुणावरींकीं ॥
॥ २०२ ॥ ऐसेंबोलतांभूपाळ ॥ कायबोलेतेवेल्हाळ ॥ कांहोबोलतांपा
ल्हाळ ॥ नामकुळसांगावें ॥ २०३ ॥ श्लोक ॥ बोलेनृपाळपुससीम-
जवंशनामें ॥ यावीणसांगतटलींतुझिंकायकामें ॥ आलोंसुधांशुमुखिजे
घटनाकराया ॥ तीतेंविचारुनिवरींसुरलोकराया ॥ २०४ ॥ घनाक्षरी ॥
बोलेसुंदरीतयासी ॥ स्ववंशनामनसांगसी ॥ तरिआह्मीपरपुरुषासीं ॥ व
दणेंमर्यादानोहे ॥ २०५ ॥ तिचापाहुनियांकोप ॥ कायबोलेनळभूप ॥
चंद्रवंशाचेंहेंरोप ॥ माझेंजाणराजसे ॥ २०६ ॥ महाजनाचाआ
चार ॥ निजनामाचाउच्चार ॥ करूंनयेहेंसाचार ॥ शास्त्राधार
आहेकीं ॥ २०७ ॥ पुन्हाबोलेतेसुंदरी ॥ चंद्रवंशीमहीवरी ॥ बहूआहे
ततेपरी ॥ नामेंघेतांजाणवे ॥ २०८ ॥ आर्या ॥ मीवासुदेवऐसें स्वना
ममुरहरवदेसकळवेदी ॥ आधारतोचिमानुनि निजाभिधानासिकवणन
निवेदी ॥ २०९ ॥ घनाक्षरी ॥ बोलेनैषधेंद्रवाचा ॥ नामहेजीवइंद्राचा ॥
कितीसाक्षेपनामाचा ॥ कायतेणेंकरिसीतूं ॥ २१०॥ केलाकायअंगीकार॥
बोलूंइंद्रासीनिर्धार ॥ तंवतेबोलेसुकुमार ॥ चंद्राकारवदनातें ॥ २११ ॥
श्लोक ॥ ऐरावतावरिबसोनिविमानदेशीं ॥जोसंचरेसुरपतीसुखसंपदेशीं ॥
मीभूमिकेवरिअसोनितयासकांहीं ॥ मागावयातरिकशीमजलाजनाहीं ॥
॥ २१२ ॥ घनाक्षरी ॥ नळावेगळाभ्रतार ॥ नलगेस्वप्नींहेंसाचार॥ऐसानि
श्चयविचार ॥ तंवराजेंद्रबोलतो ॥ २१३ ॥ टाकुनिइंद्राचासंभ्रम॥धरिशीकां

---

१ मदन. २ इच्छिण्यास योग्य आहे लीला जिशीं. ३ दूत. ४ साम्य. ५ यमाला.
६ हे चंद्रानने दमयंती. ७ जाणणारा.

तूंनळभ्रम ॥ जाईलविश्रामविभ्रम ॥ नसताश्रमहोईल ॥ २१४ ॥ तुझेंसौंदर्य पाहावया ॥ धरीसहस्राक्षकाया ॥ तयावरीदेवराया ॥ नळमायाटाकुनी ॥ ॥२१५॥ अथवातुजजोमोहला ॥ होऊंनेदीनैषधाला ॥ यास्तवत्याचइंद्राला ॥ माळगळांघालावी ॥ २१६ ॥ श्लोक ॥ येणेंपरीचअनळासियमाधिपासी ॥ पाशीसहीतरिवरींह्मणतांनृपासी ॥ आधारलेशनवदेनवसारसाक्षी ॥ होतेतयासिसुरनायकगुप्तसाक्षी ॥ २१७ ॥ ऐसाअवंचकवदोनिनृपाळ आला ॥ इंद्रादिकांसहिनिवेदितवृत्तजाला ॥ पाचारिलेमगमहींद्रविदर्भभूपें ॥ आलेसमस्तहिसभेसिसहर्षरूपें ॥ २१८ ॥ ओंव्या ॥ इंद्रादिकतेहीअधिप ॥ धरूनिआलेनळरूप ॥ सभेबैसलेअमूप ॥ जेथेंभूपशोभती ॥ २१९ ॥ आलानळहीभूपाळ ॥ कीर्तिरूपेंजोविशाळ ॥ तदादमयंतीविल्हाळ ॥ सखियांशींबोलते ॥ २२० ॥ नळराजहिरावरिला ॥ तोचिमनींम्यांधरिला ॥ सुरकिंवानरभला ॥ नवरींत्यातेंनिश्चयें ॥ २२१ ॥ ऐसेंबोलोनीसुंदरी ॥ बैसेशिबिकेभीतरीं ॥ आलीराजसभांतरीं ॥ बरोबरीशारदा ॥ २२२ ॥ बोलेशारदातियेला ॥ ऐकेंराजांच्यानामांला ॥ मनायेईलतयाला ॥ माळगळांघालींतूं ॥ २२३ ॥ श्लोक ॥ हाराजाऋतुपर्णनामधरिताहारावळीकंधरीं ॥ हाराहेशरयूसमीपनगरींहाराजसेआदरीं ॥ हाराजीवदलाक्षसद्गुणनिधीफाराजनाचामहा ॥ थाराहाचवरींरिपूंशिपरतेसारावयाचापहा ॥ २२४ ॥ येणेंपरीचबहुभूपनिवेदिजेले ॥ हीच्यामनासचनयेतिउगेचिठेले ॥ जेथेंवळीधरुनिपंचनळीबसते ॥ तेथेंविरंचितनयेसमवेतयेते ॥ २२५ ॥ घनाक्षरी ॥ बोलेशारदावचन ॥ येथेंबाईसावधान ॥ बरेंघालूनियांमन ॥ वरलाभेंसुखीहो ॥ ॥ २२६ ॥ श्लोक ॥ ज्याचींपदेंधरितिदेवशिरोललामीं ॥ स्वाराज्यतोमिरवितोगजराजगामी ॥ जोवज्रपाणिबहुलोचनकांतिभारी ॥ हा पाहिजेतरिवरींनळरूपधारी ॥ २२७ ॥ साहीलकोणसजणेबहुतेजयाचें ॥ मध्यस्थरूपधरितोहरिचेंयमाचें ॥ स्नेहाधरीअधिकहोयतमासिवारी ॥ हांपाहिजेतरिवरींनळरूपधारी ॥ २२८ ॥ संपूर्णतेसमजयास्तवदक्षिणाशा ॥ पाप्यासदंडधरितोकरितोविनाशा ॥ देहींजयामिरवतेघनकांतिभारी ॥ हांपाहिजेतरिवरींनळरूपधारी ॥ २२९ ॥ आधारहाचसजणेबहुजीवनाचा ॥ रक्षीदयेकरुनिमानऋषीजनाचा ॥ यादां

१ इंद्र. २ स्वर्गाधिपत्य. ३ इंद्र. ४ अग्नि. ५ यम.

सफारह्मणतीजनसौख्यकारी ॥ हाँ[1]पाहिजेतरिवरींनळरूपधारी ॥ २३० ॥ होतीलनंदनविलासजयासतोहा ॥ आहेधनंजयहिधर्महिजाणतोहा ॥ रत्नाकरींतुजविराजविताविहारी ॥ हाँ[2]पाहिजेतरिवरींनळरूपधारी ॥ २३१ ॥ शारदेसमगराजसुताहे ॥ शारदेंदु[3]वदनावदताहे ॥ शेवटीलनळहामजबाई ॥ मानलाबहुमनींसुखदाई ॥ २३२ ॥ ओंव्या ॥ तेंव्हांदमयंतीसुंदरी ॥ इंद्रादिकांनमस्कारी ॥ तयांबोललीउत्तरीं ॥ अमृतापरीसमधुर ॥ २३३ ॥ माझाभीमजैसापिता ॥ तैसेतुह्मीजीतत्वतां ॥ कराकन्यादानआतां ॥ नळनाथाचेकरीं ॥ २३४ ॥ श्लोक ॥ सुरसमस्तइच्यावरानिश्चयें ॥ सुरसमस्तअसेंवदलेस्वयें ॥ नळवराशिवरोनिसुखीअसें ॥ तुजनकोजनकोणह्मणेअसें ॥ २३५ ॥ मविचनासुखमनींकमनीयबाला ॥ मायेसहीविसरलीनपुसेचिबाला ॥ दूर्वादळींकदलिबंधमधूकमाळा ॥ तीणेंअलंकृतकरीनळकंठनाळा ॥ २३६ ॥ ओंव्या ॥ चौघेश्रेष्ठसुरेश्वर ॥ देतेझालेअष्टवर ॥ मस्तकींठेवोनीकर ॥ दोनदोनएकेकें ॥ २३७ ॥ देऊनियांतयावर ॥ स्वर्गभुवनागेलेसुर ॥ निराशहोऊनिनरेश्वर ॥ जातेझालेस्वस्थानां ॥ २३८ ॥ श्लोक ॥ नृपाळाचेमांडीवरिबसुनिमांडीहरिखते ॥ तयांपाहोंआलेजनसकळजालेहरिखते ॥ महावाद्येंनानानिनदहितनानामगघडे ॥ पितातीचापांटीभरधनहिवांटीबहुविडे ॥ २३९ ॥ ओंव्या ॥ नानापरींचेंमिष्टान्न ॥ चारीदिवसभोजन ॥ वधूवरेंमिरवून ॥ घरभरणीकराविली ॥ २४० ॥ राजानिरोपातेंघेत ॥ मगदमयंतीसमवेत ॥ आपुल्यानगरातेंजात ॥ नांदेआनंदभरें ॥ २४१ ॥ श्लोक ॥ लोकींसौरभकाव्यनाटककलालंकारचूडामणी ॥ सर्वांनैषधविद्वदौषधअसेविख्यातवाग्धोरणी ॥ हेत्याचीचटिकाटिकोनिघटिकाऐकेलजोआदरें ॥ बोलेत्यारघुनाथपंडितकवीभेटेहरीसादरें ॥ २४२ ॥ इतिरघुनाथपंडितविरचितनळदमयंतिस्वयंवराख्यानसमाप्त ॥

---

१ वरुण. २ नळ. ३ शरदृतूंतील पूर्णचंद्र.

# रामजोशी.

जन्मकाळ शके १६८४–इ० सन १७६२.
मरणकाळ शके १७३४–इ० सन १८१२.

**याचे प्रसिद्ध ग्रंथ.**

**अनेक प्रकारचीं लावण्यांच्या चालीचीं पदें.**

**त्यांतील कांहीं वेंचे.**

लावणी १.

दोदिवसांचीतनुहेसाचीसुरतरसाचीकरुनिमजा ॥ गमजाकरितांमानिंउमजानाहेंसुखनपुढेंपडेलवजा ॥ भाईसावधऱ्हा ॥ ध्रु० ॥ आजउद्यांचापूरनद्यांचावयलगद्याचाबहरनवा ॥ उलटच्याझाल्याकुलटारांडामगकोठिलहोमालपुवा ॥ थाटबसायापाटरुप्याचेंताटत्यामध्येंदूधरवा ॥ धनावयालाबसेलघसरामगाविसराहोगोडखवा ॥ रांडापोरेंवंचकचोरेंजंवरमिळवितांतंवरथवा ॥ शितेंतंवरतींभुतेंभोंवतींकोणकुणाचासखाजिवा ॥ जोंवरिपैसातोंवरिबैसामंचकिंह्मणतिलघ्यालहवा ॥ बेटबिटीहातींनरचटींदेतिलहाखूपसमजाठिवा ॥ पातयांतकींघातहोतसेहातजोडितोंहरिसिभजा ॥ फुकासुखालामुकालकाथितोंनकालचादिनआजदुजा ॥ दोदिवसांचीतनुहे० ॥ १ ॥ भाईसावधऱ्हा ॥ कनकधनाचामदमदनाचावोसरल्यावररंगफिका ॥ रुकानपदरींविकालघरमगविलासभरजारिकुठनदुका ॥ गजरथघोडाकलगीतोडापाईंजोडालालझुका ॥ तोडाजाउनखोडायेइलबसलयेखादाधरमधका ॥ सुगंधशालानरमदुशालागरममसालापानपका ॥ हारतुरेहेवरेनपुढतीबुरेहालखेळालवुका ॥ कोकशालानाटकशालादासीयांचाध्यालमुका ॥ क्रामुकहोउनिकांमुकतांपरमार्थसुखालादेहविका ॥ कदममुलाजायांतभुलाजातुह्मानलाजामानिंसमजा ॥ दूतयमाचेमूतआणितिलनेलातुमचाबापअजा ॥ दोदिवसांची० ॥ भाईसावधऱ्हा ॥ २ ॥ पुरेकरायामौजातेथुनिफौजाझाल्याचिरवाना ॥ यमदूताचींढालविनीवरवालसफेदीदेखाना ॥ पुढेंयमाचेखडेदूतहेबडेहरामीसमजाना ॥ मारमारादिलफारकुणिमलामामाकाकागोसाना ॥ रांडाआतांमांडाचाखिंतिखांडाह्मणति

लकराचुना ॥ मूलकुणाचेंभूलतुह्मालाचूलचालतीतंवरह्मणा ॥ तडकायेतिलसारेअडकाहुडकायालामरतांना ॥ पीठगिळेनामीठमिळेनाऐसेंकरितिलऐकाना ॥ वेडाहोइलपरिजनवेडाह्मणतिलपेढाआठिवजा ॥ अडालभूवरिपडालमगतुह्मिरडालनह्मणाकाळखुजा॥दोदिवसांची० ॥ भाईसावधव्हा ॥ ॥३॥ सुभाकरुनिमनसुभायेखादाउभाकरापरिवारभरा ॥ कायतुह्मालायांतसांचलेंआंतवाचलेंआयुधरा ॥ दारजनालाहारनगांचेभारमुलिसमुलग्यासतुरा ॥ द्यालपुन्हाजरिध्यालनदेतिलतुह्मांसित्यांतिलजराचुरा ॥ कांमरतांधनलोभेंफिरतांपुरतायाचाशोधकरा ॥ कोणतह्मालावालीतोवनमालीलाविलपैलतिरा ॥

पा ॥ नसार्थकलटक्यासाऱ्यागपा ॥ चा० ॥ हीवारवारतलवारयेइल कायपुन्हा ॥ ह्यादुर्लभनरदेहांतठेविशीकुन्हा ॥ भगवंतभुकेलाभक्तीचापाहुणा ॥ वर्मकळेनाधर्मघडेनाकर्मचित्तनाद्विधा ॥ सदाहरिकाविरायावरफिदा ॥ भलाजन्महातुलालाधला० ॥ ३ ॥

## लावणी ३.

जाउंनकारेविषयाटविचीवाटकठिणमोठी ॥ नागविलेकितिभलेगडचांनीअसंख्यजनकोटी ॥ ध्रु० ॥ याचवनामधिंभिल्लनांदतोकामनामत्याला । पंचशरानेंविश्वमोहिलेंठाउकसकळाला ॥ कामक्रोधादिकसांगातीजिंवितिकाळा [illegible] वागरापसरल्याकामिकरंगाला ॥ चा० ॥ भज

### लावणी ५.

क्षमातळींइजसमाननाहींउमामहेश्वरपुरी ॥ पुरीपडेनाकाशीमगइतरदासीनकोणअसीपंढरी ॥ ध्रु० ॥ पांडुरंगजगदंतरंगजीमाजिरंगलाधणी ॥ पार्श्विरमारखुमाईपृष्ठींतीराहीजशीसुखाचीखणी ॥ शेषशयनपटुवेषनिकटव्यंकटेशगणपतिगुणी ॥ उभादक्षिणद्वारींअतिभारीविठ्ठलविभुचेगुणगणगणी ॥ बाळकृष्णगोपाळरांगतोव्याळमुकुटमणिफणी ॥ अहातशिचतीभामाअतिवामविभुच्यानायिकांतहिरकणी ॥ दारधरुनिसहदारउभामैदारलिंगअंगणीं ॥ रंगशिळेवरिगातीकितिनाचतिगरुडस्तंभाकवंटाळुनी ॥ सभामंडपींउभारुनीभुजउभामरूसुतऋणी ॥ अहागरुडपाराचीकितिशोभात्याचीवर्णावीतरिकुणी ॥ चा० ॥ हामंडपनोहेविमानवरदाटला ॥ भूवैकुंठींचागगनानेंचाटिला ॥ ज्यामधेंसदोदितभगवज्जनदाटला ॥ कामादिकजळचरजमावचटफाटला ॥ क्षणयांतशिरतांवाटेभवआटला ॥ मगसहजचिउतरुनिपांडुरंगभेटला ॥ चा० ॥ ऱ्यादिसतिओवऱ्याऋषींच्यादऱ्यादुबाजूवरी ॥ सदाघोषनामाचागुणधामाचागुणघेतिकितिकअंतरीं ॥ क्षमातळीं० ॥ १ ॥

---

### वेणू.

कुंजांतवाजवीवेणू ॥ भोंताल्याचरतीधेनू ॥ किंउडतीरेणू ॥ सांवळासगुणजगजेठी ॥ ब्रह्मांडेंज्याचेपोटीं ॥ किंटेंकणकाठी ॥ देहुडापदाचीधाटी ॥ दिलियश्वदेनेंतुपरोटी ॥ किंबांधीपोटीं ॥ डोईसशिकेंलंगोटी ॥ काल्यानेंभरलीवाटी ॥ किंबोटेंचाटी ॥

---

## कितीएक कवींचीं पदें वगैरे.

### शिवरामस्वामीचीं पदें.

#### पद १.

संतदयाळकसे ॥ राजारंकजयासरिसे ॥ ध्रु० ॥ देउनिभेटीतोडितिमाया ॥ नेउनिदावितिनिजपदठाया ॥ १ ॥ संत० ॥ श्रवणींपाजुनिअमृतवाणी ॥ नेउनिदावितिचिन्मयखाणी ॥ २ ॥ संत० ॥ शिवरामाचेंअभिनवलेणें ॥ लेवविलेंमजपूर्णकृपेनें ॥ ३ ॥ संत० ॥

### पद २.

तेचिगतबाईआचारतिचेठाईं ॥ जाणिवेचाबोलआंगींयेऊंदिलानाहीं ॥ ध्रु० ॥ सत्कर्माचासडाबराघालुनियांद्वारीं ॥ माजघरचीवोजबरीदावि लोकाचारीं ॥ १ ॥ तेचि० ॥ निष्कामाचेचहूंकोनींसारविलेंघर ॥ सुरंग रंगरंगमाळघालीनिरंतर ॥ २ ॥ तेचि० ॥ घवघवितप्रेमकुंकूंलावुनियांभाळीं ॥ पूर्णानंदींशिवरामींविचरेवेल्हाळी ॥ ३ ॥ तेचि० ॥

---

## केशवस्वामींचीं पदें.

### पद ३.

धांवविभोकरुणाकरमाधवदेवदयानिधेदेवकीनंदन ॥ ध्रु० ॥ हेकरुणाकरदीनजनोद्धर ॥ हाभवदुस्तरयांतुनिउद्धर ॥ १ ॥ धांव० ॥ काममदादिकगां जितिहेअति ॥ धांवरमापतिसेवकहितकर ॥ २ ॥ धांव० ॥ जननमरण भयहरणकरिंत्वरें ॥ चरणिंशरणदृढकेशवकिंकर ॥ ३ ॥ धांव० ॥

### पद ४.

संतसमागमकराचिना ॥ शांतिदयामनिंधराचिना ॥ चिन्मयराघववराचिना ॥ झडकरिकांहोतराचिना ॥ १ ॥ संतसमागमकाशीरे ॥ क्षणभर वस्तिशिजाशीरे ॥ नासतिपातकराशीरे ॥ पावसिपरमपदासीरे ॥ २ ॥ कामतरूवरतोडावा ॥ संशयअवघामोडावा ॥ सर्वसमागमसोडावा ॥ केशवस्वामीजोडावा ॥ ३ ॥

---

## पदें रंगनाथाचीं.

### पद ५.

आह्मीनमुंत्याला, नमुंत्याला ॥ उपाधिनाहींज्याला ॥ ध्रु० ॥ संशयउरलानाहीं ॥ अवघाब्रह्मचिझालापाहीं ॥ १ ॥ आह्मी० ॥ स्वयंभुमुळचाआहे ॥ द्वैतपणासिगिळूनिराहे ॥ २ ॥ आह्मी० ॥ समूळअवघेंहरलें ॥ पूर्णनिर्गुणजयासिकळलें ॥ ३ ॥ आह्मी० ॥ रंगनाथगुरुपायीं ॥ ज्याचानिश्चयदुसरा नाहीं ॥ ४ ॥ आह्मी० ॥

### पद ६.

तोंवरितळमळरेतळमळरे ॥ नाहींभक्तीबळरे ॥ ध्रु० ॥ विवेकजागाकारिना ॥ जोंवरिशांतिजिवींदृढधरिना ॥ १ ॥ तोंवरि० ॥ उदंडकरितांकर्म ॥

चुकलापरब्रह्मिंचेंवर्म ॥ २ ॥ तोंवरि ० ॥ रंगनाथगुरुपायीं ॥ जोंवरिम नहेंमुरलेंनाहीं ॥ ३ ॥ तोंवरितळमळरे० ॥

पद ७.

तोयोगी ॥ विषयविरागी ॥ अंतरींनिःसंगी ॥ शमदमकरुणाआंगीं ॥ निजसुखअपुलेंभोगी ॥ नित्यानित्यविचारविलोकुनिदृश्यपदार्थत्यागी ॥ तोयोगी ॥ १ ॥ तोपाहे ॥ सर्वहिब्रह्मचिआहे ॥ निजबोधेंडुलताहे ॥ तर्जनगर्जनसाहे ॥ देहाभिमाननवाहे ॥ त्रिभुवनिंचाअधिपतिहोउनियां अखंडतन्मयराहे ॥ तोपाहे ॥ २ ॥ आघाती ॥ जोनढळेकधिंचित्तीं ॥ नचसोडीहरिभक्ती ॥ लेखीतनुधनमाती ॥ अनृतनयेवचनोक्ती ॥ लाभालाभस्तुतिनिंदासमतोकेवळनिजमूर्ती ॥ आघाती ॥ ३ तोज्ञानी ॥ सत्तासुखजोमानी ॥ चिद्रत्नाचीखाणी ॥ लावुनिऐक्यनिशाणी ॥ वेदजयालावाणी ॥ रंगातीतनिजरंगपदींजोखेळेअचळविमानीं ॥ तोज्ञानी ॥४॥

पद ८.

प्रपंचपरमार्थअंतरइतुकेंचिपार्था ॥ ध्रु० ॥ मातीघटपटतंतू ॥ भूषणकनकतसेजिवजंतू ॥ १ ॥ स्थाणुपुरुषअहिदोर ॥ शिंपीवरतीरजतविकार ॥ ॥ २ ॥ निजानंदींनानारंग ॥ उदकींउठतीजेंवितरंग ॥ ३ ॥

पद ९.

बोलणेंफोलझालें ॥ डोलणेंवायांगेलें ॥ ध्रु० ॥ चित्तींविषयाचाअभिलाष ॥ नाहींविश्रांतीचालेश ॥ मुखेंह्मणेनिर्विशेष ॥ परब्रह्मसंचलें ॥ १ ॥ बोलणें० ॥ श्रवणींदावीअष्टहिभाव ॥ ह्मणेमृगजळवतहेंवाव ॥ कवडीवेंचितांहीजीव ॥ तळमळकरीसर्वस्वें ॥ २ ॥ बोलणें० ॥ परोपदेशींपूर्णज्ञानी ॥ मोहममतामत्सरमनीं ॥ नागसेंरजैसाफणी ॥ डोलेपरीविषवदनीं ॥ ॥ ३ ॥ बोलणें० ॥ शब्देंब्रह्मकोणझालें ॥ अन्नह्मणतांकोणधालें ॥ शिकविलेंतैसेंबोले ॥ शुकपक्षीपैंजैसा ॥ ४ ॥ बोल० ॥ शिकलाकळाविद्याछंद॥ नाहींअंतरींनिर्द्वंद्व ॥ सहजपूर्णनिजानंद ॥ सर्वरंगींनपाहे ॥ ५॥ बोलणें०॥

पद १०.

भक्तासिभगवद्भजनें, भवसागरमृगजळवतरे ॥ ध्रु० ॥ चिद्विलासजगनगहेमीं, वस्तुत्वेंभेदातितरे ॥ अस्तिभीतिप्रियरुपआत्मा, तोनामरुपाविरहितरे ॥ होउनियांअनुभवऐसा, हरिभजनींअत्यद्भुतरे ॥ १ ॥ भक्तासि० ॥ जाळिलेंसंचितसमुळीं, ज्ञानाग्नीमाजीनिगुती ॥ क्रियमाणपूर्वप्र

वाहें, विधिपूर्वककर्मेंघडती ॥ निर्हेतुकनिरहंकारें, ब्रह्मार्पणसहजचि होती ॥ प्रारब्धकलेवरभोगी, साक्षीहाईश्वरमूर्ती ॥ २ ॥ भक्तासि० ॥ अहिकुंडलवत्तनुपाहतां, संतोषाविस्मयनवसे ॥ तैसेंयाविद्वद्वर्या, स्वरुपाहुनिआननभासे ॥ मृत्तिकेवरिकुल्लाळें ॥ घटकोंठुनिआणीलासे ॥ रंगलायानिजरंगीं, निर्विषयींसदानिंविलासे ॥ ३ ॥ भक्तासि० ॥

## पद ११.

चित्उदधीनिजरंग ॥ भासेजगदाकारतरंग ॥ ध्रु० ॥ मायामृगजळशाश्वतनसतां ॥ धांवतिजेंविकुरंग ॥ भासे० ॥ १ ॥ दृग्भ्रमयोगेंरज्जुनजाणे ॥ वाटेतीव्रभुजंग ॥ भासे० ॥ २ ॥ पुत्रकलत्रगणगोत्रमित्रधन ॥ गजरथधेनुतुरंग ॥ भासे० ॥ ३ ॥ सहजपूर्णनिजरंगींरंगुनि ॥ होयसहजभवभंग ॥ भासे० ॥ ४ ॥

---

# पदें एकनाथाचीं.

## पद १२.

तेंमननिष्ठुरकांकेलें ॥ जेंपूर्णदयेनेंभरलें ॥ ध्रु० ॥ गजेंद्राचेंहाकेसरसें ॥ धांवुनियांआलें ॥ तें० ॥ १ ॥ प्रल्हादाच्याभावार्थासी ॥ स्तंभींगुरगुरलें ॥ तें० ॥ २ ॥ पांचाळीच्याकरुणावचनें ॥ कळवळुनीआलें ॥ तें० ॥ ३ ॥ एकाजनार्दनपूर्णकृपेनें ॥ निशिदिनिंपदिंरमलें ॥ तें० ॥ ४ ॥

## पद १३.

जनकांनिंदीनानिंदीना ॥ तसेंचनिंदूद्याना ॥ ध्रु० ॥ निंदककारितीनिंदा ॥ निंदितिहरळींशिंपीकुंदा ॥ १ ॥ जन० ॥ कायचाढजनासी ॥ रतलोंसद्गुरुच्याचरणासी ॥ २ ॥ जन० ॥ एकाजनार्दनींभावें ॥ आह्मींकोणासींभांडावें ॥ ३ ॥ जन० ॥

---

# पदें अमृतरायाचीं.

## पद १४.

कोठेंनवजावें २ ॥ श्रीहरिलागींभजावें ॥ ध्रु० ॥ दोचोंदिवसांघाटा ॥ भरडुनिउदककरुनियांप्यावें ॥ १ ॥ कोठें० ॥ समयींआल्याअतितासी ॥ यथाशक्तीभोजनद्यावें ॥ २ ॥ कोठें० ॥ उठतांबसतांधामीं ॥ अमृतेश्वरासीध्यातचीजावें ॥ ३ ॥ कोठें० ॥

## पद १५.

संतपदाचीजोड ॥ देहरिसंतपदाचीजोड ॥ ध्रु० ॥ संतसमागमेंआत्म त्वाचा ॥ सुंदरउगवेमोड ॥ देहरि० ॥१ ॥ सुफलितकरुनीपूर्णमनोरथ ॥ पुरविशिजिविंचेंकोड ॥ देहरि० ॥ २ ॥ अमृतह्मणेरेहरिभक्ताचा ॥ शे वटकरिशीगोड ॥ देहरि० ॥ ३ ॥

## पद १६.

अखंडहरिहारविदारे ॥ बापांनोअखंडहरिहरिवदा ॥ कितिसेवालधनदु र्मदा ॥ रेबापांनोअखंडहरिहारिवदा ॥ ध्रु० ॥ कायरानांतआटल्यान द्या ॥ कायतरूह्मणतिफळनद्या ॥ कितिकांडोकांडिंमिरवालमुद्या ॥ गे लिआजचीघडिनयेउद्यां ॥ रेबापांनो० ॥ १ ॥ कायविदींतनमिळतिचिं ध्या ॥ कायनमिळेभोंपळादुध्या ॥ यातोयुक्तिशुकाच्यासुध्या ॥ वा चाएकोबाचापुस्तकअध्या ॥ रेबापांनो० ॥ २ ॥ कायपर्वतिंबुजल्या दऱ्या ॥ कायदुकाळपडलाकऱ्या ॥ कायमहर्गतृणाच्याबोऱ्या ॥ यातो वैराग्ययुक्तिखऱ्या ॥ रेबापां० ॥ ३ ॥ बाहुअसतांआपणापाशीं ॥ मगक शासपाहिजेउशी ॥ कायअडचणमहदाकाशीं ॥ ठायनेदिकायपृथ्वी कुशी ॥ रेबापांनो० ॥ ४ ॥ कायलोकिंदारवठेरोधिले ॥ कायनमिळतिजु नेजोंधळे ॥ ऐसेंटाकुनिदुर्मदआंधळे ॥ व्यर्थअमोलआयुष्यउधळे ॥ रेबा पांनो० ॥ ५ ॥ करजोडुनिअमृतविनवितो ॥ बाहुउभारोनिगर्जतो ॥ जोनिश्चयधरुनिबैसतो ॥ त्यालाघरींबसल्यारामदेतो ॥ रेबापांनो० ॥ ६ ॥

## पद १७.

यारे ॥ सज्जनजनहोयारे ॥ मनींधरुनिविनयारे ॥ होतोनाशवयारे ॥ यारे० ॥ नाहींयमासिदयारे ॥ हरिगुणवर्णनश्रवणमननकरूंकाशीहेचिगयारे ॥ या० ॥ १ ॥ कारे० ॥ जोडुनिबहुतटकारे ॥ संसारींअटकारे ॥ घडेकसीसुट कारे ॥ लोकप्रतिष्ठेसाठींदेशोदेशींकितिभटकारे ॥ कारे०॥२॥ जारे॥ श्री हरिलागिंभजारे ॥ श्रीगुरुलागिंभजारे ॥ निजगुजपरउमजारे ॥ अंतर मनसुखवृत्तिकरुनियांविषयसुखावरजारे ॥ जारे ॥ ३ ॥ सारे ॥ चि न्मयरसअसारे ॥ सद्गुरुलागिंपुसारे ॥ वाक्यत्द्दयिंगवसारे ॥ प्रत्यय किमपिनयेतरिक्षणभरिइच्छारहितबसारे ॥ सारे ॥ ४ ॥ थारे ॥ लोभ मनांतवृथारे ॥ ऐकाईशकथारे ॥ लागासंतपथारे ॥ अमृतेश्वरहरिभजनें चुकतीजननमरणचळथारे ॥ ५ ॥

पद १८.

होउनिगोसांवीगोसांवी ॥ हरिकथाचिपरिसावी ॥ ध्रु० ॥ गमननसे ज्यागांवीं ॥ तेथिलवाटकशासपुसावी ॥ होउनि० ॥ १ ॥ सुखेंमिळोखंबाइत ॥ अथवाभगवींहीनेसावीं ॥ होउनि० ॥ २ ॥ भिक्षामागुन निस्पृहतेनें ॥ सत्संगतिपोसावी ॥ होउनि० ॥ ३ ॥ दुर्वाक्येंसोसावीं ॥ आपणअमृतवृष्टिवर्षावी ॥ होउनि० ॥ ४ ॥

पद १९.

त्याचाहरिविकला, हरिविकला ॥ प्रेमेंहरिगुणशिकला ॥ त्याचा० ॥ ध्रु० ॥ दोचौदिवसांसेवी ॥ भाजीचुकाचाकवतसुकला ॥ त्याचा० ॥ ॥ १ ॥ कर्जनसेकोणाचें ॥ देण्याघेण्यापासुनिमुकला ॥ त्याचा० ॥ ॥ २ ॥ संतुष्टयदृच्छालाभें ॥ आनंदज्याच्यात्हृदयींपिकला ॥ त्याचा० ॥ ॥ ३ ॥ आधिंवदेअमृतेश्वर ॥ जोनरधनकामिनिवरथुकला ॥ त्याचा०॥४॥

पद २०.

अशाश्वतसंग्रहकोणकरी ॥ ध्रु० ॥ चिरगुटचिंध्याजोडुनिकंथा ॥ गोदडिहेचिवरी ॥ अशाश्वत० ॥ १ ॥नित्यनूतनदेइलमाधव ॥ भिक्षातेच्चिवरी॥ अशाश्वत०॥ २ ॥ कोणकरीघरसोपेमाड्या॥विवरींवस्तिवरी॥अशाश्वत०॥ ॥ ३ ॥ आत्मस्त्रीसुतपरकीहोती ॥ टेवितिभूमिवरी ॥ अशाश्वत० ॥ ४ ॥ अमृतह्मणेमजभिक्षाडोहळे ॥ उठतिअशालहरी ॥ अशाश्वत० ॥ ५ ॥

पद श्रीधराचें २१.

सखयारामा, विश्रांतितुझियेनामीं ॥ ह्मणउनिमजलानेत्वरेंनिजसुखधामीं ॥ ॥ सखया० ॥ ध्रु० ॥ अवचटसुकृतेंनरदेहाझालीभेटी ॥ पशुसुतजाया धनधामींप्रीतीमोटी ॥ माझींमाझींह्मणुनिम्यांधरिलींपोटीं ॥ यांच्यासंगेंभोगिल्यादुःखकोटी ॥ सखया० ॥ १ ॥ सोडुनिस्वहिताधांवलोंदिशादाही ॥ शववतझालोंमागुताकौतुकपाहीं ॥ परिखळजनहेनेदितीकवडीतेही ॥ परिहेआशापापिणीलाजतनाहीं ॥ सखया० ॥ २ ॥ जंववरिदृढतांतंववरि यातनुचीप्रीती ॥ जर्जरझाल्यानिंदकहेअवघेहोती ॥ यांचींदुःखेंतुजलामी सांगूंकीवी ॥ ह्मणउनियेतोश्रीधरकाकूळती ॥ सखया० ॥ ३ ॥

पदें आनंदतनयाचीं.

पद २२.

बरवेंसमजारेउमजारे ॥ कांकरवांगमजारे ॥ ध्रु० ॥ मायामयजगसारें ॥

अवघेंदोदिवसांचेंवारें ॥ बरवें ० ॥१॥ दाराधनसुतपोरें ॥ अवघींनागवणी समचोरें ॥ बरवें० ॥२॥ धरुनीपथपरभारें ॥ तरलाआनंदतनयविचारें ॥ ॥ बरवें०॥ ३ ॥

### पद २३.

ब्रह्मविचारकरा ॥ गडेहोब्रह्मविचारकरा ॥ध्रु० ॥ नश्वरमानुनिहेंभव वैभव ॥ पाहुनिमोहतरा ॥ गडेहो० ॥ १ ॥ श्रीगुरुचेंचरणामृतसेवुनि ॥ कांहींविरागधरा ॥ गडेहो० ॥ २ ॥ आनंदतनयह्मणेहेंनिजचिंतुनि ॥ मीपणहेंविसरा ॥ गडेहोब्रह्मविचारकरा ॥ ३॥

### पद भैरवी राग.

### पद २४.

रतहरिपदकमलकंदसेविंमनोभ्रमरा ॥ ध्रु० ॥ दुष्टदैत्यदमुनिदेतनिजभक्ताथारा ॥ द्रुततरमनिंधरुनिभावसांडिंभवपसारा ॥ रत० ॥ १ ॥ शुकसनकादीकमुनीजपतिज्याआधारा ॥ सुरवरमुनिगातिमुखेंनित्यनिराकारा ॥ रत० ॥ २ ॥ पावनपदरजेंकरुनिगौतममुनिदारा ॥ निशिदिनिंआनंदतनयगायवेदसारा ॥ रत० ॥ ३ ॥

### पद २५.

दाखवींदिव्यपायदयानिधेरामा ॥ ध्रु० ॥ हीनदीनआसतुझी, कासपूर्णआह्मां ॥ धरावयापाहतसेअगाघनश्यामा ॥ दाखवीं० ॥ १ ॥ मायबापबंधुगोत्र, मित्रतूंचिआह्मां ॥ तूजवीणकोणअसेसांगसख्यारामा ॥ दाखवीं० ॥ २ ॥ सखयाआनंदतनयह्मणेगुणग्रामा ॥ शीणभागहरींत्वरें पुसोनियांघामा ॥ दाखवीं० ॥ ३ ॥

### पद २६.

कांरेनाठविशीकमलनयनवासुदेव ॥ ध्रु० ॥ जपतिजयासंतसनक ॥ सकळजनाजनानिजनक ॥ कांरे० ॥ १ ॥ कलुषहरणविमलचरित ॥ करुनिनिजानंदभरित ॥ कांरे० ॥ २ ॥ विचरेआनंदतनय ॥ ह्रदयींधरुनिनंदतनय ॥ कांरे० ॥ ३ ॥

### पद २७.

त्यांचासंगनकोमजलागीं ॥ त्यांच्यातोंडालागोआगी ॥ ध्रु० ॥ वरिवरि वचनेंलागतिगोड ॥ अंतरिंदुर्बुद्धीचामोड ॥ त्यांचासंगनको० ॥ १ ॥ भजतांश्रीरामाचेपाय ॥ मध्येंकरितीअंतराय ॥ त्यांचासंगनको० ॥ २ ॥

घेउनसौजन्याचेंसोंग ॥ साधितिजारणमारणयोग ॥ त्यांचासंगनको० ॥ ॥ ३ ॥ भजनींदावुनियांविश्वास ॥ व्यसनींघालितिजेविश्वास ॥ त्यांचासंगनको० ॥ ४ ॥ अखंडजनानिंदेतेंध्याय ॥ आनंदतनयवदेकविराय ॥ त्यांचासंगनको० ॥ ५ ॥

## पद २८.

साजणीगेमाझेमर्निचें, हितगुजहेंऐकेंबाई ॥ ध्रु० ॥ लाजकायधरुनीआतां, भयलौकिककरणेंकाई ॥ वेधलेंचमानसमाझें, नचळेहेंदुसरेठाईं ॥ होइनरामाचीदासी ॥ भावेंवंदिनपादासी ॥ स्वशिरामीठेविनपाईं ॥ ॥ साजणी० ॥ १ ॥ कांमहेशचापचढाया, पणकेलामाझ्यातातें ॥ रामचंद्रओढिलकैसा, नवपल्लवकोमलहातें ॥ नवसातुह्मिसांवशिवातें ॥ नवसारसलोचनयातें ॥ नुचलोपरिवरिलेंअपुलेठाईं ॥ साजणी० ॥ २ ॥ यामनासिआलामाझ्या, शरकार्मुकपाणीराजा ॥ कामनाचिदुसरीनाहीं, कृतनिश्चयजालेंभाजा ॥ सकळातुह्मीगाजावाजा ॥ नकरामातेसवदाजा ॥ नमतेंमीतुमच्यापाईं ॥ साजणी० ॥ ३ ॥ पाहतांचिराघवडोळां, मनतन्मयझालेंमाझें ॥ लाहतांचिप्रेमविसावा, मजजालीनजगींलाजे ॥ रमतेंमनदेवनरामी ॥ नमनींमनदेवनरामी ॥ ह्मणतोआनंदसुताचास्वामी ॥ साजणी० ॥ ४ ॥

## पद विठ्ठलकवीचें २९.

